स्त्रीजीवन

साने गुरुजी



3579

स्त्रीजीवन

साने गुरुजी

प्रस्तावना
डॉ. रा. चिं. ढेरे

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे ३०.

➢ ISBN 81-7418-121-0
Strijivan (MARATHI)
Sane Guruji

➢ © सर्व हक्क सुरक्षित

➢ **प्रकाशक**
शाम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३, शनिवार पेठ, पुणे ३०

➢ मुद्रक
प्रमोद विष्णु नापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०

➢ **प्रकाशन दिनांक**
२४ डिसेंबर १९९८
साने गुरुजी जन्मशताब्दी

➢ मूल्य शंभर रुपये

दोन शब्द :

स्त्रियांनी स्वत:चे असे सुंदर अभिजात वाङ्मय निर्मिलेले आहे. कहाण्या, ओखाणे, गाणी, ओव्या, हे सारे स्त्रीवाङ्मय आहे. कहाण्यांना तर प्रो. पोतदार यांनी लहान लहान उपनिषदेच म्हटले आहे. या कहाण्यांचा माझ्यावर अपार परिणाम झालेला आहे. माझ्या लिहिण्यातील सहृदयता व साधेपणा कहाण्यांपासून मला मिळालेला आहे. कहाण्यांचा मी ऋणी आहे. ओखाणेही फार काव्यमय असतात. सूचकता हा जर काव्याचा आत्मा असेल तर हे ओखाणे उत्कृष्ट काव्यांचे नमुने म्हणून समजायला हरकत नाही. स्त्रियांची लहानमोठी हजारो गाणी आहेत. त्यात पौराणिक आख्याने आहेत. काही काही वटसावित्रीसारखी अतिपवित्र प्रदीर्घ गाणी कोणत्याही महाकाव्याच्या तोडीची आहेत. वटसावित्रीचे गाणे बी.ए. च्या मराठीच्या अभ्यासाला अवश्य ठेवण्यासारखे आहे.

परंतु ज्या वाङ्मयात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला आहे असे वाङ्मय म्हणजे ओवीवाङ्मय. जात्यावर दळताना, पाळणा हलवताना, मुलाला खेळवताना, थोपटताना, झोपाळ्यावर झोके घेताना या ओव्या सहजस्फूर्तीने रचल्या गेल्या आहेत. या ओव्यांतील अकृत्रिम सहृदयता अपूर्व आहे. या ओव्यांत वत्सलतेचा सिंधू आहे. कोठे कोठे विनोदाची सुंदर छटाही आहे. इतरही रस इतस्तत: मर्यादेने उभे आहेत.

एकीच्या ओवीने दुसरीला सुचली असे पुष्कळदा या ओव्यांची निर्मिती होताना झालेले असावे. उदाहरणार्थ, "बोरीबंदरावरी। मड्डम खाते केळे" अशी ओवी एकीने म्हटली, की, दुसरी म्हणे, "बोरीबंदरावरी। मड्डम खाते पेरू" तिसरी म्हणे, "मड्डम खाते बिस्किट" काळी चंद्रकळा, तिन्हीसांजा झाल्या, पहिली माझी ओवी, सासरचे बोल, दृष्ट, लक्ष्मी की आली, वगैरे प्रकार आले की लागोपाठ त्याच प्रकारच्या ओव्या भराभर येतात. मुली झोपाळ्यावर बसलेल्या असाव्यात आणि असे हे काव्यनिर्मितीचे गोड प्रकार होत असावेत. या ओव्या तोंडोतोंडी

आलेल्या आहेत. आणि सदैव त्यांत भरच पडत आलेली आहे. महाराष्ट्रातील बायका दळताना, कांडताना ओव्या म्हणतात, असे फार प्राचीन-सातव्या-आठव्या शतकातील - उल्लेख आहेत.

या ओव्यांत पुष्कळशा ओव्या साडेतीन चरणी आहेत. काही चार चरणी आहेत. साडेतीन चरणी दुसऱ्या व तिसऱ्या चरणांचे अंती यमक असते. चार चरणांत दुसऱ्या व चौथ्या चरणाच्या शेवटी यमक असते. चार चरणी बहुधा जात्यावरच्या असतात. या ओव्या म्हणण्याचे विशिष्ट प्रकार आहेत. ते बायकांपासूनच शिकावे व ऐकावे. काही चाली अती गोड असतात. ओव्यांच्या शेवटी बहुधा कोणाचे तरी नाव घालायचे असते. म्हणणाऱ्याने आपल्या आवडीचे कोणाचेही घालावे. मी गोपूबाळ व उषाताई ही दोन नावे बहुतेक सर्व ओव्यांतून घातली आहेत. वाचकांनी तेथे वाटेल ती घालावी.

कहाण्या, ओखाणे, गाणी, ओव्या व लोककथा यांचा बालपणापासून मला फार हव्यास. माझे वडील फार उत्तम गोष्टी सांगणारे म्हणून प्रसिद्ध होते. लहानशी गोष्ट असावी, परंतु ते अर्धा तास, तासभर पुरवीत. आम्हाला हसवीत, रडवीत, बोध देत. माझ्या आईच्या आईला वटसावित्री येत असे. सावित्री व्रताचे वेळी ती म्हणायला जात असे, व घरीही म्हणत असे. मी ते गाणे जिन्यात बसून ऐकत असे. माझ्या दुसऱ्या एका आजीला अशीच सुंदर गाणी येत होती. आजी व आई दळीत असल्या म्हणजे मी पुष्कळ वेळा "माझ्या नावाच्या ओव्या म्हणा" म्हणून हट्ट धरून बसत असे. मग आजी, काकू शेवटी शेवटी पंढरीनाथ असे माझे नाव घालून ओव्या म्हणत. त्या ओव्या माझ्या कानात आजही गुणगुणत आहेत.

शाळा-कॉलेजांत असताना, जर्मनीतील ग्रिम् बंधुद्वयाप्रमाणे आपणही महाराष्ट्रभर हजारो खेड्यांतून हिंडावे, गाणी, ओव्या, ओखाणे, गोष्टी हे वाङ्मय जमा करावे असे माझ्या मनात येत असे. 'मराठी साहित्याचा फकीर' हे ध्येय मनात येई. मुक्तेश्वरांनी 'एकेक अक्षराची भीक' मागून अमर वाङ्मय निर्मिले. मी निर्माण न करू शकलो, तरी असे अमर वाङ्मय मरू लागले आहे, नष्ट होऊ लागले आहे, ते संग्रहीत करावे, असे वाटे. परंतु मनातील हेतू सारे थोडेच साध्य होतात! आणि ध्येय तरी का सदैव एक असते? लहान मुलाला यात्रेत दिसेल ते घ्यावेसे वाटते, तद्वत माझी स्थिती आहे. हे करावे, ते करावे, सारेच वाटते. आणि म्हणून कोठलेच नीट होत नाही व त्यामुळे हृदय फाटते व चित्त दाटते.

मी कधी कोठे गेलो व मायबहिणी भेटल्या तर ओव्या म्हणायला सांगत

असे. परंतु टिपून घेत नसे. १९३१ पासून टिपून घेऊ लागलो. १९३४ मध्ये ज्यांच्याकडे मी लहानपणी पुण्याला शिकायला होतो त्या माझ्या उंबरगावच्या डॉ. काशीनाथ रामचंद्र जोशी यांच्या आई श्रीमती सुभद्राबाई जोशी यांच्याजवळून मी पुष्कळ टिपून घेतल्या. 'लग्नातील सांगा, दृष्टीच्या सांगा, पावसाच्या सांगा' मी असे सुचवी व त्यांना आठवत. जवळ जवळ ४०० ओव्या त्यांचेजवळून मी घेतल्या. पुढे अलिबागेस माझी बहीण ती. सौ. लक्ष्मीबाई भिडे ही आहे. आमची ही सर्वांत मोठी बहीण, एकुलती बहीण. मी तिला ओव्या विचारी, ती सांगे. ती मग शेजारच्या शेजीबाईंना बोलवी व "आमच्या अण्णाला सांगा ओव्या" म्हणून प्रार्थी. मग काय तेथे लहानमोठ्या मायबहिणी जमायच्या व मी भराभर टिपून घ्यायचा. सांगता सांगता कधी त्या गहिवरत, कधी थोड्या लाजत, कधी हसत. मी म्हणायचा, "काय छान आहे ही ओवी." त्यांना आनंद वाटे, व उत्साह येई. माझ्या बहिणीच्या मुलीही ओव्या गोळा करू लागल्या व आणून देऊ लागल्या. जवळ ज़वळ १२०० ओव्या मला तेथे मिळाल्या. बडोद्याला माझी मावशी आहे व मामी आहे. तेथे मी सुरू केला प्रचार. दुपारी तांदूळ वगैरे निवडताना शेजारच्या बायका जमत व मी माझी वही-पेन्सिल घेऊन बसे. जवळ जवळ २०० ओव्या मजज़वळ नसलेल्या मिळाल्या. अंमळनेरला १००-२०० मिळाल्या. आणि कोकणातील माझ्या पालगड गावी जवळ जवळ १०० ओव्या मिळाल्या. असा हा अडीच हजार ओव्यांचा संग्रह जमा होऊन पडला होता. त्याचे वर्गीकरण वगैरे करायला वेळ कोठून होणार?

'सह्याद्रि' मासिकातील सईचे लग्न, 'प्रतिभे'मध्ये आलेल्या ओव्या, 'शालापत्रक', 'आनंद', 'खेळगडी' वगैरे मासिकांतून लोकगीते या सदराखाली येणाऱ्या ओव्या यांचा संग्रह मला करता आला नाही. मला वेळच नाही. माझ्या संग्रहातील काही ओव्या त्यातून येऊन गेल्या असतील. काही नसतील. 'न्हाणुलीच्या ओव्या' वगैरे छोटी पुस्तके मी लहानपणी पाहिली होती. परंतु आता वेळ झाला नाही. परंतु मला वेळ न झाला तर जो कोणी मराठी साहित्याचा उपासक असेल त्याला माझ्या या संग्रहाचा उपयोग होईल.

अडीच हजार ओव्यांचे मी निरनिराळे प्रकार पाडले. भाऊबहिणींच्या, मायलेकरांच्या, मुलगीसंबंधी, संसारातील सुखदुःखे, हे चार प्रकार पहिल्या भागात देत आहे. दुसऱ्या भागात पौराणिक, ऐतिहासिक, सृष्टिवर्णनपर, तीर्थक्षेत्रे, पुरे-पट्टणे, पहिली माझी ओवी, सुभाषिते व संकीर्ण असे प्रकार आहेत.

पहिल्या भागात जवळ जवळ दीड हजार ओव्या आल्या आहेत. उरलेल्या हजारांचा दुसरा भाग आहे. प्रत्येक प्रकाराला मी रसपरिचय जोडला आहे. तो धावता आहे. दिग्दर्शक आहे. ओव्या म्हणजे आपले काही तरी, असे कोणास वाटू नये म्हणून तसे केले आहे.

या ओव्यांतील माधुरीबद्दल मी काय सांगू? त्यांतील भावनोत्कटतेविषयी काय लिहू? माझी बहीण ओव्या सांगताना रडली आहे.

माझें कीं आयुष्य उणें करी रे गणराया
घाल सखीच्या चुडेया मनुताईच्या

ही ओवी सांगताना तिचे डोळे पाण्याने भरले. आई आपले आयुष्य मुलीच्या नवऱ्याला देत आहे. केवढा प्रसंग! "मला भावाच्या ओव्या फार आवडतात" माझी बहीण म्हणायची. येवले, मुंबई, अहमदाबाद, अंमळनेर वगैरे शहरी या ओव्यांवर गणेशोत्सवात वगैरे मी व्याख्याने दिली. काव्यमय ओव्या ऐकून स्त्री-पुरुष लहानथोर माना डोलवीत व सद्गदित होत, हे मी पाहिले आहे. माझ्या वह्या पाहावयास मागत. बायका व मुली विचारीत, कोठून आणल्यात ह्या ओव्या? मी उत्तर देई, "हे तुमचेच जुने ठेवणे आहे. तुम्हाला मी देत आहे."

अंमळनेरचे एक शिक्षक या ओव्या वाचीत होते. त्यांच्या बहिणीचे, नुकतेच लग्न झाले होते. मुलगी सासरी जात आहे. भाऊ 'ये हो' म्हणत आहे. सासरचे हाल वगैरे ओव्या ते वाचू लागले व रडू लागले. मी त्यांस विचारले, "काय झाले?" ते म्हणाले, "आताच बहिणीचे लग्न झाले. अनुभव ताजा आहे." आगगाडीतून नगरकडे जाताना एक गृहस्थ डब्यात होते, त्यांनी वाचायला ओव्या घेतल्या होत्या. शेवटी म्हणाले, "कधी होईल पुस्तक? कोठे मिळेल?" मी म्हटले, "छापणार आहे लवकरच. सर्वत्र मिळेल." धुळ्याहून मालेगावला मोटारीतून जात होतो. शिरपूरचे एक तरुण होते. लॉरीत. मजजवळून त्यांनी वही घेतली. ते तन्मय होऊन वाचीत होते, दोनदोनदा म्हणत होते. शेवटी मला म्हणाले, "पुरे, आता वाचवत नाही." 'मन्वंतर' मासिकात बहीण-भावंडांच्या ओव्यांचा व मायलेकरांच्या ओव्यांचा रसपरिचय जानेवारी व फेब्रुवारी १९४० च्या अंकांतून देण्यात आला होता, अमळनेरच्या किती तरी भगिनींनी ते अंक घरी आणून वाचले. अमळनेरला श्री. अनंतराव गुप्ते म्हणून एक प्रसिद्ध सज्जन वकील आहेत. त्यांना त्यांच्या आप्तमित्रांकडून 'मन्वन्तरा'चे हे अंक वाचा अशी पत्रे आली. आणि सुप्रसिद्ध कलावान हंस पिक्चर्सचे श्री. विनायक कर्नाटकी यांचे कोल्हापूरहून एक दिवस

मला अचानक पत्र आले ते मुद्दाम देतो :

३१ जानेवारी १९४०

गु. साने गुरुजी यांचे सेवेशीं

सादर प्रणिपात -

आपली व माझी ओळख नाही! माझं दुर्दैव की यापूर्वी मी आपले लिखाणही वाचू शकलो नाही! अगदी अनपेक्षित 'मन्वन्तरा'चा अंक हातीं आला! 'मायलेकरे' या लिखाणातील रस चाखू लागलो! वाचता वाचता अक्षरश: हृदय भरून आले. मला न कळता डोळ्यांवाटे अश्रू वाहू लागले! जो भेटेल त्याला मी सांगितले, हे लिखाण वाचा! पोथी-पुराण वाचून पापंसुद्धा धुतली जातील असं आपण वाचतो. पण हे वाचताना या मंगल बालवेदांच्या पठणाने ती धुतली जातात असा प्रत्यक्ष अनुभव येऊ लागतो! वात्सल्यानं हृदय भरून येतं! आसमंतात मांगल्य दरवळून येतं!

विद्वत्तेने भरलेल्या पुस्तकांतून-ग्रंथांतून जी कल्पना येत नाही ती हिंदुधर्माच्या संपन्न हृदयाची कल्पना आपल्या या लेखांकांतून येत आहे. जिला आपण 'आपली संस्कृती, आपली संस्कृती' म्हणून डोक्यावर घेऊन नाचायला हवं ती ही!

आपल्या संस्कृतीची ही संपदा विसरली जात आहे! आपण ही संपदा गोळा करून आम्हांला दाखवीत आहात! आम्ही सदैव तुमचे ऋणी राहू!

आपला नम्र,

'विनायक'

हंस पिक्चर्स, कोल्हापूर.

आपण सारे त्या मायबहिणींचे ऋणी राहू या. त्यांनी 'माझे नामरूप हारपी' या वृत्तीने हे वाङ्मय निर्माण केले. श्री. विनायकांसारख्या, कलेशी तन्मय झालेल्या कलोपासकाचा या ओव्यांवरील हा अभिप्राय आहे.

मी तर केवळ निमित्तमात्र आहे. या ओव्या ऐकताना जणू माझी समाधी लागे. या वाचताना मी वेडा होतो. वेळ असला, म्हणजे हे वेद वाचतो. पुन:पुन्हा वाचतो. ज्या आईने व आजीने लहानपणी ही गोडी लाविली, त्यांचे हे उपकार.

ज्या भगिनींनी मला या ओव्या आनंदाने सांगितल्या, त्यांचे मी कसे आभार मानू! मुले रडत आहेत, घरात कामे आहेत, तिन्हीसांजा होत आलेल्या तरीही मला

ओव्या सांगत त्या बसत. माझ्या मित्राची आई श्री. सुभद्राबाई आज नाहीत. त्यांच्या स्मरणशक्तीसारखी अपूर्व स्मरणशक्ती मी पाहिली नाही. त्यांना 'नवनीत' किती तरी पाठ. किती गाणी येत, किती ओव्या येत. त्यांना मीही आईच म्हणत असे. मातृहीनाला मला त्यांनी सतत मातृप्रेम दिले. त्यांचे आज कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो. त्यांनी किती ओव्या दिल्या. नंतर अलिबागची माझी बहीण ती. सौ. लक्ष्मीबाई भिडे, नंतर तिच्या मुली सौ. रंगुताई रिसबूड, सौ. सुंदराताई गोगटे, सौ. मनुताई थत्ते, कु. कमल भिडे; बहिणीच्या उदार व प्रेमळ शेजारिणी सौ. भागीरथीबाई फाटक, सौ. उमाबाई देवधर, श्री. लक्ष्मीबाई घारपुरे, कु. रंगू नवरे व सौ. भागीरथीबाई नवरे; गं. भा. राधाबाई ओक, गं. भा. गंगाबाई फडके, गं. भा. सईबाई मोघे; बडोद्याची माझी मावशी श्री. सखुबाई आपटे व मामी श्री. रुक्मिणीबाई परचुरे व त्यांच्या मैत्रिणी आणि शेजारिणी, माझ्या कोकणातील पालगड गावच्या ती. सौ. अन्नपूर्णाकाकू साने, ती. सौ. जानकीवयनी साने, कै. ती. सौ. लक्ष्मीबाई साने, सौ. कमलाबाई डिंगणकर, श्री. कुशाताई जोशी, श्री. बहिणाबाई ओक, गं. भा. चंद्रूताई करंदीकर व करंदीकर घराण्यातील आणखी भगिनी, माझ्या आईची चुलती श्री. भागीरथीबाई परचुरे. माझ्या वैनीच्या बहिणी श्री. अंबू पेंडसे व श्री. शकुंतला व तिच्या भावजया, सौ. कमलाबाई जोशी वगैरे; अंमळनेरच्या सौ. माई वैद्य व इतर काही मुली; अशा किती तरी लहान-मोठ्या मायबहिणींपासून मी ओव्या गोळा केल्या. काहींची नावे मला आठवत नाहीत परंतु त्यांचे कृतज्ञ स्मरण आहे. या सर्व भगिनींचा मी ऋणी आहे. हा संग्रह त्यांनी मला दिला व मी लिहिला. त्यांनी दिलेल्या ओव्यांच्या भावभक्तीने मी लेखक झालो.

या ओव्या ब्राह्मणवर्गात प्रचलित असलेल्या आहेत. प्रत्येक जातीत व निरनिराळ्या जिल्ह्यांतून अशा हजारो ओव्या असतील. नगरला मी एक दिवस अगदी उजाडत जात होतो, तर एक मुसलमान बाई 'मिय्या बिबी बोले' वगैरे चरण असलेली ओवी म्हणत होती. नवरानावरी गावी मी आश्रमात होतो तेथे शेजारी असलेल्या मुसलमान मायबहिणी गंगाजमुनांच्या ओव्या दळताना पहाटे म्हणत. खानदेशात चहाडी येथे पहाटे किसान बाया दळताना ओव्या म्हणत असत. मी ऐकल्या होत्या. त्या त्या जातीतील सुखदुःखे, अनुभव त्यांच्या त्यांच्या ओव्यांतून असणार. हे सारे वाङ्मय जमा केले पाहिजे. सर्व जातीतील मायबहिणींजवळून प्रेमस्नेहाने मिळविले पाहिजे. 'स्त्रीजीवना'ची शेवटची प्रत माझी वैनी मरणशय्येवर असताना मी करीत होतो. वैनी मरणशय्येवर असतानाही मी

तिला म्हणे, ''वैनी, आठवते का एखादी ओवी?'' ती प्रयत्न करी व म्हणे, ''भावजी, नाही आठवत हो'' परंतु एके दिवशी तिने एक ओवी सांगितली. मरणाचे आधी दोनच दिवस.

पालगड गावाचा टाकी लावून रस्ता फोडा
रंगीत गाडी धाडा भाईरायाला।।

भावाला आणण्यासाठी रस्ता दगडाधोंडाळ म्हणून गाडी पाठवता येत नसेल. तर दगड फोडून रस्ता तयार करा व भावाला गाडी पाठवा. अशी ही भ्रातृप्रेमाची अमर ओवी तिने मला दिली. मरता मरताही माझ्या वैनीने अमर स्त्रीवाङ्मय दिले. तिच्या आत्म्याला प्रणाम.

'स्त्रीजीवन' या नावाऐवजी 'स्त्रीहृदय' असे नाव असते तर चांगले झाले असते असे काही मित्र म्हणाले. परंतु आधी 'स्त्रीजीवन' हे नावच छापले गेले. त्यांची सूचना अधिक यथार्थ होती. 'स्त्रीजीवन' हे पुस्तक मुलींच्या शाळांतून तरी सर्वत्र जाईल व आपल्या मायबहिणी असे अमर वाङ्मय निर्मीत हे पाहून मुलींना स्फूर्ती येईल व नवीन जीवनावर त्या नवीन वाङ्मय निर्मितील अशी मी आशा बाळगतो.

'स्त्री जीवना'तील 'बहीणभाऊ' व 'मायलेकरे' या ओव्यासंबंधीचे रसपरिचयात्मक लेख 'मन्वन्तर' मासिकाने आधी प्रसिद्ध करून जनतेचे लक्ष वेधून घेतले याबद्दल त्यांचे आभार मानतो. श्री. दयार्णव कोपर्डेकर यांच्या उत्साही पत्नी चि. सौ. कमल कोपर्डेकर स्त्रियांच्या अभिमानाने हे पुस्तक प्रकाशावयास पुढे आल्या म्हणून त्यांनाही धन्यवाद.

२४-२-४०
लिमयेवाडी, सदाशिव पेठ, पुणे २. साने गुरुजी

टीप - दुसऱ्या भागाच्या प्रारंभी 'दोन शब्द' या शीर्षकाने साने गुरुजींनी लिहिलेले चार-पानी प्रास्ताविक (ता. २७-११-१९४०) पुस्तकातील विषयाशी साक्षात संबंध नसल्याने या आवृत्तीत पुनर्मुद्रित केले नाही. त्यात प्राधान्याने पहिल्या भागाच्या प्रकाशनानंतर उमटलेल्या अनुकूल प्रतिक्रया आणि 'मानीयेला भाऊ!' 'जातीचा मुसलमान!' या ओवीविषयी एका श्रोत्याने व्यक्त केलेल्या संदर्भात हिंदु-मुस्लिम-बंधुभावाचे आपले अनुभव यांचा समावेश आहे.

- प्रकाशक

मौखिक ओवी : एक टिपण

डॉ. रामचन्द्र चिन्तामण ढेरे

मराठी लोकसाहित्याच्या अध्ययनाला महाराष्ट्रात विद्यापीठीय प्रतिष्ठा मिळण्यास नुकताच प्रारंभ झाला आहे. अशा वेळी पू. साने गुरुजी यांनी रसपरिचयासह संपादिलेल्या 'स्त्रीजीवन' या ओवीगीतसंग्रहाची नवी आवृत्ती प्रकाशित होत आहे, याचा मला विशेष आनंद वाटतो. 'स्त्रीजीवन' हा संग्रह १९४० मध्ये दोन भागांत प्रकाशित झाला आणि त्यानंतर त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्यापूर्वी १९३८ मध्ये चोरघडे-कालेलकरांनी 'साहित्याचे मूलधन' प्रकाशित करून स्त्रीगीतांच्या, स्त्रीमुखीच्या ओवीगीतांच्या रसपरिचयाच्या प्रणालीचा पाया घातला होता. परंतु "साने गुरुजींनी रसपरिचयाच्या मर्यादा एका व्यक्तीपासून वाढवून आणि काही वेळी अलग करून, सबंध कौटुंबिक वातावरण निर्माण केले. व्यक्तिजीवनाहून कुटुंबजीवन श्रेष्ठ व सुंदर आणि कुटुंबजीवनापेक्षा समाजजीवन उच्चतर, अशा भावनेने त्यांनी ओव्यांची विभागणी करून वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाचा कोपरान् कोपरा भावनांच्या दीप्तींनी उजळून काढला." (लोकसाहित्याची रूपरेखा, पृष्ठ ५०५)

लोकगीतांतील जे अंग सहजसुन्दरतेने, नादानुकारितेने, रसमयतेने मंत्रित झाले होते, त्याची मोहिनी लोकसाहित्याच्या अध्ययनक्षेत्रात प्रथम कविवर रवींद्रनाथ ठाकुरांना पडली होती. त्यांनी लोकसाहित्याकडे, लोकगीतांकडे या रसिक दृष्टीने पाहिले. लोकसाहित्याकडे, विशेषत: स्त्री गीतांपैकी ओवीगीतांकडे या हळव्या दृष्टीने पाहण्यास गुरुजींची प्रकृती अत्यंत अनुकूल होती. दुर्गाबाईंच्या शब्दांत सांगायचे झाले तर, "गुरुजींचे हळवेपण त्यांची श्रद्धा कुठल्याही स्त्रीला मागे हटवील इतकी स्त्रीनिष्ठ आहे. तिला कुठल्याच वाङ्मयात तोड नाही. आणि म्हणूनच त्यांची शैली लोकप्रिय होऊन तिचे वारेमाप अनुकरण झाले व होत आहे. पण गुरुजींच्या लिखाणाने या विषयावरच्या विशेषत: ओवी किंवा लोकगीतावरच्या मांगल्यपूरित भावुकतेचा शेवटला टप्पा गाठला आहे. भारतीय संस्कृतीच्या पूजकांनी लोकसाहित्य हे संस्कृतीचे गमक मानले. व म्हणून लोकसाहित्यही आदर्श व मंगलमय अशा धारणा बाळगल्या गेल्या, टागोरांपासून ते साने गुरुजींपर्यंत हे सूत्र

अबाधित राहिले व अजूनही त्यांचे शिष्य-प्रशिष्य तेच करीत आहेत.''

गुरुजींच्या 'स्त्रीजीवना'च्या निर्मितीमागील प्रेरणा लोकसाहित्याच्या अभ्यासाची नव्हती, असे म्हटले तरच गुरुजींना न्याया मिळाल्यासारखे होईल. गुरुजींच्या भावपिंडाशी संवादी असे जीवनात, इतिहासात आणि वाङ्मयात त्यांना जे जे आढळले, ते ते त्यांनी हळवेपणाने वेचले. सांभाळले. गौरविले. 'स्त्रीजीवना'च्या दुसऱ्या भागाच्या प्रास्ताविकेत त्यांनी स्वत:च म्हटले आहे की, ''मी तर मांगल्यावर श्रद्धा ठेवणारा नम्र प्राणी आहे. आणि जे जे मंगल मला दिसेल ते ते सर्वांसमोर लेखणीने, वाणीने ठेवण्याची मी खटपट करीन.'' या त्यांच्या विधानात त्यांची स्त्रीगीतांच्या संकलन-आस्वादनामागील मनोभूमिका अगदी नि:संदिग्ध स्वरूपात प्रकटली आहे.

याचाच अर्थ असा की, लोकसाहित्याची जी अंगे गुरुजींच्या भावपिंडाशी संवादी नव्हती, त्यांच्याकडे ते वळलेच नसते. एवढेच नव्हे, तर स्त्रीमुखींच्या ओवीगीतामध्ये प्रतिबिंबित झालेल्या समाजजीवनाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास करणे शक्य आहे, याचे भान असूनही ते तशा अभ्यासाच्या खटपटीत पडले नाहीत, ''माझे मित्र भाई गोरे या सर्व ओव्यांचा अभ्यास करून समाजस्थितीविषयक एक निबंध या दुसऱ्या भागात घालण्यासाठी देणार होते; परंतु त्यांना वेळ झाला नाही.'' अशी खंतही त्यांनी दुसऱ्या भागाच्या प्रास्ताविकात नोंदविलेली आहे.

गुरुजींची ही भूमिका पाहता 'स्त्रीजीवना'च्या प्रभावाने मराठी लोकसाहित्याच्या अध्ययनक्षेत्रात शास्त्रीय दृष्टीचा लोप होऊन 'गहिवर संप्रदाय' फोफावला, यात गुरुजींकडे मुळीच दोष जात नाही. महाराष्ट्रात ज्ञानप्रांतातील अनेक अज्ञात वाटा रुळविण्याचे प्रयत्न सुरू झाल्यावर राजवाडे, केतकर, चापेकर यांसारख्या ज्ञानमहर्षींनी लोकसंस्कृतीच्या अभ्यासाची शास्त्रीय दृष्टी पोसण्याचे महनीय कार्य केलेले असूनही, त्याचे विस्मरण जर पुढल्या पिढ्यांना पडले असेल, तर तो आपल्या करंटेपणाचा भाग आहे असे मानावे लागेल.

साने गुरुजींचा भावपिंड आणि त्याच्याशी संवादी अथवा विसंवादी वास्तव - यांच्यासंबंधी उदाहरण देऊन सांगायचे झाले तर पुढील दोन ओव्या पाहाव्या -

चैताच्या महिन्यांत । देव जोतिबा वेडापिसा ।।
पाठीच्या भैनींसंगं । लगीन लावुनी गेला ।।

चैताच्या महिन्यांत । देव जोतिबा आवागला ।।
पाठीच्या बहिणीसंगं । गेला लगीन लावायला ।।

या ओव्या गुरुजींच्या मांगल्यनिष्ठेला उद्ध्वस्त करणाऱ्या ठरल्या असत्या; या ओव्यांच्या उपलब्धीने त्यांच्यासारख्याच्या भावपिंडाला हादरे बसले असते; परंतु लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्रधान साधन आहे, या जाणिवेने त्यांचा अभ्यास करू पाहणाऱ्या मानवशास्त्रीय दृष्टीच्या या अभ्यासकाला मात्र या ओव्यांची उपलब्धी नि:संशय आनंददायी आहे; एका पुरातन युगातील समाजविशेषाचे रहस्य उलगडण्यास उपकारक ठरणारी आहे; कित्येक सहस्रकांपूर्वीच्या जीवनाचा एक जिवंत अवशेष (living fossil) दाखविणारी आहे.

ओवीगीतांच्याच आणखी एका अलक्षित अंगाचे उदाहरण पोतराजांच्या मुखीच्या ओव्यांचे देता येईल. पोतराज या ओव्यांना 'वह्या' म्हणतात. ववी, वई, वही ही 'ओवी' या संज्ञेचीच उच्चारभेदाने घडलेली रूपांतरे आहेत हे उघड आहे.

आली आली मरीबया । कोण्या राजाला पावली ।
धजा मोत्याची लावली । धुरपताबाई ।।

अशा थाटात पोतराज या वह्या गातो. "यांची रचना ओव्यांसारखी असते. पोतराजांच्या या गीतांचे स्वरूप स्त्रीगीताशी इतके मिळते जुळते आहे की पोतराज स्त्रीगीतेच म्हणतात असे वाटते." असे या 'वह्यां'च्या संदर्भात डॉ. प्रभाकर मांडे यांनी म्हटले आहे. ('लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', पृ. २७-२८) खरे तर यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पोतराज हा वेषांतराने 'स्त्री' बनलेला देवीचा उपासक असल्यामुळे त्याच्या मुखी स्त्रीगीते नांदणे हे त्याच्या भूमिकेशी संवादीच ठरते. वेषांतराने 'स्त्री' बनलेला पोतराज काय आणि लिंगच्छेदनाने 'स्त्री' बनलेला हिजडा काय, दोघेही मातृदेवतांच्या उपासनाक्षेत्रातील एका महान स्थित्यंतराचे जिवंत पुरावे आहेत. मातृदेवतांच्या उपासनाक्षेत्रात प्रथम केवळ स्त्रीचेच अनन्यसाधारण स्थान होते; पुरुषाला तिथे प्रवेश करण्यास संपूर्ण मज्जाव होता. जर पुरुषाने हा निषेध मोडला तर त्याचे स्त्रीत रूपांतर होईल, असे भयही होते. पुरुषाने हा निषेध मोडून मातृदेवतांच्या अधिष्ठानात प्रवेश मिळविला, तो स्त्री बनूनच! पुढे कालांतराने निषेधभयाचे कृष्णमेघ विरून गेले, तरी समाजजीवनात युगानुयुगे, क्षीण स्वरूपात का होईना, त्या स्थित्यंतराचा अवशेष राहिला. वर्तमान दृष्टीला ओंगळ वाटणारा, हिडीस भासणारा! गुरुजींच्या

मांगल्यमंत्रित दृष्टीला या अवशेषांचे अध्ययन मानवले नसते; पण शास्त्रीय दृष्टीच्या अभ्यासकांना त्यांचे स्वागतच करावे लागेल.

साने गुरुजींची ओवीगीतांच्या अध्ययनाची दृष्टी आणि त्यांचा वारसा सांगणाऱ्या लोकसाहित्याच्या अभ्यासकांची झालेली फसगत यांची ही चर्चा थांबवून आपण आता ओवीच्या उगमाचा थोडा विचार करू.

'जात्यावर बसले की ओवी सुचते,' अशी एक म्हण आहे. या म्हणीतील लक्षणे काहीहीं असली, तरी जाते आणि ओवी यांचा संबंध तिच्यामध्ये निर्दिष्ट आहे, हे उघड आहे. स्त्रियांच्या मुखी असणारी ओवीगीते ही दळणकांडणाच्या वेळी, श्रम विस्मरणासाठी निर्माण झाली आहेत, याचा प्रत्यय चालू पिढीपर्यंत निदान ग्रामीण जीवनात तरी आपण घेतलेला आहे. स्त्रियांच्या मौखिक ओवीचा आणि दळण-कांडणाचा संबंध आपणास इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून अनुमानिता येतो. जैनांच्या बृहत्कल्प सूत्रभाष्यामध्ये आलेला पुढील प्राचीन उल्लेख प्रस्तुत संदर्भात महत्त्वाचा आहे -

जइ कुट्टिणीउ गायंति विस्सरं साइयाऊ मुसलेहि ।
विलवंत सु सकलुणं हय हियय किमाकुलीभवसि ।।

(जिथे पीडित होऊन कुट्टिनी मुसळे घेऊन, कारुण्यपूर्ण गीते आळवून विस्वर म्हणत असतात तिथे हत हृदया, तू का आकुल होतोस?)

इथे स्त्रियांच्या कारुण्यपूर्ण गीतांचा आणि कांडणाच्या क्रियेचा संबंध स्पष्ट आहे. ही गीते ओवीगीतेच होती, असे मानायला या उल्लेखात आधार नसला, तरी पुढे यादवकालापासून मिळणाऱ्या प्रमाणांमध्ये महाराष्ट्रातील स्त्रिया कांडणाच्या वेळी ओवीगीते गात असत, असे निःसंदिग्धपणे म्हटले आहे. सोमेश्वर नृपतीच्या 'मानसोल्लास' या ग्रंथात (इसवी सनाचे अकरावे-बारावे शतक) स्त्रियांच्या मौखिक ओवीविषयी जे निर्देश आहेत, ते ओवीच्या उत्पत्तीवर विशेष प्रकाश टाकणारे आहेत -

'उवि' शब्देन सा चान्ते कार्या स्याद् 'ओविका' बुधैः ।
'गोत्रेलेंगोलिनिह्मंवि अचलयलुतो मझपडिहे
कन्नोस चलूलादि उविए ।।२०।।
इष्टतालेन गातव्यं सानुप्रासं पदद्वयम् ।
इयमप्योविका प्रोक्ता प्रान्ते 'उवि' -पदं यदि ।।२२।।
त्रिपदी षट्पदी चैव धवलो मङ्गलस्तथा ।

'उनी' च चर्चरी चर्या राहड दन्तिका तथा ।।५४९।।
त्रिपदी कण्डने चैव शृङ्गारे विप्रलम्भके ।
प्रायः शस्त्रिभिरेवैषा गेया नानार्थभूषिता ।।५५१।।
महाराष्ट्रेषु योषिद्भिरोवी गेवा तु कण्डने ।
होलाके चच्चरी गेया राहडी वीरवर्णनम् ।।५५३।।

('मानसोल्लास', विनोदविंशति, अध्याय १६ गीतविनोद)

सोमदेवाने ओवीचे 'उवि', 'ओवी' व 'ओविका' असे तीन नामपर्याय वापरले आहेत. ओवीगीत हे त्रिपदी-स्वरूप असल्याचे म्हटले आहे. त्याचा विनियोग महाराष्ट्रातील स्त्रिया कांडणाच्या वेळी करतात. अशी स्पष्ट नोंद केली आहे आणि विशेष म्हणजे या रचनेच्या शेवटी 'उवि' शब्द ओवलेला असतो. (म्हणून या विशिष्ट रचनेला 'उवि' अथवा 'ओवी' म्हणतात.) अशी ओवीची व्युत्पत्तीही दिली आहे.

सोमदेवाच्या ओवीविषयक माहितीला शार्ङ्गदेवाच्या 'संगीत रत्नाकरा'त (इसवी सनाचे तेरावे-चौदावे शतक) पुष्टी मिळते -

खण्डत्रयं प्रासयुक्तं गीयते देशभाषया ।
'ओवी' -पदं तदन्ते चेत् 'ओवी' तज्ज्ञैस्तदीरिता ।।३०६।।
त्रयाणां चरणानां स्युरेकाद्या वृत्तितो भिदाः ।
आदिमध्यान्तगैः प्रासैरेकाद्यैश्च पदे पदे ।।३०७।।
छन्दोभिर्बहुभिर्गेया ओव्यो जनमनोहराः ।
सानुप्रासैस्त्रिभिः खण्डैर्मण्डिता प्राकृतैः पदैः ।।३०८।।

('संगीतरत्नाकर' प्रबंधाध्याय)

शार्ङ्गदेवानेही येथे प्रासयुक्त खण्डत्रय (यमकयुक्त तीन चरण) आणि अन्ती 'ओवी' पदाचा वापर-असेच ओवीचे लक्षण आणि 'ओवी' संज्ञेचे कारण विशद केले आहे. ही देशभाषेतील 'जनमनोहर' ओवीगीते स्त्रिया दळणकांडणाच्या वेळी मौखिक परंपरेने सांभाळीत होत्या. तरीही त्यांच्या लोकप्रियतेमुळे कलाविषयक 'संस्कृत' ग्रंथरचना करणाऱ्यांना या 'प्राकृत' गीतांची दखल घेणे भाग पडले, ही घटना महत्त्वाची आहे. ओवीगीताच्या प्रभावाचा हा प्रबळ पुरावा आहे.

चरणत्रय खंडत्रय अथवा त्रि-पदी हे मौखिक ओवीच्या रचनेचे जे स्वरूप सोमदेव आणि शार्ङ्गदेव यांनी सांगितले आहे, ते अगदी यथार्थ आहे. आजही स्त्रियांच्या मुखी त्रिपदी स्वरूपाची म्हणजे तीन-चरणी आदिम ओवी टिकून आहे,

याची आपण मुद्दाम नोंद घ्यायला हवी. डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनी मराठवाड्यातील ओवीगीतांची तीन संकलने संपादिली आहेत, त्यात अशा तीन-चरणी अनेक ओव्या समाविष्ट असल्याचे आढळून येते -

तुमच्या जीवापायीं । व्हईन आगाशीची धार ।
तुम्हावरी हेतू फार ।।
तुमच्या जीवापायीं । व्हईन वनींचं हरन ।
तुम्हांभवती चरन ।।
तुमच्या जीवापायीं । माझ्या जीवाची व्हती लाही ।
नाहीं विलाज करू काई ।।

('मराठीची माया' पृ. ७५)

या तीनचरणी ओव्या स्त्रिया म्हणतात कशा, ते पाहिले म्हणजे त्रिपदांच्या अंती येणाऱ्या 'उर्वी' या पदाचीही आपणास स्पष्ट कल्पना येते आणि सोमदेव-शाङ्र्गदेवाने दिलेले ओवीचे लक्षण सर्वांशाने पटते. उपरिनिर्दिष्ट तीन-चरणी ओवी जात्यावर म्हणताना-

तुमच्या जीवापायी । व्हईन आगाशीऽऽची धार।
तुम्हावरीं हेतू फाऽर - ग उइया ऽ।।

तिसऱ्या चरणात 'ग उइया' यासारखा सूर लांबवण्याची ही जी लकब ओवीगायनात आढळते, तीच सोमदेव-शार्ङ्गदेवाने नेमकेपणाने टिपली आहे. ओवीच्या व्युत्पत्तीविषयी राजवाड्यांपासून विनोबांपर्यंत अनेक थोर अभ्यासकांनी अनेक कल्पना पुढे मांडल्या आहेत. खरे तर सोमदेव-शार्ङ्गदेवांची ही ओवीविषयक चर्चा विद्वानांच्या पुढे सतत आहे; तरीही ओवीच्या व्युत्पत्तीच्या बाबत त्यांचे यथार्थ प्रतिपादन का दुर्लक्षिले गेले, ते कळत नाही.

त्रिपदात्मक ओवीचें सोमदेव-शार्ङ्गदेवाचे विवरण सादर करून, डॉ. ना. ग. जोशी यांनी आपल्या 'मराठी छंदोरचना' या ग्रंथात ओवीच्या अंती येणाऱ्या 'ओवीं' शब्दाच्या बाबतीत 'गळ्यावर म्हणण्याच्या ओवींत ही लकब कानाला जाणवते' असे वस्तुस्थितिनिदर्शक विधान करूनही पुढे ओवी शब्दाच्या उगमाविषयीची राजवाडे, वेलणकर, कत्रे इत्यादी विद्वानांची मते सादर केली आहेत आणि अखेरीस म्हटले आहे की, 'प्रत्यक्ष वापरला जाणारा ओवणे' हा धातू किंवा जुना 'ओवणिका-ओवाणिका' हा शब्द यावरूनच ओवी व्युत्पादिणे योग्य होय. राजवाड्यांचे मत या दृष्टीने अधिक ग्राह्य आहे.'' (पृ. १३१) डॉ. जोशी हे सत्याच्या जवळ

येऊनही पुन्हा दूर का गेले, ते कळत नाही.

डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनाही सोमदेव-शार्ङ्गदेवाच्या त्रिपदात्मक ओवीचे स्वरूप हे प्राचीनतम वाटते. ओवीचे हे आदिम स्वरूप त्यांच्या तीनही ओवी-संग्रहांत प्रतिबिंबित झाले आहे. त्यांनी सोमदेव-शार्ङ्गदेवाची ओवी लक्षणे सादर करून त्या अनुरोधाने म्हटले आहे की, "ओवी ही तीन पदांची प्रासयुक्त रचना असते, तिन्ही चरणांच्या अंती अर्थात् यमक असते. आणि चवथा चरण पुन्हा घोळून म्हणावयाचा असतो. आजच्याही स्त्रीगीतांतील बहुसंख्य ओव्यांची रचना तीन चरणांचीच आहे; पण त्या चरणासमवेत चवथाही एक चरण येतो. तो बहुधा नातेवाचक असतो. भाई राजस नेनंती प्राणसई दैसाईराजा इत्यादी. हा चरण पुनःपुन्हा आवर्तनाप्रमाणे फिरतो." ('मराठीचा मोहोर' प्रस्तावना, पृ. १८-१९)

डॉ. जोशींप्रमाणेच डॉ. नांदापूरकरही सत्याच्या जवळ येऊन दूर गेले आहेत असे वाटते. हा जो आवर्तनांप्रमाणे फिरणारा चरण आहे तो चौथा चरणच (अध चरण) आहे. तो ओवीच्या विकासाचा पहिला टप्पा मानावा लागेल. तीन चरण आणि त्यानंतर शेवटी 'उवी' हे पद -- असे आदिम ओवीचे अगदी स्पष्ट लक्षण आणि नाम-निर्वचन सोमदेव-शार्ङ्गदेवांनी केलेले आहे; त्या स्वरूपाच्या तीन-चरणी ओव्या डॉ. नांदापूरकरांच्या तीनही संग्रहांत समाविष्ट आहेत; 'घोळून म्हणावयाचे' अथवा 'म्हणण्याच्या लकबीत' जाणवणारे 'उवी' हे पद मौखिक ओवी अक्षरबद्ध करताना कोणी नोंदवून ठेवले नाही इतकेच.

तीन-चरणी आद्य मौखिक ओवी पुढे साडेतीन-चरणी चार-चरणी आणि साडेचार चरणी कशी झाली, तिने अभंगाला आणि ग्रांथिक ओवीला जन्म कसा दिला आणि प्राचीन मराठी वाङ्मयविश्वावर अधिराज्य कसे गाजविले हा इतिहास ओवीच्या वैभवाचा द्योतक असला तरी प्रस्तुत संदर्भात आपणास त्याचा विचार कर्तव्य नाही.

ओवीच्या प्रत्येक चरणातील अक्षरांची संख्याही नियमित नसते. कधी ती ६ ते ८ इतकी असते तर कधी १०-११ इतकी असते. अक्षर संख्येच्या या अनियमिततेमुळे ओवी-गायनातही विविधता येते आणि छन्दोभिर्बहुभिर्गेया (अनेक छंदांत गायली जाणारी) असे एक तिचे लक्षण सांगावे लागते.

- अशी ही स्त्रीहृदयातून उमललेली स्त्रीमुखातून दरवळत राहिलेली मधुगंधी ओवी साने गुरुजींच्या मातृत्वपूजक मन:पिंडाला मोहवीत राहिली आणि त्यांनी तिच्या पाकळीपाकळीतील रंग-रस-गंधाचा स्वतः अनुभव घेऊन इतरांनाही उत्कटतेने

दिला. लोकसाहित्याच्या महनीयतेकडे मराठी जनांनी आकृष्ट व्हावे यासाठी गुरुजींचा हा प्रयत्न नि:संशय उपकारक ठरला. परंतु लोकसाहित्याची महनीयता केवळ त्याच्या लहानशा अंगातील ओवीगीतातील भावमयतेत नसून, समाजजीवनाचे सकुल, संमिश्र आणि जटिल असे आविष्कार प्रतीत करून देणाऱ्या त्याच्या अफाट साधन-समृद्धीत आहे. याचे भान लोकसाहित्याच्या सच्च्या अभ्यासकाने राखायला हवे, हे पू. साने गुरुजींच्या पावन स्मृतीला स्मरून मी पुन:पुन्हा सांगत आहे. हे भान ठेवले नाही, तर त्यांच्या आत्म्याला व्यथा होतील. त्यांचा वारसा विपरीत स्वरूपात उचलण्याने आपण यांच्यावर अन्याय करीत आहोत, असे कळवळून सांगावेसे वाटते. मराठी लोक-साहित्याचा अभ्यास विद्यापीठीय पातळीवर सुरू होण्याच्या प्रसंगी नव्या अभ्यासकांनी हे भान राखावे आणि साने गुरुजींसारख्या सत्त्वसंपन्न व्यक्तीला 'गहिवर संप्रदाया'च्या प्रवर्तनाच्या अपश्रेयातून सोडवावे; अशी अपेक्षा व्यक्त करून हे टिपण संपवतो.

डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे

□□

दोन शब्द

साने गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभी 'स्त्री-जीवन' या संग्रहाची नवी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे, याचा मला फार आनंद वाटतो. साने गुरुजी स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात अनेक गावी गेले. तेथे मायबहिणी भेटल्यावर साने गुरुजी त्यांना ओव्या म्हणायला सांगत आणि त्या टिपून घेत. १९३२ सालच्या स्वातंत्र्य चळवळीत साने गुरुजी नाशिक तुरुंगामध्ये शिक्षा भोगत होते. त्या वेळी त्यांच्या भोवती जमणाऱ्या राजबंद्यांना या पैकी काही ओव्या ते म्हणून दाखवीत. या अनुभवांसंबंधी साने गुरुजींनी लिहिले आहे : "नाशिक जेलमध्ये असताना बहिण-भावंडांच्या प्रेमाच्या या ओव्या मी म्हणून दाखवित होतो अणि पश्चिम खानदेशातील सुप्रसिद्ध कळकळीचे तरुण कार्यकर्ते, माझे मित्र श्री. नवलभाऊ पाटील यांचे डोळे भरून आले होते. ते मला म्हणाले, "गुरुजी माझ्या डोळ्यातून क्वचितच पाणी

येते. परंतु आज माझ्या डोळ्यांतून तुम्ही पाणी आणले. माझा रडू न येण्याचा अहंकार आज दूर झाला.'' मी म्हटले, ''ही शक्ती माझी नव्हे. स्वतःचे अनुभव ज्या स्त्रियांनी सहृदय भाषेत उत्कटपणे ओतून ठेवले त्या स्त्रियांच्या अनुभवपूर्ण व जिवंत अशा या ओव्यातील ही शक्ती आहे.''

१९३२ साली सत्याग्रहात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांपैकी आता बोटावर मोजण्याइतकेच हयात आहेत सुदैवाने साने गुरुजींनी ज्यांचा प्रेमाने उल्लेख केला आहे ते नवल आनंदा पाटील आज ९० वर्षे ओलांडल्यावर अद्यापही तरुण कार्यकर्त्यांना मायेची सावली देत आहेत. साने गुरुजी पश्चिम खानदेशात फिरताना नवल आनंदा पाटील यांच्या घरी, नावरी या गावी राहात. साने गुरुजी नवलभाऊंना धाकटे भाऊच मानत. या दोघांची उत्कट मैत्री साने गुरुजींच्या अखेरीपर्यंत कायम होती. आयुष्यभर नवलभाऊ साने गुरुजींच्या शिकवणीप्रमाणे वागले. एक महिन्यापूर्वी त्यांचा मला निरोप आला, ''साने गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये 'स्त्री-जीवन' हे पुस्तक छापून घ्या. मला ते पुस्तक ग्रामीण भागात वाटायचे आहे.'' मी त्यांना कळविले की 'स्त्री-जीवन' ची नवी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे यावर त्यांचे मला लागलीच पत्र आले. त्यात त्यांनी लिहिले, ''साने गुरुजी, आमचे नावरी गाव, मी आणि या ओव्या यांचा फार जवळचा संबंध होता.'' त्यांचे हे भावपूर्ण पत्र वाचल्यावर मला दोन शब्द लिहिल्यावाचून राहवेना.

माझे मित्र श्री. श्याम कोपर्डेकर यांनी साने गुरुजींच्या 'स्त्री जीवन' ची नवी आवृत्ती काढली आणि लोक साहित्याचे गाढे अभ्यासक आणि थोर संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या सुंदर प्रस्तावनेच्या सोबत मला दोन शब्द लिहिता आले याबद्दल श्री. कोपर्डेकर यांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

- ग. प्र. प्रधान

नगर वाचनालय, सातारा.

१ : बहीणभाऊ

रसपरिचय

या प्रकरणात बहीणभावासंबंधीच्या ओव्या दिल्या आहेत. या रसाळ व प्रेमळ ओव्या वाचून ज्याचे हृदय उचंबळणार नाही असा माणूस क्वचित असेल. बहिणीचे भावासाठी हृदय किती तुटते, तिचे त्याच्यावर किती प्रेम, भावाचे वर्णन करताना तिला साऱ्या उपमा कशा कमी वाटतात, ते सारे या ओव्यांत पहावयास मिळेल. सासरी गेलेली बहीण माहेरच्या प्रेमासाठी, भावाच्या भेटीसाठी, त्याच्याकडून निरोप वा पत्र यावे यासाठी कशी अधीर झालेली असते ते या ओव्यांतून फार सुरेख रीतीने दाखविले गेले आहे. पावसाळा संपत आलेला असावा, नदी-नाले शांत झालेले असावेत, शेतेभाते पिकलेली असावी, दिवाळी जवळ आलेली असावी. मग बहिणीचे डोळे भावाकडे लागतात. ती म्हणते :

"पूर ओसरले, नदीनाले शांत झाले
अजून कां न भाई आले बहिणीसाठीं ।।
नवरात्र गेलें दसरा दूर गेला
नेण्याला कां न आला भाईराया ।।"

इतर भाऊ आपल्या बहिणी नेतात. बहिणींना आणण्यासाठी प्रेमळ भाऊ रंगीत गाड्या पाठवतात. ते सारे पाहून जिचा भाऊ येत नाही तिच्या जिवाची फार तगमग होते. त्यात शेजारच्या बायका आणखी विचारू लागतात :

"शेजी मला पुसे येऊन घडी घडी
कधीं माहेराची गाडी येणारसे ।।"

असे कोणी विचारले म्हणजे फारच वाईट वाटते. घरात मुलेही विचारू लागतात, "आई, केव्हा ग मामा येईल?" आई काय उत्तर देणार? ती मामाची बाजू घेते. "बाळांनो, त्याला काम असेल, नाही तर आल्याशिवाय राहता ना" असे सांगते:

"मुले पुसताती येई ना कां ग मामा
गुंतला कांहीं कामा माय बोले ।।"

ती असे उत्तर देते. परंतु तिच्या मनाचे त्याने समाधान होत नाही. तिचा भाऊ आजारीबिजारी तर नसेल असे तिच्या मनात येते. परंतु या मनातील दुष्ट शंकेचे ती स्वतःच निरसन करते. माझा भाऊ आजारी असता तर हा वारा शीतल व सुगंधी असा येता ना, असे ती म्हणते. किती सहृदय व रम्य कल्पना :

"दूरच्या देशींचा शीतळ वारा आला
सुखी मी आईकीला भाईराया ।।
दूरच्या देशींचा सुगंधी येतो वात
असेल सुखांत भाईराया ।।"

वाऱ्याच्या गुणगुणण्यात तिला सारी कुशल वार्ता मिळते, दुसरे कोठले पत्र, कोठला निरोप?

भाऊ खुशाल आहे. मग का येत नाही? तिला नाना शंका येतात. लहानपणी मी चावा घेतला, दादाने भातुकलीचे दाणे खाल्ले म्हणून मी त्याला बोलले, ते आठवून का दादा येत नसेल? परंतु ती म्हणते :

"अपराध पोटीं प्रेम थोरांचें घालित
येई धांवत धांवत भाईराया ।।"

भाऊ बहिणीवर रागावेल ही कल्पनाच तिला असह्य होते. कस्तुरीचा सुगंध कधी सरत नाही, चंद्र कधी प्रखर होत नाही, सोने सडत नाही, आकाशाचा रंग बदलत नाही. किती सहृदय उपमा व दृष्टान्त :

पाठच्या बहिणीवरी भाऊ का संतापेल
कस्तुरी का सोडील निज वास ।।
पाठच्या बहिणीवरी भाऊ कसा रागावेल
चंद्र आग का ओकेल कांहीं केल्या ।।
पाठच्या बहिणीवरी भाऊ कसा हो रुसेल
कधीं सोनें का कुजेल कांहीं केल्या ।।
पाठच्या बहिणीवरी भाऊ का रागावेल
रंग ना बदलेल आकाशाचा ।।

भाऊ माझ्यावर रागावणे अशक्य, मग माझ्या पतीवर का रागावला आहे? मागे आला होता एकदा न्यावयाला, तर यांनी पाठवले नाही मला. पुन्हा कशाला

नगर वाचनालय, सातारा.

येईल दादा अपमान करून घ्यायला? परंतु बहिणीच्या समाधानासाठी दादा का ते विसरणार नाही?

आपलेच ओठ दादा आपलेच दांत
थोर सारे विसरत मागील रे ।।

तिचे आईबाप नसतात. आईबाप गेले म्हणजे कोठले माहेर असे लोक म्हणतात. ते का खरे होणार? मरताना मायबाप बोलले ते का दादा विसरेल?

शेवटील शब्द आई तुला जे बोलली
काय विस्मृति पडली त्यांची दादा ।।
ताईला प्रेम देई तिला रे तूंच आता
माय बोले मरता मरता दादा तुला ।।

या ओव्या वाचता वाचता कोणाचे डोळे भरून येणार नाहीत? स्त्रियांच्या अंतरंगातील हे थोर दर्शन आहे.

बहिणीला ओवाळणी घालावी लागेल म्हणून तर भावाला चिंता नसेल ना पडली? अरे, बहीण का पैशासाठी भुकेलेली असते?

लागेल घालावी फार मोठी ओवाळणी
चिंता काय अशी मनी भाईराया ।।
नको धन नको मुद्रा नको मोतियाचा हार
देई प्रेमाश्रूची धार भाईराया ।।
पानफुल पुरे पुरे अक्षता सुपारी
नको शेला जरतारी भाईराया ।।

भावाला केव्हा पाहीन असे तिला होते. तिच्या डोळ्यांतून पाणी येते. तिला चैन पडत नाही.

येरे येरे भाऊ किती झाले दडपण
कधी हृदय उघडीन तुझ्यापुढें ।।
येरे येरे भाऊ किती पहावी रे वाट
पाण्याचा चाले पाट डोळ्यांतून ।।
जिवाच्या जीवना अमृताच्या सिंधु
देई गा तूं बंधू उठाउठी ।।
जिवाच्या जिवलगा प्रेमाच्या सागरा
सुखाच्या माहेरा येइ गा तूं ।।

ती भावाला निरोप तरी कोणाबरोबर पाठवणार, पत्र कोणाबरोबर देणार? स्त्रियांना कोठे आहे ते स्वातंत्र्य? परंतु एक साधन आहे. वाऱ्याबरोबर, पाखरांबरोबर पाठवावा निरोप. त्यांना बातमी घेऊन येण्याविषयी सांगावे :

अरे वाऱ्या वाऱ्या धांवशील लांब लांब
बहिणीचा निरोप सांग भाईरायाला ।।
कावळ्या कावळ्या लांब जाई रे उडून
येई निरोप सांगून भाईरायाला ।।

परंतु चिमण्याकावळ्यांनी का जावे, का ऐकावे? का म्हणजे? मी त्यांना अंगणातून हाकलले नाही. त्यांना दाणे घातले, त्यांना का कृतज्ञता वाटत नसेल?

दाणे मी घालत्यें तुम्हाला अंगणात
भावाची आणा मात चिमण्यांनो ।।
नाही हाकलीले कधी अंगणामधून
यावे निरोप सांगून भाईरायाला ।।

भाऊ येणार असे तिला वाटू लागते. हातातला घास गळतो, डोळा लवतो. कोणी तरी दूर डोंगर उतरून उन्हातून येताना दिसते. भर दुपारच्या उन्हातून कोण येते ते? पावसानंतरचे पहिलेच ऊन्ह. फार त्रास देते ते. भाऊच असणार तो :

दुपारचे ऊन घाटीडोंगर कोण येतो
बहीणीसाठी भाऊ येतो भाऊबीजे ।।
दुपारचें ऊन लागते सणसण
शेला घेतो पांघरून भाईराया ।।
तांबडें पागोटें उन्हाने भडक्या मारी
सुरूच्या झाडाखाली भाईराया ।।

कोकणातील हे वर्णन दिसते. घाटी चढून येणारा, सुरूच्या झाडाखाली बसणारा हा कोकणचा भाऊ दिसतो. भाऊ येतो व मुले मामा मामा करू लागतात. बहिणीच्या आनंदाला आकाश ठेंगणे होते. ती भावाजवळ प्रेमाने विचारपूस करते. कौतुकाने पुसते :

"तुला आळवीत बैसल्यें होत्यें दादा
काय वयनीच्या नादा गुंतलासी ।।"

"वयनीने मोहिनी घातली म्हणून बहिणीला विसरलास ना? बरे पण खुशाल आहेस ना, सारी मंडळी बरी आहेत ना? थकलास हो दादा. तू का आजारी

झालास? डोळे का असे खोल?'' किती प्रश्न ती करते. परंतु प्रेमळ भाऊ म्हणतो:

प्रवासाचा शीण ताई नाहीं मी आजारी
हळुवार चित्त भारी ताई तुझें ।।
ताईला पाहून हरेल सारा शीण
भावाला बहीण अमृताची ।।
ताईला पाहून सारीं दुःखें हरपती
हृदयी भरती प्रेमपूर ।।

किती दिसांनी भाऊ भाऊबीजेसाठी आलेला. बहीण मग थाट करते. परंतु ती गरीब असते. तिच्या घरात गहू नसतात. ती शेजी बाईकडे जाते :

''शेजारणी बाई उसने द्यावे गहूं
पाहुणे आले भाऊ फारा दिशीं ।।''

शेजारीण नाही म्हणत नाही.. सुंदर मोत्यासारखे गहू शेजी देते. बहीण दळते :

सोनसळें गहूं रवा येतो दाणेदार
फेण्यांचे जेवणार भाईराजा ।।
सोनसळे गहूं त्यांत तुपाचे मोहन
भाऊबीजेचें जेवण भाईरायाला ।।

घरात चंदनाचे पाट आणून ती मांडते. भावासाठी काय करू, काय न करू असे तिला होते :

चंदनाचे पाट मांडीले हारोहारीं
आज आहे माझ्या घरीं भाऊबीज ।।

कधी भाऊ भाऊबीजेला बहिणीच्या घरी येतो किंवा तिला घरी माहेरी नेतो. माहेरी साऱ्या बहिणी जमलेल्या असतात. भाऊबीज होऊन जावी. पुन्हा सासरी जाण्याची वेळ यावी. त्या वेळी बहिणी म्हणतात :

आम्ही चारी बहिणी चार डोंगराच्या आड
माझ्या भाईराया खुशालीचें पत्र धाड ।।
आम्ही चौघी बहिणी चारी गावांच्या चिमण्या
सख्या भाईराया आम्ही घटकेच्या पाहुण्या ।।

दादा, वर्षातून एकदा आम्हाला भेटत जा, एकदा आणीत जा, आम्ही घटकाभर राहू, प्रेम लुटू व उडून जाऊ. एक चार आण्याचा साधा खण व रात्रभर

तुझ्या घरी विसावा. दुसरे काही नको :

बहिणीला भाऊ एक तरी गे असावा
पावल्याचा खण एका रात्रीचा विसांवा ।।

माहेरी गेल्यावर भाऊभावजय कशा वागतात ते बहिणींना कळून येते भावजयीला बहिणी म्हणतात :

दसरा दिवाळी वरषाचे दोन सण
नको करूं माझ्यावीण वयनीबाई ।।

माहेरी जावे तो भावजयीला बरे वाटत नाही. नणंदा कशाला आल्या असे तिला वाटते :

गोऱ्ये भावजयी नको बोलूं रागें फार
आल्ये मी दिवस चार माहेराला ।।

परंतु ही प्रार्थना फुकट जाते. धुसफूस सुरू असते. बहीण मनात म्हणते.

गोरी भावजय गर्विष्ठ बोलाची
मला गरज लालाची भाईरायाची ।।
भाऊ ग आपला वयनीबाई ती लोकाची
मने राखावी दोघांची ताईबाई ।।

भावजयीचे वर्तन पाहून बहिणीला वाईट वाटते. आपल्या भावाला वैनी बोलते हे पाहून बहीण कष्टी होते :

गोऱ्ये भावजयी नको बोलू एकामेकी
हळुवार भाईराया चंद्र कोमेजेल एकाकी ।।
गोऱ्ये भावजयी किती उर्मट बोलणें
मन दुखवीलें माझ्या भावाचें कोवळें ।।
गोऱ्ये भावजयी किती बोल रागाचे
फूल कोमजलें देवा शिवशंकराचें ।।
गोऱ्ये भावजयी किती बोल अहंतेचे
फूल कोमेजलें भाईराय ममतेचें ।।

वैनी उभ्या उभ्या कुंकू लावते. नीट बसून प्रेमाने सौभाग्यतिलक लावीत नाही. कपाळीच्या कुंकवाची सुद्धा वैनी अशी हयगय करते हे पाहून बहिणीचे हृदय चरकते. ती म्हणते :

वैनीबाई भावजये नको उभ्याने कुंकू लावू

नवसाचा माझा भाऊ किती सांगूं ।।

घरी दोन दिवस बहिणी आलेल्या. भावाला वाटते कौतुक करावे. परंतु त्याच्या पत्नीला राग येतो. बहिणी कशाला लुटायला आल्या असे ती म्हणते :

भाऊ ग म्हणती आल्या बहिणी भेटीला
भावजया ग म्हणती आल्या नणंदा लुटीला ।।
भाऊ ग म्हणती बहिणीला द्यावा पाट
भावजया ग म्हणती धरा नणंदा आपुली वाट ।।

बहिणी मनी म्हणतात, "आपण वैनीपासून अपेक्षा तरी का करावी? किती झाले तरी परक्या घरून ती आलेली :"

माउलीची माया काय करील भावजयी
पाण्यावीण जाईजुई सुकतील ।।
आईबापांच्या राज्यांत खाल्या दुधावरल्या साई
भावजयांच्या राज्यांत ताक घेण्या सत्ता नाहीं ।।

परंतु सर्वच भावजया वाईट नसतात. कधी भावजयाच मनाच्या थोर असतात व भाऊ उलट असतात. भावजयीचे कौतुक करायला नणंद तयार असते:

भावा ग परीस भावजय फार भली
कोणा अशीलाची केली वयनीबाई ।।
भावा ग परीस भावजय ग रतन
सोन्याच्या कारणें चिंधी करावी जतन ।।

कोणा कुलशीलवंताच्या घरची ही? किती चांगली वागते. सोन्यासारखी आहे. माझा भाऊ म्हणजे फाटकी चिंधी. परंतु सोन्यासाठी ह्या चिंधीला जपले पाहिजे. लहानशी चिंधी सोन्याला सांभाळते. किती सुंदर दृष्टान्त! भाऊ व भावजय यांचे परस्पर प्रेम पाहून बहिणीला धन्यता वाटते :

अतिप्रीत बहु प्रीतीची दोघेजण
विडा रंगे कातावीण भाईरायाचा ।।

इतर जगातल्या भावजया पाहिल्या म्हणजे स्वत:च्या भावजयीची किंमत कळते :

भावजयांमध्ये वहिनीबाई शांत
भाऊ माझे सूर्यकान्त उगवले ।।

भाऊ तेजस्वी, जरा प्रखर. परंतु वैनी अगदी शांत व सौम्य पाहून बहिणीला

समाधान होते!

भावाचे वर्णन करताना बहिणींच्या वाणीत सारी सरस्वती जणू येऊन बसते. माझे भाऊ म्हणजे देवळातील निर्मळ आरसे, देवळातले अभंग खांब, देवळाजवळची शीतळ झाडे :

माझे दोघे भाऊ देवळाचे खांब
अभंग प्रेमरंग मला ठावें ।।
माझे दोघे भाऊ बिल्लोरी आरसे
देवळीं सरिसे लावीयेलें ।।
माझे दोघे भाऊ मला ते वाणीचे
देवाच्या दारींचे कडुलिंब ।।

माझे भाऊ नवानवसाचे आहेत, त्यांच्यावर दृष्ट नको पडायला. ते कडू असले तरी देवाच्या दारातले आहेत, देवाने दिलेले आहेत :

माझा भाईराया कसा का असेना
त्याच्यासाठीं प्राणा टाकीन मी ।।

भाऊ कसा असला तरी त्याच्यावर प्रेम करायला बहीण तयार आहे. मग गुणी भावाबद्दल तिला किती प्रेम वाटेल! माझा भाऊ उदार, शहाणा, मातृभक्त आहे. लोकांची लांबून आलेली पत्रे माझा भाऊ सभेत वाचून दाखवतो, तो कसा हसतो, कसा गोड दिसतो. किती वर्णावे?

काशींतले कागद आले डब्यांतून
वाचले सभेंतून भाईरायांनी ।।

पूर्वी कोणी काशीस जाई तेव्हा सर्व गावाचा निरोप घेऊन जाई, सुखरूप परत आला तर सारे गाव सामोरे जाई. बहुधा बरीच मंडळी एकदम निघत, आणि मग नळकांड्यातून पत्र आले सांडणीस्वाराबरोबर किंवा कोणाबरोबर, तर सारा गाव कुशलवार्ता व इतर बातमी ऐकायला जमा होई. तेथे पत्र कोण वाचून दाखवी?

माझा आहे भाऊ शहाणा सुरता
त्याच्या लौकीकाची वार्ता चोहीकडे ।।

असा हा भाऊ आणखी कसा आहे ऐका :

हाताचा उदार मनाचा खंबीर
गुणाने गंभीर भाईराया ।।

गोड गोड बोले हंसणें किती गोड
जगत्रीं नाहीं जोड भाईरायाला ।।
कुणा ना दुखवील हंसून हांसवील
साऱ्यांना सुखवील भाईराया ।।

भाऊ नुसता गोड बोलणारा, गोड हसणारा नाही.

दांडपट्टा खेळे करी तलवारीचे हात
घोडा नेत दौडवीत भाईराया ।।

आपल्या बहिणीची अब्रू सांभाळावयासही तो समर्थ आहे. अब्रू सांभाळण्याची गोष्ट निघाली की, काहींच्या डोळ्यासमोर एकदम मुसलमान येतील. परंतु आपल्या बहिणींनी मुसलमान भाऊ मानले होते. मुसलमान तेवढे वाईट असे त्यांचे मत नव्हते. वाईट लोक सर्वत्र आहेत :

मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
दिवाळीचा चोळी त्याचा कागदी सलाम ।।
मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
दिवाळीची चोळी घरीं आलासे घेऊन ।।
मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
सख्ख्या भावाच्या परीस त्याचें आहे ग इमान ।।
दरसाल येतो बहिणीला आठवून
जातीचा मुसलमान प्रेमासाठी ।।

बहिणीच्या प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी तो मुसलमान आतुर असतो. अधीर असतो. तो या मानलेल्या बहिणीकडे येतो. परंतु इतर लोक हसतात ते पाहून त्या मानलेल्या बहिणीला वाईट वाटते. ती म्हणते :

मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
नको ग त्याला हंसू दुःखें जाईल त्याचा प्राण ।।

तो मानलेला मुसलमान भाऊ आपल्या मानलेल्या बहिणीकडे येतो. लोकांना ते पाहवत नाही. टवाळपणे प्रश्न करतात :

मानीयला भाऊ काय तुला तो ग देतो
दिवाळीची चोळी घेऊनिया घरीं येतो ।।

परंतु शेवटी ती मानलेली वहीण आपल्या मानलेल्या भावास दुःखाने म्हणते :

"तुझा माझा भाऊपणा जगजाहीर नसावा
लोभ अंतरी असावा भाईराया ।।
आपण गूज बोलूं डाळिंबीसमान
तूं भाऊ मी बहीण जडे नातें ।।"

कशाला जगासमोर प्रेम मांडायचे? ते मनातच आपण ठेवू. मुकेपणाने मनातले बोलू. डाळिंबाचे फळ फोडले तर आत हजारो दाणे भरलेले असतात. वरून किती सुकलेले दिसते. तसे आपले प्रेम वरून बोलण्या-चालण्यात दिसणार नाही. परंतु हृदयात आपण एकमेकांशी गोड बोलू.

जोपर्यंत भाऊ आहे तोपर्यंत बहिणीला आधार वाटतो. दिवाळी आली की चोळीबांगडी तो पाठवतो. श्रीमंत असेल तर चोळीला मोती लावून पाठवतो :

चोळी शिव रे शिंप्या मोती लाव शिवणीला
चोळी जाते बहिणीला दूरदेशा ।।

अशी सुंदर चोळी यावी. परंतु कुंकवाची पुडी दिसत नाही. सासरची माणसे बोलू लागतात. "काय बाई रीत तरी-" परंतु कावरीबावरी झालेली बहीण म्हणते:

"चोळीयेची घडी कुंकवावीण धाडी
असें नाहीं पडली पुडी कोठें तरी ।।"

पुडी पडली असेल. भावाची ती बाजू घेते. श्रीमंत भाऊ मोती लावून चोळी पाठवतो. गरीब भावाने काय करावे? गरीब भाऊ खण कोठून घेणार? परंतु गरीब भाऊ डोक्याचा रूमाल फाडतो. त्याची चोळी करूनं धाडतो. बहिणीचे हृदय भरून येते. ती म्हणते :

भाऊ चोळी शिवी शिवी आपुल्या रुमालाची
धन्य तुझ्या इमानाची भाईराया ।।

अशा भावासाठी बहीण काय करणार नाही?

माझें की आयुष्य कमी करून मारुती
घाल शंभर पुरतीं भाईरायाला ।।
माझ्या आयुष्याचा भाईराया तुला शेला
उरल्याची चोळी तुला वयनीबाई ।।

बहीण आपल्या आयुष्याच्या शेल्याने भावाला पांघरवीत आहे. भाऊ आहे तोपर्यंत चोळीबांगडीची चिंता नाही. शेजीला बहीण म्हणते :

शेजी चोळी ग फाटली चिंता नाही ग वाटली

दुसरीं पाठविली भाईरायांनी ।।

असा संसार चालतो. बहिणीची एकच इच्छा शेवटी असते की, सौभाग्यपणी मरण यावे. त्या क्षणी भावानेही यावे. अहेवपणी आलेले मरण भाग्याचे. भावाने शेवटचे चोळीपातळ नेसवावे. जर चंद्र नसता कृष्णपक्षात मरण आले तर मोक्ष नाही. भावाने चंद्रज्योती पाजळून प्रकाश करावा, भरल्या कपाळाने बहीण गेली, तिचे सोने झाले. भावाने आनंद मानावा :

अहेवा मरण सोमवारी आलें
भाऊ म्हणती सोनें झालें बहिणीचें ।।
अहेवा मरणाचा आहे मला वांटा
चोळी पातळ कर सांठा भाईराया ।।
जीव जरी गेला कुडी ठेवावी झांकून
येईल सर्वही टाकून भाईराया ।।
जीव माझा गेला जर काळोख्या रे रात्री
सख्या लाव चंद्रज्योती भाईराया ।।

अशा ह्या बहीणभावंडांच्या प्रेमाच्या ओव्या आहेत. ह्या प्रेमाचे मी किती वर्णन करू? स्त्रियांचाच अभिप्राय ऐका :

भावा ग बहिणीच्या प्रेमाला नाही सरी
गंगेच्या पाण्यापरी पवित्रता ।।
भावा ग बहिणीचें गोड किती असे नातें
कळे एका हृदयातें ज्याच्या त्याच्या ।।
संसारीं कितीक असती नातीं गोतीं
मोलाची माणिकमोती बहीणभाऊ ।।
जन्मून जन्मून संसारांत यावें
प्रेम तें चाखावें बहिणभावांचें ।।

असो. ह्या ओव्या वाचा व धन्य व्हा. नाशिक जेलमध्ये असताना बहीण-भावंडांच्या प्रेमाच्या या ओव्या मी म्हणून दाखवीत होतो. आणि प. खानदेशातील सुप्रसिद्ध, कळकळींचे तरुण कार्यकर्ते माझे मित्र श्री. नवल भाऊ पाटील यांचे डोळे भरून आले होते. ते मला म्हणाले, 'गुरुजी, माझ्या डोळ्यांतून क्वचितच पाणी येते. परंतु आज माझ्या डोळ्यांतून तुम्ही पाणी आणले. माझा रडू न येण्याचा अहंकार आज दूर झाला.' मी म्हटले, 'ही शक्ती माझी नव्हे. स्वत:चे अनुभव ज्या

स्त्रियांनी सहृदय भाषेत उत्कटपणे ओतून ठेवले. त्या स्त्रियांच्या अनुभवपूर्ण, अपूर्ण व जिवंत अशा ह्या ओव्यातील ती शक्ती आहे.'

ओव्या

दसऱ्यापासून दिवाळी विसां दिशीं
मज माघारा कधीं नेशी भाईराया १
माझ्या दारावरनं रंगीत गाड्या गेल्या
भावांनीं बहिणी नेल्या दिवाळीला २
भाऊबीजेच्या रे दिवशीं लोकांचे भाऊ येती
वाट तुझी पाहुं किती भाऊराया ३
मुलें पुसतातीं केव्हां मामा ग येईल
काय उत्तर देईल बहिण तुझी ४
मुले पुसताती येईना का ग मामा
गुंतला काही कामा माय बोले ५
कोणत्या कामांत भाईराया गुंतलासी
बहिणीची कासाविशी होत आहे ६
शेजी मला पुसे येऊन घडीघडी
कधीं माहेराची गाडी येणारसे ७
पूर ओसरले नदीनाले शांत झाले
अजुन कां न भाई आले बहिणीसाठी ८
नवरात्र गेलें दसरा दूर गेला
नेण्याला का न आला भाईराया ९
असेल आजारी काय माझा भाऊ
आयुष्या त्याला देऊ देवराया १०
दूरच्या देशींचा शीतळ वारा आला
सुखी मी अईकयीला भाऊराया ११
दूरच्या देशींचा सुगंधी येतो वात
असेल सुखांत भाईराया १२
लागेल घालावी फार मोठी ओंवाळणी

चिंता काय अशी मनी   भाईराया   १३
पान फूल पुरे   पुरे अक्षता सुपारी
नको शेला जरतारी   भाईराया   १४
नको धन नको मुद्रा   नको मोतियांचा हार
देई प्रेमाश्रूंची धार   भाईराया   १५
दादा बाळपणीं   तुला चावा मीं घेतला
त्याचा काय राग आला   आज तुला   १६
दाणे भातुकलीचे   खाशी म्हणून बोलल्ये
तेंच काय मनीं धरिलें   आज दादा   १७
आपराध पोटीं   प्रेम थोरांचें घालीत
येई धांवत धांवत   भाईराया   १८
पाठच्या बहिणीवरी   भाऊ कसा रागावेल
चंद्र आग का ओकेल   कांहीं केल्या   १९
पाठच्या बहिणीवरी   भाऊ का संतापेल
कस्तूरी का सोडील   निज वास   २०
पाठच्या बहिणीवरी   भाऊ कसा हो रुसेल
कधीं सोनें का कुसेल   कांहीं केल्या   २१
पाठच्या बहिणीवरी   भाऊ का रागावेल
रंग का बदलेल   आकाशाचा   २२
पाठच्या बहिणीवरी   जरी रागावेल भाऊ
तरी म्हणेल कोण राहूं   संसारांत   २३
सोड सारा राग   रुसवा टाक सारा
पुसाव्या माझ्या धारा   लोचनींच्या   २४
सोड सारा राग   तुला राग ना शोभत
येई धांवत धांवत   भाईराया   २५
सोड सारा राग   रागाचें होवो हंसूं
डोळ्यांचे माझे असू   दादा पुस   २६
ताईच्या बाळांचे   येऊन घेई मुके
खेळव कौतुकें   भाचेयांना   २७
येरे येरे मामा   बाळें बोलती अंगणी

डोळ्यांना माझ्या पाणी   येते बघ   २८
येईल आतां मामा   आणील आम्हां खाऊ
मुलें सांगती मुलांना   रडें येतें मला भाऊ   २९
येरे येरे मामा   मुलें बोलती नाचत
प्रेमे भरे माझे चित्त   कोणा सांगूं   ३०
मागें त्यांनीं तुला   रागें कागद लिहिला
त्याचा काय राग आला   भाईराया   ३१
न्यावया आलास   नाहीं पाठविली त्यांनीं
अढी काय त्याची मनीं   धरिलीस   ३२
आपलेच ओंठ   दादा आपलेच दांत
थोर सारें विसरत   मागील रे   ३३
नको कांहीं मनीं ठेवूं   भाऊ येई लगबग
मायबापांची ती बघ   आण तुला   ३४
मायबाप मेल्यावरी   मग कोठले माहेर
काय खरे हे होणार   शब्द दादा   ३५
शेवटील शब्द   आई तुला जे बोलली
काय विस्मृती पडली   त्यांची दादा   ३६
ताईला प्रेम देई   तिला रे तूंच आतां
माय बोले मरतां मरतां   दादा तुला   ३७
ताईला प्रेम देई   तुला ती तिला तूंच
नको कधीं विसंबूस   माय बोले   ३८
नको ताईला विसरूं   बाबा बोलले आठव
मला गाडी तूं पाठव   भाऊबीजे   ३९
कोणापुढे रडूं   कोणापाशीं बोलूं
कधीं येईल मायाळू   भाईराया   ४०
येरे येरे भाऊ   किती झालें दडपण
कधी हृदय उघडीन   तुझ्यापुढें   ४१
येरे येरे भाऊ   किती पहावी रे वाट
पाण्याचा चाले पाट   डोळ्यांतून   ४२
येरे येरे भाऊ   भेटीला वर्षे चार

पाहूं नये अंत फार बहिणीचा ४३

येरे येरे भाऊ किती वरसं नाहीं भेटी
कधीं पडशील दृष्टी भाईराया ४४

जिवाच्या जिवलगा प्रेमाच्या सागरा
सुखाच्या माहेरा येई भाई ४५

जिवाच्या जीवना अमृताच्या सिंधू
येई गा तूं बंधु उठाउठी ४६

पावलो पावलीं किती करुं आठवण
डोळे येतात भरुन भाईराया ४७

वाऱ्या वाऱ्या सांग भाईरायाची खुशाली
धार संतत लागली माझ्या डोळां ४८

अरे वाऱ्या वाऱ्या करिशी भिरीभिरी
भावाच्या कानांवरी हांक आली ४९

अरे वाऱ्या वाऱ्या धांवशी लांबलांब
बहिणीचा निरोप सांग भाईरायाला ५०

कां रे सकाळींच कावळ्या का का करिशी
काय न्याया येतो मशी भाईराया ५१

कावळ्या कावळ्या लांब जाई रे उडून
येई निरोप सांगून भाईरायाला ५२

दाणे मी घालितें नित्य तुम्हां अंगणांत
भावाची आणा मात चिमण्यांनो ५३

नाहीं हांकलीलें कधीं अंगणामधून
यावें निरोप सांगून भाईरायाला ५४

डोळा फडफडे घांस गळे तोंडातून
काय येतसे दुरून भाईराया ५५

उचकी लागली मला सकाळपासून
काय येतसे दुरून भाईराया ५६

काय वयनीनें भूल फार रे पाडली
म्हणून नाहीं झाली आठवण ५७

वाट मी पहात्यें डाक रे मार्गाची

सख्या तुझ्या रे पत्राची दादाराया ५८
दुपारचें ऊन घाटीडोंगर कोण घेतो
बहिणीसाठीं भाऊ येतो भाऊबीजे ५९
दुपारचे ऊन लागतें सणसण
शेला घेतो पांघरून भाईराया ६०
दुपारचे ऊन लागते शेल्यांतून
घोडी काढी बागेंतून भाईराया ६१
सूर्यनारायणा तापूं नको फार
येतसे सुकुमार भाईराया ६२
तांबडें पागोटे उन्हाने भडक्या मारी
सुरूच्या झाडाखाली भाईराया ६३
तांबडे पागोटे सोडीतो बांधीतो
चाल पुण्याची काढीतो भाईराया ६४
कावळा का का करी दहीभात मागे
पाहुणा येतो सांगे भाईराया ६५
कावळा कोकावे घराच्या आढ्यावरी
पाहुणा येतो घरीं भाईराया ६६
दिवस मावळला केळीचे कोक्यांत
मला माघारा सोप्यांत भाईराया ६७
दिवस मावळला कण्हेरी आड गेला
मला माघारा काल आला भाईराया ६८
आई आली आली मामाची गाडी आली
मुलांची हांक आली अंगणांत ६९
मामाची गाडी आली बहीण आनंदली
आनंदें वोसंडली चित्तवृत्ती ७०
भावाला पाहून बहीण गहींवरे
डोळीयांचे झरे वाहताती ७१
पुर ओसरतो बहिणीच्या डोळियांचा
बोलते गोड वाचा बहीण भावा ७२
तुला आळवीत बैसल्ये होत्ये दादा

काय वयनींच्या नादा गुंतलास ७३
तुला आठवीत बैसले दादा देख
काय ऐकलीस हांक भाईराया ७४
आहेस खुशाल खुशाल वैनीबाई
सांग सांग सारें भाई भुकेलेली ७५
काय होतास आजारी डोळे तुझे गेले खोल
बोल रे सख्या बोल भाईराया ७६
किती दिवसांनी भेटशी तूं रे मला
अमृताचा रस भाऊराया चाखवीला ७७
प्रकृतीची दादा नको करूं हेळसांड
बहिणीशीं बोल मनींचे दुःख सांड ७८
प्रवासाचा शीण नाहीं ताई मी आजारी
हळुवार चित्त भारी ताई तुझे ७९
ताईला पाहून पळाला सारा शीण
भावाला बहीण अमृताची ८०
पाहून बहीण सारी दुःखे दुरावती
हृदयीं भरती प्रेमपुर ८१
दिवाळीच्या सणा दादा सासुरवाडी जावें
भाऊबीजे भाई यावे बहिणीकडे ८२
बहिणीचीं मुलें भाऊ खेळवूं लागला
जरी थकला भागला प्रवासानें ८३
शेजारिणी बाई उसने द्यावे गहू
पाहुणे आले भाऊ फारा दिशी ८४
शेजारिणी बाई उसनें द्यावें लोणी
भाऊ माझा ग पाहुणा त्याला शिरा मेजवानी ८५
जिरेसाळी गहूं खिरीला किती घेऊं
जेवणार माझे भाऊ पांचजण ८६
सोनसळे गहूं रवा येतो दाणेदार
फेण्यांचे जेवणार भाईराया ८७
सोनसळे गहूं त्यांत तुपाचे मोहन

भाऊबीजेचें जेवण भाईरायाला ८८
माझ्या घरीं पाहुणा भाजीभाकरीचा
जेवणार साखरेचा भाईराया ८९
चंदनाचे पाट मांडीले हारोहारीं
आज आहे माझ्या घरीं भाऊबीज ९०
भाऊबीज केली बहिणीनें काल
भाईराया हिरवी शाल पांघुरला ९१
भाऊबीज केली बहिणीनें रातोरातीं
भाईराये चंद्रज्योती उजळील्या ९२
भाऊबीजेच्या रे दिवशीं कां रे भाई रुसलासी
तुझा शेला माझ्यापाशी आठवण ९३
सोन्याची सांखळी देत्यें मी बजावून
तूं भाऊ मी बहीण भाईराया ९४
भाऊबीजेच्या दिवशीं करीन कवतूक
ओवाळीन पालखींत भाईराया ९५
भाऊबीज करूं आपण दोघीतिघी
शाल घेऊं मनाजोगी भाईरायाला ९६
भाऊबीजेच्या दिवशीं भाऊ बैसला न्हाऊन
चल सखे ओंवाळून ताईबाई ९७
भाऊबीजेच्या दिवशीं ओवाळीन तुला
जरीचा खण मला भाईराया ९८
भाऊबीजेच्या दिवशीं ओवाळीत जातें
ताटीं घाला मोत्यें भाईराया ९९
हात भरला कांकणानें कान भरला चाफानें
केलें माहेर भावानें बहिणीला १००
माझ्या दारावरून हरदासी मेळा गेला
त्यांत मी ओळखीला भाईराया १०१
हजाराचा घोडा बाजारांत उठे बसे
बहिणीचें घर पुसे भाईराया १०२
माझ्या दारावरून कोण गेला ग सुरंगी

हातीं रुमाल पंचरंगी भाईराया १०३

अंबारीचा हत्ती रस्त्याने उठे बसे
माझा भाईराया बहिणीचें घर पुसे १०४

मुंबई शहरांत गल्लोगल्ली चिरे
त्यांतून सखा फिरे भाईराजा १०५

भाऊबीजेकारणें तुम्ही यावें भाई
संगे आणा वैनीबाई उषाताई १०६

माझ्या दारावरून टपालवाला येतो
माझ्या ग भाईरायाचे खुशालीचे पत्र देतो १०७

निरोप धाडित्यें निरोपासरशीं चिठ्ठी
सत्वर यावें भेटी भाईराया १०८

दळण मी दळी काढितें रवापीठी
धाडित्यें तुम्हां भेटी भाईराया १०९

निरोप धाडीत्यें निरोपासरसें यावें
भेटून मला जावे भाईराया ११०

वाईट हा रस्ता टाकी लावून फोडावा
छकडा रंगित पाठवावा भाईरायाला १११

नदीच्या पलीकडे कोणाचे शेले भाले
मातृभक्त माझे आले भाईराज ११२

चांदीच्या घंघाळांत चंद्र सूर्य डोले
सखा कचेरींत बोले भाईराया ११३

काशींतलें कागद आले डब्यांतून
वाचले सभेंतून भाईरायानें ११४

माझा आहे भाऊ शहाणा सुरता
त्याच्या लौकिकाची वार्ता चोहींकडे ११५

मोठेमोठे डोळे हरीण पाडसाचे
तसे माझ्या राजसाचे भाईरायाचे ११६

गोड गोड बोले हंसणे किती गोड
जगत्रीं नाहीं जोड भाईरायाला ११७

हाताचा उदार तसा मनाचा खंबीर

गुणानें गंभीर भाईराया १ १ ८
कुणा ना दुखवील हंसून हांसवील
साऱ्यांना सुखवील भाईराया १ १ ९
माझा भाईराया सर्वांना हवा हवा
आहे मधुरेचा खवा भाईराया १ २ ०
दांडपट्टा खेळे करी तरवारीचे हात
घोडा नेई दौडवीत भाईराया १ २ १
हत्तीच्या सोंडेवरी मोहनमाळा लोळे
तालीमपट्टा खेळे भाईराया १ २ २
हत्तीच्या सोंडेवरी ठेवीली सुपारी
स्वारी निघाली दुपारी भाईरायाची १ २ ३
माझे दोघे भाऊ देवळाचे खांब
अभंग प्रेमरंग भला ठावे १ २ ४
माझे दोघे भाऊ बिल्लोरी आरसे
देवळीं सरीसे लावीयेले १ २ ५
माझे पांच भाऊ ते ग मला बहू
ईश्वरावरी गहूं वाहीयेले १ २ ६
माझे पांच भाऊ देवळाच्या भिंती
गिलावा देऊ किती आयुष्याचा १ २ ७
माझे दोघे भाऊ मला ते वाणीचे
देवाच्या दारीचे कडुलिंब १ २ ८

टीप-१. वाणीचे म्हणजे नवसाचे; उत्कृष्ट. वाणीचा हुरडा म्हणजे उत्कृष्ट बियांचा, विशिष्ट जातीचा हुरडा.

२. भावांना कडुलिंब म्हटले आहे. कारण ते नवसाचे. नवसाच्या मुलावर दृष्ट पडू नये म्हणून मुद्दाम त्याचे नाव भिक्या, धोंड्या असे ठेवतात. परंतु हे कडुलिंब देवाच्या दारचे म्हणजे अमृताहून गोड आहेत.

अंगणांत उभा जन म्हणे राजा
मी म्हणे भाऊ माझा आला भेटी १ २ ९

माझा भाईराया कसा का असेना
त्याच्यासाठी प्राणा टाकीन मी १३०
माझा भाईराया मनीं मी आठवीन
पोटांत सांठवीन निरंतर १३१
माझा भाईराया ओंव्यांत गाईन
हृदयीं स्मरेन रात्रंदीस १३२
ध्यानीं मी पाहीन स्वप्नीं मी पाहीन
प्रेमाची मी बहीण भाईरायाची १३३
बहिणीला भाऊ एक तरी ग असावा
पावल्याचा खण एका रात्रीचा विसांवा १३४
आवड मला बहू लुगडे नको घेऊं
अंतर नको देऊं भाईराया १३५
माझे दारावरुन नको जाऊ मुक्यामुकी
नको घेऊं साडीचोळी मी रे शब्दाची हो भुकी १३६
भाऊ चोळी शिवी शिवी आपुल्या रुमालाची
धन्य तुझ्या इमानाची भाईराया १३७
माझ्या आयुष्याचा भाईराजा तुला शेला
उरल्याची चोळी तुला वयनीबाई १३८
माझ्या आयुष्याची भाईराया तुला कंठी
उरल्याची तुला आंगठी वयनीबाई १३९
माझें कीं आयुष्य कमी करून मारुती
घाल शंभर पुरती भाईरायाला १४०
जीवाला देत्यें जीव जीव देईन आपुला
चाफा कशानें सुकला भाईराया १४१
पिकला अननस हिरवी त्याची छाया
बहिणीवर करी माया भाईराया १४२
पाऊस पाण्याचें कुणी येईना जाईना
माझा निरोप जाईना भाईराजाला १४३
ओळी ओळी घर मोजीत मी गेल्यें
एक घर विसरल्यें भाईरायाचें १४४

दूरदेशीं पेण कोणी येईना जाईना
माझा निरोप सांगेना भाईरायाला १४५
दूरदेशीं पेण महिन्याची वाट
कागदीं तुझीं भेट भाईराया १४६
चोळी माझी ग फाटली चिंता नाहीं ग वाटली
दुसरी पाठवीली भाईरायांनीं १४७
चोळी माझी ग फाटली फाटली फाट जाऊं
घेणाराचें मन पाहूं भाईरायाचें १४८
चोळीयेची घडी कुंकवावीण धाडी
असें नाहीं पडली१ पुडी कुठें तरी १४९
चोळीयेची घडी कुंकवाची पुडी
निरोपावीण धाडी भाईराया १५०
शब्दांचे निरोप बोलले संपताती
मुके निरोप धाडिती भाईराय १५१
चोळीयेची घडी कुंकवाची पुडी
त्यांतून भाऊ धाडी अंतरंग १५२
चोळीयेची घडी कुंकवाचा मासा
चोळी जाते दूरदेशा बहिणीला १५३
चोळी शिव रे शिंप्या चोळी शिव पाटावरी
चोळी जाते घाटावरी बहिणीला १५४
चोळी शिव रे शिंप्या मोती लाव शिवणीला
चोळी जाते बहिणीला दूरदेशा १५५
एकापुढें एक माझ्या माउलीबाईचे
भाऊ चालती सोयीचे चौघेजण १५६
एकापुढें एक चालती शिवूमिवु
नको पापिणी दृष्ट लावूं भाईरायांना १५
माझ्या अंगणांत चिमण्या पाणी पीती
बहिणी तोंडे धुती भाऊरायाच्या १५८
सरलें दळण उरले पांच गहूं
आम्ही बहिणी ओंव्या गाऊं भावंडांना १५९

टीप -१. भावाकडची चोळी आली, परंतु आत कुंकवाची पुडी नाही हे पाहून सासरची माणसे संतापतात. परंतु भावाची बाजू घेऊन बहीण म्हणते, "असे नाही हो तो करायचा. बहिणीच्या कुंकवाची का त्याला काळजी नाही? पडली असेल पुडी वाटेत."

नगर वाचनालय, सातारा.

माझ्या दारावरून गाड्या ग धांवती
वर रुमाल उडती भाईरायांचे १६०

दादाराया अप्पाराया तुम्ही बसा एकीकडे
दिवाळीचे वांकी तोडे मला द्यावे १६१

दादाराया अप्पाराया तुम्ही बसा एके ओळी
दिवाळीची साडी चोळी मला द्यावी १६२

दिवाळीचा सण भाऊबीज आनंदाची
करूं सख्या गोविंदाची भाईरायाची १६३

बीजेच्या दिवशीं माझ्या ताटामध्यें मोती
ओवाळीन तुझा पति वयनीबाई १६४

शेजी ती पुसती तुला भाऊ ग कितीक
पृथ्वीचा चंद्र एक भाईराया १६५

शेजी ग पुसता तुला भाऊ कोण कोण
चंद्रसूर्य दोघेजण भाईराज १६६

पड रे पावसा पिकूं दे दाणापाणी
भाईरायाला बहीणी आठवीती १६७

पाऊस कीं पडे मृगाआधीं रोहिणीचा
भावाआधीं बहिणीचा संवसार १६८

माझ्या दारावरनं गेला माझ्या घरीं नाहीं आला
काय अपमान झाला भाईरायाचा १६९

हांका मीं मारित्यें उभी राहून गल्लीला
मशीं अबोला धरीला भाईरायाने १७०

माझे दारावरून कोण गेला पगडीचा
कळा माझ्या बुगडीचा भाईराया १७१

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

तांबडे पागोट्याचा पदर लोंबे पाठीवरी
कंठी शोभे छातीवरी भाईरायाचे १७२
सासुरवाडी गेला सासू पाहे तोंडाकडे
तुझ्या विड्याला रंग चढे भाईराया १७३
माझ्या दारावरनं मुलांचा मेळा गेला
त्यांत मी ओळखीला भाईराजा १७४
माझ्या दारावरनं हळदीकुंकवाचा नंदी गेला
खडा मारून उभा केला भाईरायांनी १७५
दसऱ्याचा खण दिवाळीचा रास्ता
ओवाळीन तुझ्या कंथा वयनीबाई १७६
मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
दिवाळीची चोळी त्याचा कागदी सलाम १७७
मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
दिवाळीची चोळी घरी आलासे घेऊन १७८
मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
हस्तीदंती चुडे मला आलासे घेऊन १७९
मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
सख्ख्या भावा ग परीस त्याचे आहे ग इमान १८०
मानीयला भाऊ जातीचा मुसलमान
नका ग त्याला हंसूं दुःखे जाईल त्याचा प्राण १८१
दरसाल येई बहिणीला आठवून
जातीचा मुसलमान प्रेमासाठी १८२
तुझा माझा भाऊपणा जगजाहीर नसावा
लोभ अंतरी वसावा भाईराया १८३
आपण गूज बोलूं डाळिंबीसमान
तूं भाऊ मी बहीण जडे नातें १८४
मानीयला भाऊ तुला तो काय देतो
दिवाळीची चोळी घेऊनीयां घरी येतो १८५
माय तों माहेर बाप तो येंऊ जाऊं
पुढे आणीतील भाऊ लोकलाजे १८६

माय तों माहेर बाप तो माझी सत्ता
नको बोलूं भाग्यवंता भाईराया १८७

गोऱ्ये भावजयी नको करूं फुणफुण
सांगेन तुझे गुण भाईरायांना १८८

गोऱ्ये भावजयी नको बोलूं रागें फार
आल्यें मी दिवस चार माहेराला १८९

वयनीबाई भावजयी नको बोलू येग जाग
माझा पेटाऱ्याचा नाग भाईराया १९०

वयनीबाई भावजयी नको बोलू इडीतिडी
माझ्या पाटावाची घडी भाईराया १९१

वयनीबाई भावजयी तुझा भांग ग सरसा
माझा कल्याणी आरसा भाईराया १९२

भावजयांमध्ये वयनीबाई गोरी
कपाळी शोभे चिरी कुंकवाची १९३

गोरी भावजय गर्विष्ठ बोलाची
मला गरज लालाची भाईरायाची १९४

वयनीबाई भावजयी नको उभ्याने कुंकू लावूं
नवसाचा माझा भाऊ किती सांगूं १९५

भाऊ ग आपला वयनीबाई ती लोकांची
मने राखावी दोघांची ताईबाई १९६

दादाराया बाजारांत वयनीबाई मारी हांका
उंची खण घेऊं नका वन्सबाईंना १९७

गोऱ्ये भावजयी किती उर्मट बोलणे
मन दुखविशी भाईरायाचे कोवळे १९८

गोऱ्ये भावजयी किती बोल अहंतेचे
फूल कोमेजलें भाईराया ममतेचे १९९

गोऱ्ये भावजयी किती बोल ग रागाचे
फूल कोमेजलें देवा शिवा शंकराचे २००

गोऱ्ये भावजयी नका बोलू टाकामेकी
हळूवार भाईराया चंद्र कोमेजे एकाकी २०१

भाई ग म्हणती आल्या बहिणी भेटाया
भावजया ग म्हणती आल्या नणंदा लुटाया २०२

भाऊ ग म्हणती बहिणीला द्यावा पाट
भावजया ग म्हणती धरा नणंदा अपुली वाट २०३

भाऊ ग म्हणती बहिणीची घाल वेणी
भावजया ग म्हणती उंदराने नेली फणी २०४

भाऊ म्हणे ग बहिणी बहिणी येई ग घरात
भावजय रागे म्हणे बऱ्या आहेत उंबऱ्यात २०५

भाऊ ग म्हणती बहिणीची भरा ओटी
भाऊजया ग म्हणती गहूं जमिनीच्या पोटी २०७

भाऊ म्हणे चोळी शिवी भावजय देना दोरा
नको हो वयनीबाई चोळीचा तो काय तोरा २०८

भाऊ चोळी शिवी भावजय डोळें मोडी
नको हो वयनीभाई चोळीची काय ती गोडी २०९

पिकलेलें लिंबू झाडाला तोलेना
गर्व झालेली बोलेना वयनीबाई २१०

माऊलीची माया काय करील भावजयी
पाण्यावीण जाईजुई सुकवील २११

आईबापांच्या राज्यात खाल्ल्या दुधावरच्या सायी
भावजयांच्या राज्यांत ताक घेण्याची सत्ता नाही २१२

अति प्रीत बहु प्रीतीची दोघेंजण
विडा रंगे कातावीण भाईरायाचा २१३

कपाळीचे कुंकू करिते ढळढळा
तुला लक्ष्मीची कळा वयनीबाई २१४

कपाळीचे कुंकू घामानें भिजलें
तुझें दैव ग चांगलें वयनीबाई २१५

वडील भावजय आईच्या समान
पित्याचा तुला मान भाईराया २१६

दसरा दिवाळी वरसाचे दोन सण
नको करू माझ्यावीण वयनीबाई २१७

भाईरायाच्या शेजारी नये राहूं ग वयनी
कोपऱ्यातील साऱ्या मनी भावजया २१८

वयनीबाई भावजयी तुझी रात्र गे सोयरी
कोंबडा परी वैरी आरवला २१९

आमच्या वयनीबाई गंगाबाई कोठे गेल्या
उन्हानें कोमेजल्या जाईजुई २२०

भावजयांमध्ये वयनीबाई रंभा
सोन्याचा तुळंबा भाईराया २२१

नाकींची ग नथ खाली बस ग पाहूं दे
वज्रटीक ग लावूं दे वयनीबाई २२२

भाऊ माझे गोरे आम्ही बहिणी सांवळ्या
मखमली त्या पीवळ्या भावजया २२३

भावजयांमध्ये वयनीबाई शांत
भाऊ माझे सूर्यकान्त उगवले २२४

चैत्रमासींच्या रांगोळ्या प्रकारच्या
नणंदा झणकाराच्या वन्संबाई २२५

नणंदा वन्संबाई आपुला मान घ्यावा
आशीर्वाद मला द्यावा चुडेयांचा २२६

भावा ग परीस भावजय फार भली
कोणा अशीलाची केली वयनीबाई २२७

भावा ग परीस भावजय ग रतन
सोन्याच्या कारणें चिंधी करावी जतन २२८

वळवाचा पाऊस पडून ओसरला
भावाला झाल्या लेकी मग बहीण विसरला २२९

आम्ही चारी बहिणी चार डोंगराच्या आड
माझ्या भाईराया खुशालीचे पत्र धाड २३०

आम्ही चौघी बहिणी चारी गांवींच्या चिमण्या
सख्या भाईराया आम्ही घटकेच्या पाहुण्य२३१

आम्ही तिघी बहिणी आम्ही आपल्या आईच्या
कळ्या फुलती जाईच्या बागेमध्यें २३२

चांदात चांदणी   मृगात रोहिणी
तशा तुझ्या रे बहिणी   भाईराया   २३३

आहेवा मरण   सोमवारी आलें
भाऊ म्हणती सोनें झोलें   बहिणीचें   २३४

आहेवा मरणाचा   आहे मला वांटा
चोळी पातळ कर साठा   भाईराया   २३५

जीव जरी गेला   कुडी ठेवावी झांकून
येईल सर्वही टाकून   भाईराया   २३६

जीव माझा गेला   जर काळोख्या रे रात्री
सख्या लाव चंद्रज्योती   भाईराया   २३७

संसारीं असतीं   उदंड नातीगोतीं
निराळी पडती   बहीणभाऊ   २३८

संसारी कितीक   असतीं नातीगोतीं
मोलाची माणिकमोतीं   बहीणभाऊ   २३९

जन्मून जन्मून   संसारात यावें
प्रेम तें चाखावें   बहीणभावांचे   २४०

बहीण भावंडांचें प्रेम   निर्मळ अनुपम
अमृताहुन उत्तम   संसारांत   २४१

भावा ग बहिणीच्या   प्रेमाला नाहीं सरी
गंगेच्या पाण्यापरी   पवित्रता   २४२

भावा ग बहिणीच्या   प्रेमाला नाहीं तोड
लाभेल ज्याला जोड   धन्य धन्य   २४३

भावा ग बहिणीचें   किती गोड असे नातें
कळे एका ह्रदयातें   ज्याच्या त्याच्या   २४४

बहीणभावांच्या   प्रेमाला नाहीं सीमा
द्यावी कोणती उपमा   जगत्रयीं   २४५

बहीणभावांचें   प्रेम तें शुद्धबुद्ध
अपुरे होती शब्द   वर्णनाला   २४६

□ □

शहर वाचनालय, सातारा

२ : मायलेकरे

रसपरिचय

तान्ह्या बाळाच्यासंबंधीच्या शेकडो ओव्या आहेत. या ओव्यांतून अपार वत्सलता आहे. या ओव्यांतील काव्यशक्ती उच्च दर्जाची आहे. काही काही ओव्या वाचून व्यास-वाल्मीकी, कालिदास-भवभूती यांनीही माना डोलवाव्या. या प्रकरणात मुलगा अगदी लहान आहे तोपासून तो शाळेत जाऊ लागतो, त्याची मुंज वगैरे होते, तो पर्यन्तच्या ओव्या दिल्या आहेत. शक्य तो ओव्यांत क्रम आणण्याची खटपट केली आहे. परंतु अनेक ओव्या पुढेमागेही झाल्या आहेत. सर्व ओव्यांचा क्रम सांभाळणे कठीण असते. कारण या ओव्या स्फुट आहेत. अनेक ठिकाणी एकेक गोळा केलेल्या आहेत. स्त्रियांनीही निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळ्या स्थळी, काळी त्या रचलेल्या आहेत. रचलेल्या म्हणण्यापेक्षा त्यांच्या तोंडून सहज हे मंगल बालवेद, या मधुर श्रुती बाहेर पडल्या. खरोखरच या ओव्यांत मला एक प्रकारची दिव्यता दिसून येते. त्यांतील माधुर्याला तर सीमाच नाही. या मजबरोबर. मी दाखवतो त्यांतील रमणीयता, चाखवतो मधुरता.

तान्हे बाळ जन्माला येणे म्हणजे केवढी मंगल गोष्ट. ईश्वराला मानव जातीची आशा आहे याची ती खूण. संसाराला सुंदरता देणारी, कोमलता देणारी ती वस्तू. माता म्हणते :

माझे तान्हे बाळ देवाचे मंगल
अमृताचें फळ संसाराचे ।।
तान्हिया रे बाळ मंगलाच्या मूर्ति
संसाराची पूर्ती तुझ्यामुळें ।।
तान्हें हे जन्मले भाग्य ग उदेलें
आनंदी बुडालें सारे जग

मातेलाच तान्ह्या बाळाच्या जन्माचा आनंद होतो असे नाही, तर सर्व जगाला त्याचा आनंद आहे. तान्हे बाळ जन्माला आले. पाळणा बांधला. माहेराहून

मामा पाळणा पाठवतो :

पालख पाळणा मोत्यांनी विणीला
मामाने धाडिला तान्हें बाळा ।।

या पाळण्याला माउली नटवते. त्याच्यावर खेळणी बांधते. पाळण्यात तिचे रत्न असते :

पाळण्याच्या वरी विचित्र पांखरूं
नक्षत्र लेंकरूं तान्हें बाळ ।।
पाळण्याच्या वरी खेळणे कागदाचें
गोड रूप तान्हेयाचें राजसाचें ।।

पाळण्यातील गोड नक्षत्रासारख्या मुलाला पाहून सर्वांना मोह पडतो. येणारा जाणारा पाळण्यात डोकावतो व झोका देतो.

रंगीत पाळणा बांधला बहाली
येता जाता मुली हालवीती ।।

त्या पाळण्याचे मातेला कौतुक वाटते. तो पाळणा तिच्या मुलाला वाढवीत असतो. त्या पाळण्याच्या त्या दोऱ्या तिला मोत्यांचे सर वाटतात.

पाळण्याचे दोर जसे मोतियांचे सर
शोभिवंत घर पाळण्यानें ।।

ज्या घरात पाळणा नाही ते घर शून्य. दिव्यात वात, शिंपल्यात मोती, झाडाला फूलफळ, तसे घराला मूल, पाळण्यात बाळाला निजवताना अंथरूणसुद्धा किती छान केलेले असते :

अंथरूण केलें पांघरूण शेला
निजविते तुला तान्हें बाळा ।।
आंथरूण केले जाईमोगऱ्यांचे
सख्या गोजिऱ्याचे अंग मऊ ।।
बाळासाठी केली चिमणीशी गादी
बाळाचे सारें आधी कवतूक ।।

अशा पाळण्यात बाळ निजते. एकटे तान्हें बाळ पाळण्यात असते. आई कामधंदा करीत असते. बाळाला कोण सांभाळील, पाळण्याकडे कोण पाहील? आई म्हणते :

निज रे बाळका आपुल्या पालखी

तुला रक्षण जानकी   रघुनाथ ।।

पाळणा म्हणजे जणू देवाची मांडी. रामराया तुझे रक्षण करील. नीज हो बाळ. सीतामाई तुला सांभाळील.

पहाटेची वेळ असावी. आई उठते. परंतु बाळ रडते. माता म्हणते "नको रे उठू सकाळी, सासूबाई रागावतील, ही कामाची ही राजा वेळ. आईची फजिती नको करूस."

सकाळच्या वेळी   किती असे कामधंदा
नको रडूं रे गोविंदा   तान्हे बाळा ।।
नीज रे राजसा   नको रडूं उजाडत
येतील ओरडत   सासूबाई ।।

बाळाला आईची दया येते. तो झोपल्यासारखे करतो. आई पाळण्यात डोकावतो ते खुदकन् हसतो लबाड :

मला वाटे बाळ   आहे पालखी नीजले
जाऊन बघतें   तोच खुद्‌कन् हांसले।।
उघडून डोळे   पाय घालून तोंडांत
होते तान्हुले खेळत   पाळण्यांत ।।

असे हे गोरे- गोमटे आईचे बाळ. त्याला माऊली किती जपते. तिला वाटते याला दृष्ट झाली. दृष्टीच्या ओव्या किती तरी आहेत : बाळ दिसते सुंदर. का नाही दृष्ट पडणार?

तान्ह्या रे तान्हीका   बाळा रे माणीका
तुझ्या रे श्रीमुखा   लिंबलोण ।।
दृष्ट मी काढूं किती   मीठमोहऱ्या काळी माती
गोरेपणा जणूं किती   तान्हे बाळाच्या ।।

बाळाचे गोरेपण- म्हणून दृष्ट पडते. हे गोरेपण कसे लपवायचे? मुलाकडे कोणी टक लावून पाहू लागले की मातेच्या ह्रदयाचे पाणी पाणी होते:

नका बाळाकडे   असे पाहूं टकामका
चित्ताला लागे धका   माउलीच्या ।।

बाप मुलाला घेऊन सभेमध्ये गेला. तेथल्या लोकांची दृष्ट लागली बाळाला:

माळ्याला ताकीद   विसबंदाच्या रोपांची
तान्ह्याबाळा दृष्ट लागली   सभेमधल्या लोकांची ।।

विसबंदीच्या पाल्याने दृष्ट काढतात. विसबंद म्हणजे मेंदी. दृष्टीचे विष बंद करणारा वेल. कोणी जर विचारले उगीच का शंका घेता दृष्ट पडली म्हणून, तर आई म्हणते, हातातल्या मनगट्या बघा सैल झाल्या :

कोणें दृष्ट केली तान्हेबाळा सोनटक्क्या
बिंदुली मनगट्या सैल झाल्या ।।

बाळाला सोनटक्क्या म्हटले आहे. सोनटक्क्याचे फूल अति सुकुमार व सुवासिक असते. ते क्षणात कोमेजते. काही काही दृष्टीच्या ओव्या वाचा :

हात रे कुतऱ्या छुत रे मांजरा
तान्हे बाळाच्या काजळा दृष्ट पडे ।।
जळो जळो दृष्ट मीठाचे झालें पाणी
बाळ माझें फुलावाणी कोमेजलें ।।

तान्हेबाळाच्या रूपाचे वर्णन करता करता महाकाव्य जन्माला आले आहे. वामन पंडितांची स्वभावोक्ती येथे फिकी पडेल. ते पांडित्य मातेच्या वात्सल्यातून उत्पन्न झालेल्या प्रतिभेपुढे काळवंडेल. मुलाला नवीन दात आलेले असावेत. त्याला उपमा डाळिंबाच्या दाण्यांची आहे. लाल हिरड्यांतून ते लहान पांढरे दात बाहेर येत असतात :

तान्हियाचे दांत जसे डाळिंबाचे दाणे
खेळविते कौतुकाने उषाताई ।।
तान्हियाचे दांत जशी मोतियांची ओळी
हांसता पडे खळी गोड गालीं ।।

परंतु या वर्णनापेक्षाही ही खालील ओवी पहा :

पेरा झाला रानांतून मोड काढी वरी मान
तसे हंसे माझं तान्हं पाळण्यांत ।।

शेतातून अंकुर नुकतेच वर येत असावेत, तसे बाळाचे नवीन चिमणे दात त्याच्या हसण्यातून प्रगट होतात, किती सहृदय व समर्पक दृष्टांत!

आणि मुलाच्या गालांचे वर्णन ऐका :

गोऱ्या गालांवर लाल शोभतो मुलामा
गोड हंसशी गुलामा तान्हे बाळा ।।
रुप्याच्या वाटींत ठेवावे लाल फूल
तसे राजसाचे गाल तान्हेयाचे ।।

किती सुंदर उत्प्रेक्षा! तान्हे बाळाचे आणखी थोडे वर्णन वाचू या :

कुरळ्या केसांचा विरळ दातांचा
लाडका आईचा तान्हेबाळ ।।
मोठे मोठे डोळे भिवया लांबरुंद
गाल गोरे लालबुंद राजसाचे ।।
तान्हिया रे बाळा गोड तुझी हनुवटी
गोंडस तुझ्या मुठी नाचवीशी ।।

असे हे बाळ घरात वाढत असते. चंद्राच्या कोरेप्रमाणे वाढते :

चंद्राची वाढे कला तसे बाळाचें बाळासें
लावण्या उणें नसे अणुमात्र ।।

आई त्याला वाढवीत असते. त्याला न्हाऊमाखू घालीत असते. ही एक अमर ओवी वाचा :

माझे तान्हें बाळ हळदीने न्हाई
त्याचें पाणी जाई शेवंतीला ।।

ध्वनी म्हणजे सूचकता हा काव्याचा आत्मा मानतात. ती सूचकता किती सुंदरतेने वरील ओवीत प्रकट झाली आहे! शेवंतीला गोड पिवळी फुले का येतात? माझ्या तान्हेबाळाच्या न्हाणाचे पाणी तिला मिळते म्हणून. त्याच्या अंगाची हळद पाण्याबरोबर जाते. त्यातून ही फुले फुलतात. बाळाच्या सौंदर्याचे याहून कोणते वर्णन अधिक असू शकेल? देवाच्या कृपाकटाक्षाने भाग्ये येतात. बाळाच्या न्हाणाच्या पाण्याने शेवंती बहरतात.

मूल आधीच सुंदर असावे. त्यात त्याला अलंकार घातले म्हणजे तर सौंदर्याला पूरच येतो :

तान्हिया रे बाळा तुला काय साजे
गळ्यांत बांधीजे वाघनख ।।
गळ्यांत हांसोळी कमरे सांखळी
मूर्ति साजिरी गोजिरी तान्हे बाळाची ।।

परंतु श्रीमंत माताच आपल्या लेकराला असे सजवील. गरीब आईने काय करावे? गरीब आई काय म्हणते पहा :

श्रीमंतीचा डौल तुझा बाई पुरे कर
सोनेरी चंद्रकोर माझे बाळ ।।

माझ्या ग बाळाला नको हो दागिना ।।
कोंवळ्या लावण्या पूर आला ।।

सोनेरी चंद्रकोर, ती का आणखी सजवायची? 'कोवळे लावण्य' हा शब्दप्रयोग किती रसमय आहे नाही?

गरीब माता आपल्या अश्रूंच्या हारांनी बाळाला सजवील. प्रेमाने रंगवील.

गरीब माउली काय मुला लेववील
प्रेमाने रंगवील राजसाला ।।
आसवांची माळा गळां घालील बाळाचे
गरीब माउलीचे काय दुजें ।।

श्रीमंतांच्या बायका दागदागिने अंगावर घालून जातील. गरीब आईने काय करावे?

सखिये लेणे लेती आपुले हारदोरे
आपण दाखवूं आपुलें बाळ गोरें ।।

ही ओवी ऐकून मी नाचलो. श्रीमंत मैत्रिणींनी ते मोत्यांचें हार- ते दोरे - गळ्यात बांधले. मजजवळ तसले सोनेरी दोरे नाहीत.असली श्रीमंती मला जगाला दाखवता नाही येणार. परंतु मजजवळ एक वस्तू आहे. एक अमोल अलंकार आहे. माझे हे गोरेगोमटे बाळ; हाच माझा दागिना. ही माझी संपत्ती. ही मी जगाला दाखवीन व स्वतःला धन्य मानीन.

तान्हे बाळ वाढते, मोठे होते. ते रांगू लागते. हिंडू फिरू लागते :

रांगुनी खेळूनी बाळ उंबऱ्यात बसे
सोन्याचा ढीग दिसे तान्हेबाळ ।।

उंबऱ्यात बसलेले मूल आईला सोन्याची रास वाटते. इंग्रजीत "सिलास मार्नर" म्हणून जगत्प्रसिद्ध कादंबरी आहे. तो सिलास एकटा असतो. एके दिवशी पहाटेच्या वेळी त्याच्या दारात एक लहान मूल ठेवलेले आढळून येते. सिलास म्हणतो, "सोने, माझे सोने." हे सोने निर्जीव नाही, हासते खेळते सोने आहे. बाळ रांगू फिरू लागला म्हणजे आईला आनंद होतो व काळजीही वाटते. त्याच्या गुडघ्यांना खडे बोचतील, रांगत कोठे दूर जाईल असे भय वाटते :

अंगणीचे खडे मी ग लोटीत नित्यानें
रांगतो गुडघ्याने गोपूबाळ ।।
शेजारणीबाई दाट घाली सडा

बाळ माझे ग रांगते त्याला टुपेल हो खडा।

रांगणारा बाळ चालू लागतो. त्याला पाय फुटतात, पंख फुटतात. तो तांदूळ उडवतो, फुले कुसकरतो, पाणी सांडतो, पीठ उडवतो, मातेला आवरता आवरत नाही. शेजारी जातो व खोड्या करतो, शेजी रागावते :

दळणाची पाटी ठेवू मी कोणीकडे
हिंडते चोहींकडे तान्हें बाळ ।।
शेजारिणी बाई आटप मोगरा
अचपळ माझा हिरा गोपूबाळ ।।

एखादे वेळी शेजी रागावते व शिव्या देते. मातेची तगमग होते. ती शेजीच्या पाया पडते.

पुरे कर शेजीबाई किती मी क्षमा मागू
आहेत तुझी मुलें तुला मी काय सांगूं ।।
चुकले माझें बाळ तुझ्या किती पायां लागूं
पुरे कर शेजीबाई आपण प्रेमाने ग वागूं।।

तुलाही मुले आहेत. तुझे मातृह्रदय आहे. असे आई शेजीला म्हणते. याहून आणखी बुद्धिवाद कोणता? शेजीने तरीही तोंडाचा पट्टा सुरूच ठेवला तर माता म्हणते

शेजीनें वाहिली शिव्यांची लाखोली
पुष्पपूजा झाली बाळराजा ।।
शेजीनें दिली शिवी लागली माझ्या जीवी
आयुष्याची तुला ओंवी तान्हेबाळा ।।
शेजीने दिली शिवी वेचून घेतली
कळी मी मानीली जाईजुईची ।।

शेजीच्या शिव्या म्हणजे बाळाला "शताउक्षी" म्हणणारे आशीर्वादच आहेत असे थोर समाधान माता स्वतःचे करून घेते.

बाळाच्या कामात मातेचा सारा वेळ जातो. त्याला आंगडे-टोपडे शिवायचे, बाळकडू घालायचे, त्याच्या टोपड्याला गोंडे लावायचे, त्याला न्हाऊमाखू घालायचे, काजळ-तीट लावायची, अशी या बालब्रह्माची सेवा करून माता मुक्त होते. ती सारे विसरते :

शेजी आली घरा बैस म्हणाया चुकल्यें

तुझ्या कामांत गुंतल्यें   तान्हेबाळा ।।

बाळसुद्धा नाना हट्ट घेतो. त्याला नाना खेळणी हवीत, सारे हवे. तो खेळणी हरवतो. ती शोधावी लागतात, गायीच्या गोठ्यात बाळाची खेळणी पडतात. वासराजवळ तो खेळतो. तेथे खेळणी विसरतो.

गायीच्या गोठ्यांत   सर्पाची वेटोळी
तेथे तुझा चेंडूफळी   गोपूबाळा ।।

आता ती चेंडूफळी कशी आणायची? परंतु बाळाच्या हट्टापुढे काय?

आणली चेंडूफळी   सर्पाच्या जवळून
सर्प भुले सर्पपण   मातेसाठी ।।

मुलाच्या प्रेमासाठी माता आली. तिला का साप चावेल? कधी गोठ्यात वाघ बसलेला असावा. तेथे मुलासाठीं मातेला जावे लागते :

गायीच्या गोठ्यांत   वाघ हंबरला
शेष दणाणला   पाताळांत ।।

वाघाच्या डरकाळीने पाताळातला शेषही घाबरला. माउलीला ते गायीचे हंबरणेच वाटते. गायीच्या गोठ्यातील वाघ क्रूर वाटत नाही. बाळाच्या प्रेमाने रंगलेली तिची सारी सृष्टी.

हट्टी बाळाने नाना छंद घ्यावे. त्याची समजूत घालता घालता आईला पुरेसे होते.

छंदकर बाळ   छंदाला काय देऊं
नको असा हट्ट घेऊ   तान्हेबाळा ।।
छंदकर बाळ   छंद घेतलासे रात्री
चंद्रमा मागे हाती   खेळावया ।।

मुलगा खेळत असला म्हणजे मातेला आनंद असतो. परंतु तिन्हीसांजा झाल्या म्हणजे ती त्याला शोधू लागते. त्याला ती हाका मारते. त्याचा कमरेतल्या घागऱ्यांचा नाद ऐकते :

घागऱ्या घुळघुळ   दणाणला सोपा
खेळतो प्राणसखा   गोपूबाळ ।।
घागऱ्यांचा नाद   पडतो माझ्या कानी
खेळतो वृंदावनी   गोपूबाळ ।।

माजघर दणाणून सोडणारा बाळ बाहेर जातो. आई हाका मारून कानोसा

घेते:

बाळ खेळूं जाई वडासाउलीये
घरी माउलीये साद घाली ।।

गायी गोठ्यात येऊन वासरांना चाटतात. पक्षी घरट्यात जाऊन पिलांना भेटतात. परंतु आईचा बाळ कोठे आहे :

किती हांका मारू उभी राहून दारात
चंद्र कोणाच्या वाड्यात गोपूबाळा ।।

दिवे लागले. वरती देवाचा चंद्र उगवला. परंतु माता म्हणते माझा चंद्र कोठे आहे? शेवटी बाळ येतो. परंतु त्याला खेळणे पुरे वाटत नाही. आई म्हंणते :

तिन्हीसांजा झाल्या गुरांवासरांची वेळ
वाटेवेगळा तूं खेळ गोपूबाळा ।।

खेड्यात सायंकाळी पाहावे. गुरांची गर्दी असते. रानातून गायीगुरे परत येत असतात. म्हणून खेळायचेच असले तर वाटेत तरी खेळू नको असे आई सांगत आहे.

तान्हेबाळाच्या ओव्यांत सारी सृष्टी ओतलेली आहे. गाय व तिचे वासरू; माय आणि तिचे लेकरू. गायीच्या ओव्या किती गोड आहेत :

ये ग तूं ग गायी चरून वरून
तान्हेबाळाला म्हणून दूध पाजूं ।।
गायी ग चरती कोंवळी कणीसें
तान्हेबाळाला नीरसे दूध पाजूं ।।
गायी ग चरती कोंवळा ग चारा
दुधाच्या चारी धारा वासरांना ।।
गायीचा ग गोऱ्हा मांडी वाळूनीया बसे
वाडा शोभीवंत दिसे तान्हेबाळानें ।।

आई मुलाला भरवते तेव्हा गायी, म्हशी, चिमण्या, कावळे, फुलेपाने सारे दाखवीत असते :

अंगणात गाय दाखवीते माय
गोड घास खाय तान्हेबाळ ।।
बघ रे चिमणी करीते चींव चींव
म्हणते तुला जेव तान्हेबाळा ।।

लहान मुलाबरोबर सारी सृष्टी बोलते, सारी सृष्टी खेळते. गांधीसेवासंघाचे थोर अध्यक्ष श्री. किशोरलालभाई मश्रूवाला यांनी "केळवणीना पाया" - शिक्षणाचा पाया म्हणून ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी इसापनीती वगैरे गोष्टी सत्याच्या दृष्टीने अव्हेरिल्या आहेत. ते म्हणतात, "कुत्रा का बोलतो, घार का बोलते?" होय. लहान मुलांजवळ चराचरा बोलते. इसापच्या गोष्टीचा यातच तर मोठेपणा आहे. माणूस मोठा झाला म्हणजे त्याला माणसाचीच भाषा फक्त थोडीफार समजते. त्याची दृष्टी मर्यादित होते. तसे मुलाचे नाही. सारे चैतन्य त्याच्याजवळ हसते बोलते :

माझ्या अंगणात नाचते चिमणी
बाळाला खेळणी देवाजीचीं ।।
माझ्या अंगणात कावळा का का करी
बाळाला हांका मारी खेळायला ।।

रवीन्द्रनाथांच्या 'शिशु' या काव्यात देवाने आकाशातील रंग, झाडावरची फुलेफळे हे सारे आपल्या या लेकरासाठी दिले आहे अशी कल्पना आहे. ते म्हणतात, "आई आपल्या मुलाला रंगीत खेळणी देते. ते पाहून आकाशात सुंदर रंग का हे आज मला समजले." रवींद्रनाथांची ही कल्पना स्त्रियांनी या ओव्यांत ओतली आहे. माता म्हणते, "ही पाखरे म्हणजे देवाघरची बाळासाठी पाठविलेली खेळणी."

परंतु लहान बाळ केवळ कावळे, चिमण्या, वासरे या निष्पाप प्राण्यांजवळ का खेळतो? नाही. तो सापाजवळ सुद्धा खेळतो. विंचवाजवळ बसतो. लहान मुलाचा सर्वांवर विश्वास :

माझ्या अंगणात पांचफणी नाग डोले
त्याच्या संगं खेळे तान्हे बाळ ।।

माता येऊन पाहते तो पाच फणांच्या सापाजवळ हा बाळकृष्ण खेळत आहे. हजारो फणांचा नाग आला तरीही त्याच्याशी बाळ खेळेल.

अंगणात कावळ्यांची गर्दी व्हावी, का, का, का करीत असावेत. आई त्यांना म्हणते, "कावळ्यांनो, कशाला हाका मारता? आज बाळाला बरे नाही हो."

माझ्या अंगणात कावळ्यांची गर्दी
बाळाला माझ्या सर्दी सांगा त्यांना ।।

घरी मामा आलेला असतो. आई म्हणते, "मामा, भाच्याला खेळव, हिंडव. त्याला नाना फुले दाखव. पाखरे दाखव."

असा हा खेळकर बाळ कधी खोड्या करतो. त्याच्या हातून चूक होते. लोक नावे ठेवतात, म्हणून बाळ रडतो. आईचे हृदय गहिवरते :

टोचून बोलती परके चटाचटा
बाळाच्या डोळ्यांना पाणी येई पटापटा ।।
इवलासा गुन्हा किती बाळाला बोलती
मेरू मोहरीचा करिती लोक मेले ।।

तसेच मातीत वगैरे मळून जर बाळ आले तर सारे रागावतात. परंतु भूमातेच्या मांडीवर लोळून आलेले बाळ आईला अधिकच गोड वाटते :

मातीनें मळलें मांडीयें चढलें
मायेने मानीलें मोक्षसुख।।

ही ओवी किती सहृदय आहे ! कालिदासाचा

"धन्यास्तदंगरजसा मलिनीभवन्ति ।।"

हा चरणही येथे मागे पडतो. मुलाच्या अंगाला लागलेली माती पाहून माता काय म्हणते ऐका :

माती का लागली माती ना तो रे बुका
चुंबीन तुझ्या मुखा तान्हेबाळा ।।
माती लागली तिची झाली रे कस्तुरी
सोन्याच्या शरीरीं तुझ्या बाळा ।।

तुझ्या अंगाला माती लागली कीतिचा पवित्र पंढरपुरचा बुक्का होतो. तुझ्या अंगाला माती लागली की ती पृथ्वीमोल कस्तुरी होते. लहान मुलांचे याहून कौतुक जगाच्या वाङ्मयात क्वचितच कोठे केलेले असेल? ज्या मातांनी हे अमर वाङ्मय अज्ञान राहून, जगासाठी म्हणून नव्हे, बाजारात मांडण्यासाठी म्हणून नव्हे, तर स्वतःच्या आनंदासाठी सहज निर्मिले व घरोघर दरवळून ठेवले, त्यांना कोण भक्तिभावाने व निरहंकारपणे प्रणाम करणार नाही?

लहान बाळ उठतो लवकर परंतु रात्री झोपत नाही लौकर. सकाळी सूर्य वर आला, पाखरे किलबिल करू लागली, फुले फुलली की उठलाच राजा :

पांखरे उडती फुलतात फुले
उठतात मुले उजाडत ।।

सूर्य उगवला कमळें फुलली
बाळें उघडिली निजदृष्टी ।।

आईला सकाळी कामधंदा, म्हणून ती त्याला नीज म्हणते :

झोंप रे अजून कशाला उठसी
कोणी म्हणेल आळशी म्हणून का ।।

परंतु रात्री मात्र लौकर झोपत नाही :

झाली आता रात्र झोंप म्हणे आई
चंद्र कां वर येई माउलीये ।।
झाली आतां रात्र झोंप रे माझ्या तान्ह्या
नाचती चांदण्या माउलीये ।।

चंद्र झोपत नाही, चांदण्या चमचम करीत आहेत. मग मीच का झोपावे अशी शंका हा लबाड घेतो. आईला अनेक प्रश्न विचारतो. संध्याकाळ झाली म्हणजे कोल्हे कुईकुई करू लागतात. कोकणात तर अगदी घराजवळ ही कोल्हेकुई ऐकू येते. बाळ विचारतो, "आई, का ग हे कोल्हे ओरडतात?"

कोल्हे-कुईकुई कां ग आई सांग मशी ।।
थंडी पडेल ही भारी बाळ घ्यावा म्हणती कुशी।।

किती सहृदय उत्तर. " आज थंडी पडेल, बाळाला कुशीत घ्या" असे कोल्हे सांगत आहेत असे मातेला वाटते. बाळ विचारतो, "आई, हे हजारो काजवे झाडांवर का लुकलुक करतात?" आईचे उत्तर वाचा व नाचा :

कां ग झाडांवर आई काजवे नाचती
तुला ओवाळती झाडेमाडे ।।

वनदेवता बाळाला जणू हजारो नीरांजने लावून ओवाळीत आहे! आणखी कल्पना पहा :

काजवे फुलले फुलले लाखलाख
पहाया श्रीमुख तान्हेंबाळाचें ।।
वनदेवतांचें काजवे जणुं डोळे
बघाया माझें बाळ त्यांनी रात्री उघडीले ।।

आकाशात हे तारे का ग चमचम करतात? या बाळाच्या प्रश्नाला आई उत्तर देते :

आकाशांत तारे काय आई म्हणताती

तुझी राजा स्तोत्रें गाती अखंडीत ।।
आकाशांत तारे त्यांचे ओठ कां हालती
संगात गाणी गाती तुला बाळा ।।

तारे थरथरत असतात. त्यावर त्यांचे ओठ हलत आहेत, ते गाणी गात आहेत, तुझी स्तोत्रे गात आहेत. अशीही मनोहर उत्प्रेक्षा केलेली आहे :

थुई थुई उडे कां ग कारंजे उसळे
तुझ्यामुळे उचंबळे तान्हेबाळा ।।

चंद्राला पाहून समुद्र उचंबळतो. परंतु माझ्या बाळाचा मुखचंद्र पाहून दगडी कारंजीही उचंबळली व सारखी उडू लागली !

बाळाचे प्रश्न कधी कधी निराळेच असतात. बायका नवऱ्यासाठी गादी घालतील. परंतु स्वतःसाठी साधेच अंथरूण करतात. बाळ विचारतो.

आई गादी कोणा साधे अंथरूण कोणा
गादी तुझ्या जन्मदात्या साधे मला माझ्या तान्ह्या ।।
गादीवर आपण निजूं बाप्पाजी निजो खाली
वेडा कुठला म्हणे आई हळूच थापट मारी गाली ।।

बाळ विचारतो, " आई,तू मारीत नाहीस. बाबा का मारतात?"

आई तूं मुका घेशी बाबा का बोलताती
पुत्र होवो वाचस्पती म्हणूनीयां ।।
आई तूं मायेची बाबा का कठोर
लेकाने व्हावें थोर म्हणूनीयां ।।

पित्याचा मोठेपणा मुलाच्या मनावर माता ठसवीत आहे. तिरुक्कुरल अथवा तामीळ वेद म्हणून एक प्रसिद्ध तामीळ ग्रंथ आहे. त्यात म्हंटले आहे, 'बापाची पुत्रासंबंधी इच्छा काय असते? तू कोणाचा मुलगा असे सभेत पंडितांनी कौतुकाने मुलाला विचारावे अशी असते."

मुलाने शहाणे व्हावे, विद्धान व्हावे असे बापाला वाटते. पित्याची इच्छा पूर्ण कर, असे माता त्याला सांगत असते. पाहुणे वगैरे घरी आले तर त्यांना श्लोक म्हणून दाखव, त्यांची शाबासकी मिळव असे ती सांगते :

पाहुणे घरी आले सांग त्यांना नांव नीट
नको लाजूं होई धीट तान्हेबाळा ।।
पाहुणे घरी आले करितील तुझी स्तुति

अशी करावी हो कृती तान्हेबाळा ।।

पाहुणे नाना प्रकारचे असतात.एकदा एक नवखे गृहस्थ घरी आले. बाळ विचारतो :

कोण बागुलबोवा बैसला माये ओटी
काका आले तुझ्या भेटी तान्हेबाळा ।।

उत्तर-रामचरित्र नाटकात वाल्मीकीच्या आश्रमात वसिष्ठ ऋषी आलेले असतात. तेव्हा एक शिष्य मोठ्या मित्राला विचारतो, " कोण रे तो वाघोबा आला आहे?" त्याची आठवण होते येथे. परंतु ही पुढील मजेची ओवी ऐका :

मोठ्या मोठ्या मिशा भली मोठी शेंडी
होतसे घाबरगुंडी तान्हेबाळाची ।।
काय रे झालें बाळा कांही नाही घेता मुका
रुतती दाढीमिशा काकाजींच्या ।।

आपला बाळ घरकोंबडा व्हावा असे आईला वाटत नाही. त्याने बाहेर जावें, खेळावे, धीट व्हावे, असे तिला वाटते. परंतु बाळ काय बोलतो ते ऐका:

बाहेर बाळा जाई लपंडाव खेळे
कुसकरती माझे डोळे माउलीये ।।
बाहेर तूं जाई खेळ खेळ रे लंगडी
आई दुखते तंगडी खरोखर ।।
बाहेर तूं जाई खेळ हमामा हुतूतू
आई खेळूं मी तूं घरामध्ये ।।

मुलाला शाळेत घालतात. आईला सोडून तासन् तास कोंडवाड्यात बाळ जाणार. आणि त्या जुन्या काळच्या शाळा. 'छडी वाजे छमछम, विद्या येई घमघम' हे त्या वेळचे शिक्षणशास्त्रातील महान् सूत्र. शाळेतील पंतोजीचे हे मातृकृत वर्णन ऐका :

शाळेचा पंतोजी काय शिकवितो
सोडितो बांधीतो चंचीलागी ।।
शाळेचा पंतोजी शिकवी अकरकी
मुलांची मुखश्री कोमेजली ।।
शाळेचा पंतोजी वाजवीतो छडी
येती रडकुंडी सारी मुलें ।।

शाळेचा पंतोजी मुलांना वाटे यम
केलासे कायम कोंडवाडा ।।

मुलांचा विकास हा असा व्हायचा? मुलाला शाळेत पाठवताना आईला वाईट वाटे. परंतु बापापुढे काय चालणार?

शाळेसी जातांना रडे कशोंचे रें आले
पाटीदप्तरांचे ओझें आई ।।

परंतु खरे ओझे पंतोजीच्या मारण्याचे असे. आई मग मुलाच्या बापाला म्हणते :

शाळेच्या पंतोजींना देऊं करावीं सुपारी
नका मारूं हो दुपारी तान्हेबाळा ।।
शाळेच्या पंतोजींना देऊं करा धोतरजोडा
सांगा नका देऊं खडा मानेवरी ।।

निदान दुपारच्या उन्हाच्या वेळेस तरी म्हणावे मारू नका. तिरिमिरी यायची. मुलाला नीट चांगले बारीक लिहायला पंतोजीने शिकवावे असे मातेला वाटते. नाही तर पत्रातील श्री बारीक म्हणून जावईबोवा रडू लागले तसे पुढे बाळाचे व्हायचे:

शाळेच्या पंतोजींना देऊं करावी खारीक
बाळ लिहाया शिकू दे नीट अक्षर बारीक ।।

पंतोजीच्या व आईच्या मारण्यातील फरक पुढील ओवीत पहा कसा दाखवला आहे.

माऊलीचा मार नसे पंतोजीसारखा
माउली मायेची असे पंतोजी पारखा ।।

जो प्रेम करतो, त्याला मारण्याचाही हक्क पोचतो. त्याचे मारणेही मधुर असते, पवित्र असते.

क्रोधो हि निर्मलधियां रमणीय एव ।

निर्मळ माणसाचा रागही गोड असतो. परंतु जगात मारण्याचा हक्क सर्वांना पाहिजे असतो. प्रेम करण्याचा हक्क क्वचितच कोणास हवा असतो. असो.

कधी कधी आई मुलावर फार रागावते. ती अबोला धरते. लहान बाळ कावराबावरा होतो. त्याला काय करावे कळत नाही, मग तो शेजीकडे जातो व विचारतो.

शेजी मला सांगा आई प्रेमें कशी घेऊं

रडत उभा राही — दीनवाणा ।।
शेजी मला सांगा — कसें आईला हंसवावें
जाऊन मांडीवर बसावें — एकाएकी ।।
शेजी मला सांगा — कसें हसवूं आईला
घरी जाऊन डोळ्याला — तान्हेबाळा ।।

परंतु शेवटचा शेजीचा उपदेश ऐका :

शेजीला पुसतो — माउली कां बोले ना
दुखविशी तिच्या मना — घडीघडी ।।
शेजी मला सांगा — आईचा जावा राग
चरणी तिच्या लाग — भक्तिभावें ।।

तुकाराममहाराजांनी पाय धरण्याचा सार्वभौम उपाय सांगितला आहे.

तुका म्हणे कळ । पाय धरल्या न चळे बळ ।।

लहान मुलाला आईचा लळा अधिक असतो. त्याला आई प्रेमळ वाटते, बाबा कठोर वाटतात. परंतु पित्याच्या वरकरणी कठोरपणात मुलाचे हितच साठवलेले असते. आईबापांची तुलना ज्यात आहे, त्या ओव्या किती मार्मिक आहेत :

बाप्पाजी चंदन — घासलीया वास
आईचा सुवास — आपोआप।।
बाप्पाजी भास्कर — माउली चंद्रमा
बाळाला वाटे प्रेमा — माउलीचा ।।

किती गोड ओव्या.

लहान मुलाला जर आई नसेल तर कोण घेणार त्याची काळजी?

कोमल रोपाला — काय नको पाणी
नको का जननी — तान्हेबाळा ।।

या पुढील ओव्या वाचा व नाचा :

माउली असावी — रानीच्या पांखराला
चोंचीने त्याला चारा — भरवीते ।।
माउली असावी — गोठ्यांच्या वांसराला
आंग चाटायला — पान्हावोनी ।।

आई मुलांसाठी किती कष्ट काढते. तिचे उपकार कसे फिटणार?

माउलीचे कष्ट कुठे रे फेडूं देवा
तळहाताचा पाळणा नेत्रीचा केला दिवा ।।
बापाचे उपकार फिटती काशी गेल्या
आईचे उपकार फिटती ना काहीं केल्या।।

कितीही भाग्य जवळ असले, परंतु जर बाळ जवळ नसेल तर मातेला ते विष आहे, वमनवत् आहे. मुलाशिवाय स्वर्गात राहण्याऐवजी मुलासंगे ती रस्त्याच्या कडेला उभी राहील व त्यात स्वर्ग मानील. मातेचे हे थोर उद्गार ऐका व मान लववा :

धन ग संपदा आग लागो त्या वस्तेला
माझ्या बाळाच्या ग संगे उभी राहीन रस्त्याला ।।

आणखी एक मधुरतम व सहृदय ओवी पहा :

नदी वाहे झुळझुळ परी पाण्यावीण मासा
जीव माझा तोळामासा बाळावीण ।।

संसारात भाग्यसरिता वाहत असूनही बाळ जवळ नसेल तर माता तडफडेल. पाण्यात असूनही माशाने तडफडावे तसे हे आहे. अहाहा! अशा ओव्या प्रसवणाऱ्या मातांना कोण प्रणाम करणार नाही, ही पवित्र प्रतिज्ञा पाहून कोण मान डोलवणार नाही व आपला सारा कवित्वाचा अभिमान सोडून देणार नाही?

आईचे वर्णन ज्या ओव्यांत आहे, त्यांतील कोणत्या देऊ, कोणत्या दावू? त्या मुळातच वाचा. राहवत नाही म्हणून दोन-चार देतो:

माउलीचा मार त्यांत अमृताचा चारा
बाळाच्या कल्याणाच्या त्यांत कोटी कोटी धारा
समुद्राचे पाणी अहोरात्र नाचे
चित्त तसे माऊलीचे बाळासाठी ।।
किती ओव्यांमध्ये गाऊं माउलीच्या मी प्रेमाला
कोण प्रदक्षिणा घाली आकाशाच्या ग सीमेला ।।

असे हे मातृप्रेम बाळपणी अनुभवावे :

फुलामध्ये फूल फूल हुंगावे जाईचें
सुख भोगावें आईचे बाळपणी ।।

परंतु ती सावत्र आई! भेसूर कल्पना. सावत्र आईच्या दुष्ट पणाच्या किती गोष्टी. माता काय म्हणतात ते ऐका :

सख्ख्या ग आईची गोड लागे मारपीट
सावत्र आईची कडू साखरेची मूठ
सावत्र आईची प्रीतीहि विषारी
कांटेच टुपतील जरी बाभुळ मिठी मारी ।।

सावत्र आई म्हणजे बाळाला शाप. आईला सावत्र शब्द लावणे म्हणजे आई शब्दाचा अपमान आहे. सावत्र आई म्हणजे नागीण, पेटलेली खाई. इतक्यानेच नाही समाधान होत :

सावत्र माउली माउली ती ना मृत्यु
तान्हेबाळाला जप तूं देवराया ।।

मातृप्रेमाचा प्रेमळ अनुभव घेत, पंतोजीजवळ शाळेत व घरी मायबापांजवळ शिकत बाळ असा लहानाचा मोठा होत असतो. जरा मोठा होऊ लागला म्हणजे त्याला मधून मधून शेजारीपाजारी दुसऱ्याकडे जेवायला वगैरे जावे लागते. परंतु पंक्तीत बाळ उपाशी घरी येतो. तो भूक भूक म्हणतो. मग आई विचारते :

जेवून आलास भूक इतुक्यांत कशी
आई तुझ्या हातच्या गे घासाविणे उपवाशी ।।

आणखी आई प्रश्न विचारते, 'श्लोक म्हटलास का, पंक्वान्न काय होते? परंतु उत्तर काय मिळते पहा :

जेवून आलास काय होते लाडू वडे
मला नाही आई ठावें लक्ष होतें तुझ्याकडे ।।
जेवून आलास श्लोक कोणता म्हटला
आई तुला आठवून पूर डोळ्यांना लोटला।।

या प्रश्नोत्तररूप ओव्या वाचून कोणाचे हृदय भरून येणार नाही? शेवटी बाळ म्हणतो :

आई नको धाडूं कधीं दुसऱ्यांच्या घरी
बये तुझ्या ग हातची गोड कोरडी भाकरी ।।

आता मुलगा आठा वर्षांचा झाला. त्याची मुंज होते. मुहूर्त पाहतात. मुंजीची बोलावणी जातात :

नदीपलीकडे हिरव्या शालूच्या दोघीजणी
मुंजीची बोलावणी गोपूबाळाच्या ।।
मला हौस मोठी सोन्याच्या जानव्याची

मुंज करा तान्हेयाची गोपूबाळाची ।।
मुंजीचा मुहूर्त मामा पुसतो जोश्याला
चंद्रबळ भाचेयाला गोपूबाळाला ।।

मुंज झाल्यावर भिक्षावळ होते:

पहिली भिक्षावळ मामा मावशींची
तुझ्या आजोळींची गोपूबाळ ।।

मग तो ब्रह्मचारी भिक्षा मागतो :

एका हाती दंड दुजा हाती झोळी
भिक्षा मागे ब्रह्मचारी गोपूबाळ ।।

आणि भटजी शिकवायला येतो. पंतोजीचीच ती तऱ्हा:

गायत्रीचा मंत्र भटजी पढवीतो
बाळाला रडवीतो दोन्हीं वेळां ।।

कधी कधी बाळाची मुंज पाचवे वर्षीच करीत. कारण त्याचे लग्न लवकर करण्याची इच्छा:

पाचा वरुषांचा मुंजीची काय घाई
वाटते सून यावी मायबाईला ।।

अशा ह्या लहान मुलाला ब्राह्मण संध्या तरी कशी शिकवणार? भटजी त्याला कडेवर घेऊन संध्या शिकवतात:

पांचा वरुषांचा मुंजा आहे लहान
कडे घेऊन ब्राह्मण संध्या सांगे ।।

हळूहळू बाळाला संध्येची गोडी लागते:

माझ्या अंगणात चांदीची कावड
संध्येची आवड तान्हेबाळा ।।

मुलाच्या लग्नाची तयारी होऊ लागते. शाळेत जाऊन त्याचे अक्षर बघत :

मुली सांगू येती शाळेसी जाऊनी
तुझे अक्षर पाहुनी गोपूबाळा ।।

अशी लहानपणीच लग्ने होत. जिच्याजवळ लग्न लागायचे त्या मुलीचे वर्णन, लग्नाचे सोहळे, रीती, ते सारे पुढील प्रकरणी. या प्रकरणात वात्सल्यरस लुटा. मातृप्रेमाच्या सागरात डुंबा व कृतार्थ व्हा.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

मायलेकरें : ओव्या

माझे तान्हेबाळ देवाचे मंगल
अमृताचे फळ संसाराचे १
देवाजीचे देणे कोणते सुंदर
तान्हेबाळ मांडीवर माउलीचे २
तान्हीया रे बाळा मंगलाच्या मूर्ती
संसाराची पूर्ती तुझ्यामुळे ३
तान्हें हे जन्मले भाग्य ग उदेले
आनंदी बुडाले सारे जग ४
पाळणा बांधीला रंगीत सुंदर
तान्हा सुकुमार माउलीचा ५
पालख पाळणा मोत्यांनी विणीला
मामाने धाडीला तान्हेबाळा ६
रंगीत पाळणा त्याला रेशमाची दोरी
हालवीते गोरी उषाताई ७
पाळण्याच्या वरी विचित्र आकडा
गळां ताईत वांकडा तान्हेयाच्या ८
पाळण्याच्या वरी खेळणे कागदाचे
गोड बोलणे बाळाचें राजसाचें ९
पाळण्याच्या वरी विचित्र पांखरूं
नक्षत्र लेंकरू तान्हेबाळा १०
पाळणा पालखा वर खेळणे मोराचे
बाळ झोपले थोराचे गोपूबाळ ११
पाळणा पात्यांचा वर चेंडू ग मोत्यांचा
आंत बाळ नवसाचा झोप घेई १२
पाळणा बांधीला हत्तीणी दातांचा
आंत बाळ नवसाचा निद्रा करी १३

पाळणा पालखा वर रावे रत्नागिरी
खेळ तुझे नानापरी तान्हेबाळा १४

पाळण्या ग वरी राव्यांचा गलबला
आनंदाची झोंप तुला तान्हेबाळा १५

रंगीत पाळणा त्याला रेशमाचा दोरा
हळुहळु झोंका काढ उषाताई १६

रंगीत पाळणा येताजातांना हलवा
कोठे गेली ती बोलवा उषाताई १७

पाळणा पालव हलवीतो मामा
नीज तू परशरामा पाळण्यांत १८

पोपट पिंजऱ्यांत म्हणूं लागे रामराम
बाळ घेईल आराम पाळण्यांत १९

निजूं दे ग बाई बाळाला क्षणभर
घरांतील कामधंदा आटपूं दे भराभर २०

पाळणा पालख येताजातांना हलवा
माझ्या राघूला नीजवा तान्हेबाळा २१

न्हाउनी माखुनी पालखी घातले
शताउक्ष म्हणीतलें तान्हेंबाळा २२

पाळण्याच्या दोऱ्या वाजती कराकरा
झोंप नाही चारी प्रहरा गोपू बाळा २३

पाळण्याचे दोर जसे मोतियांचे सर
शोभिवंत घर पाळण्याने. २४

रंगीत पाळणा बांधीला बहाली
येतांजातां मुली हालवीती २५

आंथरुण केले पांघरुण शेला
निजवीते तुला गोपूबाळा २६

आंथरुण केले बाई मोगऱ्यांचे
बाळा गोजिऱ्याचें अंग मऊ २७

अंथरुण केले मऊ उबदार
झोंप घे चारी प्रहर तान्हेबाळा २८

निद्रा आली बाळा आपुले पालखी
श्रीरामाला जानकी माळ घाली २९
निद्रा आली बाळा आपुले पालखी
आता काम करू सखी जरा वेळ ३०
बाळासाठी केली चिमणीशी गादी
बाळाचे सारें आधी कवतूक ३१
निजेला रे आले बाळा तुझे डोळे
थोरे विसांवले पाळण्याचे ३२
नीज रे बाळका आपुल्या पालखी
तुला रक्षण जानकी रघुनाथ ३३
अंगाई म्हणून बाळाला निजवी
वाटींत निववी दूधतूप ३४
सकाळच्या वेळी किती असे कामधंदा
नको रडू रे गोविंदा तान्हेबाळा ३५
सकाळच्या वेळी झाडलोट कामधंदा
नको घेऊ वेड्या छंदा तान्हेबाळा ३६
सोड रे राजसा सारवूं दे वैलचूल
देईन तुला फूल मोगऱ्याचे ३७
सोड रे राजसा असा चिकटून नको बसूं
होईल माझे हसूं रामप्रहरी ३८
सोड रे राजसा नको रडूं उजाडत
येतील ओरडत सासूबाई ३९
देव वर आला पडली किती उन्हें
उठले माझें तान्हें झोप झाली ४०
पांखरे उडती फुलवात फुले
उठवतात मुले उजाडत ४१
सूर्य उगवला कमळें फुलली
तान्हेबाळे उघडीली निज दृष्टी ४२
भानु उगवला उगवला लाल गोळा
तान्हेबाळ जागा झाला पाळण्यांत ४३

झोंप रे अजून कशाला उठशी
कोणी म्हणेल आळशी म्हणून कां ४४
झोंप रे अजून करून गुरंगुटी
असें म्हणून थोपटी तान्हेबाळा ४५
मला वाटे बाळ आहे पालखी निजलें
जाऊन बघतें तोच खुदकन् हांसलें ४६
उघडून डोळे पाय घालून तोंडात
होतें तान्हुलें खेळत पाळण्यांत ४७
पहाटेची वेळ दूर कोंबडा आरवे
तान्हुल्या झोपी जावे लहान तूं ४८
पहाटेची वेळ कूऊ करिता रहाट
बाळा तूं पाळण्यांत झोंप घेई ४९
पहाटेची वेळ कावळा का का करी
निजावे तान्ह्या परीं पाळण्यांत ५०
पहाटेची वेळ तुला नाही परी काम
नीज रे आत्माराम तान्हेबाळा ५१
पहाटेची वेळ नीज रे बाळपणीं
ऊठ तूं मोठेपणीं तान्हेबाळा ५२
तान्हीया रे बाळा तुला मशीचा रे टिळा
कोणा पापिणी चांडाळा दृष्ट केली ५३
तान्ह्या रे तान्हिका बाळा रे माणिका
तुझ्या रे श्रीमुखा लिंबलोण ५४
घडीघडी कोण उतरी लिंबलोण
तान्ह्या बाळाची बहीण उषाताई ५५
लिंबलोण करूं दोन्ही या ग मुठी भरूं
बाळा बरोबरी शेजीचा बाळ उभा करूं ५६
लिंब ग लोण्याची आयती कोणी केली
तुझी रे मावशी आली तान्हेबाळा ५७
तान्हेबाळ खेळे ओसरीच्या काठीं
जिउतीच्या हातीं लिंबलोण ५८

कोणें दृष्ट केली तान्हेबाळा सोनटक्क्या
बिंदुल्या मनगट्या सैल झाल्या ५९
कोणें दृष्ट केली तान्हेबाळाला देखून
लिंबू देत्ये मी फेकून दृष्टीवरी ६०
माळ्याच्या मळ्यात विसबंद वेलीं गेला
दृष्टीसाठी गोळा केला तान्हेबाळाच्या ६१
माळ्याच्या मळ्यात विसबंद कोंवळा
तान्हेबाळाच्या जावळा दृष्ट पडे ६२
माळ्याच्या मळ्यात पाचूबंदीचा एक वाफा
दृष्ट होईल बापलेकां तिन्हीसांजा ६३
माळ्याच्या मळ्यात सुगंध ये रोपारोपा
दृष्ट झाली बापलेकां भाईराया ६४
एकापुढें एक चालती बापलेक
दृष्ट होईल मागें थोप गोपूबाळा ६५
माळ्याला ताकीद विसबंदाच्या रोपाची
तान्हेबाळां दृष्ट लागली सभेमधल्या लोकांची ६६
हात रे कुतऱ्या छूत रे मांजरा
तान्हेबाळाच्या काजळा दृष्ट पडे ६७
नका बाळाकडे असे पाहू टकमका
चिताला लागे धका माऊलीच्या ६८
दृष्ट उतरिली मीठमोहऱ्या नी मेथ्या
न्याहाळीत कोण होत्या तान्हेबाळाला ६९
एकापाठीमागें एक येतील शिवूमिवू
माझ्या ग राजसांना नको पापिणी दृष्ट लावू ७०
जळो जळो दृष्ट तुझ्या पाळण्यावरून गेली
निंबलोणाची जलदी केली उषाताईनें ७१
जळो जळो दृष्ट मिठाचे झाले पाणी
बाळ माझे फुलावाणी कोमजलें ७२
जळो जळो दृष्ट मिठाचे झाले खडे
घडी घडी रडे तान्हेबाळ ७३

पापिणीची दृष्ट चुलीमध्ये पडो
माझा कडुलिंब वाढो तान्हेबाळ ७४

कोणें दृष्ट केली पापिणी ग वांझे
कोमेजलें तिन्हीसांजे तान्हेबाळ ७५

कोणे दृष्ट केली तान्हेबाळाच्या डोळिया
करूं पाळणेया आंथरूण ७६

कोणे दृष्ट केली तान्हेबाळाच्या काजळा
रडून भागला तान्हेबाळ ७७

गोरीया गोरेपणा नको भिऊं तूं जीवाला
तुझी काळजी देवाला माउलीये ७८

दृष्ट मी काढूं किती मीठमोहऱ्या काळी माती
गोरेपणा जपूं किती तान्हेबाळाच्या ७९

तुला सांगितले उभे गंध लावू नको
दृष्ट पडेल जाऊ नको गोपूबाळा ८०

तान्हियाचे दांत जशी मोतियांची ओळी
हांसता पडे खळी गोड गाली ८१

तान्हियाचे दांत जसे डाळिंबाचे दाणे
हांसविते कौतुकाने उषाताई ८२

पेरा झाला रानांतून मोड काढ वरी मान
तसे हंसे माझे तान्हे पाळण्यांत ८३

गोऱ्या गालांवर मुलामा लाल लाल
जणूं गुलाबाचे फूल शोभिवंत ८४

रुप्याच्या वाटींत ठेवावे लाल फूल
तसे राजसाचे गाल तान्हेयाचे ८५

गोऱ्या गालांवर लाल शोभतो मुलामा
गोड हसशी गुलामा तान्हेबाळा ८६

तान्हीया रे बाळा गोड तुझी हनुवटी
गोंडस तुझ्या मुठी नाचवीशी ८७

कुरळ्या केसांचा विरळ दातांचा
लाडका आईचा तान्हेबाळ ८८

चंद्राची वाढे कला तसें बाळाचे बाळसें
लावण्या उणें नसे अणुमात्र ८९

कितीदा हाका मारू लेकाच्या जिन्नसा
मोत्याच्या कणीसा तान्हेबाळा ९०

माझे दोघे बाळ दारावरी उभे
चंद्रसूर्य दोघे उगवले ९१

माझे दोघे बाळ उभे पारापरी
शेजीच्या दारावरी उजेड पडे ९२

माझा बाळ गोरा हळदीचा ओंडा
शोभते गोरे तोंडा पिंपळपान ९३

माझे तान्हेबाळ हळदीचा ओंडा
पाठीवरती गोंडा रेशिमाचा ९४

माझे तान्हेबाळ हळदीने न्हाई
त्याचे पाणी जाई शेवंतीला ९६

शेवंती फुलली फुलली सोन्यावाणी
न्हाणाचे जाते पाणी तान्हेबाळाचे ९७

निळे ग गगन हिरवें ग रान
आहे गोरे पान तान्हेबाळ ९८

काळी ग यमुना सांवळा ग कान्हा
गोरा गोरा माझा तान्हा गोपूबाळ ९९

काळा ग कालीया काळा ग घननीळ
सुंदर तान्हेबाळ माऊलीचे १००

पिवळे ग लिंबू पिवळी शेवंती
अंगाची शोभे कांती तान्हेबाळाच्या १०१

पिवळे ग लिंबू पिवळे वरण
किती गोड ग वदन तान्हेबाळाचे १०२

अंगणात उभा कमळाचा जसा देठ
तसा तुझा अंगलोट तान्हेबाळा १०३

अंगणात उभा कसा म्हणूं मी लोकांचा
वांकडा ताईत गोपाचा तान्हेबाळाचा १०४

मोठेमोठे डोळे भिंवया लांबरुंद
कपाळी शोभे गंध केशराचे १०५
मोठेमोठे डोळे भिंवया चंद्रज्योती
शहाणा म्हणू किती तान्हेबाळ १०६
तान्हेया रे बाळा तुला काय साजे
गळ्यांत बांधिजे वाघनख १०७
वाघांचे वाघनख सोन्याने मढवीले
गळां चढवीले तान्हेबाळाच्या १०८
गळ्यांत हांसोळी कमरेत सांखळी
मूर्ति साजिरी गोजिरी तान्हेबाळाची १०९
केलासे ताईत गळ्यांत घालावा
घालुनीयां न्यावा तान्हेबाळ ११०
सोनारा रे शेटी उघड आपुली पेटी
कडीतोडे कंठी करूं बाळा १११
सोनारा रे शेटी उघड अपुली पेटी
रुसला कंठीसाठी तान्हेबाळ ११२
आले आले पटवेकरी पटवाया काय देऊं
टोपीला गोंडे लावूं तान्हेबाळाच्या ११३
घातलीसे कुंची गझनीच्या कापडाची
मोत्यांच्या पिंपळपानाची त्यांत शोभा ११४
घातलीसे कुंची रेशमी जरतारी
त्यांतुन येताती बाहेरी कुरळे केस ११५
पिंपळपानाची मोती झाली जुनीं
तुला शोभती बाळपणीं तान्हेबाळा ११६
माझिया घरांत मुले लहान लहान
टोपीला पिंपळपान शोभा देई ११७
माझिया घरांत लहान लहान मुले
टोपीला लावू फुले गुलाबाची ११८
माझ्या अंगणात शिंपिणी जावा जावा
टोपीला गोंडे लावा तान्हेबाळाच्या ११९

मला हौस मोठी करगोटा सव्वाशाचा
पुत्र आहे नवसाचा तान्हेबाळ १२०
बापाचा लाडका चुलत्याचा आत्माराम
तुला जडित पिंपळपान तान्हेबाळा १२१
हाती कडीतोडें कमरे करगोटा पेट्यांचा
मुलगा दिसतो मोठ्यांचा गोपूबाळ १२२
हाती कडीतोडे कानांत भीकबाळी
आतां माझ्या तान्हेबाळा नको खेळूं सायंकाळी १२३
हाती कडीतोडे कमरे करगोटा मोराचा
पुत्र दिसतो थोराचा गोपूबाळ १२४
हाती कडीतोडे गळ्यांत कंठीगोप
सावकाराचा ग लेक गोपूबाळ १२५
हाती कडीतोडे गावठणी उभा
आजीबाई नातू तुझा गोपूबाळ १२६
तान्हीया रे बाळा तुझ्या पायीं वाळा
तुझा डोळा काळा काजळाने १२७
बिंदुल्यांचा हात ठेवी ताटापुढे
जेवती मामापुढें गोपूबाळ १२८
श्रीमंतीचा डौल तुझा बाई पुरे कर
सोनेरी चंद्रकोर तान्होबाळ १२९
नटव थटव तुझे श्रीमंत लेकरू
मोहक वासरूं बाळ माझे १३०
माझे तान्हेबाळ मला ते आवडे
लोकांना नावडे घडीभरी १३१
माझ्या ग बाळाला नको हो दागीना
कोवळ्या लावण्या पूर आला १३२
माझ्या राजसाला नकोत दागीने
शोभे अलंकारावीणें तान्हेबाळ १३३
कशाने नटवूं कशाने भूषवूं
कशाने शोभवूं तान्हेबाळ १३४

गरीब माउली काय बाळा लेववील
प्रेमाने पांधुरवील तान्हेबाळ १३५

गरीब माउली काय बाळाला घालील
प्रेमाने रंगवील सर्वकाळ १३६

गरीब माउली कोठले बाळलेणें
बाळाला वात्सल्याने वाढवील १३७

आसवांची माळा गळां घालील बाळाचे
गरीब माउलीचे हेंची धन १३८

श्रीमंतांची मुले शेजारी शृंगारली
नाही ती शोभली बाळापरी १३९

श्रीमंतांची मुले पडलीं निस्तेज
पाहुनीया तेज तान्हेबाळाचे १४०

नाचती हांसती फुले जशी वेलीवर
तशी माझ्या मांडीवर माझी बाळें १४१

सखीया लेणे लेतीं आपले हारदोरे
आपण दाखवूं आपले बाळ गोरे १४२

तरूलता वेली रानावनांत डोलती
माझ्या घरांत शोभती तान्ही बाळें १४३

सरोवरामध्यें जशी फुलती कमळें
तशीं शोभतात बाळें घरामध्यें १४४

समुद्राचे तळीं मोतीं झळाळती
तशीं घरात शोभतीं तान्ही बाळें १४५

तारे चमचम करिती आकाशात
बाळें नाचती घरांत माउलीची १४६

रांगुनी खेळुनी बाळ उंबऱ्यात बसे
सोन्याचा ढीग दिसे तान्हेबाळ १४७

अंगणीचे खडे मी ग लोटीतें नित्याने
माझे रांगे गुडघ्याने तान्हेबाळ १४८

अंगणीचे खडे झाडिते निरियांनी
बाळ रांगे गुडघ्यांनी उषाताईचे १४९

शेजारिणी बाई दाट घाली सडा
रांगतो सवंगडा तान्हेबाळ १५०
शेजीबाई तूं गं दाट दाट घाली सडा
माझे बाळ ग रांगते रूतेल हो त्याला खडा १५१
शेजारिणी बाई आटप जाईजुई
अचपळ माझी सई कळ्या तोडी १५२
शेजारिणी बाई सडा टाक गे भिडूनी
अनाडी बाळ माझा येतो रांगोळी मोडूनी १५३
शेजारिणी बाई आंवर डाळी साळी
अनाडे तान्हेबाळ नको देऊं शिवीगाळी १५४
शेजारिणी बाई आटप मोगरा
अचपळ माझा हिरा गोपूबाळ १५५
शेजारिणी बाई आटप आपले वाळवण
रेती करिलं मिसळण तान्हेबाळ १५६
दळणाची पाटी ठेवूं मी कोणीकडे
हिंडते चोहीकडे तान्हेबाळ १५७
शेजी आली घरा बैस म्हणाया चुकल्यें
तुझ्या कामात गुंतल्ये तान्हेबाळा १५८
किती सांगितले नको तूं जाऊ कोठें
लबाड झाले मोठें माझे बाळ १५९
मळ्याच्या मळ्यांत नको तूं जाऊं कोठे
माळीण अवदसा शिव्या देई १६०
शेजीने दिली शिवी लागली माझ्या जीवी
आयुष्याची तुला ओवी तान्हेबाळा १६१
शेजीने दिली शिवी ह्वदय झाला भेद
समजूं आशीर्वाद तान्हेबाळा १६२
शेजीने रागानें तान्हेबाळा शिव्या दिल्या
पदरी घेतल्या जाईजुई १६३
शेजी देते शिव्या तान्हेबाळाला देखोनी
जाईमोगऱ्याच्या कळ्या ओटी घेत्ये मी वेचोनी १६४

शेजीने दिली शिवी जिची तिला पडो
माझा कडुलिंब वाढो गोपूबाळ १६५
शेजीने वाहिली शिव्यांची लाखोली
पुष्पपूजा झाली बाळराजा १६६
शेजीने दिली शिवी वेचून घेतली
कळी मी मानिली शेवंतीची १६७
शेजी आली घरा तुम्ही बसा बसा बाई
अन्याय केला काई तान्हेबाळाने १६८
शेजी आली घरा पाट देऊं बसायला
अन्याय पुसायला तान्हेबाळाचे १६९
शेजी आली घरा धरीले मनगटी
अन्याय घाल पोटी तान्हेबाळाचे १७०
आहेत तुझी मुलें तुला मी काय सांगू
पुरे कर ग शेजीबाई कितीदा मी क्षमा मागूं १७१
चुकलें माझें बाळ तुझ्या किती पाया लागूं
आतां माझे शेजीबाई विसर ग प्रेमें वागू १७२
टोचून बोलती परके चटचटा
बाळाच्या डोळ्यांना पाणी येई पटापटा १७३
टोचून बोलती कोंवळे तुझे मन
उगी रडून रडून दमशील १७४
इवलासा गुन्हा किती बाळाला बोलती
मेरू मोहरीचा करिती लोक मेले १७५
खेळशी खेळ गड्या विटीदांडू रे मोगऱ्या
तुझ्या दांडूला घागऱ्या तान्हेबाळा १७६
लहान लहान बाळ खेळती आट्या- पाट्या
रंगीत तुझ्या गोट्या तान्हेबाळा १७७
लहान लहान मुलें खेळती विटीदांडू
रंगीत तुझा चेंडू तान्हेबाळा १७८
खेळशी खेळ गड्या विटीदांडू पैलथडी
भागले तुझे गडी गोपूबाळा १७९

अंगाई मंगाई तांबूले गंगाई
तान्हेबाळाने दंगाई मांडीयेली १८०
लहान लहान मुले खेळती हुतूतू
दमली परंतु तान्हेबाळ १८१
माझ्या अंगणात बांधिलासे झोका
तेथें खेळवा बाळका गोपूबाळा १८२
माझ्या अंगणात घातला मांडव
तान्हेबाळाला खेळव साउलींत १८३
माझे दोन्ही बाळ दुपारीं कोठें गेले
उन्हानें कोमजले नागचाफे १८४
कोकंब पिकले पिकलें लाल लाल
खेळून तसे झाले तान्हेबाळाचे ग गाल १८५
उन्हाळ्याचे ऊन ऊन लागते पाठीला
कंठी शोभते छातीला तान्हेबाळाच्या १८६
उन्हाळ्याचे ऊन ऊन लागते गालाला
कंठी शोभते कंठाला तान्हेबाळाच्या १८७
दुपारचें ऊन टाळू तुझी रे तापली
उघड छत्री रे आपली तान्हेबाळा १८८
करवंदी काळ्या झाल्या लाल पिवळे काजू
गेलें कोणत्या हो बाजू तान्हेबाळ १८९
रानींवनीं किती भारावल्या बोरी
आणिती रानमेवा तान्हेबाळाला गोवारी १९०
रानीचा तो मेवा रानींच्या पाखरांना
दुधाच्या चारी धारा गायीच्या वासरांना १९१
बाळारे बागड शिवीन आंगडे
बिंदीये उघडे जाऊं नये १९२
गायीच्या गोठ्यांत सर्पाची वेटोळी
तेथे तुझी चेंडूफळी तान्हेबाळा १९३
आणतें चेंडूफळी सर्पाच्या जवळून
सर्प भुले सर्पपण मातेसाठी १९४

गायीच्या गोठ्यांत वाघ हंबरला
शेष दणाणला पाताळांत १९५
गायीच्या गोठ्यांत वाघ हंबरतो
बाळ दचकतो पाळण्यांत १९६
तान्हेबाळ खेळे विंचवाच्या संगे
त्याचे विष भंगे बाळापुढे १९७
माझ्या अंगणात पांचफणी नाग डोले
त्याच्या संगे खेळे तान्हेबाळ १९८
तान्हे बाळ खेळे अंगण झाले थोडे
लाविली फुलझाडे काकारायांनी १९९
सोन्याचा विटीदांडू भिंतीशी उभा केला
खेळणारा कोठे गेला गोपूबाळ २००
दुरून दिसतो हालतो, चालतो
सखा नारिंग झेलतो गोपूबाळ २०१
मायेच्या पाठीवर बाळ बैसले जाऊन
माय झाडीतें वाकून अंगणाला २०२
छंदकर बाळ छंदाला काय देऊं
नको असा हट्ट घेऊं तान्हेबाळा २०३
छंदकर बाळ छंदाला दिल्या लाह्या
खेळतो माझा राया कौतुकाने २०४
छंदकर बाळ छंद घेतलासे रात्रीं
चंद्रमा मागे हातीं खेळावया २०५
पाळण्याच्या दोऱ्या धरून उभा राहे
चंद्रमा दे ग माये खेळावया २०६
माझ्या अंगणात उडे, बागडे कावळा
जरी दिसतो बावळा बाळा गोड २०७
माझ्या अंगणात कावळा का का करी
बाळाला हांका मारी खेळावया २०८
माझ्या अंगणात कावळ्यांची गर्दी
बाळाला माझ्या सर्दी सांगा त्यांना २०९

माझ्या अंगणात नाचते चिमणी
बाळाला खेळणी देवाजीचीं २१०
माझ्या अंगणात चिमणी वेंची दाणे
धांवून बाळकाने उडवीली २११
माझ्या अंगणात हिरवा पोपट बोलतो
चोंचीला धरूं बघतो तान्हेबाळ २१२
माझ्या अंगणात साळुंकी मंजुळ बोले
नाचतो प्रेमें डोले तान्हेबाळ २१३
चुलीच्या जवळी मनी मांजरीची पिले
खेळती माझीं बाळे त्यांच्या संगे २१४
कुस्कुरी मांजरी परी ना बाळा चावे
बाळ माझे हवे प्राणिमात्रा २१५
ओसरीच्या वरी मोत्या भू भू भू भूंकतो
तान्हा ग ओढतो त्याचे पाय २१६
माझ्या अंगणात पिवळ्या लाल कर्दळी
बाळाची वर्दळी चारी दिशा २१७
माझ्या अंगणात लाविल्या तुळशी
नाही होणार आळशी तान्हेबाळ २१८
माझ्या अंगणात तुळशीचा वाफा
गोविंद घाली खेपा मंजुळींना २१९
माझ्या अंगणात शोभती दुर्वा, फुलें
खेळाया येतीं मुले बाळासंगे २२०
अंगणांत किती नाचती फुलवेल
बाळाचा चाले खेळ त्यांच्यासंगे २२१
माझ्या अंगणात वानरे येती जाती
वाकुल्या दाखविती तान्हेबाळा २२२
माझ्या अंगणात कारंजे थुईथुई
रांगतसे भुई तान्हेबाळ २२३
माझ्या अंगणात कारंजे नाचे उडे
बघून जाते रडे तान्हेयाचे २२४

माझ्या अंगणात वासरें बागडती
बाळके धावती त्यांच्यासंगे २२५

घागऱ्या घुळुघुळु दणाणला सोपा
खेळतो प्राणसखा तान्हेबाळ २२६

घागऱ्यांचा नाद पडतो माझ्या कानी
खेळतो वृंदावनी तान्हेबाळ २२७

माझे तान्हेबाळ खेळाया जाई लांब
हातावरी जांब पिकलेला २२८

माझे तान्हेबाळ खेळाया जाई दुरी
हातावरी पुरी साखर मागे २२९

घरांत काम करूं चित्त माझे नाही स्थीर
दारी खेळ रघुवीर तान्हेबाळ २३०

तिन्हीसांजा झाल्या गुरावासरांची वेळ
वाटेवेगळा तूं खेळ गोपूबाळ २३१

अंगणात रावा परसावांत साळुबाई
मधुबाळा कमळाबाई हांक मारी २३२

पांखरे घरा गेली बाहेर सांजावले
खेळून आली बाळे आईपाशी २३३

गायी घरी आल्या देव मावळला
बाळ नाही आला कैसा घरी २३४

गायीच्या पान्ह्यासाठी वांसरे हंबरती
खेळुनी बाळ येतो तिन्हीसांजा २३५

तिन्हीसांजा झाल्या दिवे लागले घरांत
गायी चाटती गोठ्यांत वांसरांना २३६

तिन्हीसांजा झाल्या दिवे लागले घरांत
बाळा पाळण्यांत आंदुळती २३७

कितीं हाका मारूं उभी राहुनी दारांत
चंद्र कोणाच्या वाड्यांत तान्हेबाळ २३८

बाळ खेळू जाये वडासाउलीये
घरी माउलीये साद घाली २३९

पारवा दारावरी सारी रात्र निंद घाली
माझे बाळ गाणें गाई पाळण्यांत २४०

माझ्या मांडीवरी पारवे घुमती
बाळें ग रमती घरांमध्ये २४१

गायींनी भरला गोठा म्हशींना झाली दाटी
यशवंत तुझी काठी तान्हेबाळा २४२

गायी गोठीयांत म्हशी वाडीयांत
बाळ पाळण्यांत दूध मागे २४३

काळ्या ग गायीचे दूध ग गोड लागे
वाटीभर मागे तान्हेबाळ २४४

काळे ग गायींचे दुध मोडाईचे
बाळ बढाईचें ताईबाईचे २४५

ये ग तूं ग गायी चरशील कोंडा
तान्हा बाळाच्या ग तोंडा दुधमांडा २४६

ये ग तूं ग गायी चरून वरून
तान्ह्या बाळाला दूध पाजूं २४७

गायी ग चरती कोंवळी कणीसें
तान्हेबाळाला नीरसें दूध पाजूं २४८

गायी हंबरती प्रेमाचा पान्हा फुटे
गळ्याचें दावे सुटे वांसरांच्या २४९

गायीचा गोवारी म्हशींचा खिल्लारी
तान्हेबाळाचा कैवारी गोकुळीचा २५०

गायी ग चरती वांसरें कोठें गेलीं
गंगेच्या पाण्या नेली तान्हेबाळाने २५१

गायी ग चरती कोंवळा ग चारा
दुधाच्या चारी धारा वांसरांना २५२

गायी ग चरती वांसरे हंबरती
वाडा आहे श्रीमंती तान्हे बाळाचा २५३

तान्हीया बाळाला कोणी ग काय केले
कडू मी भरवले मायफळ २५४

वाचनालय, सातारा.

तान्हीया बाळाला कोणी ग काय केले
रागानें धाडीलें निजावया २५५

तान्हीया रे बाळा पुरे कर आता रडे
दारीचे घेवडे जून झाले २५६

माझे तान्हे बाळ मला ते आवडे
दारीचे घेवडे जून झाले २५७

बाळा तुझी झोप कावळ्याने नेली
सारी रात्र गेली आंदुळता २५८

कां ग हें रडते तान्हे बाळ आज
त्याला आधी पाज सूनबाई २५९

तान्हे बाळ रडे उगी ना मुळीं राही
त्याला आधी घेई माउलीये २६०

सोड सारे काम सोड सारे धंदे
तान्हेबाळ ग आक्रंदे पाळण्यांत २६१

कळवळलें ग तान्हें त्याला आधी पाज
मग करी कामकाज सूनबाई २६२

मारूं नको बाळा किती कळवळे
असें म्हणून घेतलें आजीबाईनें २६३

झाली आता रात्र झोंप म्हणे आई
चंद्र का वर येई माउलीये २६४

झाली आता रात्र झोप रे चिमण्या तान्ह्या
वर नाचती चांदण्या माउलीये २६५

आई गादी ही कोणाला साधे आंथरूण कोणाला
गादी तुझ्या जन्मदात्या साधे मला माझ्या तान्ह्या २६६

गादीवर आपण निजूं बाप्पाजी निजो खाली
वेडा कुठला म्हणे आई हळूच थापड मारी गाली २६७

कोल्हे कुई कुई आज कां तिन्ही सांजा
थंडी पडेल हो भारी जपा म्हणती बाळराजा २६८

कोल्हे कुई कुई आज का सांगा मशी
थंडी पडेल हो भारी बाळ घ्यावा म्हणताकुशी २६९

का ग हे काजवे करिती लुकलुक
पहाया श्रीमुख तुझे बाळा २७०
काजवे फुलले फुलले लाख लाख
पहाया श्रीमुख तान्हेबाळाचे २७१
कां ग झाडांवर आई काजवे नाचती
तुला ओवाळिती झाडें माडें २७२
वनदेवतांचे कांजवे जणू डोळे
बघाया माझे बाळ त्यांनी रात्र उघडीले २७३
वनदेवतांचे काजवे डोळे झाले
बाळा बघून नाही तृप्ती पुन:पुन: उघडीले २७४
आकाशात तारे काय आई म्हणताती
तुझी राजा स्तोत्रे गाती अखंडीत २७५
आकाशात तारे त्यांचे ओठ कां हालती
संगीत गाणी गाती तान्हेबाळा २७६
थुई थुई उडे कां ग कारंजे उसळे
तुझ्यामुळे उचंबळे तान्हेबाळा २७७
तान्ह्या तुझ्या भाती घालीन बोंडलें
आता नको रे बोंडले भात जेव २७८
रुप्याची ही वाटी आणि चांदीचे बोंडलें
तुझ्या आजीने धाडलें तान्हेबाळा २७९
काल माझ्या ग बाळाचें शेजी केले उष्टावण
आला होता मामा राया घांस भरवी आंगठीनं २८०
दह्यादुधी भरल्या वाट्या वर साखरेची मूठ
छंदखोर बाळा उठ जेवावया २८१
दह्यादुधी भरल्या वाट्या वर साखर मावेना
छंदखोर हा जेवेना गोपूबाळ २८२
बापाचा लाडका साखर तोंडी लावी
चुलत्यापुढे जेवी तान्हेबाळ २८३
बापाचा लाडका चुलत्याच्या कडे
तबकी दूध पेढे तान्हेबाळा २८४

माझ्या अंगणात ठेवीला दहीभात
जेवीला रघुनाथ तान्हेबाळ २८५

लाडका ग लेक भूक म्हणून नीजला
माझ्या राजसाचा तूप बत्तासा थीजला २८६

वाटीयें दूध तूप निवत मी घाली
लहान बाळा हांका मारी उषाताई २८७

लोकांची ती मुले खाती ताकवण्या
तुझ्या ताटी साखरफेण्या तान्हेबाळा २८८

लोकांची ती मुलें खाती ताकभात
तुझ्या हाती लाडूं नित्य तान्हेबाळा २८९

तान्हे ग बाळाला गोडसे जेवण
दुधाला विरजण साखरेचे २९०

हाती दूधभात वर पेरते साखर
तुझे जेवण प्रकार तान्हेबाळा २९१

अंगणात गाय दाखवीते माय
गोड घास खाय तान्हेबाळा २९२

बघ रे चिमणी करिते चीव चीव
म्हणते तुला जेव तान्हेबाळा २९३

दाखवी पाखरे चुटक्या वाजवी
माउली जेववी तान्हेबाळा २९४

माझे तान्हे बाळ मोठ्या ग मानाचे
त्याच्या जेवणाचे नाना रंग २९५

आळवून किती भरविते घांस
माऊलीला त्रास नाही त्याचा २९६

तान्हेबाळ खेळे आंगण ओसरी
त्यांत संगत दूसरी ताईबाईची २९७

पाऊस पडतो मृगाआधी रोहिणीचा
पाळणा हालतो भावाआधी बहिणीचा २९८

समोर पाळणा हलग्यांशी ग हालतो
बाळ बापाशी खेळतो आनंदाने २९९

पिवळा पीतांबर कांठी कमळाचा
कडे नातू घ्या जावळाचा गोपूबाळ ३००
हंस रे राजसा हंसशी किती गोड
देई आनंदाची जोड माउलीला ३०१
मामाराया भाचा कडे घेतसे हिऱ्याला
हात घातला तुऱ्याला तान्हेबाळाने ३०२
पुरे आतां रडें डोळे झाले लाल लाल
मामा देईल रुमाल पुसावया ३०३
पुरे आता रडे आतां दाखव हंसून
मामा आलासे दुरून तुझ्यासाठी ३०४
पुरे आता रडे ठेवील मामा नावें
मामाने प्रेमे घ्यावें भाचेयाला ३०५
घे रे घे रे मामा जरा भाच्याला खेळव
त्याला वासरे दाखव गोठ्यांतील ३०६
घे रे घे रे मामा तुझ्या भाच्याला हिंडव
त्याला दाखव मांडव तोंडलीचा ३०७
घे रे घे रे मामा तुझा भाचा छंदकर
दाखव झाडांवर पांखरांना ३०८
आवडत्या मामाराया आवडत्या भाच्या घेई
गोडसा पापा घेई आनंदाने ३०९
मामेया भाचेया कौतुके नाचव
वानर दाखव हुपूप करी ३१०
घे रे घे रे मामा छंदी भाच्याला डोलव
हिरवा राघूं तूं बोलव पिंजऱ्यात ३११
घे रे घे रे मामा आवडता तुझा भाचा
कोण लळा पुरवी त्याचा तुझ्यावीण ३१२
मामाने घेतला आश्चर्य हो झालें
उभे की राहीले तान्हे बाळ ३१३
काय जादू केली मामा राया सांगे
हंसू कसें लागे तान्हेबाळ ३१४

मामा तो मातुल आईची बरोबरी
म्हणून कडेवरी हांसे बाळ ३१५
एक जसा एक कृष्णनाथ देवकीचा
तसा हा तान्हेबाळ आहे हो माउलीचा ३१६
आई म्हणे बाळा नको रे खाऊं बोरें
खाती मायें सारी पोरे बाळ म्हणे ३१७
आई म्हणे बाळा नको खाऊं रे चिंचा गड्या
पाणी सुटे माझ्या तोंडा माऊलीये ३१८
आई म्हणे बाळा नको खाऊं रे आवळे
खाती ग सगळी बाळे माउलीये ३१९
बासशी सारखा तान्हेबाळा चुलीपाशी
आवडे ना मशी खरोखरी ३२०
बाहेर तूं जाई लपंडाव खेळ खेळे
कुसकरती माझे डोळे माउलीये ३२१
बाहेर तूं जाई जरा खेळ छप्पापाणी
डोळ्यांना आणी पाणी तान्हेबाळ ३२२
बाहेर तूं जाई खेळ हमामा हुतूतू
आई खेळू मी तूं घरामध्ये ३२३
बाहेर तूं जाई खेळ हुतूतू हमामा
तुझ्या करितो सांगे कामा माउलीये ३२४
बाहेर जाई रे खेळ रे लंगडी
दुखते तंगडी माउलीये ३२५
घराचा घरकोंबडा होऊं नये बाळा
बाहेर खेळ जा मुलांमध्ये ३२६
चुलीचा चुलकोंबडा कोणाला आवडेल
नावें तुला ठेवतील तान्हेबाळा ३२७
ऊठ नको बसूं खेळ जा बाहेर
आई तुझ्याबरोबर खेळेन मी ३२८
काम ग करून पाट घेईन बसायाला
माझे तान्हें बाळ मांडीवरी विसाव्याला ३२९

रांगत खेळत बाळ आले विसाव्याला
माझ्या ग राजसाला मांडी देत्यें बसायला ३३०

खेळूनी ग आला धुळीनें माखला
माझा सोनुला दमला तान्हेंबाळा ३३१

मातीने मढलें मांडीये चढलें
मायेने मानीलें मोक्षसुख ३३२

लोळलें मातीत घुसलें मांडीत
मायेच्या मनांत प्रेम दाटे ३३३

माती का लागली माती ना तो रे बुका
चुंबीन तुझ्या मुखा तान्हेबाळ ३३४

माती का लागली लागू दे शोभे तुला
कलंक चंद्राला तान्हेबाळा ३३५

माती का लागली तिची झाली रे कस्तुरी
सोन्याच्या शरीरी तान्हेबाळाच्या ३३६

माती का लागली लागूं दे रे बाप्पा
घेतील प्रेमे पापा बाप्पाराया ३३७

लोकांची ती मुले जसे भिंतीचे दगड
माझी सोन्याची लगड तान्हेबाळा ३३८

शाळेसी जातांना रडे कशाचे रे आले
पाटी दप्तराचे झाले ओझें आई ३३९

शाळेसी जातांना कां रे राया रडूं आले
भय माउली वाटले पंतोजीचे ३४०

शाळेसी जातांना डोळे येती कां भरून
केव्हा तुला मी भेटेन माऊलीये ३४१

शाळेच्या पंतोजींना देऊं करा ताटवाटी
नका मारूं छडीकाठी तान्हेबाळा ३४२

शाळेच्या पंतोजींना देऊं करावी सुपारी
नका मारूं हो दुपारी तान्हेबाळा ३४३

शाळेच्या पंतोजींना देऊं करावी खारीक
बाळ शिकूं दे लिहाया आता अक्षर बारीक ३४४

शाळेच्या पंतोजींना देऊ करावा धोतरजोडा
सांगा, नका देऊं खडा मानेवरी ३४५
शाळेच्या पंतोजींना देऊं करावी घागर
मारूं नका सुकुमार तान्हेंबाळ ३४६
शाळेचा पंतोजी उग्र हो मुद्रेचा
जीव घाबरे मुलांचा क्षणोक्षणी ३४७
शाळेचा पंतोजी त्याचा केवढा दरारा
मुलें कांपती थरारा थंडीवीण ३४८
शाळेचा पंतोजी मुद्रा त्याची उग्र
मुलांना वाटे व्याघ्र खरोखरी ३४९
शाळेचा पंतोजी शिकवीतो पाढे
मुलांना येई रडे ओक्साबोक्शी ३५०
शाळेचा पंतोजी शिकवी एक दोन
मुलें जाती कंटाळून ओरडून ३५१
शाळेचा पंतोजी पढवी बेकंबेला
मुलांचा जीव गेला म्हणता म्हणता ३५२
शाळेचा पंतोजी शिकवितो लेंखे
सुकतात मुखें बाळ राजांची ३५३
शाळेचा पंतोजी शिकवी अकरकी
मुलांची मुखश्री कोमेजली ३५४
शाळेचा पंतोजी मुला पर्वचा शिकवी
सारखा चाखवी महिमा छडीचा ३५५
शाळेचा पंतोजी वाजवीतो छडी
येती रडकुंडी तान्ही बाळें ३५६
शाळेचा पंतोजी छडी वाजवितो
मुले रडवीतो घडोघडी ३५७
शाळेचा पंतोजी रडवीतो मुलें
कोमेजती फुलें देवाघरची ३५८
शाळेचा पंतोजी छडी का शीणवील
कळ्या का फुलतील पाण्यावीण ३५९

शाळेचा पंतोजी काय शिकवीतो
सोडीतो बांधीतो रुमालाला ३६०

शाळेचा पंतोजी काय शिकवीतो
सोडीतो बांधीतो चंचीलागी ३६१

शाळेचा पंतोजी मुलांचा हाकारी
गायींना गोवारी जसा रानीं ३६२

शाळेचा पंतोजी शाळा बाळाला आवडो
घरी ना तो दडो तुमच्या धाकें ३६३

पंतोजी रे बाप्पा नसावा भारी धाक
ओंगणावीण चाक मोडतसे ३६४

शाळेचा पंतोजी मुलां वाटे यम
केलासे कायम कोंडवाडा ३६५

जा रे बाळा शाळे घरी नको कटकट
पुरी तुझी वटवट सांगते मी ३६६

आई नको शाळा मला घरीच शीकव
मुळीं ना पाठव शाळेमाजी ३६७

अडाणी माऊली कसा शिकवील तान्हा
पाठवीते रानावना तान्हेबाळ ३६८

अडाणी माऊली कसा देईल ती धडा
रिकामा काय घडा उपयोगी ३६९

पंतोजी मारती हाताला येतो फोड
आई तूं किती गोड ममताळू ३७०

हट्ट नको घेऊ बाळा शाळेला तूं जाई
विद्येला मिळवी तेचीं धन ३७१

हट्ट नको घेऊ लिहाया घेई पाटी
खिरीची तुला वाटी तान्हेबाळा ३७२

हट्ट नको घेऊं अक्षरे शीक चार
विद्येला मान फार सभेमध्ये ३७३

हट्ट नको घेऊं बाबा मारतील काठी
माय रडेल तुझ्यासाठी तान्हेबाळा ३७४

हाती कडीतोडे कमरेला हिरवा शेला
सखा पंडित शाळे गेला गोपूबाळ ३७५

नागिणी सर्पिणी वाट दे मधुनी
सखा येतो शाळेतुनी गोपूबाळ ३७६

आई तूं खाऊ देशी बाबा का मारताती
बाळा तुझ्या बऱ्यासाठी माय बोले ३७७

आई तूं मुके घेशी बाबा का बोलताती
पुत्र होवो वाचस्पती म्हणुनीयां ३७८

आई तूं मायेची बाबा कां कठोर
लेकाने व्हावे थोर म्हणुनीयां ३७९

काय रे झालें बाळा कोणी मारीलें
बाप्पाजी गुरगुरले अंगावर ३८०

बाप्पाजी भास्कर माऊली चंद्रमा
बाळाला वाटे प्रेमा माऊलीचा ३८१

बाप्पाजी नारळ माऊली द्राक्षघोस
बाळाला वाटे ओस आईवीण ३८२

बाप्पाजी चंदन घांसलीया वास
आईचा सुवास आपोआप ३८३

माता जरी मारी तान्हेयाला कोण
जाईल सुकून तान्हेबाळ ३८४

कोमल रोपाला काय नको पाणी
नको का जननी तान्हेबाळा ३८५

माता जरी मारी बाळाने कोठे जावे
दुःख कोणाला सांगावे तान्हेयाने ३८६

माता घरी लोटी बाळ निराधार
स्नेहसूत्रावीण हार कोण गुंफी ३८७

माता घरी दूर तरी कोण घेई बाळ
त्याची होईल आबाळ घरीदारी ३८८

आई तूं हवीस हवीस जन्मोजन्मी
असा अभागी ग कोण नको म्हणेल सुधा-उर्मी ३८९

आई तूं हवीस हवीस जन्मवेरी
सांग कोण कंटाळेल अमृताच्या ग सागरी ३९०
आई तूं हवीस कशी पुरेशी होशील
असा कोण ग करंटा माऊलीला कंटाळेल ३९१
माऊली असावी रानीच्या पाखरांना
चोचीने त्यांना चारा भरवीते ३९२
माऊली असावीम मोठ्याच्या वासराला
अंग चाटायला पान्हावोनी ३९३
माउली असावी पिलापाखरांना
मुलावासरांना संसारात ३९४
फुलांमध्ये फूल फूल हुंगावे जाईचे
सुख भोगावें आईचे बाळपणी ३९५
फुलांमध्ये फूल फूल हुंगावे चाफ्याचें
सुख भोगावे बापाचे बाळपणी ३९६
फुलांमध्ये फूल फूल शोभते कमळाचे
आईच्या प्रेमाचे माप नाही ३९७
गायीचा की डुबा गोठणीये उभा
माउलीच्या लोभा मीत नाही ३९८
माउलीचे कष्ट कुठे रे फेडू देवा
तळहाताचा पाळणा नेत्रींचा केला दिवा ३९९
बापाचे उपकार फिटती काशी गेल्या
माउलीचे उपकार फिटती ना काहीं केल्या ४००
माउलीची माया शेजी करायला गेली
गुळाची ग गोडी साखरेला नाही आली४०१
माउलीची माया नाही येत आणीकाला
कोवळ्या माणीकाला रंग बहू ४०२
धन ग संपदा आग लागो त्या वस्तेला
माझ्या बाळाच्या ग संगे उभी राहीन रस्त्याला ४०३
धन ग संपदा नाही मला ती लागत
तुझ्या जीवाचे अगत्य तान्हेबाळा ४०४

नदी वाहे झुळझुळ परी पाण्यावीण मासा
जीव माझा तोळा मासा बाळावीण ४०५

जेथे तान्हेबाळ तेथे माउलीचा स्वर्ग
तान्हेबाळावीण कडू वीख सुखभोग ४०६

देवाच्या देवळांत उभी मी जागत्ये
आयुष्य मागत्ये तान्हेबाळाला ४०७

देवाच्या देवळात करिते मी धांवा
पुत्र माझा व्हावा शतावंत ४०८

तुळशीच्या पाशी सांजवात मी लावीते
आयुष्य मागते तान्हेबाळा ४०९

अतिथीला अन्न गायीला चारा
आयुष्य लेंकराला देवे द्यावे ४१०

माउली रागावली रागांत लोभ तीचा
असे गोळा ग पोटीचा तान्हेबाळ ४११

माउलीचा मार त्यांत अमृताचा चारा
बाळाच्या कल्याणाच्या त्यांत कोटी कोटीधारा४१२

माउलीचा मार नसे पंतोजीसारखा
माउली मायेची असे पंतोजी पारखा ४१३

समुद्राचे पाणी अहोरात्र उचंबळे
माउली तळमळे बाळासाठी ४१४

समुद्राचे पाणी अहोरात्र नाचे
तसे चित्त माउलीचे बाळासाठी ४१५

समुद्र उचंबळे होता चंद्राचे दर्शन
माउली ग हेलावते होता पुत्राचें स्मरण ४१६

किती ओव्यांमध्ये गाऊं मी ग माऊलीचे ऋण
हे ग कोणा मोजवती वाळवंटातील कण ४१७

किती ओव्यांमध्ये गाऊ माऊलीच्या मी गुणाला
या ग सागराच्या लाटा मोजवतील कुणाला ४१८

किती ओव्यांमध्ये गाऊ माऊलीच्या मी प्रेमाला
कोण प्रदक्षिणा घाली आकाशाच्या ग सीमेला४१९

माउलीची माया कुणा ग वर्णवेल
प्रत्यक्ष भागेल ब्रह्मदेव ४२०
माऊलीची माया कुणा ग वर्णवेल
पाताळीचा ही थकेल सहस्त्रफणी ४२१
अंधारात दिवा प्राणाला जशी हवा
मातृप्रेमाचा हवा तान्हेबाळा ४२२
आंधळ्याला दृष्टी पांगळ्याला काठी पाय
तशी असावी ही माय तान्हेबाळा ४२३
पाऊस शेताला माशाला ते पाणी
तशी असावी जननी तान्हेबाळा ४२४
वासराला गाय पाडसा हरिणी
तशी असावी जननी तान्हेबाळा ४२५
भुकेल्याला अन्न तान्हेल्याला पाणी
तान्हेबाळाला जननी तैशापरी ४२६
डोंगराचे पाणी नद्यांना पोसायाला
माउलीचे तसे सारें तान्हेबाळ वाढायाला ४२७
देवा रे ईश्वरा एक गोष्ट आईकावी
आई सावत्र नसावी तान्हेबाळा ४२८
सावत्र आईची प्रीतीहि कडू वीख
दृष्टीत बाण तीख भरलेले ४२९
सावत्र आईची प्रीतीहि विषारी
काटेच बोचतील जरी बाभुळ मिठी मारी ४३०
सावत्र ती आई तान्हेबाळाची ग सासू
आणील डोळ्या आसूं घडोघडी ४३१
सावत्र माउली माउली ती ना मृत्यु
तान्हेबाळाला जप तूं प्रभुराया ४३२
सावत्र आईची साऊली न पडावी
नागिणीची भेट कधी सुद्धा न घडावी ४३३
सावत्र आईस छळील तान्हेबाळ
होईल त्याची काळ अवदसा ४३४

सावत्र आईस — संसारीचा शाप
देईल सदा ताप — तान्हेबाळा ४३५

पेटलेली आग — पेटलेली खाई
तशी सावत्र ती आई — खाष्टनष्ट ४३६

सख्ख्या ग आईची — गोड लागे मारपीट
सावत्र आईची — कडू साखरेची मूठ ४३७

सावत्र आईला — आई तरी कशी म्हणूं
आईच्या नांवाला — आपण त्याने अवगणुं ४३८

माउली माउली — माउली कामधेनू
माउली गोड वेणू — गोविंदाची ४३९

माउली माउली — माउली चिंतामणी
बाळाचे जें जें मनीं — पुरविते ४४०

माउली माउली — कल्पवृक्षाची साउली
तान्हेबाळालागी दिली — देवाजीने ४४१

माउली माउली — देवा म्हणती साधुसंत
माउलीचा अंत — कोण गाई ४४२

माउलीची सेवा — कोण आणीक करील
सागराच्या पुढे — कसे थिल्लर राहीन ४४३

देवाच्या मायेची — माउली मूर्ती झाली
बाळासाठी ग रंगली — भवपाशी ४४४

तान्हेबाळासाठी — माउली ओव्या म्हणे
या ग माउलीच्यासाठी — कोण करील कवने ४४५

आई आई अशी — तान्हेबाळ हांक मारी
मिळाली स्तुति सारी — माउलीये ४४६

माता रागावली — बोले ना एक शब्द
कंठ झालासे सद्‌गद — गोपूबाळाचा ४४७

शेजीला पुसतो — माउली का बोलेना
दुखवीशी तिच्या मना — घडीघडी ४४८

शेजीला पुसतो — शेजी माय का रुसली
गोष्ट नाही तूं ऐकिली — माउलीची ४४९

शेजी मला सांग : आई प्रेमें कशी घेई
रडत उभा राही दीनवाणा ४५०
शेजी मला सांग कसे आईला हंसवावे
ज़ाऊन मांडीवर बसावे एकाएकी ४५१
शेजी मला सांग कसे हसवूं माउलीला
घरी जाऊन डोळ्यांला तान्हेबाळा ४५२
शेजी मला सांग सुखवूं कशी माय
जाऊन धरी पाय दोन्ही हाती ४५३
शेजी मला सांग आईचा जावा राग
चरणी तिच्या लाग भक्तिभावे ४५४
जेवून आलास भूक इतक्यात कशी
आई तुझ्या हातच्या गे घासावीणे उपवासी ४५५
जेवून आलास पंगत होती मोठी
माउली तुझ्यावीण घांस जाईना गे पोटी ४५६
जेवून आलास काय होते लाडू वडे
मला नाही आई ठावें लक्ष होते तुझ्याकडे ४५७
जेवून आलास श्लोक कोणता म्हटला
आई तुला आठवून पूर डोळ्याला लोटला ४५८
आई नको धांडू कुठे मला जेवायला
माझे ग पोट भरे तुझ्या पाहून मुखाला ४५९
आई नको धाडू कधी परक्याचे घरी
बये तुझ्या ग हातची गोड कोरडी भाकरी ४६०
आई नको धाडू कधी मला मोठ्याकडे
विचारीना तेथे कोणी मग येते मला रडें ४६१
जाईच्या फुलासाठी बाळे फांदी ओळंबली
देवपूजा खोळंबली बाप्पाजींची ४६२
जाईचा मंडप नको मोडू फांद्या
ऐक राजा रे गोविंदा तान्हेबाळा ४६३
फुलें वेचूनीया तान्हेबाळाने आणीली
पूजेसाठी झाली बाप्पाजींना ४६४

हट्ट नको घेऊं सूर्यनाथ डोक्यावर
तूं रे राजा सुकुमार सुकशील ४६५

हट्ट घेऊ नको आहे दुपारचे ऊन
जाशील सुकून तान्हेबाळा ४६६

हट्ट घेऊं नको शुभं करोतीला म्हण
होई नीट सुलक्षण तान्हेबाळा ४६७

हट्ट नको घेऊ येईन मी उठाउठी
खाऊ देईन दोन्ही मुठी भरूनीया ४६८

पाहुणे घरी आले सांग त्यांना नाव नीट
नको लाजूं होई धीट तान्हेबाळा ४६९

पाहुणे घरी आले श्लोक दाखवी म्हणून
घेतील कौतुकाने तुला मांडी ४७०

पाहुणे घरी आले स्तोत्र म्हण तोंडपाठ
थोपटतील तुझी पाठ तान्हेबाळा ४७१

पाहुणे घरी आले घरी जरा नीट वाग
काम करायला लाग माऊलीचे ४७२

पाहुणे घरी आले नको ठेवू देऊ नाव
हीच बाळा एक हाव माउलीची ४७३

पाहुणे घरी आले करितील तुझी स्तुति
अशी करावी ही कृती तान्हेबाळा ४७४

पाहुणे आलेले गेले निघून हो काल
आवडले माझे बाळ पाहुण्यांना ४७५

पाहुणे आलेले गेले निरोप घेऊन
खाऊ हातात देऊन. तान्हेबाळाला ४७६

पाहूणे आलेले गेले हो काल रात्री
रुपया दिला हाती तान्हेबाळाच्या ४७७

कोण बागुलबोवा बैसला माये ओटी
काकाजी आले भेटी तान्हेबाळा ४७८

मोठ्या मोठ्या मिश्या भली मोठी शेंडी
होतसे घाबरगुंडी तान्हेबाळाची ४७९

काय रे झाले बाळा   काही नाही घेती मुका
रुतती दाढी मिश्या   काकाजींच्या   ४८०
हट्ट नको घेऊ   त्रास नको देऊ
नीट वाग पाहूं   तान्हेबाळा   ४८१
सारखी किरकीर   नको करूं राजा
फजीतवाडा माझा   होई बाळा   ४८२
टोचून बोलतील   हळवे माझें मन
छळूं नको रे रडून   माऊलीला   ४८३
मला हौस मोठी   सोन्याच्या जानव्याची
मुंज करा तान्हेयाची   गोपूबाळाची   ४८४
पांचा वरसांचा   मुंजीची काय घाई
वाटते सून यावी   मायबाईला   ४८५
मुंजीचा मुहूर्त   मामा पुसतो जोश्याला
चंद्रबळ भाचेयाला   गोपूबाळाला   ४८६
मुंजीचा मुहूर्त   दशमी एकादशी
चंद्रबळ तुझ्या राशी   गोपूबाळा   ४८७
उखळी मुसळ   पोहे कांडायला
गोपूबाळाचे मुंजीला   आणीयेलीं   ४८८
भिंती सारवल्या   वर काढिली केरेंमोरे
तुझ्या मुंजीची आमंत्रणे   तान्हेबाळा   ४८९
नदीपलीकडे   हिरव्या शालूच्या दोघीजणी
मुंजीची बोलावणी   तान्हेबाळाच्या   ४९०
भिंती सारवून   वर काढावें ताम्हण
तुझ्या मुंजीचे सामान   तान्हेबाळा   ४९१
सोनाराच्या आळी   कशाची ठोकाठोकी
माझ्या ग बाळाच्या   मुंजीची ताटवाटी   ४९२
मुंजा ग मुलाला   मोत्यांच्या मुंडावळी
ओवीतें चंद्रावळी   उषाताई   ४९३
मुंजीचे लगीन   बापलेका लागे
परके दारी वागे   मायबाई   ४९४

पिवळ्या पाटावाची घडी उकलतें नेस
मातृभोजना तूं बैस उषाताई ४९५
मातृभोजनाला पाट मांडीले चोवीस
मातृभोजनाला बैस उषाताई ४९६
पहिली भिक्षावळ आई घालते नारळ
शतायुषी होवो बाळ साउलीचा ४९७
पहिली भिक्षावळ मामा मावशीची
तुझ्या आजोळींची गोपूबाळा ४९८
पहिली भिक्षावळ माय घालीते बत्तासा
विजयी होई कसा तान्हेबाळा ४९९
एके हाती दंड दुजा हाती झोळी
भिक्षा मागे ब्रह्मचारी गोपूबाळ ५००
पिवळा पीतांबर कांठोकांठी ठसे
संध्येच्या वेळीं नेसे तान्हेबाळ ५०१
गायत्रीचा मंत्र भटजी पढवीतो
बाळाला रडवीतो दोन्ही वेळां ५०२
पांचा वरूषांचा मुंजा आहे लहान
कडे घेऊन ब्राह्मण संध्या सांगे ५०३
पांचा वरूषांचा मुंजा उभा केला
गायत्री मंत्र दिला ब्राह्मणाने ५०४
माझ्या अंगणात चांदीची कावड
तुला संध्येची आवड तान्हेबाळा ५०५
वाढतसे लेक बापासंगे हिंडे फिरे
बापलेक जसे हिरे झळाळती ५०६
एकापुढे एक चालती बापलेक
समुद्राला आले पीक मोतीयाचे ५०७
वाघाचे ग पिलूं वाघासंगे ग रानांत
बापासंगे वसे तान्हेबाळ ५०८
माशाचें ग पिलू माशासंगे ग पाण्यांत
बापासंगे बसे तान्हेबाळा ५०९

मुली सांगू येती शाळेसी जाऊनी
तुझे अक्षर पाहुनी तान्हेबाळा ५१०

भुलतील कोणी रूप बाळाचे पाहून
कोणी पाहताती गुण तान्हेबाळाचे ५११

रूपगुण दोन्ही देवाने बाळा दीले
नाही काही कमी केले देवाजीने ५१२

एक रे करावे त्रिभुवननाथा
बाळाच्या असो माथा तुझा हात ५१३

रूपगुण आहे पुरते देवा दे आयुष्य
माझ्या रे तान्हेबाळा तुझ्या मागते पायांस ५१४

□ □

३ : मुलगी

रसपरिचय

तान्हेबाळाचे वर्णन आपण पाहिले. आता तान्हेबाळीचे जरा पाहू या. या प्रकरणात मुलीचे लग्न होऊन ती प्रथम सासरी जायला निघाली. तेथपर्यंतच्या ओव्या दिल्या आहेत. आईकडची जीवनयात्रा संपवून आपल्या नवीन संसारास सुरुवात करावयास ती जाते येथपर्यंतच्या ओव्या येथे आहेत. आपल्याकडे मुलग्यापेक्षा मुलगीचे माहात्म्य कमी मानतात. मुलगा झाला की, महोत्सव मानतात. मुलगी झाली तर जरा कष्टी होतात. या ओव्यांत आरंभीच सांगितले आहे की, मुलगी झाली म्हणून हे माते कष्टी नको होऊ:

कन्या झाली म्हणून नको करूं हेळसांड
गोपूबाळाच्या शेजारी उषाताईचा पाट मांड ।।

सासूबाई बहुधा सुनेला सांगत आहेत. मुलीचा पाट बापाजवळच मांड. मुलीची हेळसांड नको करू. मुलगी झाली म्हणून काय झाले? कन्यादानाचे पुण्य घडेल :

कन्या झाली म्हणून नको घालूं खाली मान
घडेल कन्यादान काकारायांना ।।

कन्यादानाचे महत्त्व पुढील ओवीत किती सुंदर रीतीने सांगितले आहे पहा:

कन्यादान करुनी कन्या एकीकडे
पृथ्वीदान घडे काकारायांना ।।

पृथ्वीदान दिल्याचे पुण्य कन्यादानात आहे. पृथ्वी असेल तर फळेफुले होतील, धनधान्य वाढेल. स्त्री असेल तरच संसार. नाही तर स्मशानच आहे. अशा या कन्येचे माहात्म्य कमी मानू नये. मुलगा हिरा असेल तर मुलगी हिरकणी आहे:

लेका ग परीस लेक ती काय उणी
हिरा नव्हे हिरकणी उषाताई ।।

या मुलीचे मोठे सुंदर वर्णन केलेले आहे. पायी पैंजण घातलेली ती मैना आहे, ती मखमल आहे, ती चंद्रज्योत आहे, किती तिला उपमा. तिला परोपरीचे खेळ आणून देतात.

शिंपली कुरकुली बुरूडाला सांगणार
मैना माझी खेळणार उषाताई ।।

बुरडाला लहान लहान सुपल्या तिच्यासाठी करायला सांगतात. असे तिचे कौतुक होत असते. तिला दागदागिने करतात :

सोनाराच्या शाळे ठिणगुल्या उडती
बिंदुल्या घडती उषाताईला ।।

सोनार फुंकणीने फू फू करीत आहे, ठिणग्या उडत आहेत, असे हे हुबेहुब चित्र उभे केले आहे.

मुलगी वाढू लागते. तिचे रूपलावण्य खुलू लागते. तिचे काळेभोर केस, त्यांची सुंदर वेणी दिसते. वेणीचे वर्णन ऐका:

पांचा पेडी वेणी मला वाटे काळा साप
पदराखाली झांक उषाताई ।।
लांब लांब केस वेणी येते मोगऱ्याची
फणी आणा घागऱ्यांची उषाताईला ।।

मुलीच्या सौंदर्यावर दृष्ट पडेल अशी भीती वाटू लागते :

मोकळे केस ग सोडून तूं ना जाई
दृष्ट होईल तुला बाई उषाताई ।।

केसात घालण्यासाठी बाप्पाजी गोंडे करतात. मुलीचे असे कोडकौतुक होत असते. पाठच्या बहिणी असाव्यात, त्यांचे प्रेम दाखविले आहे :

काचेची बांगडी कशी भरूं मी एकटी
आहे बहीण धाकुटी माझी घरी ।।

मोठ्या बहिणीला एकटीला नको आहे चांगली बांगडी. केसाप्रमाणे इतरही वर्णन आहे.

पिकले तोंडले तसें तुझे लाल ओठ
भरे ना माझे पोट पाहूनीया ।।

अशी सुंदर मुलगी आहे. तरीही तिला गोंदतात. देवाने दिलेल्या सौंदर्यात मानवी भर घालतात :

तुझ्या गालांवरी कुणी ग गोंदले
फूल कुणी ग टोंचलें गुलाबाचे ।।

गुलाबासारखे सुंदर कोवळे गाल, ते टोचण्याचे कोणी केले धाडस असा हा प्रश्न आहे :

असे म्हणतात की, बापाला मुलगी आवडते व आईला मुलगा आवडतो. परंतु लाडकी मुलगी उद्या सासरी जायची असते. बाप तीव्र वेदनेने म्हणतो :

बाप म्हणे लेकी लाडकी होऊ नको
जाशील परघरी वेडी माया लावूं नको ।।

किती करुण उद्‌गार! मुलगी शेवटी दुसऱ्याची. घरी सून येईल तीच आपली. आपली मुलगी दुसऱ्याची व दुसऱ्याची ती आपली :

बाप म्हणे लेकी तूं ग धर्माची पायरी
सून सत्तेची सोयरी वयनीबाई ।।

मुलगी वाढू लागते व आईबापांच्या आनंदाबरोबर चिंताही मनात वाढू लागते :

मुलगी वाढते जशी चंद्रम्याची कोर
बापाला पडे घोर अंतरंगी ।।

आणि अशा बऱ्याच मुली असल्या म्हणजे मग किती चिंता असेल! परंतु मुली बापाला म्हणतात :

बाप्पाजी हो बाप्पा लेकी फार म्हणूं नका
जसा चिमणुल्यांचा थापा उडून जाई ।।

किती सहृदय व करुण ओवी. चिमण्या क्षणभर अंगणात खेळतील. निघून जातील. बापही मग शेजीला म्हणतो:

सगळ्या झाल्या लेकी शेजी म्हणे झाल्या झाल्या
बाप ग म्हणतो दाही दिशा चिमण्या गेल्या ।।

परंतु चिमण्या सासरी पाठवायला किती चिंता ! लग्न जमवणे हिंदुस्थानात किती कठीण. बाप म्हणतो :

बाप म्हणे लेकी लेकी गुळाचे घागरी
लावण्यरूप तुझे घालू कोणाचे पदरी ।।
बाप म्हणे लेकी माझे साखरेचे पोतें
तुझ्या नशीबाला जामीन कोण होतें ।।

बापाला मुलगी गुळाची घागर, साखरेचे पोते असे वाटते. परंतु असे हे रत्न कोणाच्या पदरी घालायचे?

मुलीला पाहायला येऊ लागतात. पूर्वी लहानपणी लग्ने होत. जरीचे परकर घालू वगैरे बोलणी होतात. येणारे घरदार पाहतात. मुलीचा बाप म्हणतो :

नवरी पाहूं आले काय पाहता कूडभिंती
मुलगी सुरतेचे मोती उषाताई ।।

आमचे घर नका पाहू. कुडाच्या भिंतीचे साधे घर. परंतु साध्या शिंपल्यात मोती असते. माझी मुलगी म्हणजे साधे मोती नसून गोलबंद पाणीदार सुरतेचे मोती आहे. तसेच नवरा मुलगा पाहायला गेल्यावर मुलीच्या बापाला चार सज्जन म्हणतात :

नवरा पाहूं गेले काय पाहता वतनाला
मुलगी द्यावी रत्नाला उषाताई ।।

घरदार, वतनवाडी काय पाहता? मुलगा चांगला असला म्हणजे झाले.

स्थळ पाहतांना नका बघू घरदार
जोडा बघा मनोहर उषाताई ।।

असे जरी असले तरी आईची इच्छा मुलगी चांगल्या घरात पडावी, दागदागिने अंगावर पडावे. गडी माणसे कामाला असावीत अशी असते :

शेरभर सोने गोठाभर गाई
तेथे आमुची उषाताई देऊ करा ।।
ज्याच्या घरी हत्ती घोडे ज्याच्या घरी कुळंबिणी
तेथे देऊ हिरकणी उषाताई ।।

नवरी मुलगी कशी आहे ऐका :

नवरी पाहूं आले सोपा चढून आंगणी
नवरी शुक्राची चांदणी उषाताई ।।
नवरी पाहूं आले काय पाहतां नवरीस
माझी लाडकी ही लेक सोने जणू मोहरीस ।।
नवरी पाहूं आले सोपा चढून माडी गेले
नवरी पाहून दंग झाले उषाताई ।।

नवरी पाहून झाल्यावर शेवटी हुंड्याच्या गोष्टी निघतातच :

मुलीच्या रे बापा हुंडा द्या पांच गाड्या

शालूच्या पायघड्या पाहिजेत ।।

परंतु एक श्रुतिस्मृतिशास्त्रज्ञ गृहस्थ म्हणतो :

गृहस्थ व्याहीया हुंडा दे पांच गायी
लेकुरवाळा व्याही मामाराया ।।

पाच गायीच नवरदेवाला द्या. मोठे घर आहे. मुलेबाळे आहेत. दूधदुभते होईल.

लग्न ठरते. तयारी होऊ लागते. घरात दळण पापड होऊ लागते :

जाते घडघडे उडीदाच्या डाळी
पापडाचे दळी अक्काबाई ।।

दळण दळतांना ओव्या म्हणतात :

वाटेवरलें घर ओवियांनी गर्जे
लगीनघर साजे बाप्पाजींचे ।।

लग्नासाठी तेलफळाचे, रूखवताचे लाडू तयार करावयाचे असतात. हे लाडू कोणी वळावे? ज्यांना सासूसासरे आहेत,अशा भरलेल्या घरातील बायकांनी लाडूला हात लावावे :

सासूसासऱ्यांची येऊ द्या मांडवा
हात लागू दे लाडवा शांताताईचा ।।
सासूसासऱ्यांच्या बोलवा पांचजणी
नवरा आहे देवगणी गोपूबाळ ।।

लग्नाचा मांडव घालायचा, त्याचे वर्णन सुंदर आहे. एका ओवीत मुक्तेश्वराप्रमाणे विशाल प्रतिमेचे वर्णन आहे :

मांडव घातला पृथिवीचा मेज
लेकी कन्यादान तुझे उषाताई ।।

अहेर देतात घेतात. नवरी मुलगी असते लहान. ती बिचारी थकून जाते :

अक्षतांनी जड झाला उषाताई तुझा माथा
अहेर देतां घेता दमलीस ।।

पुढे नवरा मुलगा निघतो. हत्तीवर अंबारीत तो असतो. सर्वत्र उजेड पडतो. नवरदेवाची प्रभा फाकते :

नवरा मुलगा हत्तीवर चढे
दोन्ही बिदी उजेड पडे चकचकाट ।।

लग्नाच्या सोहळ्याचे वर्णन सुरेख आहे. मैत्रिणी सांगतात :

वाजत गाजत आले गृहस्थाचें बाळ
ऊठ सखे घाल माळ उषाताई ।।

लहानशी नवरी. ती थरथरत असतें. परंतु पाठीशी मामा असतो :

लग्नाच्या वेळे नवरी कांपे दंडाभुजा
पाठीशी मामा तुझा उषाताई ।।
लगीनाच्या वेळे नवरी कांपते दंडांत
साखर घालावी तोंडात उषाताईच्या ।।

वधूवरे परस्परांस माळ घालतात. मग होम, सप्तपदी वगैरे प्रकार. लहानपणी मुलगी दमून जाते. ती रडवेली होते :

मंत्र उच्चारिती चाललासे होम
डोळ्या जातो धूर उषाताईच्या ।।
कोंवळी सांवळी जशी शेवंतीची कळी
दमली भागली उषाताई ।।

नवऱ्या मुलीला दागदागिन्यांनी नटवतात. जणू लहानशी बाहुली :

नाकी मोंठी नथ तोंडा पडली साउली
चित्रशाळेची बाहुली उषाताई ।।

लहानग्या मुलीचे ते लहानसे नाक, परंतु त्यात मोठी नथ घालतात, सारे तोंड झाकून जाते. कोवळे नाक दुखते :

करवंदी मोत्यांची नथ लाखाच्या मोलाची
आहे कोवळ्या नाकाची उषाताई ।।

काही काही वर्णने काव्यमय आहेत :

पिवळी नागीण चंदनवेलीला
तसा पट्टा कमरेला उषाताईच्या ।।
दागिन्यांनी वाके जशी लवली ग केळ
नाजूक फूलवेल उषाताई ।।

पंक्तीत नवरी नवऱ्याच्या पानात बसते. एकमेकांस घास देतात, जणू पहिली तोंडओळख. ओखाणा घेऊन घास देतात. ते वर्णन पहा कसे गोड आहे:

घेऊन ओखाणा नवरी घांस देई
हळूच वर बघे पुन्हा मान खाली होई ।।

नंतर वरात निघते :

झोपाळ्यांच्या वरातीला मोत्यांचे घोस लावूं
प्रेमाचे गीत गाऊं उषाताईला ।।

वरात येते. नवीन नाव ठेवले जाते. माहेर तुटले, सासर जोडले :

माउलीच्या डोळां घळकन पाणी आले
नांव बदलीलें सासर जोडीलें
नांव नवीन ठेवलें उषाताईला ।।

आता सासरी जायचे. केवढा करुण प्रसंग. या सर्व ओव्या कारुण्याने थबथबलेल्या आहेत. वाचताना डोळे डबडबतात :

काळी कपिला गाय अपुल्या कळपाला चुकली
मला मायेने टाकीली परदारी ।।
नऊ मास होत्यें मायबायेच्या उदरी
आता मी परघरी लोक झाल्यें ।।

या ओव्या हृदयाला घरे पाडतात, डोळ्याला झरे फोडतात, भाऊ समजावतो, बहिणीच्या पदरी पेढे बांधतो. बाप म्हणतो, शहाणी आहेस, रडू नकोस. आईला राहवत नाही :

सासऱ्या जातांना माय धरीते पोटाशी
तान्ह्ये कधी ग भेटशी उषाताई ।।

सासरच्या मंडळीस आई म्हणते :

पदरी घातला पोटचा मी हो गोळा
भरून येतो डोळा माय म्हणे ।।

शेवटी गाडी निघते. नवरी मुलगी मागे पाहात असते :

सासरी जातांना बघते मागेपुढे
जीव गुंते आईकडे उषाताईचा ।।

भाऊ दुरून खुणावीत असतो :

सासरी जातांना गाडी लागे चढणीला
ये हो म्हणे बहिणीला भाईराया ।।
सासरी जातांना डोंगर आले आड
जातांना उषाताईला मागे पाहून येती कढ ।।

आईबापांना कसे कसे होते. मुलीपेक्षा आता मुलीच्या सौभाग्याची काळजी

वाटू लागते. मुलगीचा पती सुखी असणे म्हणजे मुलगी सुखी असणे. मातेचे हे परमोदार उद्गार ऐका :

माझे हे आयुष्य उणे करी रे गणाया
घाल सखीच्या चुडेया उषाताईच्या ।।

बापाला उद्देशून लोक म्हणतात :

लेकीच्या रे बापा धन्य धन्य तुझी छाती
काळजाचा धडा देतोस परक्या हाती ।।

बापही विरघळतो :

बाप म्हणे लेकी साखरेचा घडा
जाशी परघरा जीव होई थोडाथोडा ।।

गाडी दिसत नाही. बैलाच्या घंटांचा आवजही हवेवर विरून जातो :

गाडी आड गेली दिसेना नयनांला
माहेरच्या मंडळीच्या पाणी लोटले डोळ्यांला ।।
गाडी आड गेली ऐकूं न येई कांही
परतती मायबाप परते रडत भाई ।।

लोक आईबापांना शांत करतात. आईबापच हौसेने लग्न करतात. परंतु मुलगी सासरी जायला निघाली की तेच कष्टी होतात:

संसारी सुखांत आहे दुःख मिसळलें
लगीन थाटाने करिती परि डोळ्यां पाणी आलें ।।

सारांश काय, तर -

सुखामध्ये दुःख दुःखामध्ये सुख
असे संसारी कौतुक देवाजीचे ।।

अशा रीतीने मुलगी सासरी जाते. संसार पुढे सुरू होतो. संसारातील ते बरेवाईट अनुभव पुढील प्रकरणी :

मुलगी : ओव्या

पुत्र झाला म्हणून साखर वाटली
पुत्र नाही कन्या झाली शांताबाईला १
कन्या झाली म्हणून नको करू हेळसांड
गोपूबाळाच्या शेजारी उषाताईचा पाट मांड २

कन्या झाली म्हणून नको घालू खाली मान
घडेल कन्यादान काकारायांना ३
लेका ग परीस लेक ती काय उणी
हिरा नव्हे हिरकणी उषाताई ४
लाडकी झाली लेक घास जाईना तिच्या तोंडा
बापाशेजारी पाट मांडा उषाताईचा ५
लाडकी झाली लेक लाड करूं मी कशाचा
चंद्रमा आकाशींचा मागतसे ६
साठ्यांच्या दुकानी देखीली फडकी
बापाची लाडकी उषाताई ७
साठ्यांच्या दुकानी उंच गझन मोलाची
बहीण भावाच्या तोलाची उषाताई ८
कापड दुकानी देखीली लाल साडी
बापाची झोप मोडी उषाताई ९
अंबा मोहरला मोहरला पांनोपानी
बापाच्या कडे तान्ही उषाताई १०
लाडकी ग लेक लाड मागते बापाला
माझी उषाताई मोती मागते कापाला ११
माझ्या अंगणात शेजीचे पांच दाजी
पायी पैंजण मैना माझी उषाताई १२
माझ्या अंगणात शेजीचे पांच लाल
त्यांत माझी मखमल उषाताई १३
माझ्या अंगणात शेजीचे पांच पुत्र
त्यात माझी चंद्रज्योत उषाताई १४
माझ्या अंगणात शेजीबाईंची माणके
उषाताई ग सारखे एक नाही १५
माझ्या अंगणात सांडली दूधफेणी
जेवली उषाताई शोभे शुक्राची चांदणी १६
माझ्या अंगणात ठेवीली तूपपोळी
ज़ेवीली चाफेकळी उषाताई १७

लांब लांब केस मला वाटे काळा साप
अंग गोरे गोरे झाक उषाताईचे १८

गोऱ्या ग अंगाला शोभती काळे केस
काळोख्या रात्रीत शोभे चंद्रमा सुरेख १९

लांब लांब केस तुझ्या केसांची पडली छाया
देत्ये चौरंग बैस न्हाया उषाताई २०

लांब लांब केस वेणी येते मोगऱ्याची
फणी आणा घागऱ्यांची उषाताईला २१

लांब लांब केस आईने वाढवीले
बापाने गोंडे केले उषाताईला २२

मोठमोठे केस मुठींत मावती ना
लिंबावांचून न्हाईना उषाताई २३

मोकळे केस ग सोडून तूं ना जाई
दृष्ट होईल तुला बाई उषाताई २४

गोंडीयाची वेणी पाठीवरी लोळे
भावंडांत खेळे उषाताई २५

पांचा पेडी वेणी मला वाटे काळा साप
पदराखाली झांक उषाताई २६

घागऱ्या घुंगुर दणाणे माझी आळी
खेळून आली चाफेकळी उषाताई २७

सोनाराच्या शाळे ठिणगुल्या उडती
बिंदुल्या घडती उषाताई २८

उषाताई खेळे तुळशीच्यामागें
केवड्याला ऊन लागे गोपूबाळाला २९

माते माते म्हणून मातेच्या पाठी लागे
कुड्यांना मोती मागे उषाताई ३०

माझ्या दारावरनं कोण गेली परकराची
हाती आंगठी हिऱ्याची उषाताई ३१

झोपाळ्यावर बसूं हिरव्या साड्या नेसूं
सारख्या बहिणी दिसूं उषाताई ३२

काचेची बांगडी कशी भरूं मी एकटी
आहे बहीण धाकटी माझ्या घरी ३३
काचेची बांगडी कशी भरूं मी हातांत
आहे हो घरात लहान बहीण ३४
दोघी ग बहिणी जोडीजोडीने चालती
परकर ते हालती रेशमाचे ३५
नदीच्या पलीकडे हिरव्या परकराची कोण
पैजण वाळ्यांची माझी धाकुटी बहीण ३६
लाडक्या लेकीचे नांव ठुमक बीजली
पायी पैंजण सुंदर ओसरीला की नीजली ३७
लाडकी ग लेक लेक उपाशी निजली
ऊठ ऊठ आता साखर तुपांत थिजली ३८
बाहुलीं बुडकुली भिंतीशी उभी केली
खेळणार कोठे गेली उषाताई ३९
शिंपली कुरकुली बुरुडाला सांगणार
मैना माझी खेळणार उषाताई ४०
तुझ्या गालांवरी सांग कोणी ग गोंदले
फूल कोणी ग टोचलें गुलाबाचे ४१
पिकले तोडलें तसे तुझे बाळे ओठ
भरे ना माझे पोट पाहुनीया ४२
बापाची लाडकी बाप म्हणे कोठे गेली
हांसत दारी आली उषाताई ४३
मुलगी वाढते जशी चंद्रम्याची कोर
बापाला पडे घोर अंतरंगी ४४
मुलगी वाढते दिवसेंदिवस
घोर लागतो जिवास बाप्पाजींच्या ४५
मुलगी वाढते मनीं चिंताही वाढते
चिंता सतत रडवी मायबापां ४६
बाप म्हणे लेकी लेकी गुळाचे घागरी
लावण्यरूप तुझें घालूं कोणाचे पदरीं ४७

बाप म्हणे लेकी माझें साखरेचें पोतें
तुझ्या नशिबाला जामीन कोण होते ४८

बाप म्हणे लेकी लाडकी होऊं नको
जाशील परघरीं वेडी माया लावू नको ४९

बाप म्हणे लेकी तूं ग धर्माची पायरी
सून सत्तेची सोयरी वैनीबाई ५०

लेकीचें जन्मणें जसा पानांचा पानमळा
ज्याची त्याने नेली बया शोषला ग तुझा गळा ५१

बाप्पाजी हो बाप्पा लेकी फार म्हणूं नका
जसा चिमणुल्यांचा थापा उडुनीं गेला ५२

सगळ्या झाल्या लेकी शेजी म्हणे झाल्या झाल्या
बाप ग म्हणे दाही दिशा चिमण्या गेल्या ५३

बाळपट्टी खण रुपयाला एक
परकराजोगी लेक अक्काबाईची ५४

बाळपट्टी खण रुपयाला दोन
परकराजोगी सून अक्काबाईला ५५

मुलगी पाहूं आले पुण्याचे पुणेकर
जरीचे परकर घालूं केले ५६

मुलीला पाहूं आले पुण्याचे वाईचे
नाना फडणीसांचे कारकून ५७

मुलीला पाहूं आले आधीं चहा करा
मग मुलीला पहा उषाताई ५८

मुलगी पाहूं आले पुण्याचे पुणेकर
बिंदीपट्टा अलंकार घालू केले ५९

नवरी पाहूं आले काय पाहतां कूडभिंती
मुलगी सुरतेचे मोतीं उषाताई ६०

नवरी पाहूं आले सोपा चढून अंगणी
नवरी शुक्राची चांदणी उषाताई ६१

नवरी पाहूं आले सोपा चढून माडी गेले
नवरी पाहून दंग झाले उषाताई ६२

नवरी पाहूं आले काय पाहतां नवरीस
माझी लाडकी ही लेक सोनें जणूं मोहरीस ६३
उषाताई ग नवरी पुतळीचें जणूं सोनें
जिची सून होईल तीनें पुण्य केले ६४
उषाताई ग नवरी कोणा भाग्यवंता द्यावी
हिऱ्याला जडवावी हिरकणी ६५
नवरा पाहूं गेले काय पाहतां वतनाला
मुलगी द्यावी रतनाला उषाताई ६६
मुलगा पाहूं येती काय पाहतां घरदार
मुलगा आहे वतनदार गोपूबाळ ६७
मुलगा पाहूं येती आक्काताई तुझ्या गुणा
लेकी तशा सुना वागवीशी ६८
मुलगा पाहूं येती हुंडा द्यावा पांचशाचा
नवरा मुलगा नवसाचा गोपूबाळ ६९
स्थळ पाहतांना नका बघूं घरदार
जोडा बघा मनोहर उषाताईला ७०
स्थळ पाहतांना नका पाहूं धनबीन
एक पाहावें निदान कुंकवाला ७१
स्थळ पाहतांना पहा गणगोत्र कूळ
मुलगी दिल्यावर काढूं नये कूळबिळ ७२
शेरभर सोनें गोठाभर गायी
तेथें आमची उषाताई देऊं करी ७३
ज्याच्या घरीं हत्ती घोडे ज्याच्या घरीं ग पालखी
तेथें देऊं ग लाडकी उषाताई ७४
ज्याच्या घरीं हत्ती घोडे ज्याच्या घरीं कुळंबिणी
तेथें देऊं हिरकणी उषाताई ७५
मुलीच्या रे बापा नकों भिऊ करणीला
घालूं तुमच्या हरणीला गोठतोडे ७६
मुलीच्या रे बापा हुंडा द्या पांच गाड्या
शालूच्या पायघड्या पाहिजेत ७७

लगनाच्या बोली बोलती पारावरीं
नवरा हुंड्याचा माझ्या घरीं गोपूबाळ ७८
गृहस्थ व्याहीया हुंडा दे पांच गायी
लेंकुरवाळा व्याही मामाराया ७९
गृहस्थ गृहस्थ विचार करिती बाजारीं
माझ्या बाप्पाजींच्या हुंडा शेल्याच्या पदरीं ८०
भिंती सारवून वर काढावी सुखड
तुझ्या लग्नाचे पापड उषाताई ८१
भिंती सारवून वर काढीले नारळ
तुझ्या लग्नाचा फराळ उषाताई ८२
भिंती सारवून वर काढूं केरेंमोरें
तुझ्या लग्नाचे सोयीरे जमताती ८३
भिंती सारवून वर काढावा पोपट
तुझ्या लग्नाची खटपट उषाताई ८४
भिंती सारवून वर काढावी परात
तुझ्या लग्नाची वरात उषाताई ८५
लगीन ठरलं करीती केळवण
जरीचे मिळती खण उषाताईला ८६
करा केळवण आहे मुहूर्त समीप
आला घाईचा निरोप मामारायांचा ८७
करूं केळवण लाडक्या भाचीला
मनांत आनंदला मामाराया ८८
ओल्या हळदीचें वाळवण दारी
केळवण घरीं उषाताइला ८९
ओल्या हळदीचें वाळवण घाला
केळवण तुला उषाताई ९०
दिवसा दळूं कांडूं रात्रीं पापडाचें
लगन तांतडीचें उषाताईचें ९१
दिवसा दळूं कांडूं रात्रीं पापडपीठी
धाडूं लग्नचिठी अप्पारायांना ९२

जातें घडघडे उडदाच्या डाळी
पापडाचें दळी अक्काबाई ९३
वांटेवरलें घर ओंवीयांनी गर्जे
लगीनघर साजे बाप्पाजींचें ९४
हळंद कुटीतां मुसळें घुमती
तुला बाशिंगें शोभती गोपूबाळा ९५
सासू-सासऱ्यांची येऊं द्या मांडवा
हात लागूं दे लाडवा शांताताईचा ९६
सासू-सासऱ्यांच्या बोलवा पांचजणी
नवरा आहे देवगणी गोपूबाळ ९७
लगन उतरलें उतरलें तळ्याकांठीं
नवरी जडावाची उषाताई ९८
लगन उतरलें आंबराईच्या पिंपळाखालीं
नवरी पिवळ्या छत्राखालीं उषाताई ९९
मांडव घातला पृथिवीचा मेज
लेकी कन्यादान तुझं उषाताई १००
मांडवाला मेढी घालाव्या ठेंगण्या
बहिणी चिमण्या उषाताई १०१
मांडवाला मेढी सरशा सूत्रधारी
चुलता कारभारी उषाताई १०२
घातला मंडप त्याला लावियलें छत्र
नवरी शोभते घरात उषाताई १०३
घातला मंडप हंड्या झुंबरे लावती
तेथे झालरी सोडीती रेशमाच्या १०४
मंडपाला खांब शंभर लावीले
लाल कापडे मढवीले रातोरात १०५
मांडव घातला ओल्ये की हिरांचा
वैनीबाईच्या दीरांचा पराक्रम १०६
मांडव घातला ओल्ये पोफळीचा
व्याही केला कोंकणीचा मामारायांनी १०७

मांडव घातला ओल्ये ओलेत्यांनी
उषाताईच्या चुलत्यांनी परी केल्या १०८

मांडवाला मेढी घालाव्या दुसऱ्या
बहिणी रुसल्या गोपूबाळाच्या १०९

खांद्यावर कुऱ्हाडी कुठें जाता हो वऱ्हाडी
मांडवाला मेढी चंदनाच्या ११०

घाणा भरियेला विडा ठेवियेला
आधी नमियेला गणराज १११

घाणा भरियेला खंडीच्या भाताचा
आमुच्या गोतांचा गणराय ११२

आधी मूळ धाडा दूरी दूरींचीये
आम्हा कुळीचीये जोगेश्वरीला ११३

आधी मूळ धाडा घुंगराची गाडी
शालजोडीचे वऱ्हाडी गणराय ११४

आधी मूळ धाडा चिपळूण गांवा
परशुराम देवा आमंत्रण ११५

नागवेली बाई आगरी तुझा वेल
कार्य मांडले घरी चल भाईरायांच्या ११६

अहेर की आला शेला शालू खंबायीत
चल सखी मंडपात उषाताई ११७

अहेर की आला माहेरीचा शेला
शेल्यावरी झेला मोतीयांचा ११८

अहेर की आला माहेरींची चोळी
चोळीवर जाळी मोतीयांची ११९

अहेर की आला माहेरींची शाल
शालीवरी लाल पीतांबर १२०

अहेर की आला माहेरींची घटी
घटीवर मुठी मोतीयांच्या १२१

अक्षतांनी जड झाला उषाताई तुझा माथा
अहेर देता घेता दमलीस १२२

माडीखालीं माडी माडीखाली तळघर
तेथे तुझा गौरीहर उषाताई १२३

अष्टपुत्री कांचोळी आजोळींची नेस
गौरीहरी बैस उषाताई १२४

हौसदार मोठे कमळाबाईचे चुलते
गौरीहरी ग फुलते नागचाफे १२५

आणील रुखवत मुलीची आई उभी
उघडून पाहूं दोघीं ताईबाई १२६

आणीले रुखवत मंडपी राहूं द्या
वडील मानाची येऊं द्या ताईबाई १२७

आणीले रुखवत बत्तीस ताटांचे
नवऱ्या मुलीचे गोत मोठे उषाताईचे १२८

वाजत गाजत आले रुखवत
भोवती मैत्र येत गोपूबाळाचे १२९

आले रुखवत आता उठा घाई करा
घोडा आहे उभा दारा शृंगारलेला १३०

सजलेला घोडा वर वर बसवीला
एकच घोष झाला वाजंत्र्यांचा १३१

नवरा मुलगा हत्तीवर उभा करा
करवलीचा चुडा भरा कमळाताईला १३२

नवरा मुलगा हत्तीवर चढे
दोन्ही बिंदी उजेड पडे चकचकाट १३३

चौघडे कडाडती उडतात बार
चालला हो वर उषाताईचा १३४

शिंगे वाजवीती कुणी वाजवीती झांजा
मुहूर्त तिन्हीसांजा गोरजाचा १३५

वरापाठीमागे मानाच्या वऱ्हाडणी
अप्सरा स्वर्गातूनी उतरल्या १३६

निघाल्या बायका अपुला करून शृंगार
पैठण्या पीतांबर झळकती १३७

धन्य धन्य वाटे मनांत वरमाये
आनंद न समाये हृदयात १३८

घोडा सजलेला घोड्याला शोभे तुरा
बसला वर हिरा गोपूबाळ १३९

घोडा सजलेला त्याच्यापायी चांदी तोडा
वराच्या पायी जोडा शोभतसे १४०

उषाताईचा नवरा आला रे घाटीशी
भाईराया दिवटीशी तेल घाली १४१

उषाताईचा नवरा आला रे घाटीये
भरूं हें पाठीये तेलफळ १४२

वाजत गाजत बाळ गृहस्थाचे आलें
दारांत ओवाळीलें वधू मायें १४३

तोरणाच्या दारा कशाचे रुसणें
चीर मागते दुसरें अक्काबाई १४४

तोरणाच्या दारा चिखल कां झाली
वरुमाय न्हाली वयनीबाई १४५

बाशिंगाची कळी लागते तोरणा
नवरा मुलगा शहाणा गोपूबाळ १४६

बाशिंगाची कळी लागली अनंता
नवरा मुलगा नेणता गोपूबाळ १४७

पिवळे नेसली पिवळे तिचे पाय
मुलाची वरुमाय शांताबाई १४८

नवऱ्या मुलाची करवली कोण
नेसली सूर्यपान शांताबाई १४९

चला जाऊं पाहूं मधुपर्क सोहळ्याला
कंठी देतो जावयाला भाईराया १५०

मधुपर्की एक बैसलासे हिरा
तो तुझा नवरा उषाताई १५१

मधुपर्की एक बैसलासे मोती
तो तुझा लक्ष्मीपती उषाताई १५२

वाचनालय, सातारा.

वाजत गाजत   येऊ दे उभ्या बिदी
माळ घेऊन आहे उभी   उषाताई   १५३

वाजत गाजत   आले गृहस्थाचे बाळ
ऊठ सखे माळ घाल   उषाताई   १५४

वाजत गाजत   बाळ गृहस्थांचे आले
हाती धरून त्याला नेले   बाप्पाजींनी   १५५

वाजंत्री वाजती   चला जाऊ पहायला
वस्त्र देतो जावयाला   अप्पाराया   १५६

लगनाच्या वेळे   भट करिती सावधान
होतसे कन्यादान   उषाताईचें   १५७

नेस ग अक्काबाई   हिरवे पाचूचें
कन्यादान ग लेकीचे   उषाताईचे   १५८

पांचा ग पेडी वेणी   मामांनी उकलीली
कन्यादाना उभी केली   उषाताई   १५९

कन्यादान करुनी   पुण्य आहे भारी
हाता आहे झारी   बाप्पाजींच्या   १६०

कन्यादान करुनी   बाप बोले पांच गायी
चुलता बोले उषाताई   अर्धे राज्य   १६१

कन्यादान करुनी   कन्या एकीकडे
पृथ्वीदान घडे   काकारायांना   १६२

कन्यादाना वेळे   कन्या उच्चारिली
बापे पाचारिली   उषाताई   १६३

मंडप भरला   जमले छोटे मोठे
लगीन होतें थाटे   उषाताईचे   १६४

मंडप भरला   लागे पागोट्या पागोटें
लगीन होते थाटे   उषाताईचें   १६५

भिक्षुकांची दाटी   मांडवांत झाली
लगीनाची वेळ झाली   उषाताईच्या   १६६

गोरज मुहूर्त   मुहूर्त पवित्र
उच्चारिती मंत्र   ब्रह्मवृंद   १६७

मंगल अष्टके भट भिक्षुक म्हणती
होतसे शुभ वृष्टी अक्षतांची १६८
लगनाच्या वेळे अंतरपाटाला दोरवा
मामा सरदार बोलवा उषाताईचा १६९
लग्नाच्या वेळे नवरी कांपे दंडाभुजा
पाठीशी मामा तुझा उषाताई १७०
लगनाच्या वेळे नवरी कांपते दंडात
साखर घालावी तोंडात उषाताईच्या १७१
लगनाच्या वेळे नवरी कांपे थरथरा
मामा येऊं दे घरा उषाताईचा १७२
वाजंत्री वाजती फुलती फुलबाजा
उषाताई कोणा राजा माळ घाली १७३
रुपयांची वाटी बोहल्याच्या कोना
तुझ्या वराला दक्षिणा उषाताई १७४
वाजवा वाजवा वाजवा झाली वेळ
घालती गळा माळ वधूवर १७५
कडका उडाला घोष जातो अंबरांत
गर्दी उडे मांडवांत बाप्पाजींच्या १७६
ताशे तडाडती उडती किती बार
सोहळा होतो थोर लगीनाचा १७७
सनया सुस्वर धिमधिम चौघडे वाजती
शिंगे जोराने फुंकती शिंगवाले १७८
पानसुपारीची अत्तरफुलांची
तबके चांदीची झळाळती १७९
आणिती साखरा तबकी भरभरून
गर्दीत घुसून वांटतात १८०
मंत्र उच्चारिती चाललासे होंम
डोळ्यां जातो धूम उषाताईच्या १८१
मंत्र उच्चारिती चाललासे होम
होतसे भारी श्रम उषाताईला १८२

कोवळी सांवळी जशी शेवंतीची कळी
दमली भागली उषाताई १८३
कोंवळी कोंवळी सुंदर सांवळी
घामाघूम भारी झाली उषाताई १८४
आणिले दागीने तबकी भरून
शोभले चौगुण उषाताई १८५
आधीच सोन्याची आणि सोन्याने मढली
अत्यंत शोभली उषाताई १८६
हाती गोठतोडे भाळी बिंद बिजवर
गळा शोभे चंद्रहार उषाताईच्या १८७
नाकी मोठी नथ तोंडा पडली साउली
चित्रशाळेची बाहुली उषाताई १८८
ठुशापेट्यांखाली कंठ्याचे बारा सर
दिल्या घरी राज्य कर उषाताई १८९
ठुशा पेट्यांखाली तन्मणीला बारा घोंस
दिल्या घरी सुखे अस उषाताई १९०
पिवळी नागीण चंदन वेलीला
तसा पट्टा कमरेला उषाताईच्या १९१
गोंडस सुकुमार हात चिमणे कोंवळे
जड तोड्यांनी वांकले उषाताईचे १९२
तोडीच्या वाकींनीं शोभती दोन्ही भुजा
फाकते तेजःप्रभा उषाताईची १९३
पांच पेडी वेणी वेणीला पन्हळ
मुद राखडी सांभाळ उषाताई १९४
करवंदी मोत्यांची नथ लाखाच्या मोलाची
कोवळ्या नाकाची उषाताई १९५
नक्षत्री आकाश फुलांनी फुलवेल
भूषणी शोभेल उषाताई १९६
फुलांच्या गुच्छांनी वांकतो कोवळा वेल
तशी नवरी लवेल दागिन्यांनी १९७

वाजत गाजत हळदीला नेती
अंगाला लाविती वधूवरांच्या १९८
नवऱ्यापरीस नवरी आहे गोरी
हळद लावा थोडी उषाताईला १९९
नवऱ्यापरीस नवरी आहे काळी
आणा फुलांची हो जाळी उषाताईला २००
दागिन्यांनी वाके जशी लवली ग केळ
नाजूक फुलवेल उषाताई २०१
नवऱ्यापरीस नवरी उजळत
सोन्याचे तिला गोट शोभतात २०२
सूनमूख पाहता मांडवी आले ऊन
शालूखाली झांका सून उषाताई २०३
सूनमूख पाहता मांडवी आले ऊन
कडे घ्यावी सून आक्काबाई २०४
सूनमूख पाहता मांडवी आले ऊन
उभी छाया हो करून आक्काबाई २०५
विहिणीविहिणींच्या रस्त्याबिदी झाल्या भेटी
गुलाल तुझ्या ताटी वैनीबाई २०६
चाल माझ्या वैनीबाई पायघड्यांवरून
व्याही तुला ग दुरून हात जोडी २०७
पायघड्या घालिती परटीणी जावाजावा
पायघड्यांचा मान घ्यावा आक्काबाई २०८
पायघड्या घालिती परटीणी सासवासूना
पायघड्यांचा मान तुम्हा वैनीबाई २०९
एका छत्रीखाली दोन वरूमाया
नणंदा भावजया विहिणी झाल्या २१०
वाजंत्री वाजती सनया आलापती
बैसल्या हो पंगती जेवावया २११
हातातील घांस कां हो हातात रहाती
सूनेला आणिती मांडवांत २१२

बघतात सारे बघती टकमक
नवरी लखलख उषाताई २१३

घेऊन ओखाणा नवरी घांस देई
हळूच वर बघे पुन्हा मान खाली होई २१४

घेऊन ओखाणा नवरीला घांस देई
घांस पटकन् तोंडी घेई उषाताई २१५

प्रीतीच्या जावयाला देऊ करा ताटवाटी
बाळे सारे तुझ्यासाठी उषाताई २१६

चोळी शिव रे शिंप्या मोती लाव परातीत
चोळी जाते वरातीत उषाताईच्या २१७

कसले हे बार कशाचे वाजतें
आता वरात निघते उषाताईची २१८

झोपाळ्यांच्या वरातीला मोत्यांचे घोस लावूं
प्रेमाचे गीत गाऊं उषाताईला २१९

नळे चंद्रज्योती शेकडो लाविती
अंबारीत शोभती वधूवर २२०

नळे चंद्रज्योती त्यांची झांकतसे प्रभा
वरातीसाठी निघा लाग वेगे २२१

नवरानवरी बैसली पालखींत
फुले उधळित हौसेसाठी २२२

हत्तीच्या सोंडेवरी शोभे मोतीयांची जाळी
वर बैसली सांवळी उषाताई २२३

नक्षत्रासारखे हे ग दीप झळाळति
झाल ओवाळिती वधूवरा २२४

हत्तीच्या सोंडेवरी मोतीयांची झाल
वर शोभे बाळ भाग्यवंत २२५

माहेर तुटले सासर जोडले
नांव नवीन ठेवीले उषाताईला २२६

माउलीच्या डोळां घळकन पाणी आलें
नांव हो बदलीलें उषाताईचें २२७

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

सासूसासऱ्यांच्या वधूवरे पाया पडती
आशीर्वादा मिळवीती वडीलांच्या २२८
जवळी घेऊनी बैसवीती मांडी
घालतात तोंडी साखरेला २२९
पाठीराखी कोण जाईल बरोबर
सांभाळील अष्टोप्रहर उषाताईला २३०
नको नको रडूं पाठीराखीणीला धाडूं
आसवे नको काढूं उषाताई २३१
नको नको रडूं पाठीराखीण येईल
प्रेमे तुला समजावील उषाताई २३२
नको नको रडूं सत्वर तुला आणू
डोळ्यां नको पाणी आणूं उषाताई २३३
काळी कपिला गाय अपुल्या कळपा चुकली
मला मायेने टाकीली परदारी २३४
काळी कपिला गाय रेशमी तिला दावे
आंदण मला द्यावें बाप्पाराया २३५
नऊ मास होत्यें मायबायेच्या उदरी
आता मी परघरी लोक झाल्यें २३६
नऊ मास होत्यें मायबाईच्या पोटांत
चिरेबंदी कोटांत वस्ती केली २३७
नऊ मास होत्ये माउलीच्या डाव्या कुशी
उणे उत्तर बोलू कशी मायबाईला २३८
नऊ मास होत्ये कळकीच्या बेटा
कन्येचा जन्म खोटा मागीतला २३९
सासरी जातांना डोळ्यांना येते पाणी
सखा भाईराया पुसून टाकीतो शेल्यांनी २४०
सासरी जातांना डोळ्यांना येते पाणी
सासरी जाते तान्ही उषाताई २४१
सासरी जातांना करीते फुंदफुंद
डोळे झाले लालबुंद उषाताईचे २४२

सासरी जातांना डोळ्यांना येतें पाणी
बाप म्हणे शहाणी लेक माझी २४३
सासरी निघाली पहिल्या पहिल्यानें
शब्दही भावाच्याने बोलवेना २४४
सासरी जातांना उषाताई रडे
पदरी बांधी पेढे भाईराया २४५
सासरी जातांना डोळ्यांना आल्या गंगा
महिन्याची बोली सांगा बाप्पाराया २४६
सासरी जातांना बघते मागेपुढे
जीव गुंते आईकडे उषाताईचा २४७
सासरी जातांना माय धरीते पोटाशी
तान्हे कधीं ग भेटशी उषाताई २४८
सासरी जातांना उषाताई मुसमुशी
शल्याने डोळे पुशी भाईराया २४९
सासरी जातांना गाडी लागली जाईला
हांका मारीते आईला उषाताई २५०
सासरी जातांना गाडी लागे चढणीला
ये हो म्हणे बहिणीला भाईराया. २५१
सासरी जातांना डोंगर आले आड
जातांना उषाताईला मागे पाहून येती कढ २५२
सासरी जातांना डोळ्यांना नाही पाणी
आई म्हणे लेक शहाणी उषाताई २५३
घातली पदरी पोटची मी लेक
करा देखरेख माय म्हणे २५४
पदरी घातला पोटचा मी हो गोळा
भरून येतो डोळा माय म्हणे २५५
पोटच्या मुलीपरी करा माझ्या हो तान्हीला
काय फार सांगूं माय म्हणे हो तुम्हाला २५६
मायेच्या डोळ्यांनी सुटल्या शतधारा
कन्येच्या पाठीवरून फिरवी कांपऱ्या हाताला २५७.

बाप म्हणे लेकी साखरेचा घडा
जाशी परघरा जीव होई थोडाथोडा २५८
लेकीच्या रे बापा धन्य धन्य तुझी छाती
काळजाचा घडा देतोस परक्या हातीं २५९
लेकीच्या रे बापा धन्य धन्य तुझे मन
काळजाचा घडा करिशी परक्या आधीन २६०
लेकीच्या बापाचे धन्य धन्य हो धारिष्ट
लेक देऊनीया केला जावई वरिष्ठ २६१
आयुष्य चिंतीते परक्याच्या पुत्रा
सखे तुझ्या मंगळसूत्रा उषाताई २६२
आयुष्य चिंतीते परक्या मुलास
सखे तुझ्या कुंकवास उषाताई २६३
आयुष्य मी चिंती परक्या ब्राह्मणा
सखी तुम्हां दोघाजणां उषाताइ २६४
आयुष्य मी चिंती लेकी आधी जांवयाला
माउलीचे सुख तुला उषाताई २६५
माझे हे आयुष्य उणे करी रे गणया
घाल सखीच्या चुडेयां उषाताईच्या २६६
होऊन लगीन कन्या सासरी निघाली
संसाराची यात्रा निराळी सुरू झाली २६७
होऊन लगीन निघाली पतिघरी
होई कावरीबावरी उषाताई २६८
बापाने दिल्या लेकी जन्माच्या सांठवल्या
ब्रह्याने गांठी दिल्या जन्मवेरी २६९
निघालीसे गाडी संसारा सुरवात
सखीचे मंगळसूत्र मंगल करो २७०
निघालीसे गाडी होवो संसार सुखाचा
माझ्या तान्ह्या ग बाळीचा उषाताईचा २७१
गाडी आड गेली दिसेना नयनांला
माहेरच्या मंडळींच्या पाणी लोटले डोळ्यांला २७२

गाडी आड गेली घंटेचा येई नाद
त्याचा ऐके पडसाद भाईराया २७३
गाडी आड गेली येतो खडखड आवाज
आता भाईरांया घरी जायाला रे नीघ २७४
गाडी दूर गेली ऐकूं ना येई काही
परतती मायबाप परते रडत भाई २७५
लोक बोलताती नका करूं कांही चिंता
लेक दिली भाग्यवंता बाप्पाजींनी २७६
लोक बोलताती नका आता रडूं
लेक लाडकी तुमची आता भाग्यावर चढूं २७७
लोक समजावीती मायबाप झाले शांत
परी आतून मनांत कढ येती २७८
संसारी सुखांत आहे दुःख मिसळलें
लगीन थाटाने करिती परि डोळ्यां पाणी आलें २७९
सुखामध्ये दुःख दुःखामध्ये सुख
असे संसारी कौतुक देवाजीचें २८०
गणया रे देवा कर सखीचं चांगलं
आई सारं रे मंगल तुझे हातीं २८१

□ □

४ : सुखदुःखाचे अनुभव

रसपरिचय

मागील प्रकरणात आपण मुलीचे लग्न लागून ती प्रथम सासरी जाते तोपर्यंतचा प्रकार पाहिला. आता या प्रकरणात संसारातील सारे बरेवाईट अनुभव ओव्यांत ओतलेले तुमच्यापुढे ठेवले आहेत. सासुरवास हा शब्दच किती भयंकर आहे. परंतु कितीही सासुरवास असला तरी सासरीच राहावयाचे. माहेरी फार तर दोन दिवस. स्त्रिया सांगतात :

सासरी सासुरवास   माहेरी माहेरवास
सत्तेचा परी धांस   सासऱ्यास ।।

लग्न लावून एकदा सासरी मुलगी गेली म्हणजे मग माहेरी कोणती सत्ता? कधी एखादे लुगडे, खण फार तर मिळायचा. वटसावित्रीच्या त्या अमर गाण्यात सावित्री यमदेवाला म्हणते :

मापिलेंच देई माता   मापिलेंच देई पिता
माझा उमोप दाता   देई रे आतां ।।

आई मोजके देईल, बाप मोजके देईल, परंतु पती हा मोजमाप न करता देणारा आहे. अशा या पतिदेवाकडे पाहूनच सारे सासरचे इतर हाल नववधू विसरते. सासरच्या वर्णनात स्त्रियांनी किती सुंदर उपमा दिल्या आहेत. सासरचे बोल म्हणजे काल्याचे वेल, रेशमाच्या गाठी, वळचणीचा येता जाता लागणारा वासा, सडसड येणारे पाण्याचे शिंतोडे, मिरच्यांचे वा निवडुंगाचे काटेरी घोस, विषाचे पेले- कोणती द्यावी उपमा? परंतु असे हे सासरचे हाल मुलगी का सोसते? सारी कटू बोलणी मुकाट्याने का सहन करते? आपल्या आई-बापांच्या नावाला कमीपणा येऊ नये म्हणून :

सासरचे बोल   कडू विषाचे ग प्याले
तुझ्यासाठी गोड केले   मायबाई ।।
सासूचा सासुरवास   रडवीतो पदोपदीं

लेक थोराची बोलेना कोणाशी परी कधीं ।।
सासरचे बोल जसे निवडुंगाचे घोस
शीलवंतांच्या मुली सोस उषाताई ।।

सासरी माहेरचा भाऊ आलेला असावा. त्याच्या कानांवर घरातले बोल येतात. आपल्या बहिणीला कसे टोचून बोलतात हे तो चोरून ऐकतो. त्याचे डोळे भरून येतात :

सासरचे बोल भाऊ ऐकतो चोरोनी
नेत्र येतात भरोनी भाईरायाचे ।।

लग्नापूर्वी वडिलांनी पाहिले असते तर. परंतु वडिलांनी फार काळजी घेतली नाही :

बापे दिल्या लेकी आपण बसले सुखे ओटी
मायेला चिंता मोठी वागण्याची ।।

बाप ओटीवर पानसुपारी खात बसला तरी मुलीला कसे वागवतील याची आईला काळजी; आणि मुलगीही सासरच्या हालात कशी वागते ती काळजी. परंतु मुलगी आईबापांस निश्चित करते :

चंदनासारखी देह मी झिजवीन
लेक तुमची म्हणवीन बाप्पाजी हो ।।

चंदन आपला सुगंध पसरते, त्याचप्रमाणे सासरच्या हालांनी झिजून माझ्या चारित्र्याचा सुगंध पसरेल. सासरी गेलेली लहान मुलगी. तिला भूक लागते. तिचे वाढण्याचे वय, परंतु कोणाजवळ बोलणार ? ती पोट आवळून बांधते :

भूक लागते माझ्या पोटा परवंटा देत्ये गांठी
तुमच्या नांवासाठी बाप्पाजी हो ।।

सासरी सारीच बोलणार. सासू-सासरे, दीर-नणंदा सर्वांचाच बोलण्याचा अधिकार. पहाटेपासून प्रहरभर रात्र होईपर्यंत राबराब राबावे, भारतीय स्त्रिया काय म्हणतात ऐका :

सासुरवाशिणी तूं ग वाड्यातला बैल
कधी रिकामी होशील उषाताई ।।
स्त्रियांचा हा जन्म नको घालूं सख्या हरी
रात्र ना दिवस परक्याची ताबेदारी ।।
नाचण्याचा कोंडा नाही कशाच्या काजा कामा

मुलगीचा जन्म रामा देऊं नये ।।

आपण किती म्हटले की, आम्ही स्त्रियांना देवतांप्रमाणे वागवतो, तरी स्त्रियांचा अभिप्राय तोच खरा. या भारतात स्त्रियांचा जन्म नको, असे आपण म्हणायला लावले. याची लाज भारतीय पुरुषांना वाटली पाहिजे, सासरच्या मंडळींस वाटली पाहिजे :

सकाळी उठून सडासारवणाचे काम असते. देवा-तुळशीला नमस्कार असतो :

सकाळी उठूंन सडा घालूं गोमूत्राचा
माझ्या ग कंथाचा वाडा आहे पवित्राचा ।।

माझ्या पतीचा वाडा पवित्र आहे. सर्वत्र स्वच्छता ठेवली पाहिजे. शिवाय आमच्या घरावरून देवळाचा रस्ता जातो. सकाळी लोक देवदर्शनाला जातील. रस्ता स्वच्छ ठेवला पाहिजे :

सकाळी उठून काम करित्यें घाईघाई
माझ्या ग दारावरून मंदिराची वाट जाई ।।

सकाळी भगवान् सूर्यनारायण अंगणात येऊन उभे राहतात. त्यांना का गलिच्छ अंगणात उभे करावयाचे ? सूर्याच्या किरणांचे स्वच्छ अंगण स्वागत करील. किती सुरेख कल्पना व पवित्र भावना :

सकाळी उठून काम सडा-सारवण
दाराशी उभे राहती देव सूर्यनारायण ।।

दळण-कांडण, दुरून पाणी आणणे, मसाला कुटणे, सारी कामे ती करते. तिला कंटाळा नाही. आईच्या तालमीत ती तयार झालेली :

दळण सडण नित्य माझे ग खेळणं
माझ्या मायेनें वळण लावीयेलें ।।

सासरी कसे वागावे ते आईने शिकविलेले असते. आई गुरू :

मला शिकवीलें माय त्या माउलीनें
परक्याच्या साउलीनें जाऊं नये ।।
मी ग शिकलेली बयाबाईच्या शाळेला
काम आपुलें करावें सदां वेळेच्या वेळेला।।

साऱ्याच ठिकाणी सासुरवास असतो असे नाही. काही सासवा आयांसारख्या असताल :

घराची घरस्थिती काय पाहशी परक्या
लेकी-सुना त्या सारख्या माझ्या घरी ।।

अशी प्रेमळ सासू सुनेचे लाड करते. बांगड्या भरणारे कासार आले तर बांगड्या भरविते, पटवेकरी आले तर सुनेचे बाजूबंद पटविते :

आले आले ते पटवेकरी पटवाया काय देऊं
बाजूबंद गोंडे लावूं सूनबाईच्या ।।
आले हो वैराळ बसूं घालावी घोंगडी
चूडा भर नागमोडी सूनबाई ।।

सासू सूनबाईला नटवते. सूनही सजते. परंतु कुणी म्हणते :

किती तूं नटशील एवढें नटून काय होतें
रूप सुंदर कुठें जातें. उषाताई ।।

सूनबाईलाही ते समजते. मुख्य अलंकार म्हणजे शेवटी स्वतःचे सौभाग्य हे ती ओळखते :

सासूबाई तुम्हीं एक हो बरें केलें
कपाळीचें कुंकू रत्न माझ्या हातीं दिलें ।।

पतीला आनंद व्हावा म्हणून ती झटते. सारे दुःख गिळून पतीसमोर हसते. पती सुखी असला म्हणजे पत्नीला सारे मिळाले :

सासूचा सासुरवास सारा मनांत गिळिते
कंथाशी हांसती उषाताई ।।
होवो माझें कांही नाहीं मला त्याचें दुःख
माझ्या कुंकवाला मिळूं दे ग परी सुख ।।

कपाळीचे कुंकू हे पत्नीचे भाग्य. हे तिचे सारे बळ. ती एकच मागणे देवादिकांजवळ, वडिल माणसांजवळ मागते, की माझे चुडे अभंग ठेवा :

माझे हे कीं चुडे बत्तीस बंदाचे
तेतिस कोटीं देवाजींचे आशीर्वाद ।।
देशील रे देवा देशील तें थोडें
मी मागतें रोकडें हळदीकुंकू ।।

ही पुढील ओवी वाचा :

चुडेयांच्या बळें न भीं कवणाला
लंकेच्या रावणाला देईन जाप ।।

माझे सौभाग्य आहे तोवर कोणाचे भय? लंकेचा रावण आला तरी त्यालाही उत्तर देईन व गप्प बसवीन.

सून मोठी होते, ती वयांत येते. न्हाण, गर्भाधान होते. देवाजवळ ती पुत्र मागते :

देवाच्या देवळांत नंदीला घाली माळ
मागते तान्हे बाळ उषाताई ।।

पुढे तिला दिवस जातात. पूर्वीचा तो काळ. पती कोठे तरी चोरून विचारतो की किती महिने झाले :

पहिल्याने गर्भार कंथ पुशितो आडभिंती
तुला महिने झाले किती उषाताई ।।

पहिल्याने गंर्भार. तिला प्रसन्न ठेवावी, तिची इच्छा पुरवावी. कारण बाळंतपणाचा नवीन अनुभव यावयाचा असतो. तिचे सारे डोहाळे पुरवले जातात:

तीनशे साठ पाट काढीले कारणाला
तुझ्या डोहाळ-जेवणाला उषाताई ।।

तोंडावर तेज दिसू लागते :

गरभार नारी गर्भच्छाया तोंडावरी
हिरवी चोळी दंडावरी उषाताईच्या ।।

त्या पहिलटकरणीला चिंता वाटते. अनुभवी बाया म्हणतात :

पहिल्याने गर्भार कां ग नारी चिंताक्रांत
उद्या होशील पुत्रवंत उषाताई ।।

असा धीर दिला जातो. शेवटी मुलगा होतो :

पळी पंचपात्री कोठे जातोस ब्राह्मणा
पुत्र झाला यजमाना दादारायांना ।।

असा मग संसार रंगू लागतो. सासूबाईंना धन्य वाटू लागते. घर गोकुळासारखे दिसते. आपल्या कर्त्यासवरत्या मुलाचे माता कौतुक करते :

माझें घर मोठें पन्नास येती जाती
हाती रुपयांची वाटी माझ्या बाळाच्या ।।
मोठे मोठे लोक उठून उभे राहती
लोडाशी जागा देती माझ्या बाळा ।।
मोठे मोठे लोक सरकारें अडवीले

एका शब्दे सोडवीले माझ्या बाळें ।।

तो नोकरी करीत असला तरी साहेबांची त्याच्यावर मर्जी आहे वगैरे ती सांगते. तो खोताचा, जमीनदाराचा मुलगा असेल तर खंड मोजून घेतो :

बारा बैल वाहती एवढा कोण शेती
चार गावांची ग खोती माझ्या बाळाची ।।
आवाज मोठा आला मोठा गाडा घडघडला
खोतीचा गल्ला आला माझ्या बाळाचा ।।

मुलगा सावकारी करतो. सावकाराचे वर्णन ऐका :

पशाने पायली सवाईची झाली दिढी
कंठी छातीला भिडली माझे बाळाच्या ।।
हातींच्या आंगठ्या कशाने झिजल्या
राशी मोहरांच्या मोजील्या माझ्या बाळें ।।
पाटील पट्टी करी येतील सचणीला
हिरवी शाल खोतीणीला आक्काबाईला ।।

असा हा खोता-सावकारांचा थाट आहे.

घरात मूलबाळ, धनधान्य, आणखी काय पाहिजे? पतिपत्नींना मग स्वर्ग दोन बोटे राहतो. त्यांचे प्रेमरंग रंगतात :

भ्रतार पुसतो कोठे गेली प्रियसखी
मागें उभी हंसतमुखी उषाताई ।।
भाईराया घोड्यावर वयनी माडीवरी
तेथून खुणा करी विड्यासाठी ।।
तांबडे पागोटें बांधीतो सोडीतो
राणीला खुणावीतो गोपूबाळ ।।

एखादे वेळेस, नवरा रागावला तर राग शांत कसा करावा तिला ठाऊक असते :

भ्रताराचा राग दुधासारखा ऊतूं गेला
हंसुनी शांत केला उषाताईने ।।

किती सुदंर दृष्टांत! पतीजवळ ती आपली हौस सांगते, काळी चंद्रकळा घ्या म्हणते, दागिने घ्या म्हणते :

काळी चंद्रकळा शोभे माझ्या गोऱ्या अंगा

म्हणाल आली रंभा *स्वर्गातून ।।*
दागिना मागत्यें *म्हणून म्हणतां वेडी*
कोण माझी हौस फेडी *तुम्हांवीण ।।*

परंतु कोणता दागिना खरोखर तिला पाहिजे आहे? सोन्यारुप्याचा, हिऱ्यामोत्यांचा का? नाही :

दागिना मागत्यें *कंथा नाही म्हणूं नका*
पत्नी प्रेमाची भुकेली *नको तिला पैसा रुका ।।*

प्रेमाचा दागिना ती मागत आहे.

पहिली सून म्हणजे लक्ष्मी, जणू तिच्या रूपाने प्रत्यक्ष लक्ष्मीच घरी आली. भाग्यदेवता घरी आली तिचे वर्णन फार सुंदर आहे. लक्ष्मी ही चंचल, परंतु माझ्या बाळाच्या घरी आता ती विश्रांती घेणार. पांगळी लक्ष्मी माझ्या बाळाच्या घरी आली, आता जाईल कशी?

लक्षुमी चंचळ *घर शोधतां भागली*
तुझ्या घरा मानवली *गोपूबाळा ।।*
लक्षुमी कीं आली *पांगळ्या पायांची*
बाळाजवळ बोली केली *कधी नाहीं मी जायची ।।*

लक्ष्मी उगीच नाही आली. बाळ शेतात काम करतो, गोफण घेऊन पाखरे हाकलतो. तिने "अरे शेती करणाऱ्या" अशी बाळाला हाक मारली :

लक्षुमीबाई आली *शेताचा बांध चढे*
हाती गोफण पाया पडे *गोपूबाळा ।।*
लक्षुमी की आली *शेताच्या बांधावरी*
"शेत्या म्हणून हाका मारी *माझ्या बाळा ।।*

भाग्यदेवता कोणाचा हात धरावा म्हणून बाजारात हिंडत होती. परंतु माझा बाळच तिला आवडला :

लक्षुमी चंचळ *हिंडते बाजार*
धरिते पदर *गोपूबाळाचा ।।*

असे हे धनधान्यसंपन्न घर. आल्यागेल्याचाही नीट पाहुणचार तेथे होतो. कृपणपणा नाही. सूनबाई अतिथ-अभ्यागताचे मनापासून करते. कुळांची कीर्ती वाढविते :

वाटेवरलें घर *आल्या गेल्या गूळपाणी*

वडिलांची सून शहाणी उषाताई ।।
वाटेवरलें घर आल्या गेल्याचें माहेर
मिळे मीठ ग भाकर सर्व लोकां ।।

अशा सूनबाईला कोठे ठेवू कोठे न ठेवू असे सासऱ्याला होते. किती काम करतेस तू असे तो म्हणतो :

लक्ष्मी लक्ष्मी हांका मारीतो सासरा
तुझ्या कामाचा पसारा वैनीबाई ।।
मामंजी म्हणती धन्य ग सूनबाई
कुळाला कळा येई तुझ्यामुळें ।।

सासुसासरे, सासरची सर्व माणसे चांगली मिळाली, म्हणून सून म्हणते:

काय मी पुण्य केलें बहीणीसारखी नणंद
कमळी गोविंद पूजीयेला ।।
काय मी पुण्य केलें भावासारखा हो दीर
कमळीं रघुवीर पूजीयेला ।।

पुण्य पदरी असल्याशिवाय थोडेच हे भाग्य मिळणार? कृतज्ञतेने सूनबाई सासूसासऱ्यांस म्हणते :

मामंजी सासूबाई तुम्ही तुळशीची झाडें
आम्ही तुमच्या उजेडे राज्य करूं ।।

तुमची पुण्यपरंपरा, तिच्या प्रकाशात आम्ही पावले टाकू :

पूर्वी लहानपणी लग्ने होत. पतीचे धाकटे भाऊ भावासारखेच वाटत. काही हवे असले तर दिरांजवळ सांगावयाचे. वैनीबाई भावोजीस म्हणते :

भावोजी हो दिरा माझ्या मनींचे जाणावें
माझ्या वेणीतले आणावे गंगावन ।।
भावोजी हो दिरा माझ्या मनीचे एक करा
दारी बाग पेरा द्राक्षियांची ।।

सासरी किती सुख असले तरी माहेरची आठवण यावयाचीच. माहेरच्या वर्णनाच्या ओव्या अति सह्रदय आहेत. आई म्हणते :

माहेरा आलीस रहावे चार मास
येऊं दे थोडे मांस अंगावरी ।।

आईला मुलगी सुकून गेलेली दिसायची. माहेराहून कोणी येईल याची

सासुरवाशीण वाट पहात असते :

पाऊस पाण्याची धरणी माय वाट पाहे
तशी मला आस आहे माहेराची ।।

माहेरचा रस्ता कितीही वाईट असला तरी तो मृदू वाटतो. सासरचा कितीही चांगला असला तरी वाईट असतो :

माहेरच्या वाटे मऊ गार हरीक दाटे
सासरच्या वाटे टोंचती कुचकुच काटे ।।

हरिकाचे गवत थंडगार व मऊ असते. माहेरी गेल्यावर आई म्हणते, "दुधावरची साय घे, कलमी आंबा खा, लौकर उठू नको, नीज अजून." परंतु माहेरीही ती कामे करते.

जाईन माहेरा बाप्पाजींच्या घरा
घुसळीन डेरा अमृताचा ।।

माहेरी भावाजवळ गोष्टी सांगते, आईच्या हाताचे गोड जेवण जेवते. माहेरचे पाणीही अमृतासारखे वाटते :

जेवण मी जेवी जेवण जेवत्यें पोळीचे
पाणी माहेरच्या गांवीचें गोड लागे ।।

माहेरी गेल्यावर तिला जणू पवित्र तीर्थक्षेत्री आल्यासारखे वाटते.

बाप तो ईश्वर मायबाई काशी
नंदी आहे पायापाशी भाईराया ।।

शेजारीणबाईसंबंधीच्या ओव्याही मोठ्या समर्पक व गोड आहेत. पुष्कळसे सुखदु:ख शेजारी माणसे कशी असतात यावर अवलंबून असते. माहेराहून आलेली, सासरी कोण ओळखीचे नाही. अशा वेळेस शेजारीणबाई जर चांगली असली तर किती आधार वाटतो :

शेजारिणी बाई तुझा शेजार चांगला
नाही मला आठवला मायबाप ।।
शेजारिणी बाई धन्य तुझ्या शेजाराची
सय नाही माहेराची बारा वर्षे ।।

माहेराला आसावलेली सासुरवाशीण शेजीला म्हणते :

शेजारिणी बाई माझी वेणी ही घालावी
आईच्या हातांची आठवण मज द्यावी ।।

"आई केस तडतडू न देता हलक्या हाताने वेणी घाली. तशी तुम्ही घाला." असे प्रेमार्थ भुकेलेली ती म्हणते. परंतु शेजी नेहमीच चांगली वागत्ये असे नाही :

शेजीच्या घरी गेल्यें — शेजी बोलली रागानें
कोवळें मन माझे — नेत्र भरले पाण्यानें ।।

गर्विष्ठ शेजीला ती म्हणते :

शेजारिणी बाई — नको करूं गर्व फार
रोज ग बघत्यें — दिव्याखाली अंधःकार ।।

केळीची पाने मऊ असतात. ती फाटत नाहीत. परंतु ती कठोर टरटरीत झाली की वाऱ्याने फाटतात. शेजीबाई मृदू स्वभावाची रहा, ताठ नको होऊः

शेजारिण बाई — गर्वानि दाटली
पानें केळीचीं फाटली — वारियानें ।।

शेजारच्या बायका कधी प्रेमाने भाजी वगैरे देतात. परंतु भांडण झाले म्हणजे ते सारे काढतात :

शेजीनें दिली भाजी — दिली अंगणांत
काढी भांडणांत — वारंवार ।।

परंतु नेहमी शेजीच चुकत्ये असे नाही. स्वतःचीही चूक असते. शेवटी भांडणे मिटतात. पुन्हा एक होतात :

तीळ घे गुळ घे — विसर मागील भांडण
शेजी आता हं अंगण — तुझे माझे ।।
शेजारिणी बाई — एका दारी दोघी वागूं
माझी मैना तुझा राघू — खेळतील ।।

आपली दोघींची मुले एकत्र खेळतील. प्रेमाने नांदू.

शेजीच्या ओव्यांहून मैत्रिणीसंबंधीच्या ओव्या अधिकच सुंदर आहेत. लहानपणाच्या मैत्रिणी एकदा लग्न झाले म्हणजे थोड्याच पुन्हा भेटणार? पत्र कोण लिहिणार? आधी त्या वेळेस लिहिता येत नसे, आणि लिहिता येत असले तरी लिहिण्याची चोरी :

आपण मैत्रीणी — जाऊं ग वारा वाटे
जसे नशिबाचे फांटे — फुटतील ।।
आपण मैत्रिणी — पुन्हा भेटूं कधीं

आठवू मनामधी एकमेकी ।।
वारियाच्या संगे आपण पाठवूं निरोप
पोचतील आपोआप मैत्रिणीला ।।

मैत्रिणी एकदा गेल्या म्हणजे कोठे सिंहस्थात, कन्यागतात किंवा आषाढी-कार्तिकीला यात्रेत भेटावयाच्या :

माझ्या ग मैत्रिणी आहेत देशोदेशी
आषाढी एकादशी भेटी झाल्या ।।

कोणी जाणारा येणारा असला तर मैत्रिणीला माझे दु:ख सांगू नका असे ती म्हणे :

जीवाला माझ्या जड नका सांगूं एकाएकी
घाबरी होईल सखी शांताबाई ।।

माझ्या रडकथा कशाला तिला सांगता? सांगायच्याच झाल्या तर हळूहळू सांगा. ती फार कोवळ्या मनाची आहे. दूर पडलेल्या मैत्रिणीचे पत्र आले तर ती अर्धी भेटच जणू झाली :

दूरच्या देशीची काळी रेघ आली
अर्धी भेट झाली मैत्रिणीची ।।

पुष्कळ वर्षांनी जर कधी लहानपणच्या मैत्रिणी माहेरी भेटल्या तर किती आनंद ! त्या एकमेकींना म्हणतात :

तुझा माझा मैत्रपणा मैत्रपणा काय देऊं
एका ताटी दोघी जेवूं मनूबाई ।।
तुझा माझा मैत्रपणा मैत्रपणा काय देऊं
एका घोटे पाणी पिऊं मनूबाई ।।

मैत्रिणी मने मोकळी करतात. सासरची सुखदु:खे बोलतात. त्यांच्या त्या बोलण्याच्या वेळेस दुसरे तिसरे कोणी त्यांना नको असते. तो तटस्थ दिवाही नको वाटतो :

आपण गुज बोलूं कशाला हवा दिवा
आहे चांदण्याची हवा शांताबाई ।।

मैत्रिणीला ती म्हणते, "काय सांगू मी ? सगळीकडे तेच. पळसाला कोठे गेले तरी तीन पाने. आमच्या घरी कधी सुखाची, प्रेमाची पूर्णिमा, तर कधी दु:खाची भांडणाची अवस असते !"

कधी उजळे पुनव　　　　कधी काळी ग अवस
मैत्रिणी काय सांगू　　　　मिळे सुधा मिळे वीख ।।

संसार म्हणजे सुखदु:खांचे मिश्रण. अमृताचे व विषाचे पेले. घरात पती बरोबर कधी प्रेमाला रंग चढतो, तर कधी भांडण होऊन अबोले निर्माण होतात. मैत्रिणीला ती म्हणते, "आपण आधणाच्या पाण्यात भात शिजवितो. मी रागाने फणफणाऱ्या पतीच्यां सहवासातही प्रेम समाधान पिकविते." :

आधणाचे पाणी　　　　त्यांत भात शिजवीत्यें
रुसवे फुगवे　　　　त्यांत सुख पिकवीतें ।।

किती समर्पक दृष्टान्त ! एखादी मैत्रीण म्हणते, " माझा पती म्हणजे लाखातील माणिक." :

शत ग जन्मांची　　　　पुण्याई आली फळां
माझ्या कुंकवाची कळा　　　　सूर्यावाणी ।।
लाखांत एखादा　　　　तसा सखी माझा पती
अनुरक्त परी व्रती　　　　भाग्य माझें ।।

पतीचे प्रेम आहे मज़वर, परंतु ते प्रेम संयमी आहे. त्या प्रेमात पावित्र्य आहे. परंतु दुसरी एखादी सांगते :

रुप ना लावण्य　　　　सोडीना कधीं माडी
करीतो नासाडी　　　　जीवनाची ।।
रात्र ना दिवस　　　　चंदन वेलीला
विळखा मारून राहिला　　　　साप मेला ।।

असे काही अमर्याद व विषयासक्त पती असतात. दु:खाने ती सती म्हणते:

समुद्राच्या कांठी　　　　मोती पोंवळ्यांच्या वेली
दैवाची उणीव　　　　कडू वेली हाती आली ।।

जगात का थोडे चांगले तरुण होते? परंतु माझ्या नशिबी असेच रत्न यायचे होते ! ती मैत्रिणीला म्हणते, " असे आहे तरीही मी प्रेम देत्ये. परंतु त्यांना काही नाही. ना प्रेम, ना माया." :

जीवाला देत्यें जीव　　　　जीव देऊन पाहीला
पाण्यांत पाषाण　　　　अंती कोरडा राहिला ।।
फोडीलें चंदन　　　　त्याच्या केल्या बारा फोडी
स्त्रियांची जात वेडी　　　　पुरुषांना माया थोडी ।।

किती ह्रदयभेदक आहेत ह्या ओव्या !

पुष्कळ वर्षांनी भेटलेल्या मैत्रिणींना परत यायचे असते सासरी. त्या शेवटचे रडून घेतात :

गळां घालू गळा ये ग रडूं पोटभरी
पुन्हा जायचे सासरी चारी दिशी ।।

त्या एकमेकींना धीर देतात. अवसेची पुनव होईल सांगतात :

नको ग रडूं गडे होईल सारे भलें
अवसेचे काळें कोठें राहे ।।

संसारात नाना दु:खे. परंतु त्यात पोटच्या बाळाचे मरण, त्या दु:खाला सीमाच नाही. आई मुलीला म्हणते :

पुरे हो रडणें धीर ना सखी सांडी
शोभेल पुन्हा मांडी तान्हेबाळानें ।।
नको नको रडूं पुन्हा कळी ग फुलेल
पुन्हा पाळणा हलेल तुझ्या घरीं ।।
आंबे मोहरती सारे कोठें ग फळती
फळती तितुके ना पिकती किती सांगू ।।

आजोळच्या कौतुकाचे वर्णन आहे. परंतु आई मुलाला म्हणते, "मामाकडे बोलाविल्याशिवाय जाऊ नये." :

मामाच्या रे घरा नको जाऊं लडालडा
येऊं दे गाडी घोडा गोपूबाळा ।।
मामाच्या रे घरा नको जाऊ कामावीण
येऊं दे बोलावणं गोपूबाळा ।।

गावातल्या गावात जर सासर-माहेर असेल तर मजा. लहानपणी लग्न झालेले असावे. मग त्या लहानशा बहिणीला आणण्यासाठी वासरांच्या गाडीने जात:

गांवांतल्या गांवांत उषाताईचे सासरे
गाडीला जुंपिलीं वांसरें भाईरायांनीं ।।

कधी कधी भावजया भावजया भांडतात. ही भांडणे पुष्कळ वेळा लहान मुलांवरून असावयाची. त्या गोड बाळाला ती भांडणे समजतही नाहीत :

धाकटी वैनी मोठी वैनी भांडती कडाकडा ।।

मध्ये साखरेचा खडा गोपूबाळ ।।

गावात लग्ने असावीत. माहेरी आलेली नणंद वैनीस म्हणते :

लगीनसराई कापडाची महागाई
नेस तूं ग वैनीबाई पीतांबर ।।

अशा रीतीने वैनीला नणंदाबाई आनंदवितात. लेकी सुना घरात आल्या म्हणजे म्हातारबाईला कोण समाधान. ती म्हणते :

लेकी झाल्या लोकी सुना झाल्या लेकी
हातींचे काम घेती मायबाईच्या ।।

स्वत:च्या मुली परक्या झाल्या. परक्याच्या मुली सुना होऊन घरच्या सारख्या झाल्या. सासूबाईंना त्या आता काम करू देत नाहीत. भाग्याची म्हातारी आजीबाई आता नातवंडे खेळवते :

नातवंडे पतवंडे भरली ओसरी
दैवाची बैसली आजीबाई ।।
नातवंडाची आजी पंतवंडांना दूध पाजी
दैवाची आहे माझी आजीबाई ।।

असे एकत्र कुटुंबपद्धतीतील हे वर्णन आहे, घर म्हणजे जसे गोकुळ. मुलांबाळांनी, लेकीसुनांनी गडीमाणसांनी गजबजलेले. भांडणे-तंडणे आहेत. परंतु त्यातही शेवटी संयम येऊन सारे पुन्हा गोड व्हायचे, समाधान मिळावयाचे, असो. आता तुम्ही प्रत्यक्षच त्या ओव्या वाचा .

सुखदु:खाचे अनुभव : ओव्या

सासरी सासुरवास माहेरी माहेरवास
सत्तेचा परी घास सासऱ्यास १
सासरचे बोल कडू कारल्याचा पाला
गोड बोलूं दिली मला बाप्पाजींनी २
सासरचे बोल जसे कारल्याचे वेल
गोड कधीं का होईल काहीं केल्या ३
सासरचे बोल जशा रेशमाच्या गाठी
सैल कर माझ्यासाठी भाईराया ४
सासरचे बोल जशा रेशमाच्या गाठी

माने बसल्या न सुटती   कांही केल्या ५
सासरचे बोल   जसा वळचणीचा वांसा
लागतो ठसाठसा   येतांजातां ६
सासरचे बोल   जसे पाण्याचे शिंतोडे
पहावें माझ्याकडे   भाईराया ७
सासरचे बोल   कडू काडेकिराईत
जरी नाही गिळवत   गोड मानी ८
सासरचे बोल   कडू विषाचे ग प्याले
तुझ्यासाठी गोड केले   मायबाई ९
सासरचे बोल   जसे निवडुंगांचे घोंस
जातीवंताच्या मुली सोस   उषाताई १०
सासरचे बोल   जसे मिरियांचे घोंस
शीलवंताच्या ग लेकी   तूं सारे सुखें सोस ११
सासरचे बोल   भाऊ ऐकतो चोरोनी
नेत्र आले ग भरोनी   भाईरायाचे १२
दीर बोलती दीरपणी   नणंदा बोलती टाकूनी
वाग पायरी राखूनी   उषाताई १३
सासूचा सासुरवास   नणंदाबाईची जाचणी
कशी कोमेजून गेली   माझी शुक्रांची चांदणी १४
सासूचा सासुरवास   रडवी पदोपदी
लेक थोराची बोलेना   कोणाशी परी कधीं १५
बापें दिल्या लेकी   कामाच्या खळाळ्याला
हिरवी लवंग मसाल्याला   चला कुटू १६
बापे दिल्या लेकी   वाटेवरल्या गोसाव्याला
पालखींत बैसायाला   दैव तिचें १७
बापे दिल्या लेकी   नाही पाहिले घरदार
पाहाणारा परमेश्वर   दुसरे कोण १८
बापे दिल्या लेकी   नाही पाहिले धनबीन
एक पाहिले निधान   कुंकवाला १९
बापे दिल्या लेकी   आपण बसले सुखें ओटी

मायेला चिंता मोठी वागण्याची २०
माझे ग मायबाई नको करूं माझा घोर
रत्न दिलेंस तू थोर लेकीहाती २१
बाप्पाजी हो बाप्पा मी तुमच्या पोटीची
मला कोणत्या गोष्टीची चिंता नाही २२
बाप्पाजी हो बाप्पा आम्ही तुमच्या कीं पोटा
लेकासारखाच वांटा आम्हा द्यावा २३
चंदनासारखी देह मी झिजवीन
लेक तुमची म्हणवीन बाप्पाराया २४
चंदनासारखी देह घालीन करवती
तुमच्या नांवासाठी बाप्पाजी हो २५
इवलाही बोल मला लागू न देईन
लेक तुमची म्हणवीन बाप्पाराया २६
माझे ग मायबाई नको करूं माझी चिंता
दिलीस भाग्यवंता लेक तुझी २७
सासुरवाशिणीचें तोंड का कोमेजलें
कोण कडू हो बोललें उषाताईला २८
भूक लागे माझ्या पोटा परवंटा देत्यें गाठी
तुमच्या नांवासाठी बाप्पाजी हो २९
लेकीचा हा जन्म देव घालून चुकला
बैल घाण्याला जुंपला जन्मवेरी ३०
स्त्रियांचा हा जन्म नको घालूं सख्या हरी
परक्याची ताबेदारी जन्मवेरी ३१
स्त्रियांचा हा जन्म नको घालूं सख्या हरी
रात्र ना दिवस परक्याची ताबेदारी ३२
सासुरवाशिणी तूं ग वाड्यातला बैल
कधी रिकामी होशील उषाताई ३३
नाचणयाचा कोंडा नाही कशाच्या काजाकामा
मुलगीचा जन्म रामा देऊं नये ३४
सकाळी उठून काय म्यां काम केले

वृंदावन सारविलें   तुळशीचें ३५
सकाळी उठून   काम सडा-सारवण
दाराशी राहती उभे   देव सूर्यनारायण ३६
सकाळी उठून   गायीच्या गोठ्या जावें
पवित्र नांव घ्यावे   गोविंदाचे ३७
सकाळी उठून   लागल्ये कामालां
माझा निरोप रामाला   नमस्कार ३८
सकाळी उठून   मुख पहावें गायींचे
दारी तुळशीमाईंचे   वृंदावन ३९
सकाळी उठून   देवापुढें सारवींले
रांगोळीने काढीयलें   रामनाम ४०
सकाळी उठून   सडा घालू गोमूत्राचा
माझ्या ग कंथाचा   वाडा आहे पवित्राचा ४१
सकाळी उठून   काम करित्ये घाईघाई
माझ्या दारावरनं   मंदिराची वाट जाई ४२
सकाळी उठून   सूर्याला हात जोडी
कपाळी रेष ओढी   कुंकवाची ४३
सकाळी उठून   कामधंद्याला लागल्यें
सूर्याला विसरल्यें   नमस्कार ४४
सकाळी उठून   सूर्याला नमस्कार
मग करीत संसार   उषाताई ४५
मला शिकविले   बयाबाई माउलीनें
असे उभें राहूं नयें   परक्याच्या साउलीने ४६
मी ग शिकलेली   बयाबाईच्या शाळेला
काम आपुले करावें   सदा वेळच्या वेळेला ४७
माळ्यानें मळ्यांत   पेरीले उगवलें
माय ग माउलीनें   शिकवीलें कामा आलें ४८
मला शिकवीलें   बाप्पाजी ज्ञानवंता
भरल्या पाणवठा   जाऊं नये ४९
मला शिकवीलें   माय त्या माउलीनें

परक्याच्या साउलीने   जाऊं नये   ५०
दळण सडण   नित्य माझें ग खेळणें
माझ्या मायेनें वळण   लावीयेलें   ५१
दळण मी दळी   माझ्या बाह्या लोखंडाच्या
माय ग माउलीनें   मुळ्याचारिल्या वेखंडाच्या ५२
दळण सडण   नित्य माझें ग खेळणें
दूर पाणीयाला जाणें   अवघड   ५३
दळण दळतांना   अंगाच्या झाल्या गंगा
माय माउलीने   मला चारिल्या लवंगा   ५४
दळण दळावें   जसा चंदन खिसावा
माउलीला ग पुसावें   कसा परदेश कंठावा   ५५
नाकींच्या नथीला   नको लावूं टीकफुली
आपण गृहस्थाच्या मुली   उषाताई   ५६
परके पुरुषाचा   नको घेऊं कातचुना
आपण गृहस्थाच्या सुना   वैनीबाई   ५७
परके पुरुषाशी   नये बोलूं एकाएकी
आपण गृहस्थाच्या लेकी   उषाताई   ५८
किती मी सांगू तुला   एवढा पदर घे अंगावर
परक्या ग पुरुषाची   नजर असते दूरवर   ५९
किती तूं नटशील   एवढे नटून काय होतें
रुप सुंदर कोठे जातें   उषाताई   ६०
सोनाराच्या शाळे   खुट्टू खुट्टू वाजे
नवा बिंदीपट्टा साजे   वैनीबाईला   ६१
पायांत तोरड्या   नवी नवरी कोणाची
सखा शाळे जातो त्याची   गोविंदबाळाची   ६२
हातींच्या पाटल्या   मागे पुढे सारी
गोटांना जागा करी   उषाताई   ६३
हाती गोट पाटल्या   हातरींच्या वांकी
आपण गृहस्थाच्या लेकी   उषाताई   ६४
आले हो वैराळ   बसूं घालावा कांबळा

चुडा भरावा जांभळा उषाताईला ६५
आले हो वैराळ बसूं घालावी घोंगडी
चुडा भरा नागमोडी सूनबाई ६६
आले आले पटवेकरी पटवाया काहीं नाही
पटवा सूनबाई तुझ्या पेट्या ६७
आले आले पटवेकरी पटवाया काय देऊं
बाजूबंद गोंडे लावूं सूनबाईच्या ६८
आले आले पटवेकरी नको घेऊं मुली छंद
पटव बाजूबंद सूनबाई ६९
आले आले पटवेकरी नको घेऊं मुली चाळा
पटव तुझ्या माळा उषाताई ७०
माझ्या अंगणांत सासूबाईचा ठेवारेवा
सीतेसारख्या आम्ही जावा चौघीजणी ७१
गोटपाटल्यांच्या या मुली ग कोणाच्या
माझ्या ग मायबाईच्या लेकीसुना ७२
घराची घरस्थिति काय पाहाशी परक्या
लेकीसुना त्या सारख्या माझ्या घरीं ७३
लेकी-सुना घेऊन नको बसूं तूं अंगणीं
दृष्ट लागेल म्हणुनी अक्काबाई ७४
माझ्या दारावरनं हत्ती गेले एकदोन
पालखीत लेकसून मायबाईची ७५
माझ्या अक्काबाईची वडील सून कोण
कारल्याची खूण शांताबाई ७६
सासूबाई तुम्ही एक हो बरें केलें
कपाळीचें कुंकू रत्न माझ्या हातीं दिले ७७
सासूचा सासुरवास सारा मनांत गिळीतें
कंठाशीं हांसते उषाताई ७८
माझे सारें दुःख मी ग मनांत ठेवीन
कंथाला पाहून गोड गोड मी हांसेन ७९
होवो माझे कांही मला नाही त्याची पर्वा

माझा कंथ ग रहावा आनंदात ८०
होवो माझे कांही मला नाही त्याची चिंता
मिळूं दे ग माझ्या कंथा समाधान ८१
होवो माझें काही मला नाही त्याचे दुःख
माझ्या कुंकवाला मिळूं दे ग परी सुख ८२
आंतून जळतें मनांत रडते
परी वरून हांसते उषाताई ८३
पांवसावांचून पीक नाही जमिनीला
कंथा ग वांचून सुख नाही कामिनीला ८४
पावसावांचून कसा भरारेल मळा
कथां ग वांचून कमिनीला नाहीं कळा ८५
सुनेला सासुरवास नको करूं माझे आई
आपल्या घरी चाफा परक्याची आली जाई ८६
सुनेला सासुरवास नको करूं माझे गंगा
आपल्या घरी चाफा परक्याची आली रंभा ८७
जावयाची जात जसा पेटाऱ्याचा नाग
त्याच्या मर्जीने तूं वाग उषाताई ८८
जावयाची जात जात खायाची जायाची
पुत्राची ग बोली अस्थि गंगेला न्यायाची ८९
जांवई देईल मान जाऊन बैसले लोकांत
आपला ग पुत्र पाणी घालील तोंडांत ९०
जांवयाची जात माजोरी मस्तवाल
आतां मी उषाताई तुझ्यासाठी आल्यें काल ९१
जांवयाची जात रागीट तामसी
त्याच्या मंर्जीने वागसी उषाताई ९२
भ्रताराचा राग जसा विस्तव इंगळ
त्याची मर्जी तूं सांभाळ उषाताई ९३
देवाच्या देऊळी नंदीला घाली माळ
मागते तान्हे बाळ उषाताई ९४
शिवाची केली पूजा नंदीला कोरा शेला

पुत्रासाठी नवस केला   उषाताईने   ९५
देवाच्या देवळी   पुत्राची फळ-वाटी
शालूची कर ओटी   उषाताई   ९६
वडाच्या झाडाला   सदा प्रदक्षिणा घालते
तान्हेबाळाला मागते   उषाताई   ९७
तिन्ही ग त्रिकाळ   पूजा करिते गायींची
आस तान्ह्या ग बाळाची   उषाताईला   ९८
देवाच्या देवळी   सहज गेल्यें होत्यें काल
प्रसाद दिला मला   दोन मोती एक लाल   ९९
देवाच्या देऊळी   सहज गेल्ये गाभाऱ्यांत
प्रसाद दिला मला   दोन मोती अंगाऱ्यात   १००
देवाच्या देऊळी   उभी मी केव्हाची
वाट बघते ब्राह्मणाची   पूजेसाठी   १०१
अश्वत्थाचा पार   कुणी झीजवीला
पुत्रासाठी नवस केला   उषाताईनें   १०२
पिंपळा प्रदक्षिणा   कोण घालीते एकली
आहे पुत्राची भुकेली   उषाताई   १०३
नवस मी केला   अंबाबाईला पाळणा
पुत्र होऊं दे खेळणा   उषाताईला   १०४
देवाच्या देऊळी   पुत्रांचे पर्वत
एक द्यावा हो त्वरित   उषाताईला   १०५
नारायण देवाजीचा   झाडीत होत्यें जामदारखाना
सांपडला मोतीदाणा   गोपूबाळ   १०६
नारायण देवाजीचा   झाडीत होत्यें पलंगपोस
सांपडला मोतीघोंस   गोपूबाळ   १०७
लाखावरी सावकार   तुझ्या माडीला आरसे
पोटीं नाही पुत्रफळ   झाले द्रव्याचे कोळसे   १०८.
लाखावरी सावकार   तुझ्या ओसरी दिवा जळे
पोटी नाही पुत्रफळ   तुझ्याओटीवर कोणखेळे१०९
वाजंत्री वाजती   कोणत्या आळीला

ताईबाई सावळीला न्हाण आलें ११०
देवाच्या देवळी मोकळ्या केसांची
न्हालेल्या दिवसांची उषाताई १११
पहिल्याने न्हाण न्हाण आलें ते आजोळी
मखराला जाळी मोतीयांची ११२
पहिल्याने न्हाण हिरव्या साडीवरी
मखर माडीवरी घालतात ११३
पहिल्या न्हाणाची सासू करीतसे हौस
सखे मखरी तूं बैस उषाताई ११४
पिवळे पातळ साळ्याला सांगितलें
न्हाण आले आईकलें उषाताईला ११५
केळी कंडारल्या तेथें कां ग उभी
पहिल्या न्हाणाजोगी उषाताई ११६
पहिले न्हाण आलें आले तें सासरा
केळी घाडिल्या उशीरा मखराला ११७
पहिल्याने न्हाण आलें हांसतां खेळतां
मखर गुंफितां रात्र झाली ११८
पहिल्याने गर्भार हिरवा शालू घेऊं
बागेमध्ये नेऊं उषाताईला ११९
पहिल्याने गर्भार नारळी हिचें पोट
डाळिंबी नेस चीट उषाताई १२०
पहिल्याने गर्भार आली माहेराला
आनंद मनी झाला मायबापां १२१
पहिल्याने गर्भार औषधें ठेवी घरी
बाळी आहे सुकुमारी उषाताई १२२
हिरव्या खणासाठी रुपया सारीला
चोळी गर्भार नारीला उषाताईला १२३
पहिल्याने गर्भार कंथ पुशीतो आडभिंती
तुला महिने झाले किती उषाताई १२४
पहिल्याने गर्भार कंथ पुशीतो गोठ्यांत

हिरवें डाळिंब ओटींत उषाताईच्या १२५
गरभार नारी गर्भच्छाया तोंडावरी
हिरवी चोळी दंडावरी उषाताईच्या १२६
गरभार नारी उकाडा होतो भारी
झोंपाळा बांधी दारी अप्पाराया १२७
पहिल्याने गर्भार डोहाळे धाड मला
माझ्या बागेचे पेरू तुला उषाताई १२८
तीनशें साठ पाट काढीले कारणाला
तुझ्या डोहाळ-जेवणाला उषाताई १२९
डोहाळे तुला होती सांगून धाड मला
बागेची लिंबें पाठवीन १३०
आंबे आले पाडा चिंचबाई कधी येशी
डोहाळे पुरवीशी उषाताईचे १३१
आंबे आले पाडा पहिल्या पिकाचे
डोहाळे लेकाचे उषाताईला १३२
बांगड्या भर रे कासारा हिरवा कारला
तुला नववा ग लागला उषाताई १३३
बांगड्या भर रे कासारा बांगडी हिरवी दुधार
पहिल्याने गर्भार उषाताई १३४
सोनसळे गहूं ठेवीले कारणाला
डोहाळ-जेवणाला उषाताईच्या १३५
हिरव्या खणाची मला गरज लागली
गर्भिणी ऐकिली उषाताई १३६
रुपया मोडला हिरव्या खणाला
तुझ्या डोहाळ-जेवणाला उषाताई १३७
आणावी घोंगडी आणावें कांबळ
येईल माझी बाळ बाळंतपणा १३८
बाज करा नीट करा साफसूफ खोली
येईल माझी बाळी बाळंतपणा १३९
पहिल्याने गर्भार नको भिऊं तूं जिवाला

नगर वाचनालय, सातारा.

तुझी काळजी देवाला उषाताई १४०
पहिल्याने गर्भार कां ग नारी चिंताक्रांत
उद्या होशील पुत्रवंत उषाताई १४१
पळी पंचपात्री कुठें जातोस ब्राह्मणा
पुत्र झाला यजमाना दादारायांना १४२
पुत्र झाला म्हणून दादाराया खोता
दणका केला मोठा सोहाळ्याचा १४३
पुत्र झाला म्हणती आम्हा कळले बावीवरी
साखर गांवावरी वाटीयेली १४४
पुत्र झाला म्हणती आम्हा साखर नाही आली
पुत्र नाही कन्या झाली उषाताईला १४५
जोशाला बोलवा आधी पंचांग बघावें
जातक करावें तान्हेबाळाचें १४६
पांचवी सहावी करावी आधी पूजा
नको दृष्ट माझ्या तान्हेबाळा १४७
नातू झाला म्हणून वाटतात पेढे
नातवासाठी वेडे लोक होती १४८
बाळंतिणी बाई नको येऊं दारा
लागेल तुला वारा दक्षिणेचा १४९
बाळ बाळंतीण आहेत खुशाल
उषाताईच्या पतीला भाईराया पत्र घाल १५०
चला सखियांनो हळदी-कुंकवाला
माझ्या ग उषाताईला भाग्याचा पुत्र झाला १५१
सोळा सोमवार केले सतरावा उजवा
रत्नाच्या पालखी माझ्या बाळाला नीजवा १५२
मला हौस मोठी ताईबाईला पुत्र व्हावा
बाळंतविडा न्यावा कडीतोडे १५३
मला हौस मोठी ताईबाईला पुत्री व्हावी
बाळंतवीड्यावरी जरीची कुंची न्यावी १५४
तुम्हा घरीं ग कारणें आम्हां घरी ग बारसं

माझं येणं होतं कसं   शांताबाई   १५५
देवाघरचे बाळ   आलें आकार घेऊन
त्याला ठेवूं नांव   सखी पालखी घालून   १५६
देवाघरचें बाळ   आलें सगुण साकार
त्याला ठेवूं नांव   उषाताई   १५७
सवाष्णींची दाटी   बाळ पालखी घालती
रामकृष्णाच्या म्हणती   पाळण्यांना   १५८
पालखी घालून   सखीया झोके देती
पाळणे गोड गाती   आंदुळता   १५९
माझें घर मोठें   केर लोटता लोटेना
सभा बैसली उठेना   गोपूबाळाची   १६०
माझे घर मोठे   हंडे घंघाळांचे
वडील मामंजींचे   नांव मोठें   १६१
माझे घर मोठे   धुराचा कोंडमार
कोमेजली सुकुमार   उषाताई   १६२
माझे घर मोठे   हिंडती दारी गडी
भरली मोठी माडी   पाहुण्यांनी   १६३
माझे घर मोठे   पन्नास बाहालांचें
पाहुण्याउण्यांचे   वावरण   १६४
माझे घर मोठे   पन्नास येती जाती
हाती रुपयांची वाटी   गोपूबाळाच्या   १६५
मोठ मोंठे लोक   उठून उभे राहती
लोडाशी जागा देती   माझ्या बाळा   १६६
मोठ मोठे लोक   सामोरे येतात
स्वागत करितात   माझ्या बाळाचें   १६७
मोठ मोठे लोक   सरकारे अडवीले
एक्या शब्दें सोडवीले   माझ्या बाळें   १६८
कचेरीच्या पुढें   हिरवा कंदील डोलतो
नवा साहेब बोलतो   माझा बाळ   १६९
कचेरीच्या पुढे   हिरवा कंदील कोणाचा

नवा साहेब पुण्याचा   माझा बाळ   १७०
कचेरीच्या पुढें   काय गुलाबा तुझी हवा
वास घेणारे गेले गांवा   दादाराया   १७१
बारा बैल वहाती   एवढा कोण शेती
चार गावांची ग खोती   गोपू बाळाची   १७२
बारा ग बैलांची   दावण आली घरा
निजला जागा करा   गोपूबाळ   १७३
बारा बैल वहाती   बाप्पाजींच्या नांगराला
जिरेसाळ डोंगराला   पेरीयेली   १७४
आवाज मोठा आला   मोठा गाडा धडधडला
खोतीचा गल्ला आला   बाप्पाजींचा   १७५
बाप्पाजी काकाजी   करा भाताचा व्यापार
मोत्यांचा चंद्रहार   द्यावा मज   १७६
नाचण्यांनो तुम्ही   कोकणींचे राजे
त्याने भाई माझे   सावकार   १७७
नाचण्यांनो तुम्ही   कोकणीचे गहूं
अंतर नका देऊं   भाईरायाला   १७८
सभेमध्ये ग बसले   उंच पगडी लहानथोर
सभेमध्ये माझे दीर   शोभतात   १७९
पशाने पायली   सवाईची दिढी झाली
कंठी छातीला भीडली   दादारायांच्या   १८०
पिकलेला अननस   हिरवा त्याचा देठ
खोतांना आली भेट   अप्पारायांना   १८१
पाटील पट्टी करी   येतील सचणीला
हिरवी शाल खोतीणीला   अक्काबाई   १८२
माझ्या ओटीवरी   खोतापाटलांची दाटी
तुमच्या नावासाठी   बाप्पाजी हो   १८३
हातींच्या आंगठ्या   कशानें झीजल्या
राशी मोहरांच्या मोजल्या   गोपूबाळाने   १८४
माझ्या ओटीवर   चांदीचे गडवे पेले

मैत्र तुझे पाणी प्याले गोपूबाळा १८५
माझ्या ओटीवरी सतरंज्या लोळती
मैत्र तुझे रे खेळती गोपूबाळा १८६
माझ्या ओटीवरी कशाचा केर झाला
जाई मोडून तुरा केला भाईरायाला १८७
माझ्या ओटीवरी कागदाचा केर
लिहिणार सुभेदार मामाराया १८८
माझ्या ओटीवरी कागद किती पाहूं
लिहिणार माझे भाऊ कारभारी १८९
अंगांत सदरा कोट पायांत कुलपी बूट
तुझ्या चालण्याची ऐट गोपूबाळा १९०
लहानसा कारकून साहेबाच्या डावीकडे
पहिल्या पगाराचे तोडे उषाताईला १९१
लहानसा कारकून साहेबापुढें उभा
तुमच्या स्वारीजोगा गोपूबाळ १९२
लहानसा कारकून साहेबाला आवडला
पगार वाढवीला गोपूबाळाचा १९३
लहानसा कारकून साहेबाची खुशी
पहिल्या पगाराची ठुशी उषाताईला १९४
लहानसा कारकून बैसे साहेबांच्या कडे
पहिल्या पगाराचे पेढे वांटीयेले १९५
माझ्या अंगणात बैसलासे हिरा
सखे तुझा ग नवरा उषाताई १९६
कचेरीच्या पुढें आंवळीचे झाड
सांवळा सुभेदार गोपूबाळ १९७
दळणाची पाटी अखंड जात्यावरी
अन्नछत्र तुझ्या घरीं गोपूबाळा १९८
कारागीरी टोपी आली दारावरी
गोपूबाळ पारावरी मोल करी १९९
शेरभर सोनें लेखणीच्या टांका

हिशोब देतो बापा गोपूबाळ २००
मंदिरी सप्ताह भागवत चाले
बाप्पाजी तेथें गेले ऐकावया २०१
मंदिरी सप्ताह झालासे आरंभ
मामंजी त्यांत दंग ऐकावया २०२
हरदास आले पुण्याचे वाईचे
अलोट लोकांचे जाती थवे २०३
आले हरदास राजधानीहून
ऐकाया कीर्तन संत जाती २०४
संत आले गांवी दर्शनाला चला जाऊं
घरी नका कथा राहूं सखी सांगे २०५
संत आले गांवा चला त्यांची करूं सेवा
हेत माझा पुरवावा एवढा की २०६
दागीना मागत्यें म्हणूनी म्हणतां वेडी
कोण माझी हौस फेडी तुम्हांवीण २०७
काळी चंद्रकला घेऊन मला द्यावी
हौस माझी पुरवावी तुम्ही कंथा २०८
काळी चंद्रकळा शोभेल गोऱ्या अंगा
म्हणाल आली रंभा स्वर्गातून २०९
नको हो पैठणी नको मला शालू शेले
भाळ असो भरलेले कुंकवाने २१०
नको मज बिंदी नको तो चंद्रहार
पुरे एक अलंकार मंगळसूत्र २११
दागिना मागत्ये एक आज तुम्हांपाशी
जन्मोजन्मी ठेवा दासीला या पायापाशी २१२
दागिना मागत्यें कंथा नाहीं म्हणूं नका
पत्नी प्रेमाची भुकेली नको तिला पैसा रुका २१३
दागिना मागत्यें परस्त्रीला माना माता
कंथा आपण साधूं या संसारांत परमार्था २१४
देशील रे देवा देशील ते थोडें

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

मी मागत्यें रोकडे हळदीकुंकू २१५
पुतळ्यांची माळ पडते निऱ्यांवरी
कंथाच्या राज्यावरी उषाताई २१६
आयुष्य मी चिंती सासुबाईच्या हो नीरीं
माझ्या कुंकवाची चिरी जन्मवेरी २१७
देई देवा मज देशील तितुकें पुरें
अक्षय माझे चुडे जन्मवेरी २१८
देई देवा मज संततीला सोने
विश्रांतीला बाळ तान्हें मांडीवरी २१९
देई देवा मज हळदीचे तेज
कुंकवाचे राज्य जन्मवेरी २२०
देवाच्या देऊळी उभी मी जागत्ये
आयुष्य मागत्यें चुडेयांना २२१
माझे हे की चुडे वज्री घडवीले
साक्ष ठेवीयेले चंद्रसूर्य २२२
माझे हे कीं चुडे बत्तीस बंदांचे
तेतीस कोटी देवाजींचे आशीर्वाद २२३
चुडेयांच्या बळे न भीं कवणाला
लंकेच्या रावणाला देईन जाप २२४
माझे चुडेयांचे सोने आहे सुरतेचें
वडिलांच्या पारखींचे दादारायांच्या २२५
माझे चुडेयांचे सोने बरफीची वडी
पारख्यांना शालजोडी बाप्पाजींना २२६
सासुरवाशिणीचे तोंड दिसे हंसतमुख
तिला भ्रताराचे सुख उषाताईला २२७
गळ्यांत मंगळसूत्र गळा दिसे तालेदार
कंथ तुझा सुभेदार उषाताई २२८
काळी गळेसरी देवानें मला दिली
भूषणासाठी केली सोनीयाची २२९
आमच्या वैनीबाई गंगाबाई कोठें गेल्या

उन्हाने कोमेजल्या जाईजुई २३०
भोळा कीं भ्रतार माझ्या उषा ग बाईचा
तिनें पिंपळ दारींचा पूजीयेला २३१
शेजी देई फूल सखी घालीना केसांत
आपुल्या कंथाच्या नेऊन देतसे हातांत २३२
शेजी देई फूल सजवाया वेणी
नेऊन देतसे निज कंथाला कामिनी २३३
कंथ ग रुसला कशाने समजावावा
हाताने विडा द्यावा उषाताई २३४
भ्रताराचा राग दुधासारखा ऊतूं गेला
हंसूनी शांत केला उषाताईनें २३५
तोंडात तोंड घाली राघूची लाल चोंच
आवडीची मैना तूंच उषाताई २३६
तोंडात तोंड घाली उषाबाई चेडी
आली राघवाची उडी दादारायांची २३७
दादाराया घोड्यावर वयनीबाई माडीवरी
तेथून खुणा करी विड्यासाठी २३८
तांबडे पागोटे बांधीतो सोडीतो
राणीला खुणावीतो दादाराया २३९
माडीखालीं माडी माडी खालीं झरा
तेथें तोंड धुतो हिरा उषाताईचा २४०
माडीखालीं माडी माडीला चंदन ताटल्या
तबकी तुझ्या पाटल्या उषाताई २४१
माडीखालीं माडी माडीखाली शिडी
पुतळी आहे जाडी उषाताईची २४२
भ्रताराची सेवा काय करीतां चुकली
पायां पडता देखली उषाताई २४३
भ्रताराची सेवा काय करीतां चुकली
पाय पुशी पदरानें उषाताई २४४
भ्रतार पुसतो कोठें गेली प्रियसखी

मागें उभी हंसतमुखी   उषाताई   २४५
भ्रतार पुसतो   कोठें गेली राणी राजा
हंसत मुख सदा   उषाताई   २४६
कंथ विंचारीतो   राणी वल्लभा कोठें गेली
नंदादीपा तेल घाली   उषाताई   २४७
कंथाची ग खूण   दोहींच्या मधून
देत्यें सुपारी शोधून   उषाताई   २४८
चिकणी सुपारी   तुझ्या कंथाला आवड
दिवा घेऊन निवड   उषाताई   २४९
चिकणी सुपारी   दादारायांना लागली
वारा घालता भागली   उषाताई   २५०
पांच पानी खाई विडा   त्यांची बत्तीशी रंगली
त्याची सुरत चांगली   गोपूबाळाची   २५१
पांचपानी खाई विडा   डेखापासून लावी चुना
बापापरीस लेक शहाणा   गोपूबाळ   २५२
रात्रीची चांदणी   जाते कापुराला
विडा देत्यें चतुराला   उषाताई   २५३
दिवाणाशीं जातां   वैरी पाहती तोंडाकडे
माझ्या ग कंथाच्या   विड्याला रंग चढे   २५४
टिचकी वाजवीतो   खिडकी उघडीतो
राणीला खुणवीतो   गोपूबाळ   २५५
काळी चंद्रकळा   ठेवून ठेवून नेसावी
कुंकवाची चिरी   माझ्या जन्माला असावी   २५६
काळी चंद्रकळा   ठेवून ठेवून नेसावी
साऱ्या जन्माला असावी   मायबाई   २५७
काळी चंद्रकळा   पदरी मोतीजाळी
नेसली सायंकाळी   उषाताई   २५८
काळी चंद्रकळा   कण्हेरी कांठांची
बुधवार पेठेची   आणीयेली   २५९
काळी चंद्रकळा   पदरीं रामबाण

वाचनालय, सातारा.

नेसली सूर्यपान उषाताई २६०
काळी चंद्रकळा जशी काजळाची वडी
त्याची आज घडी मोडी उषाताई २६१
काळी चंद्रकळा ठेवून ठेवून नेसावी
साऱ्या जन्माला पुरवावी उषाताई २६२
काळी चंद्रकळा नेसता लागे मऊ
भूषणाजोगे भाऊ राज्यधर २६३
काळी चंद्रकळा कशी नेसूं मी एकटी
माझी बहीण धाकुटी आहे घरी २६४
काळी चंद्रकळा धुऊन धुऊन वीटली
नाही ग हौस फीटली उषाताईची २६५
काळी चंद्रकळा धुऊन धुऊन झाला बोळा
रुपये दिले साडेसोळा बाप्पाजींनी २६६
काळी चंद्रकळा धुऊन धुऊन झाला कचरा
रुपये दिले साडेसतरा काकारायांनी २६७
काळी चंद्रकळा ठेवीली भुईवरी
रुसली आईवरी उषाताई २६८
काळी चंद्रकळा ठेवीली बाकावरी
रुसली काकावरी उषाताई २६९
काळी चंद्रकळा ठेवीली दारावरी
रुसली दीरावरी उषाताई २७०
काळी चंद्रकळा ठेवीली जात्यावरी
रुसली आत्यावरी उषाताई २७१
काळी चंद्रकळा ठेवीली खुंटीवरी
रुसली कंथावरी उषाताई २७२
काळी चंद्रकळा ठेवीली मापावरी
रुसली बापावरी उषाताई २७३
काळी चंद्रकळा दोन्ही पदरीं रामसीता
नेसली पतिव्रता उषाताई २७४
काळी चंद्रकळा जसें काजळाचं बोट

घेणाराचं मन मोठं दादारायाचं २७५
काळी चंद्रकळा जसे रात्रीचे गगन
घेणाराचं मोठं मन दादारायांचे २७६
मला हौस मोठी जरीच्या पातळाची
पेठ धुंडिली साताऱ्याची मामारायांनी २७७
मला हौस मोठी गोटापुढें ग तोड्याची
काळी चंद्रकळा चोळी धोतरजोड्याची २७८
गोटपाटल्यांची घडण साताऱ्याची
लाडकी भ्रताराची उषाताई २७९
हाती गोटपाटल्या मागे पुढें सारी
तापत्या चोळीवरी बाजूबंद २८०
हाती कांकण पाटल्या जवे दोरे गजरे गोट
सुभेदारिणी तुझा थाट उषाताई २८१
कशीद्याची चोळी अंगी झाली तंग
सखी चवळीची शेंग उषाताई २८२
मोठे मोठे डोळे हरिणीबाईंचे
तसे तुझ्या रे आईचे गोपूबाळा २८३
ठुशाटीकांखाली सरीबाई तूं दोराची
राणी जहागीरदाराची उषाताई २८४
जोडव्यां झणत्कार बिरवल्यांना बारा ठसे
चालतांना रूप दिसे उषाताईचें २८५
कशीद्याची चोळी अंगी की फाटली
सखी सासऱ्या भेटली उषाताई २८६
ठुशापेट्यांखाली कंठीचे झालें पाणी
मागते तन्मणी उषाताई २८७
ठुशापेट्यांखाली कंठ्याचे झालें जाळें
मागते तायतळें उषाताई २८८
उठा उठा जाऊबाई दिवा लावावा तुपाचा
दारी पलंग रुप्याचा भावोजींचा २८९
उठा उठा जाऊबाई दारी उजाडलें

आपल्याला वाण आलें हळदीकुंकू २९०
उठा उठा जाऊबाई रथाचें धरूं चाक
शंभरी करूं आंख चुडेयांना २९१
उठा उठा जाऊबाई रथाची धरूं दोरी
शंभरी करूं पुरी चुडेयांना २९२
सहांच्या पंगतीला पितांबराचे झळाळ
तूप वाढते वेल्हाळ उषाताई २९३
सहांच्या पंगतीला कशाला हव्या तिघी
आपण वाढूं दोघी उषाताई २९४
सहांच्या पंगतीला नको भिऊं परातीला
येतें तुझ्या संगतीला उषाताई २९५
माझ्या दारावरनं कोण गेला झपाट्याचा
कुसंबी पागोट्याचा अप्पाराया २९६
माझ्या दारावरनं कोण गेली पातळाची
गळां माळ पुतळ्यांची उषाताई २९७
माझ्या दारावरनं मुलांचा मेळा गेला
त्यांत मी ओळखीला गोपूबाळ २९८
माझ्या दारावरनं हळदी कुंकवाचा नंदी गेला
खडा मारून उभा केला भाईरायांनी २९९
पुतळ्यांची माळ गोपूबाळाच्या नारीला
सून शोभते गौरीला आक्काबाईला ३००
हात भरले अंगठीनें कान भरले कुडक्यांनीं
शृंगार केला चुलत्यांनीं उषाताईला ३०१
मागील दारी आंबा पुढील दारी चिंच
माडी बांधा उंच दादाराया ३०२
दादाराया घर बांधी वैनीबाई ती बोलेना
तेथे उपाय चालेना काहीं केल्या ३०३
दादाराया घर बांधी आपुल्या हिंमती
वाडा शोभतो श्रीमंती थाटमाटें ३०४
दादाराया घर बांधी आपुल्या हिंमती

किती पारवे घुमती   माडीवरी ३०५
माडीवरती माडी   माडीला दहा दारें
बैसुनी घेती वारे   वैनीबाई ३०६
माडीवरती माडी   माडीला चंदनशिडी
पुतळी केस झाडी   उषाताई ३०७
माडीवरती माडी   माडीला तक्तपोशी
तबकी तुझी ठुशी   उषाताई ३०८
मामाराया माडी बांधी   सुतारांना दिला चहा
माडीचा बेत पहा   वैनीबाई ३०९
हौशानें हौस केली   जाई लावल्या जिन्यामध्यें
फुले पडती मेण्यामध्ये   देवाजीच्या ३१०
हौशानें हौस केली   फुले लाविली जिन्यांत
फुले पडती ताम्हनांत   बाप्पाजींच्या ३११
हौशाने हौस केली   फुले लाविली दारांत
फुले पडती हातांत   उषाताईच्या ३१२
हजारांचा घोडा   त्याला पन्नासाची झूल
वर बसणार   जणूं गुलाबाचे फूल ३१३
हजाराचा घोडा   त्याला विसांचा चाबूक
वर बसणार   फुलावाणी नाजूक ३१४
धुणें धुवी रे परीटा   लिंबे घे ताजी ताजी
धोतरजोडा अमदाबादी   गोपूबाळाचा ३१५
धुणें धुवी रे परीटा   धुण्याला काय तोटा
माझ्या ग अप्पारायांचा   रुपयांनी भरला लोटा ३१६
धुणें धुवी रे परीटा   लिंबू साबण लावी त्याला
नेसणारा भाऊ माझा   अप्पाराया ३१७
धुणे धुवी रे परीटा   इस्तरीची घडी कर
नेसणारा सावकार   गोपूबाळ ३१८
कानीचें कुडूक   हालती वाऱ्याने
बोलते तोऱ्यानें   उषाताई ३१९
कानीचे कुडूक   हालती लुटू लुटू

बोलते चुटू चुटू	उषाताई	३२०
पायी साखळ्या तोरड्या	पाय भरले चिखलात
लेकी दिल्या कोकणात	बाप्पाजींनी	३२१
चंद्रहार ग तुटला	टिकल्या झाल्या खोलीभर
पदराने गोळा कर	उषाताई	३२२
तिन्हीसांजा झाल्या	आले लक्ष्मीचे धनी
दिवे लावा खणोखणी	झगमगीत	३२३
तिन्हीसांजा झाल्या	लक्ष्मीचा डामडौल
बाळराजासाठी	गवळ्याचा वाडा खोल ३२४
तिन्हीसांजा झाल्या	दिव्यांची जलदी करा
लक्ष्मी आली घरा	मोत्यांनी ओटी भरा	३२५
तिन्हीसांजा झाल्या	दिवा ओसरीबाईला
सोड वासरें गायीला	गोपूबाळा	३२६
तिन्हीसांजा झाल्या	दिवे लावू कोठे कोठे
चिरेबंदी वाडे मोठे	बाप्पाजींचे	३२७
तिन्हीसांजा झाल्या	कामाची झाली घाई
गोवारी आणि गायी	रानांतून	३२८
तिन्हीसांजा झाल्या	घालूं चुलीत विस्तव
आधी बाळाला निजव	उषाताई	३२९
तिन्हीसांजा झाल्या	दिवा राईबाई
गवळी बांधी गायी	मथुरेचा	३३०
तिन्हीसांजा झाल्या	दिव्याला भरवण
वाचीती रामायण	दादाराया	३३१
तिन्हीसांजा झाल्या	दिवे लावू कोठे कोठे
चौसुपी वाडे मोठे	बाप्पाजींचे	३३२
लक्ष्मीबाई आली	तिन्हीसांजांच्या भरात
कुंकवाचा पुडा	साक्ष ठेविली घरात	३३३
लक्ष्मीबाई आली	तांब्याने दूध घाली
बाळा राजसाच्या	घराला मानवली	३३४
तिन्हीसांजा झाल्या	गुरांच्या गोंधळी

लक्ष्मी पूजिली तांदुळांनी ३३५
देणे देवाजींचे मनुष्याने काय द्यावे
माझ्या ग बाळाला लक्ष्मीने साह्य व्हावे ३३६
लक्ष्मीबाई आली शेताचा बांध चढे
हाती गोफण पाया पडे गोपूबाळ ३३७
लक्ष्मी की आली पांगळ्या पायांची
बाळाजवळ बोली केली कधी नाही मी जायाची ३३८
लक्षुमी चंचळ हिंडते बाजार
धरिते पदर गोपूबाळाचा ३३९
लक्षुमी चंचळ घर शोधतां भागली
माझ्या घरात राहिली दादारायांच्या ३४०
लक्षुमी की आली बैसली ती बाजे
माझें घर तिला साजे खरोखर ३४१
लक्षुमी कीं आली आली मागील दारानें
धाकट्या बाळानें बोलाविलें ३४२
लक्षुमी कीं आली बाळाच्या पायगुणा
भाईरायाच्या शांतपणा मानवली ३४३
लक्षुमी कीं आली हाती मोहरांचे ताट
पुशी कचेरीची वाट गोपूबाळाच्या ३४४
लक्षुमी कीं आली आलेली जाऊं नको
धरला पदर सोडूं नको गोपूबाळाचा ३४५
लक्षुमी कीं आली शेताच्या बांधावरी
शेत्या म्हणून हांका मारी गोपूबाळाला ३४६
वाटेवरलं शेत जशी हळद लोटली
कोठें लक्षुमी भेटली गोपूबाळा ३४७
वाटेवरलं शेत नको खुडूं त्याची पात
धनी आहे हो रागीट दादाराया ३४८
वाटेवरलं शेत नको मोडूं त्याची काडी
येते सावकारा गाडी गोपूबाळाला ३४९
वाटेवरला आंबा कोणी ओळंबीला

सखा सासुरवाडीला गेला गोपूबाळ ३५०
वाटेवरलं घर आल्या गेल्या गूळपाणी
वडीलांची सून शहाणी उषाताई ३५१
वाटेवरंल घर आल्या गेल्या ताकभात
वडीलांचे नांव राख गोपूबाळ ३५२
वाटेवरलं घर आल्या गेल्याचे माहेर
मिळे मीठ नी भाकर सर्व लोकां ३५३
भावोजी हो दिरा माझ्या मनींचे एक करा
दारी बाग पेरा द्राक्षीयांची ३५४
भावोजी हो दिरा सांगत होत्यें नानापरी
स्वस्त झाल्या राजापुरी चंद्रकळा ३५५
भावोजी दिरांनी आणिली केतकें
मी मागत्यें कौतुकें भावजयी ३५६
भावोजी हो दिरा माझ्या मनींचे सांगत्यें
तुमच्यापाशी मी मागत्यें कुडीजोड ३५७
भावोजी हो दिरा माझ्या मनींचे जाणावें
माझ्या वेणींतले आणावें गंगावन ३५८
काय मीं पुण्य केलें भावासारखा हो दीर
कमळीं रघुवीर पूजीयेला ३५९
काय मीं पुण्य केलें बहिणीसारखी नणंद
कमळीं गोविंद पूजीयेला ३६०
काय मीं पुण्य केलें आईपरी सासूबाई
कमळीं अंबाबाई पूजीयेली ३६१
काय मी पुण्य केलें बापासारखा सासरा
कमळीं हरिहरा पूजीयेला ३६२
काय मीं पुण्य केलें बापासारखा सासरा
कमळीं सोमेश्वरा पूजीयेला ३६३
काय मीं पुण्य केलें बापासारखा सासरा
सरीखाली ग दुसरा चंद्रहार ३६४
मामंजी सासूबाई तुम्ही तुळशीची झाडे

आम्ही तुमच्या उजेडे राज्य करूं ३६५
मामंजी सासूबाई तुम्ही तुळशीची मुळें
आम्ही परक्यांची बाळें सांभाळा हो ३६६
लक्षुमी लक्षुमी हांक मारीतो सासरा
तुझ्या कामाचा पसारा वैनीबाई ३६७
लक्षुमी लक्षुमी हाका मारी दीर
काढ ओसरीचा केर वैनीबाई ३६८
ब्राह्मण जेवती उत्तम झाला पाक
पवित्र तुमचा हात सासूबाई ३६९
मामंजी म्हणती धन्य ग सूनबाई
कुळाला कळा येई तुझ्या गुणें ३७०
मामंजी म्हणती धन्य ग सूनबाई
नातू दिला लवलाही मांडीवरी ३७१
मामंजी म्हणती सून ही गुणांची
होती राशी ही पुण्याची माझ्या बाळाची ३७२
मामंजी म्हणती सूनबाई जेव आधीं
वाढतो पोटामधी कुळतंतू ३७३
मामंजी म्हातारे रागानें होती लाल
जाईल कोण जवळ विस्तवाच्या ३७४
माहेरा आलीस नको करूं कामधंदा
तुझ्या सांग पुरवीन छंदा तान्हेबाळी ३७५
माहेरा आलीस नको करू काम कांही
आतां विसावा तूं घेई उषाताई ३७६
माहेरा आलीस आतां बाळे हास खेळ
सुखानें नेई वेळ उषाताई ३७७
माहेरा आलीस काय तुझ्यासाठी करूं
पिकला आंबा चिरूं उषाताई ३७८
माहेरा आलीस सांग तुला देऊं काय
खाई दुधावरची साय तान्हेंबाळे ३७९
माहेरा आलीस नीज आतां नको उठूं

करी बाळे गुरगुंटी उषाताई ३८०

माहेरी आलीस किती गेलीस सुकोनी
किती आलीस दिसांनी तान्हेबाळें ३८१

माहेरा आलीस रहावें चार मास
येऊं दे थोडें मांस अंगावरी ३८२

माहेरी आलीस तुला सखी काय देऊं
बैंगणी खण घेऊं उषाताईला ३८३

दिवाळसणाला जांवई घरीं आला
सल्ल्यांचा जोड दिला बाप्पाजींनी ३८४

दिवाळसणाला जावयाला आणा
सखीया समाधाना उषाताईच्या ३८५

पाहुण्याला पाहुणचार मेहुण्या मेजवानी
कंथ तुझा समाधानी उषाताई ३८६

पाहुण्या पाहुणचार मेहुण्या बुंदी-लाडू
एका पंक्ती दोघीं वाढूं वन्संबाई ३८७

सांवळ्या मेहुण्याचा पलंग पितळेचा
वर ठसा पुतळीचा उषाताईचा ३८८

पाहुण्या पाहुणचार मेहुण्या बुंदी-लाडू
नको माझी आस मोडूं वैनीबाई ३८९

माझ्या माहेराला जशी गोकुळींची वजा
कारभारी मामा तुझा तान्हेंबाळा ३९०

माझ्या माहेराला ताटवाट्यांच्या चळती
जेवून उठले माझे भाऊ तुझें पती ३९१

माझ्या माहेराला राही सदा उघडें दार
आल्या गेल्या पाहुणचार होत असे ३९२

माझ्या माहेराला नकार नाही कोणा
आला गेला पाहुणा नित्य आहे ३९३

माझ्या माहेराची सांगू मी कीर्ति
लाज वाटे सखी कशीं सांगू माझ्या ओठीं ३९४

माझ्या माहेराला केवढी आंबराई

आंब्यांना तोटा नाही | कधीं काळीं | ३९५
माझ्या माहेराला | नारळी पोफळी
त्यांची ग छाया दाटली | अंगणात | ३९६
माझ्या माहेराला | नाही कोणा सासुरवास
सुना लेकीच्यापरीस | वागवीती | ३९७
पाऊसपाण्याची | धरणीमाय वाट पाहे
तशी मला आस आहे | माहेराची | ३९८
दिवस मावळला | कर्दळीआड झाला
मला माघारी ना आला | माहेरीचा | ३९९
माझ्या माहेराला | डोलते मोठी बाग
वाटेल ते तूं माग | वैनीबाई | ४००
माहेरी जाईन | बसेन अंगणी
जशा लवती कामिनी | भावजया | ४०१
अंगणात खेळे | दणाणली माझी आळी
लेंकुरवाळी आली | माहेराला | ४०२
जेवण मी जेवी | भाजीभाकरीचे
मायेच्या हातींचे | गोड लागे | ४०३
जेवण मी जेवी | जेवण जेवतें पोळीचें
पाणी माहेरच्या गावींचे | गोड लागे | ४०४
माहेरच्या वाटे | मऊ गार हरिक दाटे
सासरच्या वाटे | टोंचती कुचकुच काटे | ४०५
जाईन माहेरी | बसेन खांबापाशीं
धाकट्या भावापाशी | गुज बोलूं | ४०६
जाईन माहेरी | बाप्पाजींच्या घरा
घुसळीन डेरा | अमृताचा | ४०७
जाईन माहेरी | पदर घेईन पुरता
सभे बैसला चुलता | काकाराया | ४०८
जाईन माहेरी | पदर घेईन दोन्ही भुजा
वडीलांपरिस धाक तुझा | काकाराया | ४०९
जाईन माहेरी | बैसेन बाजेवरी

विसावां तुझे घरीं माउलीयें ४१०
जाईन माहेरी बैसेन मी खाटे
विसावा मला भेटे माहेरास ४११
मजला माघारी तुजला कां न ये
जोडीनें जाऊं सये माहेराला ४१२
मजला माघारी मदनाचे घोडे
सदनाचें पुढें गोपूबाळ ४१३
काळी चंद्रकळा धुऊन धुऊन वीटली
नाहीं हौस फिटली माहेराची ४१४
दळण मी दळी हळदीवीण फिक्कें
मायेवीण सख्खे कोणी नाही ४१५
बाप्पाजींच्या ग बहिणी नको बोलूं तुझे माझे
एक माहेर तुझे माझे आत्याबाई ४१६
माहेरीचा देव कशाने ओळखावा
निशाणी मोती लावा सोमेश्वराच्या ४१७
माहेरीचा देव तुझा माझा एक
पूजा बांधूं समाईक आत्याबाई ४१८
बाप तो ईश्वर मायबाई काशी
नंदी आहे पायापाशीं भाईराया ४१९
आजोळच्या ओटीवरी आजीबाई बसे
घराला शोभा दिसे मामारायांच्या ४२०
बारीक दळणाच्या सभेमध्ये गेल्या गोष्टी
घराची रीत मोठी मायबाईच्या ४२१
बारीक दळणाची भाकरी चवघडी
आठवण घडीघडी मायबाईची ४२२
मामेयाच्या घरी भाची मी पाहुणी
समया लावुनी थाट केला ४२३
मामा की हो पुसे भाची केवढीशी झाली
चुनाडी रंगावीली कमळाबाईला ४२४
साखरेचा पुडा मुंग्यांनी फोडीला

तुझ्या मामाने धाडीला | तान्हेबाळा | ४२५
मोगऱ्या फुलांनी | भरले देवघर
पूजीला रघुवीर | बाप्पाजींनीं | ४२६
गुलाबाची फुलें | शंकर बाळाच्या ओंजळीं
त्याची तुला पुष्पांजली | गणेराया | ४२७
देवांचा देव्हारा | फुलांनी भरला
मंत्रांनी पूजीला | बाप्पाजींनी | ४२८
काशींतले कागद | आले लखोट्याने
वाचीले धाकट्याने | चंदूबाळाने | ४२९
काशींतले कागद | आले उडाउडी
वाचीले घोड्यावरी | मामारायांनी | ४३०
मामेयाचे घरी | भाचे कारभारी
शेले जरतारी | पांघुरती | ४३१
मामेयाचे घरीं | भाचे कारकून
वस्त्रें घ्या पारखून | मधूबाळाला | ४३२
बहिणींचे बाळ | मला म्हणे मावशीबाई
उचलून कडे घेई | लीलाताई | ४३३
शेजारिणीबाई | तुझा शेजार चांगला
नाही मला आठवला | मायबाप | ४३४
शेजारिणीबाई | एका दारीं दोघीं वागूं
माझी मैना तुझा राघू | खेळतील | ४३५
शेजारिणीबाई | धन्य तुझ्या शेजारिणी
सय नाही माहेराची | बारा वर्स | ४३६
शेजारिणीबाई | माझी वेणी हो घालावी
आईच्या हातांची | आठवण मज द्यावी | ४३७
शेजीच्या घरी | शेजी बोलली रागानें
कोवळें मन माझें | नेत्र भरले पाण्यानें | ४३८
शेजीच्या घरी गेल्यें | जाऊं नये जाणें झालें
तिच्या बोलण्याने | मन माझें दुखवीलें | ४३९
शेजीने दिली भाजी | दिली अंगणांत

काढी भांडणांत वारंवार ४४०
शेजारिणीबाई गवनिं दाटली
पानें केळींची फाटली वारीयानें ४४१
शेजारिणीबाई नकों करूं गर्व फार
रोज ग बघत्यें दिव्याखाली अंधकार ४४२
शेजारिणीबाई चल जाऊं नदीवर
धुण्याची धुऊं मोट करूं मोकळे अंतर ४४३
शेजारिणीबाई तुमचे झाले उपकार
कसें फेडूं सांगा मनीं ठेवावा आभार ४४४
शेजारिणीबाई घरीं का आज सुने
दूर ग देशा गेलें माझे सौभाग्याचे सोनें ४४५
शेजारिणीबाई आज कसली केली भाजी
आज कसली भाजी स्वारी गेली स्वारीमाजी ४४६
शेजीच्या घरी गेल्य तिला आला होता ताठा
दु:खाचा माझा वांटा दैव माझें ४४७
शेजीच्या घरी गेल्यें शेजीला झाला गर्व
पराङ्मुख होती सर्व अभागिया ४४८
शेजारिणीबाई नको हो मला हंसू
येतील तुझ्या आसूं लोचनांना ४४९
शेजारिणीबाई गर्वाचें घर खाली
गोष्ट ही कधीं काळीं विसरूं नको ४५०
शेजीचे बोलणें सदा उफराटे
बोंचती माझ्या काटें काळजाला ४५१
शेजीचें बोलणे झोंबले ह्रदया
शेजीला दयामाया नाही ठावीं ४५२
शेजारिणीबाई मनीं अढीं धरूं नका
पुन्हां गोड होऊं एकमेकां देऊं सुखा ४५३
शेजारिणीबाई माझेंच चुकलें
आता धरिते पाऊले सोड राग ४५४
संक्रांतीचा तीळगुंळ चला देऊं घेऊं

शेजी आतां हे अंगण तुझें माझें ४५६
तीळ घे गुळ घे आपण विसरूं मागचें
शेजी नवीन प्रीतीचें नातें जोडू ४५७
तीळ घे गुळ घे आतां विसर मागील
शेजी प्रेमाचें पाऊल दोघी टाकू ४५८
माझ्या अंगणांत शेजीचे पांच पुत्र
त्यांत तुझें मंगळसूत्र वैनीबाई ४५९
प्रेमाचा ओलावा पाहून जवळ गेली
तहान नाही हो भागली शेजीबाई ४६०
मैत्रीणीकडे गेल्यें मैत्रीणीला गर्व भारी
पायांनी पाट सारी बसावया ४६१
मैत्रीणीकडे गेल्यें मैत्रीणीच्या दारा कडी
तिच्या मनामध्ये अढी राहिलीसे ४६२
प्रेमाच्या नात्याशी राहील कशी अढी
चंद्राशी नाही कधीं अंधःकार ४६३
जीवाला माझ्या जड सांगू मी कोणापाशीं
सखी राही दूर देशीं शांताबाई ४६४
जीवाला माझ्या जड नका सांगूं एकाएकी
घाबरी होईल सखी शांताताई ४६५
जीवाला माझ्या जड नका सांगू मैत्रीणीस
पडेल धरणीस शांताताई ४६६
जीवाला माझ्या जड नका सांगूं वाटे
सखी गहिवरें दाटे शांताताई ४६७
जीवाची मैत्रीण पडली दूर स्थळी
दृष्टीला नाही पडली बारा वरसं ४६८
माझ्या ग मैत्रीणी आहेत देशोदेशी
आषाढी एकादशी भेटी झाल्या ४६९
आपण मैत्रीणी जाऊं ग बारा वाटे
जसे नशिबाचे फांटे फुटतील ४७०
आपण मैत्रीणी पुन्हा भेटू कधी

नगर वाचनालय, सातारा.

आठवू मनामधी   एकीमेकी ४७१
वारियांच्या संगे   आपण पाठवू निरोप
पोंचेल आपोआप   मैत्रीणीला ४७२
आपण मैत्रीणी   मनांत आठवू
पत्रें तीं पाठवू   वाऱ्यावरी ४७३
जिवाची मैत्रीण   देवा खुशाल ठेवावी
सुखांत नांदावी   सासुऱ्याला ४७४
माझ्या आयुष्याची   दोरी आहे बळकट
सखी मला कधी भेंट   देईल हो ४७५
माझ्या ग मैत्रीणी   आहेत दहाबारा
एक दिली सुभेदारा   शांताबाई ४७६
माझ्या ग मैत्रीणी   आहेत दोघीतीघी
त्यांत माझ्या मनाजोगी   मनुबाई ४७७
माझ्या ग मैत्रीणी   आहेत वीसतीस
एकीला द्यावा खीस   खोबऱ्याचा ४७८
माझ्या ग मैत्रीणी   आहेत गोऱ्यागोऱ्या
कपाळी लाल चिऱ्या   कुंकवाच्या ४७९
माझ्या ग मैत्रीणी   आहेत शंभर
त्यांत पहिला नंबर   कमळाताईचा ४८०
माझ्या मैत्रीणी   आहेत सात-आठ
एकीला द्यावा पाट   बसावया ४८१
माझ्या ग मैत्रीणी   आहेतं किती पहा
कितीदां देऊं चहा   सांगा तुम्ही ४८२
गोंडीयांची वेणी   मोगऱ्या दाटली
सखी सासऱ्या भेटली   मैनाताई ४८३
मैत्रीणींच्या मेळ्यामध्ये   चांगली कोण दिसे
हिरवा जी शालू नेसे   शांताबाई ४८४
मैत्रीणींचा मेळा   वेशीं खोळंबला
शृंगार नाही झाला   अजूनी माझा ४८५
तुझा माझा मैत्रपणा   मैत्रपणा काय देऊ

एका ताटी दोघी जेवूं . मनूबाई ४८६

तुझा माझा मैत्रपणा एका घागरीतले पाणी
नको कपट धरू मनीं शांताबाई ४८७

तुझा माझा मैत्रपणा मैत्रपणा काय देऊ
एक लवंग दोघी खाऊ मनूबाई ४८८

तुझा माझा मैत्रपणा मैत्रपणा काय देऊ
एका घोटे पाणी पिऊ मनूताई ४८९

माझ्या ग मैत्रिणी साधुसंतांच्या बायका
त्यांच्या मुखींचे आयका रामनाम ४९०

मैत्रिणीकडे गेल्ये मैत्रीण गुंतली कामाला
हार गुंफीते रामाला तुळशीबागेच्या ४९१

मिळाल्या भेटल्या गुजाच्या गजकरणी
लहानपणींच्या मैत्रीणी ताई माई ४९२

आपण गुजू बोलूं कशाला हवा दिवा
आहे चांदण्याची हवा शांताबाई ४९३

तिन्हीसांजा झाल्या दिव्यांतील वात डोले
सखी माझी गोष्ट बोले हृदयातील ४९४

आपण मैत्रीणी ये ग बोलू गूज
सुखदुःख तुझं माझं शांताबाई ४९५

किती ग वरसांनी भेटलो दोघीजणी
साठलें किती मनीं बोलूं आता ४९६

काय तूं पुसशी पळसा तीन पानें
संसारी समाधानें नांदू सखी ४९७

कधी रागावती बोलती कधीं गोड
मैत्रीणी अशी खोड कंथा माझ्या ४९८

रूप ना लावण्य एक नाही गुण अंगी
संसार त्याच्या संगी करणें दैवीं ४९९

रूप ना लावण्य नाहीं धन ग संपदा
चुरीते परी पदा उषाताई ५००

रूप ना लावण्य सोडींना कधीं मांडी

करितो नासाडी जीवनाची ५०१
रात्र ना दिवस चंदन वेलीला
विळखा देऊन राहिला नाग जेवीं ५०२
कधीं उजळे पुनव कधीं कांळी ग अवस
मैत्रीणी काय सांगू मिळे सुधा मिळे वीख ५०३
कधीं फुले ग वसंत तुझी सखी तेव्हा खुले
कधीं वैशाख वणवा हरिणी तुझी होरपळे ५०४
मैत्रीणी काय सांगू गोड मी करूनी घेत्ये
दिवूस रोज नेत्यें मोजूनीयां ५०५
काय विचारीशी होते का धूसपूस
मैत्रीणी येते घूस घरा कधीं ५०६
आधणाचे पाणी त्यांत भात शिजवीते
रुसवे फुगवे त्यांत सुख पिकवींते ५०७
आधणाचे पाणी ओतीते विसावण
पतीच्या रागांत मिसळते प्रेमगुण ५०८
दूध वर येतां पाणीयानें खाली जाई
कंथाचा ग राग सखी हंसण्याने नष्ट होई ५०९
कंथा रागावता सखी हळूंच हंसून बघत्यें
क्रोधी मुद्रा मोहावते क्षणामाजीं ५१०
शत ग जन्मांची पुण्याई आली फळा
माझ्या कुंकवाची कळा सूर्या सारी ५११
लाखांत एखादा तसा सखा माझा पती
अनुरक्त परी व्रती भाग्य माझें ५१२
पुरवीती हौस मैत्रीणी विचारून
आम्ही ग नांदतो दोघे हंसून खेळून ५१३
काय विचारीशी कधीं ना सखी तंटा
जीवेंभावें ओंवाळीन प्रेमरंगा माझ्या कंथा ५१४
काय विचारीशी आहे हो खरी सुखी
तुझ्या गळ्याची शप्पथ कसें खोटें बोलूं सखी ५१५
समुद्राच्या कांठी सखी मोतीं पोवळ्याच्या वेली

दैवाची उणीव कडू वेल हाती आली ५१६
जीवाला देत्ये जीव जीव देऊन पाहीला
पाण्यांत पाषाण अंती कोरडा राहीला ५१७
फोडीले चंदन त्याच्या केल्या बारा फोडी
स्त्रियांची जात वेडी पुरुषांना माया थोडी ५१८
सेवेला करित्यें झटून झिजून
चीज त्यांचें करी कोण मैत्रीणी गे ५१९
हंसेना बोलेना कोणी सासरी ग मशी
मैत्रीणी जीवासी कंटाळल्यें ५२०
गळां घालूं गळा ये ग रडूं पोटभरी
पुन्हा जायाचें सासरी चारा दिशीं ५२१
नको ग रडूं गडे होईल सारें भलें
अवंसेचे काळें कोठें राहे ५२२
नको रडूं गडे होईल तुला सुख
प्रार्थीन गजमुख तुझ्यासाठी ५२३
नको रडूं गडे होईल सखी भलें
चिखली कमळें फुलतात ५२४
नको रडूं गडे जरी वरून पाषाण
झिरपे आंतून फुटतील ५२५
मैत्रीणी भेटती हांसती रडती
फिरून दूर जाती संसारात ५२६
मैत्रीणी भेटती जीवाचें बोलती
फिरून दूर जाती संसारांत ५२७
पुत्रनिधनाचें दुःख दारुण कठीण
बरें त्याहून मरण माये वाटे ५२८
अपत्याला लाभ त्याहून नाहीं सुख
आणि त्याचा ग वियोग त्याच्याहून नाहीं दुःख ५२९
नको ग बाळें रडूं किती तूं रडशील
पुन्हा ग फुलतील फुलें दारी ५३०
नको नको रडूं डोळे झाले लाल

होईल पुन्हा बाळ सांवळीये ५३१
नको नको रडूं धर गे मनीं धीर
शोभेल पुन्हा घर माझ्या बाळे ५३२
नको नको रडूं रडें आपुलें आंवर
हांसेल तुझें घर तान्हेबाळें ५३३
पुरे हे रडणें धीर ना सखो सांडी
शोभेल पुन्हां मांडी तान्हेबाळानें ५३४
नको नको रडूं पुन्हां कळी ग फुलेल
पुन्हा पाळणा हलेल तुझ्या घरीं ५३५
नको नको रडूं बघ तूं माझ्याकडे
आवरी बाळे रडें विवेकाने ५३६
आंबे मोहरती सारे कुठें ग फळती
फळती तितुके ना पिकती किती सांगू ५३७
दूर ग देशींचा वारा येतो संथ
सुखी आहे तुझा कंथ मनूबाई ५३८
निरोप मी धाडी गोपूबाळाच्या आईला
माझ्या उषाताईला सांभाळावी ५३९
निरोप मी धाडी शंकरपंतांना कानी सांगा
आठ दिवसांची रजा मागा उषाताईला ५४०
सूर्याच्या समोर माझ्या अक्काबाईचें घर
ओसरीला दार चंदनाचें ५४१
जीव माझा गेला चोळी पातळ दांडीवरी
जीव गेला मांडीवरी भाईरायांच्या ५४२
राखी राखी देवा दिव्यांतला दीपक
माझ्या भाई रायाचा एक गोपूबाळ ५४३
राखी राखी देवा दिव्याची की ज्योत
माझ्या भाईरायाची लेक उषाताई ५४४
नेसा माझ्या वैनींबाई हिरवा शालू कमळाचा
कडे पुत्र जावळाचा चंदूबाळ ५४५
काय सांगू बाई भाईयाचा खोली माचा

किल्ल्या कुलपाचा दरवाजा ५४६
सोंगट्या खेळतांना फांसे आले हारी
मामा तुझें रे कैवारी गोपूबाळा ५४७
देवाचें देऊळीं रुद्रजप पारायण
कंथ तुझा नारायण उषाताई ५४८
नाकीची ग नथ पडली ताकांत
मामारायांच्या धाकांत मामीबाई ५४९
माझ्या घरी ग पाहुणा मांडा करीन साईचा
आला माझा मामाराया भाऊ माझ्या ग आईचा ५५०
माझ्या घरी ग पाहूणी करीन करंजी
आली माझी मावशीबाई बहीण माझ्या ग आईची ५५१
एका छत्रीखाली मामाभाचे चौघेजण
धाकुट्याला लिंबलोण मधुबाळाला ५५२
धाडा माघारी पाहुणा साखर-साईचा
भाऊ माझ्या हो आईचा मामाराया ५५३
चल शिंगीबाई तुझी चाल पाणेयाची
वर स्वारी तान्हेयाची मधुबाळा ५५४
नदीपलीकडे शालूच्या त्या कोण
लेक माझी तुझी सून सखी दोघ्या ५५५
पायां पडूं आला भावजयांचा घोळका
त्यांत धाकुटी ओळखा अप्पारायांची ५५६
पायां पडूं आली आशीर्वाद काय देऊं
जन्मसावित्री पुत्र होऊं उषाताईला ५५७
पायां पडूं आली आशीर्वाद काय द्यावा
अक्षयी चुडा व्हावा उषाताईचा ५५८
पायां पडूं आली भाचेसून माझी
राजसा राणी तुझी गोपूबाळा ५५९
माझ्या अंगणांत चांदीचे फुलपात्र
संध्येला झाली रात्र बाप्पाजींच्या ५६०
मला हौस मोठी ताईबाईला आणावी

नवी पालखी विणावी रेशमाची ५६१
उठा उठा वैनीबाई दारी उजाडलें
आपुल्याला वाण आलें हळदीकुंकू ५६२
माझ्या दारावरून बेलाच्या पाट्या जाती
शंकराची भक्ति मोठी बाप्पाजींना ५६३
माझ्या दारावरून कोण गेली सवाशीण
काजळकुंकू बाळंतीण मामीबाई ५६४
हाती गोटतोडे मागें पुढें सारित होत्यें
भावांना वाढीत होत्यें पंचामृत ५६५
जीवाला देते जीव प्राणाला होते राजी
सखी माय बहीण तुझी गोपूबाळा ५६६
शेवंती फुलली फुलली पाकळी
निघाला आजोळीं गोपूबाळ ५६७
मामाच्या रे घरा नको जाऊं कामावीण
येऊं दे बोलावणं गोपूबाळा ५६८
मामाच्या रे घरा नको जाऊं लडालडा
येऊं दे गाडी घोडा गोपूबाळा ५६९
चंदन चंदन चंदनाची बारा नांवे
उंची चंदन मला घ्यावें भाईराया ५७०
माझ्या अंगणात कोण बैसली दुलाबाई
वडिलांची वाट पाही सुधाबाई ५७१
लगीनसराई कापडाची महागाई
नेस माझा वैनीबाई पीतांबर ५७२
सासूचा सासूरवास नणंदा तुम्ही हळू बोला
माझा दमून भागून कंथ बाहेरूनी आला ५७३
उठा उठा जाऊबाई दिवे लावा गच्चीवरी
भावोजी हत्तीवरी घरी आलें ५७४
गांवांतल्या गांवांत उषाताईचे सासरे
गाडीला जुंपिली वासरे दादारायाने ५७५
गांवांतल्या गांवांत किती घेशी बोलावणी

अभिमानाच्या बहिणी उषाताई ५७६
आधी मूळ धाडा लांबच्या अक्काबाईला
जवळच्या सखुबाईला दांडी डोल्या ५७७
माझ्या घरां ग पाहुणी जिलबी केली ग साईची
बहीण माझ्या ग आईची मावशीबाई ५७८
खाऊ मी धाडिला बत्तासा रेवडीचा
भाचा माझा आवडीचा मोरूबाळ ५७९
नदीपलिकडे कोण ग दिसत
हाती तांब्याची परात मावशीबाई ५८०
गोपूबाळ वसंत बाळ हे दोघे जोडीचे
शेले चुनाडीचे पांघुरले ५८१
शंकरबाळ मोरूबाळ हे दोघे जोडीचे
माझ्या आवडीचे दोन हिरे ५८२
शंकरबाळ मधुबाळ हे दोघे गडी गडी
जशी भीमार्जुनांची जोडी घरामध्यें ५८३
एका छत्रीखाली कोण ग चालती
मामेयाच्या संगे भाचे बाहेर निघती ५८४
गंगूबाई रंगूबाई या दोघी मावश्याभाच्या
डोकीवरी कुंच्या रेशमाच्या ५८५
धाकटी वैनी मोठी वैनी भांडती कडाकडा
मध्ये साखरेचा खडा गोपूबाळ ५८६
धाकटी वैनी मोठी वैनी जावांचा ग जोडा
कोथिंबीरी चुडा भरीयेला ५८७
भांडशी भांड गड्या तुझ्या तोंडाची जाते वाफ
भल्या बापाची मी लेक नेदी जाप ५८८
शेजारी भांडतो करीतो हमरी तुमरी
बोले ना उषाताई थोरामोठ्यांची ग नारी ५८९
साखरेचे लाडू वाटेच्या पाहुण्यांना
श्रीधरपंत मेहुण्यांना एकादशी ५९०
सांवळे मेहुण्यांना समई नाही दिली

चंद्रज्योत उभी केली शांताताई ५९१
मनोहरपंत मेहुणे आपल्या आईचे बालक
दिली पुतळी ठळक कमळाताई ५९२
हाती दौत-लेखणी कलमदानीं गोंडे
कारकून हिंडे बाप्पाजींचा ५९३
माझें ओटीवर बुकांचे कीं ओझे
वकील नांव तुझें आप्पाराया ५९४
चौसुपी माझें घर कितींदा काढूं केर
माझे भाग्यवंत दीर घरी आलें ५९५
माझा नव्हें कोणी माझ्या बहिणीबाळेचा
हिरा मोहनमाळेचा गोपूबाळ ५९६
माझा नव्हे कोणी माझ्या बहिणीचा होशी
मला मावशी म्हणशी चंदूबाळा ५९७
माझ्या ग घरांत सदा येती आप्त इष्ट
माझ्या घराचे अभीष्ट चिंतितात ५९८
नदीपलीकडे कोणाच्या मोऱ्या गायी
आजोबा आजीबाई दान देती ५९९
नदीपलीकडे कोणाची वांसरें
तेथे तुझे ग सासरे उषाताई ६००
चिठी बरोबर आंबे द्या पाठवून
त्यात ठेवावे लिहून उषाताईला ६०१
लेकी झाल्या लोकी सुना झाल्या लेकी
हातींचे काम घेती मायबाईच्या ६०२
लेकी झाल्या लेकुरवाळ्या सुनांना आली न्हाणे
दैवाची देते वाणि आक्काबाई ६०३
नातवंडे पतवंडे भरली ओसरी
दैवाची बैसली आजीबाई ६०४
नातवंडाची आजी पतवंडांना दूध पाजी
दैवाची आहे माझी आजीबाई ६०५

□ □

५: देवादिकांच्या व पौराणिक ओव्या

रसपरिचय

या प्रकरणात आरंभी मी मंगलमूर्तीच्या वंदनाच्या जोड्या दिल्या आहेत. मंगलमूर्तीजवळ माता आपल्या मुलीला पुत्र व्हावा अशी प्रार्थना करीत आहे.

मोरया रे देवा लाडू घे सोंडेवरी
पुत्र दे मांडीवरी उषाताईला
मोरया रे देवा तुला लिंपीन शेंदूर
पुत्र तूं दे सुंदर उषाताईला

आपली मुलगी सासरी सुखी राहावी म्हणून विघ्ननाशक गणपतीला माता प्रार्थना करिते :

मोरया रे देवा सारी विघ्नें ही हाकवावि
तान्हे बाळीला राखावी दूरदेशी

गणपती ही विद्येची देवता. मुलाला विद्या मिळावी, सद्बुद्धी यावी म्हणून ही मोरयाची विनवणी केलेली आहे. संकष्टचतुर्थीचेही वर्णन आहे. संकष्टीच्या चंद्राचे हे मनोहर वर्णन वाचा :

संकष्ट चतुर्थी चंद्र दिसतो हिरवा
सखी वेचते दुरवा पूजेसाठी

गणपतीच्या वर्णनानंतर शंकराच्या वर्णनपर ओव्या दिल्या आहेत. शंकराचे स्थान बहुधा डोंगरात, जंगलात, कोठे तरी घळीत असावयाचे. हा विरक्त योगी राजा दूर राहतो :

खोलामध्यें नांदे नाहीं त्याचा गाजावाजा
भोळ्या त्या सांबा माझा नमस्कार

शंकराचे वर्णन करणाऱ्या ओव्या फार सुंदर आहेत. एके ठिकाणी तर गंमत केली आहे. शंकराला आपण भोळा म्हणतो; परंतु एक कवयित्री सांगते,

"याला भोळा म्हणू नका. मोठा लबाड आहे हा. यानें आपल्या जटेत गुपचूप गंगा ठेवून दिली आहे, पार्वतीला कळू नये म्हणून."

भोळा महादेव याला भोळा म्हणूं नये
त्याच्या जटेमध्यें गुपित गंगा वाहे

परंतु एकंदरीत हा देव भोळा. तो आशुतोष म्हणजे पट्कन प्रसन्न होणारा आहे. सुष्ट असो वा दुष्ट असो, जो जे मागेल ते त्याला देतो.

भोळा महादेव क्षणी प्रसन्न होतसे
दुष्ट असो सुष्ट असो वर मागे तो देतसे

या भोळ्या महादेवाला मूठभर शिवामूठ वहा. तेवढ्याने प्रसन्न होऊन तो अपार भाग्य देतो.

पार्वतीने हा भोळा सांब वरिला म्हणून तिचे कौतुक केले आहे. जशी ही पार्वती पतिव्रता, तशी ती सत्यवानाची सावित्री. सत्यवान् व सावित्री यांची ती अमर कथा कोणास माहीत नाही? पतीचे प्राण यम पाशाने ओढीत असता सावित्री धैर्याने तेथे उभी राहते :

पति असे पाशीं धैर्य बसे त्याच्यापाशी
नाही झाली गोष्ट अशी भूमंडळी

यमापासून योगिनी सावित्रीने पती परत आणिला, त्या सावित्रीचा महिमा किती गावा? पतिप्रेमामुळे एक अबला यमाहून बळी झाली :

सावित्रीचा महिमा अमर भूमंडळी
अबला झाली बळी यमाहून

पातिव्रत्याच्या प्रभावाने प्रत्यक्ष काळही मनी दचकतो :

सतीच्या प्रभावे काळहि मनी खचें
नांव घ्या सावित्रीचे संसारात

अशा या सावित्रीचे नुसते नाव घेतले तरी अक्षय सौभाग्य लाभेल :

सावित्री सावित्री जरी म्हणतील नारी
त्यांचे या संवसारी वज्रचुडे

सावित्री आठवताच सीताही आठवते :

रामाची ग सीता लक्ष्मणाची वयनी
दशरथाची पहिली ज्येष्ठ सून

लग्नामध्ये राम पाच वर्षांचे होते व सीता अडीचच वर्षांची होती असे म्हटले

आहे. कारण सर्वत्र बालविवाह होत होते. अडीच वर्षांच्या सीतेने माळ कशी घातली, पाच वर्षांच्या रामाने धनुष्य कसे मोडले त्याची आपणाला का उठाठेव?

दुष्ट कैकेयीने रामासारखा भ्रतार सीतेला भोगू दिला नाही. ती सारी वनात गेली. परंतु भरत! त्याचे किंती प्रेम! राम वनांत गेले म्हणून तो नंदिग्रामी वनस्थ व व्रतस्थ होऊन राहिला :

जटाधारी झाला निजतो सुखे भुई
भरत जणूं होई वनवासी
धन्य रे भरता धन्य रे तूं भाऊ
तुझी कीर्ति राहू चिरंजीव

समृद्ध असे राज्य तृणप्राय तो मानतो. भरताची ही भक्ती पाहून डोळे भरून येतात.

धन्य रे भरता धन्य रे तुझें मन
तुझ्या स्मरणें लोचन भरून येती

भरताची अशी भक्ती, अणि तो लक्ष्मण ! तो राम जवळ नसेल तर राहूच शकत नव्हता, जगूच शकत नव्हता. राम म्हणजे त्याचे जीवन. राम व सीता वनात चालत असता लक्ष्मण पुढे चालत असे. तो दगडधोंडे, काटे दूर करत असे. किती सहृदय वर्णन आहे ते वाचा :

राम चाले वाटे लक्ष्मण झाडी खडे
असे बंधू झाले थोडे पृथ्वीवरी
राम चाले वाटे लक्ष्मण झाडी कांटे
असे बंधु नाही कोठें संसारात

राम व सीता यांची सेवा-चाकरी करणे हाच लक्ष्मणाचा आनंद. तो त्याच्यासाठी रसाळ फळे आणी. सीतेनेही वनवासातील संसाराला मधुरता आणली. स्त्रियांनी पंचवटीतील राम-सीतेच्या राहणीचे मनोहर वर्णन केले आहे. सीतेने जाईचे वेल लावले आहेत. त्यांच्या हिरव्यागार मंडपात राम आंघोळ करतो; परंतु कढत पाण्याला विसावण हवे होते. गोदावरीचे पाणी आणणे कठीण; मग रामाने तेथेच बाण मारून पाणी काढले.

रामाच्या अंघोळीला पाणी नाहीं विसाणाला
अमृताचे झरे लाविले ग पाषाणाला

रामाची आंघोळ चालते. सीता सर्वत्र सडासंमार्जन करून रांगोळी काढते.

रामाच्या संध्येसाठी ती स्वच्छ पाण्याचा तांब्या भरून ठेवते :

रामकुंडावरी रामराया संध्या करी
सावळी सीताबाई अमृताने तांब्या भरी

सीता त्या पंचवटीत कुमारिकांना परकर - चोळ्या वाटते. सुवासिनींना हळदीकुंकू देते, ब्राह्मणांना धोतरजोडे देते असे वर्णिले आहे. जशी एखादी भरल्या घरातील सुवासिनी वागते तशी सीता वनात राहते. सीता वनात आहे हे जणू ओव्या करणाऱ्या बायका विसरल्या.

सीता रामाची शय्या तयार करते, त्याला विडा देते, त्याचे प्रेमाने पाय चेपते. रामाला घाम वगैरे आला तर सीता आपल्या पदराने तो पुसून टाकते व घाम पुसणाऱ्या प्रेमळ पत्नीकडे राम बघतो. किती गोड हे स्वभावचित्र!

रामाला आला घाम सीता पुसते घोळानें
पाहतसे तिच्या मुखा रामराया ग प्रेमानें
रामराया आला घाम सीताबाई घाली वारा
पतिसंगतीत प्रेमें वनवास कंठी सारा

पंचवटीत थंडी फार. गोदावरीच्या तीरावर बसती, गार गार वाटायचे. त्यामुळे रामरायाला पडसे आले व सीतेनें त्याला आले खायला दिले असे घरगुती सांसारिक वर्णन आहे :

रामरायाला पडसे सीता देते त्याला आलें
पंचवटीमधें त्यांचे पर्णकुटी घर झालें

राम व सीता यांचा वेळ तरी कसा जाई? राम फुलझाडे लावी, सीता पाणी घाली. रानातील पाखरांची नावे सीतेने विचारावी व सीतेचे अज्ञान पाहून रामाने हसावे. मग सीतेला राग येई. तो राग हळूच हात लावून राम दूर करी :

रामरायाला पुसते सीता पांखरांची नांवे
रामरायानें हसावें कौतुकाने
सीता रागावली रानी रुसून बैसली
रामरायें हासविली स्पर्शमात्रें

रानात राहता राहता रावणाचे संकट आले. सीतेला सुवर्णमृगाच्या चर्माची चोळी शिवावी असे वाटले. मोठमोठ्यांसही मोह फसवितो :

सोन्याच्या चोळीचा मोह सीतेला सुटला
कोण प्रपंची विटला सर्व सुखा

सीतेला रावण नेतो. राम हिंडू लागतात.शबरी भेटते. शबरीची बोरे अधाशाप्रमाणे राम खाऊ लागले. सीतेला देत ना. ती भांडू लागली :

शबरीची बोरें एकटा राम खाई
सीतेचें त्याच्याशी मग गोड भांडण होई

रामाची व मारुतिरायांची गाठ पडते. अशोकवनात सीता रडत असते. अशोकाच्या फुलांना बहर आला होता. कारण सीतेच्या डोळ्यांतील पाणी त्यांना मिळे.

अशोकाच्या झाडा फुलांचा नित्य बहर
सीतादेवीच्या डोळ्यांचा त्याला मिळतो पाझर
अशोकाच्या झाडा सीता घाली पाणी
नेत्र येतात भरोनी रात्रंदिस

सीतेच्या डोळ्यांतील पाणी मिळे म्हणून ती फुले अत्यंत सुकुमार दिसत. सीतेचा श्वासोच्छ्वास लागल्यामुळे त्या फुलांना गोड वास येई. सीतेच्या डोळ्यांतून पाण्याचा सडा पडे व अशोकाची फुलेही टपटप खाली पडून सडा होई; अशा मनोहर उत्प्रेक्षा आहेत.

मारुती सीतेची बातमी नेतात. वानरांसह राम येतात. सेतू बांधू लागतात. राम शिळा टाकी ती बुडे. परंतु त्याचे नाव लिहिलेली तरे. मारुती म्हणतो :

हसून मारुति म्हणे रामा रघुनाथा
देवा तुमच्याही पेक्षां तुमच्या नावाची योग्यता

सेतू होतो. रावणाशी युद्ध सुरू होते. रामाचे बाण हळूहळू लंकेवर येऊ लागतात. मग लाखो येऊ लागतात. इंद्रजिताला लक्ष्मण मारतो. रावणही मारला गेला. परंतु राम सीतेची परीक्षा पाहतात :

रामाचे ह्रदय जणूं कठीण पाषाण
फूल आगीत घालून बघतसे

पुढे पुष्पक विमानात बसून राम-सीता निघतात. सीतेला समाधान वाटते. शेवट गोड होतो :

सावळी जानकी रामरायाच्या मांडीवरी
सीतेच्या तोंडावरी प्रसन्नता

रामाला भरत भेटतो. राम भरताला नाही भेटले. जणू स्वतःच्या ह्रदयाला भेटले :

भरता भेटला भेटला ह्वदयाला
रामरायाने न्हाणीला नेत्रजळें

रामाने भरताच्या पाठीवरून हात फिरविला आणि भरताचे बारा वर्षांचे कष्ट नष्ट झाले :

भरताच्या पाठीवर राम फिरवितो हात
बारा वरसांचे कष्ट दूर केले

रामाला अभिषेक होतो. सुखाचा संसार सुरू होतो. सीता नाना प्रकारचे दागिने मागते. राम देतो. दिवाणखाना सजलेला असतो. भाग्य फुलते. सीता गर्भार असते. राम तिला डोहाळे पुसतो.

सीतेला डोहाळें रामाला काय कळे
निंबोणी रस गळे शेल्यावरी
सीतेला डोहाळे रामाला सांगावे
रुमाली आणावे बाळआंबे

रानातील आंब्याच्या कैऱ्या खाव्या असे डोहाळे सुरू होतात. पुढे राम सीतेचा त्याग करितात. वनवासातील हे गरोदर सीतेचे वर्णन करुण असे आहे:

सीता वनवासी दगडाची केली उशी
अंकुश बाळ कुशी वाढतसे

दगडावर कशी आली तिला झोप? पुढे सीता बाळंत होते. बाळबाळंतीण कोठल्या बाजेवर निजत होती? :

सीता वनवासी दगडाची केली बाज
अंकुश बाळा नीज वनामध्यें

पुढे लवांकुश वाढतात. रामाबरोबर त्यांची लढाई होते. रामाचे बाण लवांकुशावर येत होते. जणू ते बाण म्हणजे कमरेला कडदोरा, हातातील कडीतोडे. रामाला का कठोर बाण मारवत नव्हते? का ते बाण मुलांना फुलाप्रमाणे वाटत होते? रामाने आपल्या मुलांना इतर बाळलेणे घातले नाही. जे घातले ते या बाणांचे :

बाणामागे बाण बाण येती मागेंपुढें
रामाच्या बाणांचे लवांकुशा कडीतोडे
बाणामागे बाण बाण येती झराझरा
रामाच्या बाणाचा लवांकुशा कडदोरा

असे हे थोडक्यात जणू ओव्यांत रामायणच आहे. रामायण म्हणजे मारुतीचा पराक्रम. मारुतिरायाच्या वर्णनाच्या ओव्या सुंदर आहेत :

मारुतीला प्रणाम करण्यापूर्वी असा पुत्र प्रसवणाऱ्या मातेला आधी नमन केले पाहिजे :

आधी नमन करूं अंजनीबाईला
मग मारुतिरायाला तिच्या पुत्रा

कोणताही गाव घेतला तरी मारुतीचे देऊळ आहेच. पुष्कळ वेळा गावाबाहेर ते वेशीजवळ असते. तेथे मंडळी बसतात, उठतात. वाटेचे वाटसरू विसावा घेतात:

माझा ग दयाळु वेशीच्या बाहेर उभा
मारुतिरायाचा शेंदरी लाल झगा

रामाचे वर्णन झाले आणि कृष्णाचे? वर्णन करता करता कोणाची वाणी थकणार नाही? यशोदामाईचे केवढे भाग्य!

दैवाची यशोदा नेसली पिवळें
मांडीये सांवळे परब्रह्म

यशोदा कृष्णाला खेळवते, जेववीते, तो तिच्या निऱ्या धरून उभा राहतो. चांदोबा खेळायला मागतो:

यशोदेच्या निऱ्या कृष्ण धरूनि उभा राही
चंद्रमा म्हणे देई खेळावया

कृष्ण वाढतो. यमुनेच्या तीरी गाई चारतो. कालियाला मारण्यासाठी यमुनेत उडी घेतो. ते झोकदार वर्णन वाचा :

कृष्ण उडी टाकी कळंब कडाडला
शेष दणाणला पाताळांत
कृष्ण उडी टाकी कळंबाच्या मेजें
यमुने पाणी तुझे गढूळले

उंच कळंबाच्या झाडावरून कृष्ण उडी मारतो. त्यामुळे कृष्ण खोल जातो. यमुनेच्या तळाचा गाळ वर येतो.

असा हा गोपाळकृष्ण भक्तांची संकटे दूर करतो. गायीसाठी पावा वाजवतो. साध्या मोरपिसांनी नटतो :

खांदीये घोंगडी अधरी धरी पांवा

गोपाळ कृष्ण गावा गोकुळींचा
मोरमुकुट माथां गळा वनमाळा
स्मरावा सांवळा गोकुळीचा

कृष्ण खोड्या करतो. यशोदा त्याला बांधते, मारते. ज्याच्या नावानें बद्ध मुक्त होतात, त्याला यशोदा बांधून ठेविते:

ज्याच्या नांवें होती संसारांत मुक्त
यशोदा बांधीत त्याला दावें

जो दुष्ट असुरांना मारतो, त्याला यशोदा काठी मारते :

राक्षस संहारी कालिया विदारी
यशोदा त्याला मारी वेताटीने

असा हा गोड विरोधाभास आहे.

आणि ती कुंजवनातील फुललेल्या शारदीय चांदण्यातील रासक्रीडा :

कां ग सखी तुझे डोळे लाल धुंद
काननीं गोविंद वाजवितो

सूचक उत्तर! काननातील वेणुध्वनी ऐकून झोप कशी येणार?

कृष्ण भगवान् पांडवांचा सखा. द्रौपदीचा तो पाठीराखा. राजसूय यज्ञात वाढताना द्रौपदीच्या चोळीची गाठ सुटली. पापी हसू लागले. परंतु कृष्णाने लाज राखली. द्रौपदी चतुर्भुज झाली :

दोन हाती वाढी दोन हाती बांधी
सांवळी द्रौपदी मांडवात
राजसूय यज्ञी द्रौपदीचे तुटे बिरडे
चतुर्भुज कीं गोविंदे तिला केलें

द्रौपदी चतुर्भुज होताच सारे आश्चर्यचकित होऊन टकमक पाहू लागतात. द्रौपदी मग नाना प्रकारचे पदार्थ वाढते. सारे जेवून उठतात. द्रौपदी शेण लावून थकलेल्या कृष्णाला वाढते. देवाला ती राधे लोणचे आणते :

राजसूय यज्ञी द्रौपदी वाढी लोणचें
कृष्णाचे पान कोणचे विचारीते

कृष्णाची द्रौपदीवर फार प्रीती. सख्ख्या बहिणीवर त्याची प्रीती कमी आणि द्रौपदीही म्हणते : ''कृष्ण माझा कोणी नाही. तरी खरी माया त्याचीच माझ्यावर.''

द्रौपदीमाई म्हणे नव्हे माझा सख्खा भाऊ

मायेचा कृष्णनाथ   किती त्याची वाट पाहूं

द्रौपदीवर तो केवढा कठीण प्रसंग! दुर्योधन तिला उघडी करू पाहतो. परंतु देव लाज राखतो. अनंत रंगांची वस्त्रें भराभरा आतून निघतात. शेवटी दुष्ट दमतो:

वस्त्रे फेडुनिया   पापी चांडाळ दमला
कैवारी कृष्ण झाला   द्रौपदीचा

कृष्ण व द्रौपदीचे हे प्रसंग बहारीने वर्णिले आहेत.

अभिमन्यू बाळाच्याही ओव्या सुंदर आहेत.

चक्रव्यूही शिरें   पुत्र प्रतापी पार्थाचा
भाचा प्रत्यक्ष कृष्णाचा   अभिमन्यू
अभिमन्यू बाळ   सिंहाचें ग पिलुं
लागले सारे पळुं   कौरवांचे

शेवटी रणांगणात तो सिंहाचा छावा मरून पडतो. तोंडाने गोविंदनाम तो जपत असतो :

गोविंद गोविंद   मंजुळ मुखी वाचा
पति पडे उत्तरेचा   रणांगणी

याच प्रकरणात नारदांच्या वर्णनाच्याही ओव्या आहेत. हे शब्दचित्र पाहा :

कळीचा नारद   उभारीतो शेंडी
वीणा तो काखुंडी   शोभे सदा

या प्रकरणात शेवटी तुळसादेवीच्या ओव्या घातल्या आहेत. तुळस म्हणजे पवित्र वस्तू. मरताना तोंडात तुळशीपत्र ठेवून देवाघरी जायचे. तुळशीला पाणी घातल्याशिवाय बायका जेवत नाहीत. रानावनातील तुळस परंतु प्रेमाने तिला अंगणात जागा दिली :

तुळशी ग बाई   जन्म तुझा रानीवनी
बैस अंगणात   जागा देते वृंदावनी

तुळशीच्या पवित्र झाडाला माता पाणी घालीत असते. त्या वेळेस माता कशी दिसते :

तुळशीला पाणी घाली   तुळशी खाली बसे
प्रत्यक्ष गंगा दिसे   मायबाई

गरीब बायका म्हणतात : "आम्हां कोठली काशीयात्रा? अंगणातील तुळशीचे दर्शन हेच काशीदर्शन."

काशी काशी म्हणून लोक जाती ग धावत
काशी माझ्या अंगणात तुळसादेवी
काशी काशी म्हणून लोक जाती दुरी
काशी माझ्या घरी तुळसादेवी

बाहेर सायंकाळ व्हावी, दिवा लावून तुळशीला दाखवावा, तुळशीला हात जोडावे.

संध्याकाळ झाली वाजले ते सात
तुळशीला हात जोडीयेले

भगिनी निवेदिता देवींना अशा प्रसंगांची चित्रे किती सुंदर काढता येतील असे नेहमी वाटत असे.

देवादिकांच्या व पौराणिक : ओव्या

आधी नमन करू देव गणपति
शारदा सरस्वती मोरावरी १
मोरया रे देवा तुला दुर्वांची आवडी
एकविसांची जुडी बाळासाठी २
मोरया रे देवा लाडू घे सोंडेवरी
पुत्र दे मांडीवरी उषाताईला ३
मोरया देवाला केलें दुर्वांचे आसन
झाला मोरया प्रसन्न भाईरायाला ४
मोरया रे देवा तुला लिंपीन शेंदूर
पुत्र तूं दे सुंदर उषाताईला ५
मोरया रे देवा तुला जास्वंदीचे फूल
मांडीये देई मूल उषाताईला ६
मांडीये देई मूल सारी विघ्ने ही हाकावी
तान्हे बाळीला राखावी दूरदेशी ७
मोरया रे देवा सारी विघ्ने कर दूर
निर्विघ्न माझा कर संवसार ८

आणा गणेशाला गणेशचतुर्थीला
देईल सद्‌बुद्धीला तान्हे बाळा ९
आणावा गणेश त्याचा मांडला सोहळा
देईल विद्येला तान्हेबाळा १०
आणावा गणेश विघ्नें तो करी दूर
सुखाला येवो पूर गोपू बाळाच्या ११
आणावा गणेश त्याला वाहूं हिरव्या दुर्वा
प्रार्थू मनोरथ पुरवा गणराया १२
आणावे नारळ करीन एकवीस मोदक
देव सिद्धिविनायक कृपा करो १३
संकष्ट चतुर्थी आहे माझा नेम
भाचा सांगेन ब्राह्मण गोपू बाळा १४
संकष्ट चतुर्थी चंद्र दिसतो हिरवा
सखी वेंचते दुरवा पूजेसाठी १५
सर्वांच्या मागून शिवाची करिती पूजा
भोळ्या सांबालागी माझा प्रणिपात १६
खोलामध्ये नांदे नाही त्याचा गाजावाजा
भोळ्या सांबा माझा नमस्कार १७
रानीवनी वसें माझा कैलासीचा राजा
भोळ्या सांबालागी माझा प्रणिपात १८
स्मशानी वसतो अंगाला विभूति
पती तो पार्वती वरीतसे १९
सर्पाची वेटोळी ज्याच्या गळां वेढे देती
पति तो पार्वती वरीतसे २०
भैरव भुतांची नाचे मंडळी सभेती
पति तो पार्वती वरीतसे २१
हातात डमरू त्रिशूळ दुज्या हाती
पति तो पार्वती वरीतसे २२
नंदीचे वाहन चंद्रमा माथ्यावरती
पति तो पार्वती वरीतसे २३

जगाच्या कल्याणा हलाहल सुखे पीती
पति तो पार्वती वरीतसे २४

जगाच्या कल्याणा विषाचा घोट घेती
नीळकंठ झाली कीर्ति शंकराची २५

भोळा महादेव याला भोळा म्हणूं नये
त्याच्या जटेमध्ये गुपित गंगा वाहे २६

भोळा महादेव भोळे याचे देणे
त्याने मला दिले त्याच्या विभूतीचे सोने २७

भोळा महादेव क्षणीं प्रसन्न होतसे
दुष्ट असो सुष्ट असो वर मागे तो देतसे २८

भोळा महादेव त्याला वहा शिवामूठ
मग संसारी सुखाची उषाताई तुला लूट २९

चिलू माझा वेसारा पापड पसारा
निघाला वेसवारा कैलासांत ३०

चिलू माझा दाणीया भांगी भरल्या गोणीया
निघाल्या पेणीया कैलासांत ३१

त्रिश्चरण चेतविला महानंदा घाली उडी
आला धांवूनी तांतडी महादेव ३२

कुक्कुट मर्कुट महानंदेने पाळीले
भद्रसेनाकडे आले पुत्र दोन्ही ३३

पतिव्रता मोठ्या पार्वती सावित्री
पवित्री धरित्री त्यांच्यामुळें ३४

योगिनी सावित्री यमापाशी गेली
पति घेऊनियां आली स्वर्गातूनी ३५

पतिव्रता सावित्री प्रतिज्ञा करूनी गेली
पति घेऊनिया आली स्वर्गातूनी ३६

योगिनी सावित्री संतोषवी यमराणा
मागते चुडेदाना त्याचेपाशी ३७

सासू-सासऱ्यांच्या आज्ञे गेली अरण्यांत
जाहली कृतार्थ दोघेंजणें ३८

यमाचे पाशांतून पति सोडवी सावित्री
जगती तिची कीर्ति नारी गाती ३९

पति असे पाशी धैर्य बसे त्याच्यापाशी.
नाही झाली गोष्ट अशी भू-मंडळी ४०

सावित्री सावित्री जरी म्हणतील ओठ
सौभाग्या नाही तूट भू-मंडळी ४१

सावित्री सावित्री जरी म्हणतील नारी
त्यांचे या संवसारी वज्रचुडे ४२

सावित्री सावित्री म्हणती ज्या नारी
मंगळसूत्र दोरी अक्षै त्यांची ४३

सावित्रीचें व्रत करील जी नारी
जन्म सावित्री संसारी होईल ती ४४

सावित्रीचे व्रत करावें पवित्र
ऐकावें चरित्र सावित्रीचें ४५

यमधर्माला आडवी पतिव्रता किती मोठी
अपूर्व केल्या गोष्टी सावित्रीनें ४६

सावित्रीचा महिमा अमर भूमंडळी
अबला झाली बळी यमाहून ४७

सतीच्या प्रभावें काळहि मनी खचे
नाव घ्या सावित्रीचे संसारात ४८

रामाची ग सीता लक्ष्मणाची ग वयनी
दशरथाची पहिली जेष्ठ सून ४९

पांचा वरुषांचे राम अडचा वरुषींची सीता
धन्य तुझी दशरथा सून आली ५०

सीतेला सासुरवास कैकयीने केला
रामासारखा भ्रतार तिला नाही भोगू दिला ५१

अहिल्या शिळा धाली गौतमाची कांता
रामरायें वनीं जातां उद्धरली ५२

अहिल्या शिळा झाली पतीच्या श्रापानें
दशरथाच्या लेकानें उद्धरीली ५३

आश्चर्य आश्चर्य रामरायाच्या पायाचें
शिळेतून वर येई रूप अहिल्या सतीचें ५४

रामरायाच्या चरणाचा धूमीला ग लागे कण
अहिल्या ग प्रगटली न लागतां एक क्षण ५५

राम लक्षुमण भरत शत्रुघ्न
चौघांमध्ये कोण राज्य करी ५६

राम लक्षुमण गेले की काननांत
भरत मनांत दुःखी कष्टी ५७

रामसीता वनी माय कैकेयी पाठवी
मनी भरत आठवी नित्य त्यांना ५८

जटाधारी झाला निजतो सुखें भुई
भरत जणूं होई वनवासी ५९

नको म्हणे राज्य भरत कैकयीला
बंधू नाही असा झाला जगत्रयीं ६०

नंदीग्रामी राही सदा रामनाम जपे
तपश्चर्या घोर तपे भरत बंधु ६१

धन्य रे भरता धन्य रे तूं भाऊ
तुझी कीर्ति राहू चिरंजीव ६२

धन्य रे भरता धन्य रे तुझें मन
तुझ्या स्मरणें लोचन भरून येती ६३

धन्य रे भरता धन्य रे तुझी भक्ती
आलेलें राज्य हाती सोडिले तूं ६४

धन्य रे भरता धन्य रे तुझी निष्ठा
आलेलें राज्य हाता सोडियेलें ६५

राम चाले रथी लक्षुमण चाले पायी
एवढ्या पृथ्वीवर असा बंधु झाला नाही ६६

राम चाले वाटे लक्षुमण झाडी खडे
असे बंधू झाले थोडे पृथ्वीवर ६७

राम चाले वाटे लक्षुमण झाडी कांटे
असे बंधु नाही कोठें संसारांत ६८

राम चाले वाटे लक्ष्मण झाडी पाला
असा बंधू नाही झाला भूमंडळी ६९

राम चाले वाटे लक्ष्मण झाडी माती
असे बंधू झाले किती कोणी सांगा ! ७०

राम सीता वनी लक्ष्मण फळें आणी
असा बंधू त्रिभुवनी भाग्यें भेटे ७१

रामकुंडावरी हिरवा मंडप जाईचा
आंघोळीला आला पुत्र कौसल्याबाईचा ७२

रामाच्या आंघोळीला पाणी नाही विसाणाला
अमृताचे झरे लाविले ग पाषाणाला ७३

रामकुंडावरी रामरायाची आंघोळी
सांवळी सीताबाई तेथें काढीते रांगोळी ७४

रामकुंडावरी रामराया संध्या करी
सांवळी सीताबाई अमृताने तांब्या भरी ७५

रामकुंडावरी रामरायाची आरती
सभामंडपात हात जोडून मारुती ७६

रामकुंडावरी कुंवारणीची झाली दाटी
परकर-चोळ्या वाटी सीताबाई ७७

रामकुंडावरी ब्राह्मणांची झाली दाटी
धोतरजोडे वाटी रामराया ७८

रामकुंडावरी सवाष्णींची झाली दाटी
हळदीकुंकू वांटी सीतादेवी ७९

रामकुंडावरी रामरायाची बिछाई
तेथें पाय चेपी सांवळी सीताबाई ८०

रामकुंडावरी रामरायाची बिछाई
तेथे विडा देते सांवळी सीताबाई ८१

रामाला आला घाम सीता पुसते घोळानें
पाहतसे तिच्या मुखा रामराया ग प्रेमाने ८२

रामराया आला घाम सीताबाई घाली वारा
पतिसंगतीत प्रेमें वनवास कंठी सारा ८३

रामरायाला पडसें सीता देते त्याला आलें
पंचवटीमध्ये त्यांचे पर्णकुटी घर झालें ८४

रामराया लावी जाई-मोगऱ्यांची फुलें
सांवळी सीताबाई शिंपीतसे त्यांना जळें ८५

रामाला पुसते सीता पाखरांची नांवे
रामरायाने हसावें कौतुकानें ८६

सीता रागावली रानी रुसुन बैसली
रामरायें हसविली स्पर्शमात्रें ८७

लक्षुमण आणी सीतामाईला मोरपीसें
सांवळी सीताबाई त्यांचे करीतसे पंखे ८८

राम-लक्षुमण जसे मोतीयांचे बाण
मध्यें शोभे सूर्यपान सीताबाई ८९

राम-लक्षुमण मोतीयांची जोडी
मध्यें शोभते लालडी सीताबाई ९०

राम-लक्षुमण जसे धनुष्य बाण
मध्यें लावण्याची खाण सीतादेवी ९१

रामलक्षुमण जसे मोतीयांचे हार
शेवंती सुकुमार सीताबाई ९२

सीता वनवासी झाडांशी सांगे गोष्टी
दुष्ट ग रावण तेथें ठेवी पापी दृष्टी ९३

सोन्याच्या चोळीचा मोह सीतेला सुटला
कोण प्रपंची वीटला सर्व सुखा ९४

सीतेला लोभ जडे रामराया मोह पडे
होणार तें ते घडे लल्लाटीचें ९५

जटायू तो पक्षी रामासाठी मेला
मरून धन्य झाला संसारात ९६

शबरीची बोरे उष्टीमाष्टीं खाशी
तूं रे दिसशी अधाशी रामराया ९७

शबरीची बोरे उष्टीमाष्टी खाशी
शतजन्मांचा उपाशी रामराया ९८

शबरीची बोरें	एकटा राम खाई
सीतेचें त्याच्याशीं	मग गोड भांडण होई ९९
शबरीची बोरें	अमृताहून गोड
कोण ठेविल त्यांना खोड	त्रैलोक्यांत १००
शबरीची बोरें	रामें मटकावीली
शबरी मुक्त केली	संसारात १०१
सीतेच्या शोधासाठी	रामानें दिली सरी
मारुति ग राया	मग पडला विचारीं १०२
सीतेच्या शोधासाठी	रामानें दिली माळ
समुद्र लंघुनी	गेले अंजनीचें बाळ १०३
अशोकाचे खाली	सीता रडतसे
मारुती देतसे	आश्वासन १०४
अशोकाचे खाली	सीताबाई शोक करी
हनुमंते खूण दिली	रामरायाची १०५
अशोकाचे खाली	सीतेची गळेसरी
तेथें मारुतीची फेरी	रात्रंदीस १०६
अशोकाचे खाली	सीतेचा कमरपट्टा
तेथें मारुती झपाटा	रात्रंदीस १०७
अशोकाचे खाली	सीतामाईचे कांकण
तेथे मारुती राखण	रात्रंदिवस १०८
अशोकाचे खाली	सीताबाईची हो नथ
तेथे मारुतीचा पथ	रात्रंदिवस १०९
अशोकाची फुलें	शेंदरी रंगाची
फार आवडीची	जानकीच्या ११०
अशोकाच्या झाडा	फुलांचा नित्य बहर
सीतादेवीच्या डोळ्यांचा	त्याला मिळतो पाझर १११
अशोकाची फुलें	झुबके झुबके
पाहते कौतुकें	दुःखी सीता ११२
अशोकाच्या झाडा	सीता घाली पाणी
नेत्र येतात भरोनी	रात्रंदीस ११३

अशोकवनाची का ही सुकुमार फुलें
जानकीच्या नेत्रातील पोसली ती नित्य जळें ११४
अशोकवनींच्या फुलांना कां गोड वास
जानकीचा त्यांना लागे नित्य नित्य श्वासोच्छ्वास ११५
अशोकवनांत फुलांचा सडा पडे
परंतु सीता रडे रात्रंदीस ११६
सागरावरती सेतु बांधिला बाणांचा
दशरथाच्या पुत्राचा पराक्रम ११७
सागरावरती सेतु बांधला वानरी
तुझ्यासाठी ग सुंदरी सीताबाई ११८
राम टाकी शिळा परि बुडाल्या त्या तळीं
रामाच्या नांवाची शिळा परि तरे जळीं ११९
हसून मारुती म्हणे रामा रघुनाथा
देवा, तुमच्याहीपेक्षां तुमच्या नांवाची योग्यता १२०
रामाच्या नांवाने शिळा सिंधूंत तरती
आणि शिवाशंकराच्या विषवेदना थांबती १२१
रामाच्या नांवाने शिळा सागरीं तरती
संसारी त्याच्या नांवे जडमूढ उद्धरती १२२
राम चाले वाटे लक्षुमण झाडी वाळू
रामाचे बाण हळू लंकेवरी १२३
हस्ती झाले मस्त गगनी उडे राख
रामाचे बाण लाख लंकेवरी १२४
हस्ती झाले मस्त गगनीं उडे वाळू
रामाचे बाण हळू लंकेवरी १२५
हस्ती झाले मस्त गगनी उडती दगड
रामाचे बाण रगड लंकेवरी १२६
हस्ती झाले मस्त गगनी उडे रेती
रामाचे बाण येती लंकेवरी १२७
हस्ती झाले मस्त गगनीं उडे चुना
रामाचे बाण पुन्हा लंकेवरी १२८

हस्ती झाले मस्त गगनी उडे गोळा
रामाचे बाण सोळा लंकेवरी १२९

हस्ती झाले मस्त गगनी उडे सूप
रामाचे बाण खूप लंकेवरी १३०

हस्ती झाले मस्त आकाशी काळोख
रामाचे बाण लाख लंकेवरी १३१

हस्ती झाले मस्त गगनी अंधार
रामाची बाणधार लंकेवरी १३२

हस्ती झाले मस्त गगनी उडे माती
रामाचे बाण येती लंकेवरी १३३

इंद्रजीत मारी लक्षमण ब्रह्मचारी
रडते त्याची नारी सुलोचना १३४

बारा वर्ष राही निराहार ब्रह्मचारी
म्हणून सौमित्र रावणाच्या पुत्रा मारी १३५

मारिला इंद्रजित दिली दऊत लेखणी
लक्षुमणें घात केला भुजा दाखवी लिहूनी १३६

रामाचे ह्रदय कठिण वज्राचें
अग्नींत सीतेचे सत्त्व पाही १३७

रामाचे ह्रदय जणूं कठिण पाषाण
फूल आगींत घालून बघतसे १३८

पुष्पक विमानी रामाच्या जवळी
शोभली सांवळी सीताबाई १३९

शोभली जानकी रामरायाच्या मांडीवरी
सीतेच्या तोंडावरी प्रसन्नता १४०

भरता भेटला भेटला ह्रदयाला
रामरायाने न्हाणीला नेत्रजळें १४१

भरताच्या पाठीवर राम फिरवितो हात
बारा वरसांचे कष्ट दूर केले १४२

बारा वरसांनी कौसल्या भेटे रामा
ह्रदयी दाटे प्रेमा माऊलीच्या १४३

कौसल्या माउली रामाला धरी पोटी
उमटेना शब्द ओठी कांही केल्या १४४

वाजंत्री वाजती वाजती माळावर
राज्य-अभिषेक कौसल्याच्या बाळावर १४५

वाजंत्री वाजती चला सख्यांनो पहायला
रामाची आरती जाते मारुतिरायाला १४६

राम-लक्ष्मण अर्धांगी सीता नारी
सेवेशी ब्रह्मचारी मारुतिराय १४७

राम-लक्ष्मण अर्धांगी सीता शोभे
सेवेशी दास उभे मारुतिराय १४८

सतरंज्यांना ठसे लोडांना आरसे
रामरायाच्या सभे बसे मारुतिराय १४९

सतरंज्यांना ठसे शोभती कमानी
रामरायाच्या दिवाणी मारुतिराय १५०

शिंदेशाई तोडे सिताबाईच्या हातांत
रामरायाच्या रथांत उजेड पडे १५१

शिंदेशाई तोडे राम सीतेला देणार
रामरायाच्या रथांत त्याचा उजेड पडणार १५२

चला जाऊं पाहूं रामरायाची बिछाई
शेजारी रत्न टीक सीताबाई १५३

चला जाऊं पाहूं रामरायाची बैठक
हासून विडा देई सीताबाई १५४

नदीपलीकडे कोणाची पालखी
रामरायाची जानकी उतरली १५५

मोठी मोठी मोती रामरायाच्या सदऱ्याला
राणी मागते गजऱ्याला सीताबाई १५६

मोठी मोठी मोती रामरायाच्या कोटाला
राणी मागते गोटाला सीताबाई १५७

मोठी मोठी मोती रामरायाच्या पगडीला
राणी मागते बुगडीला सीताबाई १५८

शिंदेशाई तोडे सीताबाई कधीं केले
राम इंदूरला गेले जव्यासाठी १५९
शिंदेशाई तोडे राम सीतेला देणार
पंचवटीचे सोनार कारागीर १६०
मोठी मोठी मोती रामरायाच्या पलंगाला
राणी मागे लवंगाला सीतादेवी १६१
मोठी मोठी मोती रामरायाच्या जोड्याला
राणी मागते तोड्याला सीतादेवी १६२
राम रथामध्यें लक्षुमण घोड्यावरी
मधून जाते डोली जानकीची १६३
सीतेला डोहाळे रामाला काय कळे
निंबोणी रस गळे शेल्यावरी १६४
सीतेला डोहाळे रामाला सांगावे
रुमाली आणावे बाळआंबे १६५
सीता वनवासी दगडाची केली उशी
अंकुश बाळ कुशी वाढतसे १६६
सीता वनवासी दगडाची केली उशी
एवढ्या अरण्यांत तिला झोंप आली कशी १६७
सीता वनवासी वनी कंटकांची दाटी
पांच महिन्यांचा अंकुश बाळ पोटीं १६८
सीता वनवासी दगडाची करी गादी
एवढ्या अरण्यांत तिला झोंप आली कशी १६९
सीता वनवासी दगडाची केली बाज
अंकुश बाळ नीज वनामध्यें १७०
पांच महिन्यांचा अंकुश असे पोटी
घोर अरण्यांत सीतामाई केर लोटी १७१
बाण्याच्यामागे बाण बाण येती मागें-पुढें
रामाच्या बाणांचे लवांकुशा कडी-तोडे १७२
बाणांमागें बाण बाण येती ग पीवळे
रामाशी लढती लवांकुश ग कोवळे १७३

बाणांमागे बाण बाण येती झराझरा
रामाच्या बाणांचा लवांकुशा कडदोरा १७४

सीतेला सासुरवास असा केला केसोकेसी
सीता गेली निजधामा तिने वांटला देशोदेशी १७५

सीतेला सासुरवास असा केला परोपरी
सीता गेली निजधामा तिने वांटला घरोघरी १७६

सीतेला वनवास कैकयीनें नेली फणी
तिनें बारा वर्षे वेणी वर्ज्य केली १७७

सीतेला सासुरवास कैकयीनें केला
बारा वर्षे दिला वनवास १७८

सीतेला डोहाळे कैकयीने केले
राम नाही दाखवीले बारा वर्षे १७९

सीता सांगे कथा आपुल्या कर्माची
पापिष्टा रावणाची लंका जळली १८०

राम गेले वना मारिले रावणा
राज्य दिलें बिभीषणा सोनियाचें १८१

सीता सांगे स्वप्न ऐक रे शहाण्या
सवतीवरी कन्या देऊं नये १८२

सीता सांगे स्वप्न ऐक मंदोदरी
राम लंकेवरी स्वार झाले १८३

सीता सांगे स्वप्न ऐक मंदोदरी
इंद्रजीत मारी लक्षुमण १८४

सीता सांगे स्वप्न ऐक मंदोदरी
राक्षस वानरी संहारीले १८५

सीतेच्या श्रापानें डोंगर जळती
वानर म्हणती रामनाम १८६

सीतेच्या श्रापानें लंकेची झाली होळी
तोंडें झाली काळी वानरांचीं १८७

आधी नमन करूं अंजनीच्या सुता
मारुति हनुमंता रामभक्ता १८८

आधी नमन करूं अंजनीबाईला
मग मारुतिरायाला तिच्या पुत्रा १८९

अंजनीबाई म्हणे बाळ माझा बंळीवंत
द्रोणागिरी पर्व उचलीला १९०

घडीत आणीला पर्वताचा चेंडू
हनुमंत वंदू रामदूत १९१

मनाचाही वेग मारुतींच्या मागें
लंकेला रागे रागें जाळीतसे १९२

एकाच उडीत समुद्र ओलांडी
जाऊनी सीता वंदी रामदूत १९३

रामाचा सेवक मारुतिराय तो मानाचा
विडा पिकल्या पानांचा सुकुनी गेला १९४

पहाटेच्या प्रहर रात्री मला वेशीकडे जाणें
त्याचे दर्शन आहे घेणें मारुतिरायाचें १९५

राम राम म्हणत दारावरून कोण गेला
रामराया तुझा चेला मारुतिराय १९६

राम राम म्हणुनी नदींत कोण गेला
रामराया तुझा चेला मारुतिराय १९७

माझा ग दयाळू वेशीच्या बाहेर उभा
मारुतिरायाचा शेंदरी लाल झगा १९८

रामाच्या बैसली अर्धांगी सीता नारी
सेवेला ब्रह्मचारी मारुतिराय १९९

धन्य ग यशोदा नेसली कशीदा
मांडीये मुकुंदा न्हाणीयेले २००

देवाची यशोदा नेसली पीवळें
मांडीये सावळें परब्रह्म २०१

दैवाची यशोदा नेसली शेलारी
बैसली श्रीहरी दूध पाजू २०२

दैवाची यशोदा नेसली पातळ
मांडीये घननीळ नाचतसे २०३

कृष्णाची यशोदा नेसली जरतारी
मांडीये मुरारी दूध पीई २०४

यशोदेच्या निऱ्या कृष्ण धरून उभा राही
चंद्रमा म्हणे देई खेळावया २०५

गायींना चारीतो यमुनेच्या तटीं
भक्तांना संकटी सांभाळीतो २०६

कृष्ण टाकी उडी कळंब कडाडला
शेष दणाणला पाताळांत २०७

कृष्ण उडी टाकी कळंबाच्या मेजें
यमुने पाणी तुझें गढूळले २०८

गायींगुरे चारी वाजवितो पांवा
गोपाळकृष्ण ध्यावा गोकुळींचा २०९

खांदीये घोंगडी अधरी धरी पांवा
गोपाळकृष्ण गावा गोकुळीचा २१०

हाती शोभे काठी गवळे सवंगडी
खांदीये घोंगडी कृष्णाजीच्या २११

मोरमुगुट माथां गळां वनमाळा
स्मरावा सांवळा गोकुळीचा २१२

गोपाळकाला करी यमुनेच्या तीरी
होऊन गोवारी नंदजीचा २१३

दैवाचा तूं नंद धन्य दैवाची यशोदा
आनंदाच्या कंदा खेळवीले २१४

ज्याच्या नांवे होती संसारात मुक्त
यशोदा बांधीत तयाला दावें २१५

राक्षस संहारी काळीच्या बिहारी
यशोदा त्याला मारी वेताटीने २१६

तोंडांत दाखवी विश्व ब्रह्मांड सगळें
तेव्हां यशोदे कळलें बाळरूप २१७

कृष्णें काळीयाची मर्दीयेली फणी
काढीयला मणी मस्तकींचा २१८

गोविंद गोविंद गोविंद ध्यानी मनी
गोविंद गोपांगणी क्रीडा करी २१९

वाजवून पांवा वेध लावी सर्वा
गोपाळकृष्ण घ्यावा गोकुळींचा २२०

दही, दूध लोणी चोरून वांटीतो
कौतुक करीतो बाळकृष्ण २२१

कां ग सखी तुझे डोळे लाल धुंद
काननी गोविंद वाजवितो २२२

गोवर्धनगिरी बोटाने उचली
वाढतो गोकुळी कंस शत्रु २२३

गायी गोवर्धनी चरती बारा रानें
पावा जनार्दनें वाजवीला २२४

यशोदा म्हणतें कृष्ण माझा वरसाचा
कसा तो गोरसाचा नाश करी २२५

कृष्णनाथ काळा जसा उडीदाचा दाणा
सोळा सहस्त्र गोपांगना भूलवील्या २२६

माझ्या दारावरून रंगीत गाडी गेली
कृष्णानें राधा नेली गोकुळांत २२७

वाढतां वाढतां सुटे द्रौपदीची चोळी
गोविंद सांभाळी तिची लाज २२८

चतुर्भुज केली द्रौपदी निज सखी
भक्तांची लाज राखी भगवंत २२९

दोन हातीं वाढी दोन हाती बांधी
सांवळी द्रौपदी मांडवात २३०

राजसूय यज्ञीं दुर्जन हासले
चतुर्भुज देवे केले द्रौपदीला २३१

राजसूय यज्ञी द्रौपदींचें तुटे बिरडे
चतुर्भुज की गोविंदे तिला केले २३२

जाहले कौतुक टकमक पाहती
पाठीराखा कमळापति द्रौपदीचा २३३

पाठीची बहीण सुभद्रा होती जरी
प्रीति द्रौपदीच्या वरी गोविंदाची २३४
राजसूय यज्ञीं द्रौपदी वाढी मीठ
नथींतील टीक झळाळती २३५
राजसूय यज्ञीं द्रौपद्री वाढी ताक
तिच्या दंडातील वांक झळाळली २३६
राजसूय यज्ञी द्रौपदी वाढी मठ्ठा
कमरेचा कमरपट्टा झळकला २३७
राजसूय यज्ञी द्रौपदी वाढी भात
नाकांतील नथ झळकली २३८
राजसूय यज्ञी द्रौपदी वाढी खीरी
गळ्यातील सरी झळकली २३९
राजसूय यज्ञी द्रौपदी वाढी वडे
हातांतील तोडे झळकले २४०
राजसूय यज्ञी द्रौपदी वाढी लोणचे
कृष्णाचें पान कोणचे विचारीते २४१
राजसूय यज्ञी घंटानाद झाला
कृष्ण सांगे अर्जुनाला शुकमहाराज आला २४२
राजसूय यज्ञीं पूजा झाली ग कोणाची
झाली गोपाळकृष्णाची गोविंदाची २४३
द्रौपदीमाई म्हणे नव्हे माझा सखखा भाऊ
मायेचा कृष्णनाथ किती त्याची वाट पाहूं २४४
द्रौपदीमाई म्हणे जळो देवा माझें जिणें
कौरवांच्या सभे दुष्ट गांजीयेले दुर्योधनें २४५
वस्त्र फेडी दुर्योधन पहिला पितांबर
पाठीशी दामोदर द्रौपदीच्या २४६
वस्त्र फेडी दुर्योधन दुसरी पैठणी
पाठीशी चक्रपाणी द्रौपदीच्या २४७
वस्त्र फेडी दुर्योधन तिसरी वल्लरी
पाठीशी मुरारी द्रौपदीच्या २४८

वस्त्र फेडी दुर्योधन चवथा ग शेला
पाठीशी सांवळा द्रौपदीच्या २४९

वस्त्र फेडी दुर्योधन पांचवें अमोल
पाठीशी घननीळ द्रौपदीच्या २५०

वस्त्र फेडी दुर्योधन सहावें जरतारी
पाठीशी कंसारी द्रौपदीच्या २५१

वस्त्रें फेडूनीयां पापी चांडाळ दमला
कैवारी कृष्ण झाला द्रौपदीचा २५२

तुळशीपानांच्या लावील्या पत्रावळी
जेवीले वनमाळी द्वारकेंत २५३

देव भावाचा भुकेला विदुराच्या कण्या खातो
अर्जुनाचे घोडे धुतो नारायण २५४

देव भावाचा भुकेला विदुराच्या कण्या भक्षी
अर्जुनाचे घोडे रक्षी नारायण २५५

पांडवाची घरे सोनियाच्या भिंती
एवढ्या इमारती सोडून गेले रात्री २५६

चक्रव्यूही शिरे पुत्र प्रतापी पार्थाचा
भाचा प्रत्यक्ष कृष्णाचा अभिमन्यु २५७

चक्रव्यूही शिरे लाडका अर्जुनाचा
पति उत्तराबाईचा अभिमन्यु २५८

अभिमन्यू बाळ सिंहाचे ग पिलुं
लागले सारे पळूं कौरवांचे २५९

अभिमन्यु बाळ गरुडाचें ग पिलूं
लागले सारे पळू कौरवांचे २६०

अभिमन्यु बाळ सर्व मिळून मारिती
अधर्मयुद्ध करिती द्रोणादीहि २६१

उत्तरेचा कंथ लढून पडला
पाय त्याला हो मारिला जयद्रथें २६२

गोविंद गोविंद मुखानें म्हणत
रणांत पडत अभिमन्यु २६३

गोविंद गोविंद मंजुळ मुखीं वाचा
पति पडे उत्तरेचा रणांगणी २६४

दुरून दिसतो सोन्याचा कळस
कृष्ण-अर्जुनांचा रथ येत असे २६५

कळीचा नारद त्रैलोक्यांत हिंडे
दुष्टांचे धिंडवडे करीतसे २६६

कळीचा नारद उभारीतो शेंडी
विणा तो खाकुंडी शोभे सदा २६७

कळीचा नारद उडते त्याची शेंडी
उच्चार सदा तोंडी रामनामाचा २६८

कळीचा नारद त्याचे रूप कोणा कळे
दुष्टांचा गर्व गळे त्याच्यामुळें २६९

वाल्याचा वाल्मिकि नारदाने केला
असा कोण आहे संती नाही उद्धरीला २७०

तुळशी करूं पूजा तुळशीला आल्या शेंगा
पतिव्रता माझी गंगा उषाताई २७१

तुळशी ग बाई हिरवा तुझा पाला
सत्यभामेनें गोविंदाला दान दिले २७२

तुळशीला पाणी घाली तुळस कोवळी
पुत्र मागते सांवळी उषाताई २७३

तुळशी ग बाई तुझा जन्म रानींवनी
बैस अंगणांत जागा देते वृंदावनी २७४

तुळशीला पाणी घाली तुळशीखाली बसे
प्रत्यक्ष गंगा दिसे मायबाई २७५

सकाळी उठोनी तोंड पाहिलें एकीचे
माझ्या जीवाच्या सखीचे तुळशीबाईचें २७६

तुळस पिकली तिला आल्या शेंगा
तिला पाणी घाली माउली माझी गंगा २७७

तुळशी ग माये तुझ्या मंजुळ्या झळकती
तेथें कृष्णनाथ खेळती सारीपाट २७८

काशी काशी म्हणून लोक जाती ग धांवत
काशी माझ्या अंगणांत तुळसादेवी २७९

तुळशी ग बाई तुझे वाळू झाले फांटे
पलंगाला केली गाःते गोविंदाच्या २८०

तुळशी ग माई हिरवा तुझा पाला
शेल्याला ग रंग दिला भाईरायांनी २८१

तुळशी ग बाई तुझी कातर कातर पानें
येतां जातां गोविंदाने विडा नेला २८२

काशी काशी म्हणुनी लोक जाती दुरी
काशी माझ्या घरी तुळसादेवी २८३

संध्याकाळ झाली वाजले ग सात
तुळशीला हात जोडीयेले २८४

□ □

६ : तीर्थक्षेत्रे, पुरेपट्टणे

रसपरिचय

महाराष्ट्रातील सर्वांत थोर नगरी कोणती? जेथे साधुसंतांनी प्रेमाचा पाऊस पाडला ती विठूची पंढरपुरी. पंढरपुराचे वर्णन करता करता बायकांना जणू उचंबळून येत आहे. पंढरपुरास जावे, भीमेच्या, त्या चंद्रभागेच्या तीरावर क्षणभर उभे राहावे आणि मुक्त व्हावे :

जाऊं ग पंढरी उभी राहूं ग भीवरी
तेणे मुक्ती चारी येती हाता

पंढरपुरातील आषाढी-कार्तिकीचा सोहळा कोण वर्णन करील? परंतु ही थोडी चव घ्या.

पंढरपुरांत विण्याशीं वीणा दाटे
साधुला संत भेटे वाळवंटी
वीण्याला लागे वीणा दिंडीला भेटे दिंडी
यात्रेला येती झुंडी पंढरीस
टाळ-मृदंगाचा विठूच्या नामाचा
गजर पुण्याचा पंढरींत

आषाढीची यात्रा जमावी, प्रेमाचा पूर यावा, परंतु अशाच वेळी एखादे वेळेस प्रचंड पाऊस पडून चंद्रभागेस पूर यावा. मग कोण गडबड! कोणी नारळ फोडतात, कोणी पाणी उतरावे म्हणून लिंबू फेकतात:

भरली चंद्रभागा नाव निघाली बुडाया
नेला नारळ फोडाया रखुमाईला
भरली चंद्रभागा लिंबू टाका उताऱ्याला
जाणें आहे साताऱ्याला भाईरायाला

परंतु पूर ओसरत नाही. पाण्याच्या लाटा आपटत असतात. इतरांची गोष्ट दूरच राहो; परंतु प्रत्यक्ष विठोबाचाही टाळ-वीणा भिजतो. रखुमाईची चोळी शेवटी उंचावर वाळत घालण्यात येते:

भरली चंद्रभागा   पाणी करी सणासणा
भिजला टाळवीणा   विठ्ठलाची
भरली चंद्रभागा   पाणी लागलें भिंतीला
चोळी वाळते खुंटीला   रखुमाईची

पंढरपुरात फुलांना तोटा नाही. तुळशीच्या बागा, झेंडू- जिकडे तिकडे फुलेच फुले:

पंढरीसी जाता   पंढरी लाललाल
पेरिली मखमल   विठ्ठलाची
पंढरीसी जातां   पंढरी हिरवीगार
तुळशीला आला भर   विठ्ठलाच्या

माळणी विठोबाला व रखुमाईला फुलांचे शृंगारसाज करतात:

पंढरपुरांत   माळिणी ठमा रमा
फुलांचा पायजमा   विठ्ठलाला
पंढरपुरांत   माळिणी उंच काठी
फुलांची चिंचपेटी   रखमाईला

पंढरपुरातील सर्वच वस्तू पवित्र, अणुरेणू पवित्र. बायका म्हणतात, "पंढरपुरातील वस्तूंची रूपे आम्हांला धारण करू देत.

पंढरपुरींची   होईन वेळणी
वाढीन साखरफेणी   विठ्ठलाला
पंढरपुरीची   होईन परात
वाढीन साखरभात   विठ्ठलाला

मला परात होऊ दे, वेळणी होऊ दे, गडू होऊ दे, मला पक्षी होऊन शिखरावर बसू दे, पायरी होऊन संतांच्या पायांच्या धुळीने पवित्र होऊ दे. सारे जीवन जणू सेवेचे साधन व्हावे अशी उत्कटता या ओव्यांत आहे.

पंढरपूरींचा   होईन खराटा
झाडीन चारी वाटा   विठ्ठलाच्या

विठोबा-रखुमाईच्या संसाराचे वर्णन आहे. विठोबा बाजार करायला जातो,

परंतु साधुसंत भेटतात. तो लौकर कसचा येतो?

विठोबा रात्र झाली पंढरीच्या बाजारात
रुक्मिणी दरवाजांत वाट पाहे

विठोबाला उपवास असावा. रखुमाई राणी त्याला फराळासाठी पेढे नेते, अशी गंमत आहे.

त्या विठ्ठलाशिवाय आम्हाला कोणाचा आधार? तो विठोबाच सारे काही.

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
बहीण चंद्रभागा पुंडलीक माझा भाई

असे हे नाते स्त्रियांनी जोडले आहे.

पंढरपुराला जाण्याचा रस्ता नीट ठेवावा. परंतु एखादा रस्त्यातून खणून माती नेतो. खळगे पडतात. गाड्या उलटतात:

पंढरीची वाट कोणा पाप्यानें नांगरीली
गाडी बुक्क्याची उधळली विठ्ठलाची

पंढरपुरचा जसा महिमा, तसाच कोल्हापूरच्या अंबाबाईचाही:

चला जाऊं पाहूं कोल्हापुरी राहूं
ओंवियांत गाऊं अंबाबाई

अंबाबाईच्या देवळाभोवती सर्व कारागिरांची वस्ती आहे. तेथे तांबट आहेत, सोनार आहेत; दागिने पटवणारे पटवेकरी आहेत. विणकरही सभोवती आपले माग चालवीत आहेत व अंबाबाईचा पीतांबर विणीत आहेत. शहराच्या बुरुजांवर तोफा आहेत, दरवाज्याजवळ अंबाबाई रक्षणार्थ बसली आहे :

कोल्हापुर शहरी बुरुजाबुरुजा भांडी
वेशीच्या पहिल्या तोंडी अंबाबाई

पुण्याच्या पर्वतीचे वर्णन नंतर दिले आहे. पुढील प्रसिद्ध ओवी सर्वांस माहिती आहे :

येथून नमस्कार पुण्याच्या पर्वतीला
दुष्टांच्या संगतीला लागूं नये

कोणी बांधली ही पर्वती? तिचे सोन्याचे कळस कोणी केले?

पर्वती पर्वती तिला कळस सोन्याचे
प्रिय दैवत पेशव्यांचे नवें झालें
आणि ती तुळशीबाग!

चला जाऊं पाहूं तुळशीबागेचा सांवळा
नित्य पोषाक पिवळा रामरायाचा

मैत्रिणी जमलेल्या असाव्यात; आपल्या गावाहून त्या आलेल्या असतात. कोणी वाईची, कोणी पुण्याची, कोणी साताऱ्याची, कोणी कोल्हापूरचीं. मग आपापल्या गावाची बढाई त्या सांगतात. वाईवाली म्हणते:

काय सांगूं बाई वाई देशाची बढाई
तटाखालून कृष्णाबाई वाहतसे
काय सांगूं बाई वाई देशाची रचना
हिरे जडले सिंहासना कृष्णाबाईच्या
पुणे झाले जुनें वाईला बारा पेठा
सवाई झेंडा मोठा कृष्णाबाईचा

परंतु सातारकरीण काय म्हणते ऐका:

पुणे झाले जुनें सातारा नित्य नवा
जलमंदिराची हवा चला घेऊं

साताऱ्याजवळ समर्थांचा सज्जनगड, ती माहुली, तेथील ती कुत्र्याची समाधी, तेथील अहिल्याबाईने बांधलेले मंदिर! साताऱ्याची सर कोणाला येईल?

परंतु कोल्हापूरची म्हणते :

पुण्याची थोरवी सातारा नुरवी
सर्वांना हारवी कोल्हापूर

आणि ती इंद्रायणीच्या तीरावरची आळंदी!

आळंदीला जावें जीवें जीवन्मुक्त व्हावें
तेथे श्री ज्ञानदेवे दिव्य केले

तसेच देहू गाव; ही गोड ओवी ऐका:

देहूला जाऊन देह विसरावा
अंतरी स्मरावा तुकाराम

देहूचे भाग्य कोणी वर्णावे! तेथील अणुरेणूंतूनसुद्धा 'विठ्ठल विठ्ठल' आवाज येत असेल:

देहूचा अणुरेणू गर्जे विठ्ठल विठ्ठल
लोकां उद्धरील क्षणामाजी

आणि कोकणातील परशुरामाचे देवस्थान् तेथील ती पाखाडी. ती चढायला

कठीण असलेली चढण. आई मुलाला म्हणते:

भार्गवराम देवाजीची पायठणी अवघड
येथून पायां पड गोपू बाळा

त्या देवळांला चुना किती लागला, उत्सवात जेंवणाचे वेळेस सार करतांना चिंच किती लागते, याची गमतीदार वर्णने आहेत :

तिन्ही देवांमध्ये भार्गवराम उंच
सव्वा खंडी चिंच उत्सवाला
तिन्ही देवांमध्ये भार्गवराम जुना
सव्वा खंडी चुना देवळाला

असा हा भार्गवराम; त्यांच्या पूजेला रोज कस्तुरी. आणि एक सखी म्हणते:

कस्तुरीचा वास माझ्या ओच्याला कुठूनी
आल्ये सख्याला भेटूनी भार्गवरामा

आणि हिंदुस्थानच्या दक्षिणेकडचा तो रामेश्वर - त्याचे एका ओवीतील वर्णन वाचा:

देवांमध्ये देव रामेश्वर अति काळा
त्याच्या दोंदावर रुद्राक्षांच्या रुळती माळा

चिंचवड, नरसोबाची वाडी, खंडोबा यांचीही वर्णने आहेत;

खोबऱ्याच्या वाट्या हळदी भरल्या
देव भंडारा खेळला जेजूरीचा

कोकणातील राजापूरच्या गंगेचेही वर्णन करणाऱ्या किती तरी ओव्या आहेत:

गंगाबाई आली तळकातळ फोडून
राजापुराला वेढून वस्ती झांली

आणि प्रसिद्ध मुंबापुरी! तेथील ती मुंबादेवी:

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची कंबर
निरी पडली शंभर पैठणीची

मुंबईच्या व्यापाराचे वैभव वर्णिलेले आहे:

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पायरी
सव्वा लक्ष तारूं उभें कोटाच्या बाहेरी

परंतु मुंबई नवीन चालीरीतीचे होते. सुधारणा येतात:

मुंबई मुंबई सारी मुंबई रांगडी

केरव्यावांचून कोणी भरेना बांगडी

साऱ्या बायकांना केरवा हातात हवा; परंतु आज केरवाही मागासला. आता रेशमी बांगडी हवी. आणि मुंबईच्या नळांवरची ही टीका ऐका. कोकणात लांब असलेल्या विहिरीवरून ज्यांना पाणी आणावे लागते अशा बायकांनी ही ओवी रचिली असावी:

मुंबईच्या बायका आहेत आळशी
नळ नेले चुलीपाशीं इंग्रजांनी

इंग्रजांच्या कर्तृत्वाचे हे वर्णन आहे:

मुंबई शहरांत घरोघरीं नळ
पाण्याचे केले खेळ इंग्रजांनी

बडोदे शहराच्या काही गमतीदार ओव्या मिळाल्या. कोणत्याही शहरात नवीन रचना करावयाची असली म्हणजे पाडापाड करावी लागते; जुनी घरे पाडावी लागतात. नवीन रस्ते करावे लागतात; लोकांना नुकसानभरपाई दिली तरी ते असंतुष्ट असतात. आणि बायकांना तर जुने घरदार जाणे म्हणजेच फार वाईट वाटते. इतकी वर्षे सांभाळलेले नष्ट व्हावे याचा त्यांना राग येतो. बडोदे शहरात सुंदर प्रशस्त रस्ते आहेत; परंतु कोणी तरी बाई कुरकूर करते;

बडोदे शहरांत पाडीले जुने वाडे
मोठ्या ग रस्त्यांसाठी नवे लोक झाले वेडे
राणीच्या हातींचा राजा झाला ग पोपट
वाडे पाडून बडोद्या रस्ते केले ग सपाट

परंतु काहींनी अशी कुरकूर केली, तर काहींना या गोष्टीचा अभिमान वाटतो:

बडोदे वाढले रस्ते नि इमारती
डोळे दिपवीती पाहणारांचे

या ओवीत जरा उपहासही आहे का? बडोदे वाढले; रस्ते नि सुंदर इमारती वाढल्या; परंतु माणसांची मने वाढली का? मोठ्या रस्त्यावरून हिंडणारांची, मोठे रस्ते करणारांची मने मोठी झाली का? एक बाई म्हणते, "हो"

सयाजीराव महाराज बडोद्याचे धनी
राज्यकर्ते अभिमानी जनतेचे

जनतेचा अभिमान धरणारे श्री सयाजीराव आहेत:

बडोदे शहरांत वडांची थंड छाया

प्रजेवर करती माया सयाजीराव

वटवृक्षाच्या शीतळ छायेप्रमाणे महाराज प्रजेवर छाया करतात असे वर्णन आहे.

अनेक तीर्थक्षेत्रांचे एकेका ओवीत वर्णन आहे. आणखीही ओव्या असतील; परंतु मला थोड्याशा मिळाल्या. कोकणाचे हे वर्णन ऐका:

समुद्राच्या कांठी कोंकण वसलें
कृष्ण-अर्जुन बैसले रथावरी
समुद्राच्या कांठी कोंकण वसले
सुखाने हासले नारळीत

नारळी-पोफळीच्या छायेत कोकण सुखाने हसत आहे. आणि समुद्रातले व डोंगरावरचे ते पहारा करणारे किल्ले:

कोकणपट्टी रत्नागिरीचा जिल्हा
जळी स्थळीं किल्ला पहारा करी

आणि मुंबई व अलिबाग यांच्यामध्ये आलेल्या खांदेरी-उंदेरीचे हे वर्णन:

खांदेरी उंदेरी या दोघी जावा जावा
मध्ये ग कुलाबा हवा घेई

अशी ही वर्णन आहेत. अशा शेकडो ओव्या असतील. परंतु त्यांचा संग्रह कोण करणार?

तीर्थक्षेत्रे, पुरेपट्टणे : ओव्या

पंढरीसी जातां पंढरी पिवळी
आंत मूर्त सांवळी विठ्ठलाची १
पंढरपुरा जाऊं भेटीला काय नेऊं
तुळशी बुक्क्याची विठ्ठला प्रीत बहु २
जाऊं ग पंढरी उभी राहूं ग भीवरी
तेणें मुक्ति चारी येती हाती ३
पंढरीचा राणा चला पाहायाला जाऊं
संसारांत होऊं कृतकृत्य ४
पंढरपुरांत होतो नामाचा गजर
नादानें अंबर कोंदतसे ५

पंढरपुरांत आषाढी कार्तिकी
सोहळा त्रैलोकीं असा नाही ६
पंढरपुरात विण्याशीं वीणा दाटे
साधूला संत भेटें वाळवंटी ७
वीण्याला लागे वीणा दिंडीला भेटे दिंडी
यात्रेला येती झुंडी पंढरीस ८
टाळ-मृदुंगाचा विठूच्या नामाचा
गजर पुण्याचा पंढरीत ९
पंढरपुरीचा घेऊन जाऊं बुक्का
संसारीच्या दुःखा दूर करूं १०
पंढरपुरींच्या घेऊन जाऊं लाह्या
येतील आया-बाया त्यांना देऊं ११
पंढरपुरांत कसला गलबला
चंद्रभागे पूर आला वाट नाही १२
भरली चंद्रभागा बुडाले हरिदास
पितांबराची घाली कास पांडुरंग १३
भरली चंद्रभागा नाव निघाली बुडाया
नेला नारळ फोडाया रखुमाईला १४
भरली चंद्रभागा लिंबू टाका उताऱ्याला
जाणें आहे साताऱ्याला भाईरायाला १५
भरली चंद्रभागा उतार दे ग माये
पैलाड जाणें आहे भाईरायाला १६
भरली चंद्रभागा पाणी करी सणासणा
भिजला टाळवीणा विठ्ठलाचा १७
भरली चंद्रभागा पाणी लागलें भिंतीला
चोळी वाळते खुंटीला रखुमाईची १८
पंढरपुरांत कसला गलबला
सत्यभामेने गोविंदाला दान केले १९
पंढरीसी जातां पंढरी लाल लाल
पेरली मखमल विठ्ठलाची २०

पंढरीसी जाता पंढरी हिरवीगार
तुळशीला आला भर विठ्ठलाच्या २१

पंढरीसी जातां उभा राहील खांबाशी
चुडे मागेल देवांशी विठ्ठलाशी २२

गुलाबाचीं फुलें रुपयाला बारा
हारतुरे गजरा करा विठोबाला २३

पंढरपुरांत माळिणी ठमा रमा
फुलांचा पायजमा विठ्ठलाला २४

पंढरपुरांत माळिणी उंच काठी
फुलांची चिंचपेटी रखुमाईला २५

माळ्याच्या मळ्यांत माळिणी गाणी गाती
पूजेला तुळशी नेती विठ्ठलाच्या २६

रुसली रखुमाई बैसली वाळवंटी
धरिली मनगटी विठ्ठलाने २७

चला जाऊं पाहूं खिडकीं उभ्या राहूं
पालखी येते पाहूं विठ्ठलाची २८

कोठे ग जातसा जातसा लवलाही
विठ्ठल-रखुमाई पहावया २९

कोठे ग जातसा जातसा लगबगा
भरली चंद्रभागा बघावया ३०

पंढरपुरांत रखुमाई सुगरीण
पापड तिने केले चंद्रासारखी घडावण ३१

पंढरपुरांत कशाचा वास येतो
कस्तुरीचें माप घेतो भाईराया ३२

पंढरपुरांत काय मौज पाहायाची
हंडी फुटली दह्याची गोकुळांत ३३

पंढरपुरामध्यें दुकानें गोळा केली
रथाला जागा दिली विठ्ठलाच्या ३४

पंढरपुरामध्ये काय बुक्क्याची धारण
पुसे बंगल्यावरून रखुमाबाई ३५

पंढरपुराची होईन वेळणी
वाढीन साखरफेणी विठ्ठलाला ३६

पंढरपुरीची होईन परात
वाढीन साखरभात विठ्ठलाला ३७

पंढरपुरीचा होईन मी गडूं
वाढीन ग लाडू विठ्ठलाला ३८

पंढरपुरींची होईन मी घार
तुपाची वाढीन धार विठ्ठलाला ३९

पंढरपुरींचा होईन कावळा
बैसेन राऊळा विठ्ठलाच्या ४०

पंढरपुरींची होईन पायरी
येतां जातां हरी पाय ठेवी ४१

पंढरपुरीचा होईन खराटा
झाडीन चारी वाटा विठ्ठलाच्या ४२

पंढरपुरीची होईन पोफळी
सुपारी कोवळी विठोबाला ४३

विठोबाला रात्र झाली पंढरीच्या बाजारांत
रुक्मिणी दरवाज्यांत वाट पाहे ४४

विठोबाला एकादशी रखुमाई माडी चढे
तबकां आणी पेढे फराळाला ४५

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
मला पंढरीसी नेई कृष्णाबाई ४६

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
बहीण चंद्रभागा पुंडलीक माझा भाई ४७

मजला नाही कोणी तुजला आहे रे माहीत
यावे गरुडासहित पांडुरंगा ४८

माझ्या धांवण्याला कोण धावेल दूरचा
राजा पंढरपूरचा पांडुरंग ४९

विठोबा माझा बाप माहेर माझे करी
पिंजरेने ओटी भरी रखुमाई ५०

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
त्या नगरीचे नांव काई पंढरपूर ५१
पंढरीची वाट कोण्या पाप्याने नांगरीली
गाडी बुक्क्यांची उधळली विठ्ठलची ५२
समुद्र आटला मासा करपला
शेला झळकला विठ्ठलाचा ५३
भाजी घ्या भाजी घ्या भाजी घ्या माठाची
आली गवळण थाटाची मथुरेची ५४
भाजी घ्या भाजी घ्या भाजी घ्या मेथीची
आली गवळण प्रीतीची द्वारकेची ५५
दही घ्या दही घ्या दही घ्या गोड गोड
आली गवळण गोड गोकुळीची ५६
चला जाऊं पाहूं कोल्हापुरी राहूं
ओवियांत गाऊं अंबाबाई ५७
कोल्हापूर शहर भोंवती सोनार
घडवत चंद्रहार अंबाबाईचा ५८
कोल्हापूर शहर भोंवती तांबट
नवें घडवीत ताट अंबाबाईला ५९
कोल्हापूर शहर भोंवती पटवेकरी
पटवीली गळेसरी अंबाबाईची ६०
कोल्हापूर शहर भोंवती विणकर
विणीती पीतांबर अंबाबाईचा ६१
कोल्हापूर शहर पाण्याच्या डबक्यांत
फुलांच्या झुबक्यांत अंबाबाई ६२
कोल्हापूर शहर विंचवांचे तळें
वस्ती केली तुझ्यामुळें अंबाबाई ६३
कोल्हापूर शहर दुरून दिसे मनोहर
पांच शिखरें लहानथोर अंबाबाईचीं ६४
येथून नमस्कार महादरवाजासन्मुख
माझी विनंति आईक अंबाबाई ६५

येथून नमस्कार महादरवाजापासून
आली रथांत बैसून अंबाबाई ६६

कोल्हापूर शहरी बुरुजा बुरुजा भांडी
वेशीच्या पहिल्या तोंडी अंबाबाई ६७

येथून नमस्कार पुण्याच्या पर्वतीला
दुष्टांच्या संगतीला लागूं नये ६८

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
हिराबागेची शेवंती फुलूनी गेली ६९

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरतीं
तेथून कृपा करिती देवदेव ७०

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
धरण बांधिले खालती इंग्रजांनी ७१

पर्वती पर्वती पर्वतीचा रमणा
दक्षिणा विद्वानांना वाटतात ७२

पर्वती पर्वती तिला कळस सोन्याचे
प्रिय दैवत पेशव्यांचे नवें झाले ७३

येथूनी नमावी पुण्याची चतुःशृंगी
दुष्टांच्या ग संगी लागूं नये ७४

चला जाऊं पाहूं तुळशीबागेचा सांवळा
नित्य पोशाख पिवळा रामरायाचा ७५

चला जाऊं पाहूं तुळशीबागेतला राम
जिवाला आराम संसारात ७६

पुणें झालें जुनें वाईला बारा पेठा
सवाई झेंडा मोठा कृष्णामाईचा ७७

काय सांगूं बाई वाई देशाची बढाई
तटाखालून कृष्णाबाई वाहतसे ७८

काय सांगू बाई वाई देशाची रचना
हिरे जडले सिंहासना कृष्णाबाईच्या ७९

पुणें झाले जुनें सातारा नित्य नवा
जलमंदिराची हवा चला घेऊं ८०

जाईन साताऱ्या पाहीन सज्जनगड
चढण नाही अवघड माणसाला ८१

जाईन साताऱ्या पाहीन सज्जनगड
पाहीन कावड कल्याणस्वामींची ८२

जाईन साताऱ्या पाहीन माहुली
तेथें वाहते माउली कृष्णाबाई ८३

जाईन साताऱ्या माऊली पाहीन आधीं
तेथे ग कुऱ्याची आहे पवित्र समाधी ८४

जाईन साताऱ्या माउली पाहीन
संगमी न्हाईन कृष्णाबाईच्या ८५

जाईन साताऱ्या मी माहुली पाहीन
देवी अहिल्याबाइने मंदिर ठेविले बांधून ८६

जाईन साताऱ्या पाहीन सज्जनगड
समर्थाची ग समाधी पाहून तरती दगड ८७

पुण्याची थोरवी सातारा नुरवी
सर्वांना हारवी कोल्हापूर ८८

आळंदीला शोभा इंद्रायणीच्या पुलानें
समाधी घेतली बारा वर्षाच्या मुलानें ८९

आळंदीला आहे भिंत सामक्षेला
सांगते सर्वाला गर्व नको ९०

आळंदीला जावे जीवें जीवनमुक्त व्हावे
तेथे श्री ज्ञानदेवें दिव्य केले ९१

देहूला जाऊन देह विसरावा
अंतरी स्मरावा तुकाराम ९२

देहूला जाऊन देह विसरू या
ओवियां गाऊं या तुकाराम ९३

देहूला राखीले पाण्यांत अभंग
अभंग भक्तिरंग तुकोबांचा ९४

देहूचा अणूरेणू गर्जे विठ्ठल विठ्ठल
लोकां उद्धरील क्षणामाजी ९५

चिंचवड क्षेत्री मोरया गोसावी
त्याची ओवी गावी विसरू नये ९६
आधी नमन करूं चिंचवडीच्या मोरया
सुरूच्या समया तेवताती ९७
सहज मी उभी होत्ये मनांत ये कल्पना
नित्य जावें दर्शना मोरयाच्या ९८
भार्गवराम देवाजीची पायठणी अवघड
येथून पायां पड गोपूबाळा ९९
वाजंत्री वाजती बाणगंगेच्या धक्यावरी
परशुराम सख्यावरी अभिषेक १००
दिंडी- दरवाज्याने भार्गवराम येतो जातो
शुक्रवारी वाजा होतो चौघड्याचा १०१
दिंडी- दरवाज्याने भार्गवराम येतो जातो
नळ सोडून पाणी घेतो संध्येसाठी १०२
रेणुकामाईचा भार्गवराम तान्हा
सभामंडपी पांळणा बांधीयेला १०३
तिन्ही देवांमध्ये भार्गवराम उंच
सव्वा खिंडी चिंच उत्सवाला १०४
तिन्ही देवांमध्ये भार्गवराम काळा
त्याच्या गळां माळा रुद्राक्षांच्या १०५
तिन्ही देवांमध्ये भार्गवराम जुना
सव्वा खंडी चुना देवळाला १०६
भार्गवराम देव उभे रेड्यावरी
निळ्या घोड्यावरी स्वार झाले १०७
अक्षय तृतीयेला उदकुंभ द्यावा
मनांत स्मरावा भार्गवराम १०८
अक्षय तृतीयेला जन्मले परशुराम
मातेला मारूनी पुरवीती पितृकाम १०९
एकवीस वेळां निःक्षत्री केली धरणी
अद्‌भुत वाटे करणी परशुरामाची ११०

केशर कस्तुरी बारा रुपये तोळा
श्रीमंत लावी टिळा भार्गवराम १११
कस्तुरीचा वास माझ्या ओच्याला कुठूनी
आले सख्याला भेटूनी भार्गवरामा ११२
देवांमध्ये देव रामेश्वर अतिकाळा
त्याच्या दोंदावर रुद्राक्षांच्या रुळती माळा ११३
दिवसांची दिवटी तेथें एवढा कोण राजा
कुळस्वामी देव माझा पालखीत ११४
शेवंती फुलली नऊशे पाकळी
शाळुंका झांकली सोमेश्वराची ११५
आठ दिवसांच्या शनिवारी वाडी गांवाला वारी वाटा
श्रीपाद स्वामी माझा वाडी गांवचा वैद्य मोठा ११६
संकटाच्या वेळे कोणे ग पावला
नवसाला आला दत्तात्रेये ११७
आठा दिशी आदितवार नाहीं मजला कळला
देव भंडारा खेळला जेजुरीचा ११८
खोबऱ्याच्या वाट्या हळदी भरल्या
देव भंडारा खेळला जेजुरीचा ११९
सिंहस्थी नाशीक कन्यागती वाई
जो जो कोणी जाई मुक्त होई १२०
अलीकडे नाशीक पलीकडे रामराजा
मधून ओघ तुझा गोदाबाई १२१
गंगाबाई आली चौदा कुंडे ती वहात
यात्रा येतसे धांवत राजापूरा १२२
गंगाबाई आली चौदा कुंडें ती भरून
यात्रा येतसे दुरून राजापूरा १२३
गंगाबाई आली तळकातळ फोडून
राजापुराला वेढून वस्ती झाली १२४
आल्या गंगाबाई वडाच्या बुंध्यांतूनी
चौदाही कुंडांतूनी प्रकटल्या १२५

कोळथऱ्या कोळेश्वर दाभोळे दाभोळेश्वर
पंचनदी सत्तेश्वर ज्योतिर्लिंग १२६

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची कंबर
निरी पडलीं शंभर पैठणीची १२७

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पायरी
निरी पडली बाहेरी पैठणीची १२८

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पाटली
सारी मुंबई बाटली काय सांगू! १२९

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पायरी
सव्वा लक्ष तारूं उभे कोटाच्या बाहेरी १३०

मुंबई मुंबई सारी मुंबई रांगडी
केरव्यावांचून कोणी भरीना बांगडी १३१

मुंबईच्या बायका आहेत आळशी
नळ नेले चुलीपाशी इंग्रजांनी १३२

मुंबई शहरांत घरोघरी नळ
पाण्याचे केले खेळ इंग्रजांनी १३३

बडोदे शहरांत पाडीले जुने वाडे
मोठ्या ग रस्त्यांसाठी नवे लोक झाले वेडे १३४

राणीच्या हातींचा राजा झाला ग पोपट
वाडे पाहून बडोद्या रस्ते केले ग सपाट १३५

बडोदे शहरांत वडांची थंड छाया
प्रजेवर करती माया सयाजीराव १३६

बडोदे शहरांत जो जो दिसे वाडा पडका
तो तो ग पाडून केल्या लांब रुंद सडका १३७

सयाजी महाराज बडोद्याचे ग धनी
राज्यकर्ते अभिमानी जनतेचे १३८

बडोदे वाढलें रस्ते नि इमारती
डोळे दीपवीती पाहणारांचे १३९

पन्नास पाकळी गुलाबाच्या फुला
लक्षुमण झोला पाहण्याजोगा १४०

हरिद्वारची गंगा अत्यन्त पवित्र
तिने माझीं गात्रं शुद्ध केली १४१

पवित्र ग स्नान शरयूचे कांठी
माकडांची दाटी तेथे फार १४२

भक्तजन जाती मणिकर्णिकेचे काठी
देऊळांत दाटी विश्वनाथाच्या १४३

विष्णुला आवडे तुळशीचें पान
त्रिवेणी-संगम पाहीयेला १४४

गुलाबाचें फूल गणपतीला आवड
गंगेची कावड रामेश्वराला १४५

येथून नमस्कार पुण्यापासून कलकत्त्याला
मोतीं तुमच्या अडकित्त्याला मामाराया १४६

समुद्राच्या कांठी कोंकण वसलें
सुखानें हांसले नारळींत १४७

समुद्राच्या काठीं कोंकण वसलें
कृष्ण-अर्जुन बैसले रथावरी १४८

कोंकणपट्टीचा रत्नागिरी जिल्हा
जळी स्थळीं किल्ला पहारा करी १४९

पंढरीचा देव अमळनेरा आला
भक्तीला लुब्ध झाला पांडुरंग १५०

कड्यावरचा गणपती मूर्ति आहे मोठी
नित्य चढे घाटी मामाराया १५१

सोमेश्वर देवाजीच्या पाटांगणीं चिरा
लोटांगण घेतो हिरा गोपूबाळ १५२

झोळाई मातेचा आधी घ्यावा कौल
मग टाकावें पाऊल प्रवासाला १५३

पालगड गांवाची किती आहे लांबी रुंदी
स्वयंभू आहे पिंडी शंकराची १५४

देव देव्हाऱ्यांत गणपती गाभाऱ्यांत
पालगड गांवींचा सोमेश्वर डोंगरांत १५५

पालगड गावाला दूरवांचे बन
उत्तम देवस्थान गणपतीचें १५६
काय सांगूं बाई पालगडची हवा
गणपतीला मुकुट नवा उत्सवांत १५७
हळदीची वाटी झोळाईचे हातीं
पालगड गांवची घाटी उतरली १५८
काळकाई महामाई या दोघी ग गांवांत
तिसरी डोंगरांत झोळाई माता १५९
झोळाई मातेपुढे फुलली तगर
पालगड नगर शोभिवंत १६०
माझे दारावरनं कोण गेली सवाशीण
पालगड गांवची मोकाशीण झोळाई माता १६१
रामटेक गडावरी कर्णा वाजे झाईझाई
रामाला सिताबाई विडा देई १६२
खांदेरी उंदेरी या दोघी जावाजावा
मध्ये ग कुलाबा हवा घेई १६३

□ □

७: ऐतिहासिक व देशाच्या

रसपरिचय

स्त्रिया त्या त्या काळच्या घडामोंडींवरील ओव्या करतात. त्या घरातच गुरफटलेल्या असल्या तरी त्यांच्या कानांवर अनेक गोष्टी येतात. श्री शिवाजी महाराजाच्या या स्वराज्यस्थापनेच्या काळात अशा हजारो ओव्या मायाबहिणींनर रचिल्या असतील, झोपांळ्यांवर म्हटल्या असतील. परंतु मला ओव्या गोळा करण्यास वेळ मिळाला नाही. या प्रकरणात फारच थोड्या पूर्वीच्या काळावर आहेत. शिवाजी महाराज म्हटले की, त्यांचे प्रतापगड, सिंहगड, रायगड हे किल्ले डोळ्यांपुढे उभे राहतात. शिवाजीमहाराजांचा पुत्र राजाराम सोन्याच्या पाळण्यात आंदुळला जात आहे अशी एक गोड ओवी मिळाली आहे:

रायगडाच्या किल्ल्यावरी सोन्याचा पाळणा
शिवाजीचा बाळ तान्हा राजाराम

श्री शिवछत्रपती हे शंकराचे अवतार मानले जातात. जो गोरगरिबांत येतो, त्यांच्यासाठी धडपडतो, तो देवाचा अवतार. शिवाजीमहाराजांना अवतार नाही म्हणायचे तर कोणाला?

शिवाजी छत्रपति सांबाचा अवतार
मावळे वानर रामरायाचे

आणि ही सुंदर मार्मिक ओवी ऐका:

वानरांकरवी राम रावणा लोळवी
मावळ्यांच्या हातीं शत्रु शिवाजी बुडवी

शिवछत्रपती दिल्लीहून कसे निसटून आले ती गोष्ट स्त्रियांच्या कानावर गेली आहे. ती मोठीच ऐतिहासिक घटना होती. ती गोष्ट क्षणात महाराष्ट्रभर पसरली असेल व शिवाजीमहाराज येथे थांबले होते, तेथे उतरले होते अशा दंतकथा गावोगाव उत्पन्न झाल्या असतील:

खाऊच्या निमित्तें बादशहा फसविलें
शिवाजी बसून आले पेटाऱ्यांत
शिवाजीराजांचे धन्य ग धाडस
भवानी आईचे तो ग लाडगे पाडस

भवानी-माता शिवाजीमहाराजांनाा सांभाळीत होती. जनतेसाठी धाडस करणाऱ्याला देव आशीर्वाद देतो. अशा धाडसाला समर्थांनी "श्रेष्ठ धारिष्ट" असे म्हटले आहे. शिवाजीमहाराज भवानी-मातेचे लेकरू असे या ओवीत म्हटले आहे. ते वाचून ह्रदय सद्‌गदित होते.

आणि आता शिवछत्रपतींच्या किल्ल्याचे महत्त्व ऐका:

शिवाजीचे किल्ले किल्ले ना, ती तो किल्ली
ज्याच्या हाती तो जिंकी दिल्ली उत्तरेची

शिवाजीमहाराजांचा महिमा ऐका :

शिव छत्रपति धन्य ग धन्य राजा
पोटच्या पुत्रापरी पाळिली त्याने प्रजा
दळितां कांडीता तान्हेबाळ आंदुळीतां
शिवाजी मराठा आठवावा

मराठ्यांच्या इतिहासात पहिले बाजीराव व चिमाजीअप्पा म्हणजे राम-लक्ष्मणांची, भीमार्जुनांची जोडी! त्यांचे परस्परांवर किती प्रेम! चिमाजीअप्पा आपल्या पत्रांतून बाजीरावांचा उल्लेख "राया" अशा गोड शब्दांनी करतात. आणि वसईच्या संग्रामाचा तो वीररसपूर्ण अमर प्रसंग :

चिमणाजी बाजीराव हे दोघे सख्खे भाऊ
म्हणती वसई घेऊं एका रात्रीं

दोघे भाऊ अंबारीत बसून शनिवारवाड्यात जातात असे वर्णन आहे. चिमाजीअप्पा व बाजीराव गेले आणि शेवटच्या काळात दुसरे बाजीराव आले. ह्या दुसऱ्या बाजीरावांची एकच ओवी मिळाली :

चिमणाजी बाजी गेले दुसरे बाजीराव कैसे झाले
सारें पुणें धुंडाळीलें पैशासाठी

आणि नारायणरावांच्या वधाची ती दु:खद घटना! तिच्यावर ह्रदयाला घरे पाडणाऱ्या अशा ओव्या आहेत :

नारायणरावाला मारीलें हाडाचे केले फांसे

आनंदीबाई हांसे   पुण्यामध्यें

नारायणरावांच्या हाडांचे फासे करून आनंदीबाई सारिपाट खेळते, हसते यातील विरोध अत्यंत तीव्र आहे. गंगाबाई गरोदर, माहेरी गेलेली. दुपारची वेळ होती. नारायणराव जेवून उठले होते. लवंग-सुपारी खात होते. मरणाची कल्पनाही ध्यानीमनी नाही :

नारायणरावाला मारीलें   मारीलें दुपारी
त्यांनी खाल्ली होती   नुकती लवंग-सुपारी

किती सहृदय व करुण ओवी, देवही नारायणरावांचा साहाय्यकारी झाला नाही. रघुनाथराव आनंदीच्या अर्ध्या वचनात. गंगाबाई माहेरहून येईपर्यंत नारायणरावाचे प्रेत झाकून ठेविले होते. ती आल्यावर रडू लागली. परंतु आनंदीबाई काय करीत होती?

नारायणरावाला मारीलें   गंगाबाई रडे
आनंदीबाई पेढे   वांटीतसे

आनंदीबाईने राज्य स्वत:च्या पतीसाठी व पुत्रासाठी मिळविले.

आनंदीबाई   जशी कैकयी दुसरी
गिळिलें ग राज्य   जसें माणीक सूसरीं

पुढे राज्य दुसऱ्या बाजीरावाच्या हाती गेले, हा नवा धनी प्रजेला कितपत मानवला? समुद्र आटावा व मग माशांनी तडफडावे तसे प्रजेला झाले:

समुद्र आटला   मासा करी पाणी पाणी
राज्याला झाला धनी   बाजीराव

मराठ्यांच्या या फुटाफुटीचा इंग्रजांनी फायदा घेतला. आपसातील भांडणामुळे परक्यांचे फावले.

आनंदीबाईने   लोकी भांडण लावीलें
म्हणून फावलें   इंग्रजाला

अशा रीतीने स्वराज्य गेले. स्वराज्य का गेले याची कारणे स्त्रियांना माहीत होती. त्यांच्या मनावर या ऐतिहासिक घडामोडींचा परिणाम होत होता.

सर्वत्र अव्यवस्था माजली. पेंढारी लुटालुट करू लागले. इंग्रजांची तैनाती फौज सर्वत्र आल्यामुळे पूर्वीच्या सैन्याची जरुरी राहिली नाही. ते शिपाई पेंढारी बनले. कोकणातील हर्णैजवळच्या मुरूड गावी पेंढारी आले, त्यांच्या पुष्कळ ओव्या आहेत असे ऐकतो. मुरूडच्या देवीने पेंढाऱ्यांचा पाठलाग केला. तिने आपल्या

नाकातील मोती खडकाखाली लपवून ठेवले. नंतर ती लढायला गेली. पेंढाऱ्यांचे गलबत फुटले. अशा कथा आहेत. मुरूडला जाऊन या ओव्या गोळा केल्या पाहिजेत. मला एक दोन ओव्या मिळाल्या. पेंढारी गुपचूप आले व मुरूड गावचे सोने लुटते झाले :

पेंढारी कीं आले *आले मोनें मोनें*
मुरूड गांवचें सोने *लुटीयेलें*

मुरूड गावचे त्या वेळचे श्रीमंत बागुल यांच्याकडची धनदौलत सारी लुटली गेली.

इतर लहानमोठे मराठे सरदार लढत होते. इंग्रजांनी हळूहळू सर्वांना जिंकले. त्यांचे किल्ले घेतले. चंदनवंदन, रायरी, अर्गजा वगैरे किल्ल्यांचे उल्लेख आहेत. कुरुंदवाडकरांचे हे किल्ले होते.

स्वराज्य अशा रीतीने गेले. पुण्याला इंग्रजांचा बावटा आला आणि बुधवारवाडा भर दोन प्रहरी जळाला :

जळाला बुधवारवाडा *बाराच्या ठोक्याला*
साहेब लोकांला *वर्दी गेली*
जळाला बुधवारवाडा *उडालें कऊल*
नेला पुण्याचा डऊल *इंग्रजांनी*

आता पूर्वीचे भाग्य गेले. केवळ स्मृती राहिल्या. पुण्यात आता शनिवारवाडा पाहायचा नुसता. तेथें हत्ती चीत्कारत नाहीत, घोडे खिंकाळत नाहीत :

चला जाऊं पाहूं *पुण्यांतले वाडे*
जेथें लाखों घोडे *नाचले ग*

पुणे पूर्वी कसे होते?

पुणें शहरांत *छप्पन्न सरदार*
भरे ग दरबार *पेशव्यांचा*

परंतु ते सारे वैभव का गेले? लोकांनी मोठमोठे वाडे बांधले, परंतु राज्यकारभारात ते वेडे ठरले :

पुणें शहरांत *मोठेमोठे वाडे*
लोक परी वेडे *कारभारांत*

पुणे शहरात सर्वत्र हौद व पुष्करिणी. पाण्याचा सुकाळ झाला. परंतु परस्पर प्रेमभाव नाही, सहकार्य नाही. मत्सर बळावले. राज्य गेले :

पुणें शहरांत पाण्याचा सुकाळ
परी पुण्याचा दुष्काळ चोहींकडे

आणि ही एक सिद्धान्तस्वरूप ओवी ऐका :

पुणें झालें सुनें गुणें झालें उणें
देवें नारायणें न्याय दिला

यातील नारायण शब्दात नारायणराव पेशव्यांची आठवण आहे का? गुणहीन राष्ट्र मरते. परंतु वाईट दिवस का नेहमीच असतात? भरलेले घट रिकामे होतात, रिकामे भरतात. जगाच्या संसाराला सदैव भरती ओहोटी आहे. पुण्याला पुन्हा तेज चढेल. पुणे शहरात पुन्हा नवहिंदुस्थानचे राजकारण खेळू लागेल. कारण लोकमान्य टिळक अवतरले आहेत ना!

पुण्याचे वैभव पुन्हा दिसेल झळक
तेथें आहेत टिळक देशभक्त

आणि टिळकांच्या मूर्तीचे हे वर्णन वाचा :

पुण्याची पुण्याई पुन्हा ग उदेली
मूर्ति सांवळी जन्मली टिळकांची

ही ओवी जर पत्राचार्य अच्युतराव कोल्हटकरांना मिळाली असती तर ते नाचले असते. लोकमान्यांनी स्वदेशीचा मंत्र महाराष्ट्रभर नेला. गावोगाव स्त्री-पुरुषांनी स्वदेशीच्या शपथा घेतल्या. त्या वेळचे वातावरण अति तीव्र भावनांचे होते. बायांनी स्वदेशी बांगड्या, स्वदेशी वस्त्रे वापरण्याचा निश्चय केला. त्यांच्या ओव्यांतून राजकारण रंगले :

बायांनो नटूं नका परदेशी ग चिटानें
बुडती कारखाने साळीयांचे
विदेशी गंगड़ी नको भरूं ग हातात
अन्नान्न देशांत चोहींकडे

आज बहुतेक सारेच चहा पितात. परंतु तो आठ सालचा काळ. चहा साखऱ्या वर्ज्य झाला. साखर आज बहुतेक सारी स्वदेशात होते. परंतु त्या वेळची सारी मोरस साखर, मॉरिशसची साखर, चहावरील ही टीका ऐका :

चहाचें व्यसन दारूच्या बरोबरी
कपबशा घरोघरी खुळखुळती
चहाचें व्यसन कपबशा ग निघाल्या

प्रकृति क्षीण झाल्या घेणाऱ्यांच्या

लोकमान्यांना ती सहा वर्षांची शिक्षा होते. साऱ्या देशावर कृष्णछाया पसरते. महाराष्ट्रात सारे दु:खी होतात. ती सहा वर्षे गेली. लोकमान्य सुटून आले. सरकारने आधी वर्दी न देता एकदम वाड्याशी त्यांना आणून सोडले :

टिळक सुटले रात्रीचे साडेबारा
देशोदेशी गेल्या तारा देशभक्तां

लोकमान्यांना कोणी दत्ताचे अवतार मानीत. आणि जगच्चालकाला केलेली ही प्रार्थना ऐका :

पहिली माझी ओवी जगाच्या पालका
रक्षी टिळक बाळका रात्रंदिवस

आणि तो मुळशीचा सत्याग्रह! त्या वेळेस मुळशीचा पाळणा आणि इतर गाणी जिकडेतिकडे गेली. टाटा म्हणजे गरिबांच्या पायांतील काटा, असे बायामाणसे म्हणू लागली. त्या सत्याग्रहात स्त्रियाही सामील झाल्या. त्यांनी पराकाष्ठेचा त्याग केला, कष्ट व छळ सहन केले :

मुळशीच्या सत्याग्रहीं उडे आधणाचें पाणी
परि सत्याग्रही भगिनी मानिती तें फुलावाणी

टाटाचे हे वर्णन ऐका :

पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
मुळशीवर वरवंटा फिरवीला

आणि महर्षी सेनापती बापट! पाण्यात बुडणाऱ्या मुळशीची जमीन कोण वाचवणार! पूर्वी पृथ्वी बुडत होती तेव्हा देवाने वराह अवतार धरून दातांनी पृथ्वी वर ओढली. परंतु आज कोण घेणार अवतार? सेनापती बापट यांचे नाव पांडुरंग. हा पांडुरंग वराहावताराप्रमाणे उभा राहिला :

बुडत्या धरणीला पांडुरंग ग वराह
मुळशींत मोठा मांडीती सत्याग्रह

आणि सर्व हिंदुस्थानाला हलवणारी महात्माजींची चळवळ आली, राजकारण सर्वत्र पसरले. दिवाणखानी राजकारण चव्हाट्यावर आले. लोक स्वराज्याच्या गोष्टी उघडपणे बोलू लागले. गांधीजींनी हिंदुस्थान हे राष्ट्र केले. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी लहान-थोर, स्त्री-पुरुष उभे केले. होअरेसाहेब म्हणतात, "गांधींच्या चळवळींमुळे आम्ही हिंदुस्थानकडे अधिक आदराने पाहू लागलो." अशी ती

विराट चळवळ, ते महान आंदोलन. स्त्रियांचा आत्मा जागा झाला. तुरुंग म्हणजे घर झाले. भीती गेली. भ्याड झुंजार झाले. बायकांच्या वाणीला पल्लव फुटले. त्यांचे ओखाणे आता साधे नाही राहिले. त्यातून खादी, गांधी, स्वराज्य हे येऊ लागले :

इंग्रजांची नीति   फोडा नी झोडा
बाळकृष्णपंतांच्या नेसूं   खादीचा धोतरजोडा
किंवा स्वराज्य स्वराज्य   म्हणूं लागले सारे
बाळकृष्णपंत जखमी झाले   लाठीच्या मारे

असे ओखाणे मुली आपसांत म्हणत. स्त्रिया असे ओखाणे रचीत, फुगड्या खेळतानासुद्धा :

आपण दोघी   मैत्रिणी जोडीच्या
अंगांत चोळ्या   खादीच्या

असे म्हणू लागल्या. ओव्यांतूनसुद्धा ही स्फूर्ती प्रकट झाली:

गांधी जादुगार   भ्याडां करी धीट
दास्याचा आणी वीट   सर्व लोकां
गांधी हा गारुडी   वाजवीतो पुंगी
इंग्रजाला गुंगी   तेणे येई

लोक साधे होऊ लागले. यापूर्वीच्या गाण्यांतून लोक फॅशनेबल होऊ लागले, म्हणून बायकांनी टीका केली. घड्याळे आली, घड्याळाचे छेडे लोंबू लागले. जाकिटे आली, गळ्याभोवती उपरणी आली वगैरे टीका बायकांनी केल्या आहेत:

कळीची   करणी
झाली धोतराची   उपरणी

हे सुंदर गाणे ज्यांनी ऐकिले असेल त्यांना ती टीका माहीत असेल. परंतु गांधी आले, कोटसूट गेले, साधेपणा आला :

जिकडे तिकडे   जाहले गांधी गांधी
राहणी होई साधी   शिकलेल्यांची

आणि तो मिठाचा सत्याग्रह! त्याने तर स्त्रियांचा आत्मा खडबडून जागा झाला. महर्षी अण्णासाहेब कर्वे १९३० साली जगत्प्रवास करून परत आले. त्यांनी मुंबईला स्त्रियांच्या प्रचंड मिरवणुकी पाहिल्या. सभोवती पोलिस आहेत परंतु बायका कडेवरून समुद्राचे पाणी कायदेभंग करून नेत आहेत, राष्ट्रीय गाणी गात आहेत.

ते रोमहर्षक दृश्य पाहून स्त्रियांचा आत्मा जागृत व्हावा म्हणून सारे जीवन देणारा हा थोर पुरुष उचंबळला. ते मजजवळ बोटीत भेटले असता म्हणाले, "ते दृश्य पाहून माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले."

सत्याग्रहाने स्त्रियांची शक्ती जागृत झाली ऐका हे वर्णन :

कुठे या चालल्या हजारों आयाबाया
बंद मीठ लुटावया इंग्रजांचें
बाया झाल्या धीट त्यांची गेली भीति
हातात झेंडा घेती स्वराज्याचा

मी एकदा कोकणात माझ्या पालगड गावी गेलो होतो. रात्री सभा झाली. स्त्री-पुरुष जमले होते. माझी एक वृद्ध चुलत चुलती ती. सौ. जानकीकाकू हीही आली होती. दुसऱ्या दिवशी ती मला म्हणाली, "मी एक ओवी केली आहे. तो टिपून घे. तू ओव्या गोळा करतोस. ती ओवी टाकून नको देऊं. तू पुस्तक छापशील त्याला घाल. ही कबूल कर."

पालगड गांवांत काँग्रेसची भरली सभा
तेथें राहे हिरा उभा पंढरीनाथ

जानकीकाकूने एक ओवी सांगताच शेजारची दुसरी एक भगिनी आली. तिने लगेच दुसरी ओवी केली :

पालगडच्या गणपतीला बदामाचा शिरा
पालगड गांवचा हिरा पंढरीनाथ

त्या सभेतील वक्त्याचे नाव पंढरीनाथ होते. तो वक्ता त्या गावातीलच होता. गावच्या या मायबहिणींना आपल्या गावातील काँग्रेससेवकाचे कौतुक वाटले. त्यांची प्रतिभा जागृत झाली. त्यांनी ओव्या केल्या.

गांधींची चळवळ ही सर्वांची चळवळ. तीत स्त्रिया-पुरुष, मुले-बाळे सारी भाग घेतात. महात्माजींनी स्त्रियांचा आत्मा जागा केला. त्यांचे हे अपार उपकार आहेत :

गांधींची चळवळ मुलां बाळां बायकांची
भीति जाईल सर्वांची मनांतील

आणि स्वराज्यार्थ अहोरात्र झटणाऱ्या महापुरुषाला देवाने उदंड आउक्ष द्यावे असे स्त्रिया प्रार्थीत आहेत :

एक देणारे स्वातंत्र्य प्रिय देशा हिंदुस्थाना

देई उदंड आउक्ष   देवा महात्मा गांधींना

ऐतिहासिक व देशाच्या : ओव्या

रायगडच्या किल्ल्यावरी   सोनियाचा वरवंटा
शिवाजी मराठा   राज्य करी १
रायगडच्या किल्ल्यावरी   सोन्याचा पाळणा
शिवाजीचा बाळ तान्हा   राजाराम २
शिवाजी शिवाजी   ऐकून शत्रू पळे
सर्वांचा गर्व गळे   नाममात्रें ३
शिवाजी शिवाजी   ऐकून शत्रू धूम ठोकी
शिवाजी महाराजांची   सत्कीर्ती गावी लोकीं ४
शिवाजी छत्रपती   सांबाचा अवतार
मावळे वानर   रामरायाचे ५
वानरांकरवी   राम रावणा लोळवी
मावळ्यांचा हाती   शत्रु शिवाजी बुडवी ६
शिवछत्रपती   धन्य ग धन्य राजा
पोटच्या पुत्रापरी   पाळीली त्याने प्रजा ७
खाऊच्या निमित्तें   बादशाहा फसविले
शिवाजी बसून आले   पेटाऱ्यांत ८
शिवाजी राजाचें   धन्य ग धाडस
भवानी आईचें   तो ग लाडकें पाडस ९
शिवाजी राजाचें   धन्य ग धाडस
भवानी मातेस   चिंता त्यांची १०
शिवाजीचे किल्ले   किल्ले ना, ती तो किल्ली
ज्याच्या हातीं तो जिंकी दिल्ली   उत्तरेची ११
शिवाजीचे किल्ले   किल्ले चढाया कठीण
मोल प्राणाचें देऊन   करी मराठा तन १२
शिवाजीचे किल्ले   किल्ले चढाया कठीण
त्याचे मावळे चढती   त्यांना दोर ग लावून १३

दळीतां कांडीता तान्हें बाळा आंदूळतां
शिवाजी मराठा आठवावा १४

काय सांगूं सखी आले शिवाजीचे लोक
निघून गेले रातोरात झपाट्याने १५

वैरियांच्या हाती शिवराया देई तुरी
वैरियांच्या तोंडी शिवराया घाली भुरी १६

चिमणाजी बाजीराव हे दोघे सख्खे भाऊ
म्हणती वसई घेऊ एका रात्री १७

चिमणाजी बाजीराव दोघा भावांची लगट
शनिवारवाड्यांत हत्ती आला मोठ्या अंबारीसकट १८

चिमाजीअप्पांनी मसलत केली बाजीरावांनी मोडीली
नवी अंबारी जोडली पुण्यामध्यें १९

चिमणाजी बाजी गेले दुसरे बाजीराव कैसे झाले
सारे पुणें धुंडाळीलें पैशांसाठी २०

पेंढार की आलें आलें मोने मोने
मुरुडगांवचें सोने लुटीयेले २१

पेंढार की आलें आले ते दुपारी
बागलीणबाईची सरी लांबविली २२

आधी घेतला चंदन-वंदन मग घेतला सातारा
कुरुंदवाडकरांचा पेटारा चंदनाचा २३

आधी घेतला चंदन-वंदन मग घेतली रायरी
कुरुंदवाडकरांची पायरी चंदनाची २४

आधी घेतला चंदन-वंदन मग घेतला अरगजा
कुरुंदवाडकरांचा दरवाजा चंदनाचा २५

नारायणरावाला मारीलें हाडांचे केले फासे
आनंदीबाई हासे पुण्यामध्यें २६

नारायणरावाला मारीलें हाडांचे केले दोर
आणि पुणें ग शहरांत आनंदीबाई थोर २७

नारायणरावाला मारीलें हाडांचे केले मणी
पुण्याचे झाले धनी बाजीराव २८

नारायणरावाला मारीले मागल्या वेशीपाशी
गंगाबाई माहेराशी गेली होती २९
नारायणरावाला मारीलें आडव्या सोप्यांत
राणीचे वचनांत रघुनाथराव ३०
नारायणरावाला मारीलें मारीलें दुपारीं
गंगाबाई माहेरी होती तेव्हा ३१
नारायणरावाला मारीलें मारीलें दुपारी
त्यांनी खाल्ली होती नुकती लवंग-सुपारी ३२
नारायणरावावरी घातले मारेकरी
त्याचा प्रभूही कैवारी झाला नाही ३३
नारायणरावाला मारीलें मुडदा ठेवीला झांकोनी
आली माहेरा टाकूनी गंगाबाई ३४
नारायणरावाला मारीलें गंगाबाई गरभार
नवा भरविला दरबार रघुनाथरावांनी ३५
नारायणरावाला मारीलें गंगाबाई रडे
आनंदीबाई पेढे वांटीतसे ३६
नारायणरावाला मारीले आनंदीबाईला आनंद
तिनें तबकी गुलकंद वांटीयेला ३७
समुद्र आटला मासा करी पाणी पाणी
राज्याला झाला धनी बाजीराव ३८
आनंदीबाईनें पाप हो फार केले
म्हणून फावलें साहेबांचे ३९
आनंदीबाईनें लोकी भांडण लावीलें
म्हणून फावलें इंग्रजाला ४०
आनंदी ग बाई जशी कैकयी दुसरी
गिळलें ग राज्य जसें माणीक सूसरीं ४१
जळला बुधवारवाडा बाराच्या ठोक्याला
साहेब लोकाला वर्दी गेली ४२
जळला बुधवारवाडा उडालें कऊल
नेला पुण्याचा डऊल इंग्रजांनी ४३

चला जाऊं पाहूं पेशव्यांचा शनवारवाडा
दारांत चौघडा जेथें वाजे ४४

चला जाऊं पाहूं पुण्यांतले वाडे
जेथें लाखों घोडे नाचले ग ४५

पुणें शहरांत छपन्न सरदार
भरे ग दरबार पेशव्यांचा ४६

पुणें शहरांत मोठमोठे वाडे
लोक परी वेडे कारभारांत ४७

पुणें शहरांत केला पाण्याचा सुकाळ
परी पुण्याचा दुष्काळ चोहीकडे ४८

पुणें झाले सुनें गुणे झाले उणें
देवे नारायणें न्याय दिला ४९

पुणें झाले सुनें वाडे ओस पडे
वैभव सारे गेले मराठ्यांचे ५०

पुण्याचें वैभव पुन्हां दिसेल ठळक
तेथे आहेत टिळक देशभक्त ५१

पुण्याची पुण्याई पुन्हा ग उदेली
मूर्ति सांवळी जन्मली टिळकांची ५२

स्वदेशीचा मंत्र लोकमान्य देती
मिळेल त्यानें मुक्ति हिंदुस्थाना ५३

बायांनो नटूं नका परदेशी ग चिटानें
बुडती कारखाने साळियांचे ५४

विदेशी बांगड़ी नको भरूं ग हातांत
अन्नान्न देशांत हिंदुस्थानी ५५

चहाचे व्यसन दारूच्या बरोबरी
कपबशा घरोघरीं खुळखुळती ५६

चहाचें व्यसन कपबशा ग निघाल्या
प्रकृती क्षीण झाल्या घेणाऱ्यांच्या ५७

माझे दारावरनं कोण गेले गरजत
जयजयकार ग करीत टिळकांचा ५८

टिळक सुटले रात्रीचे साडेबारा
देशोदेशी गेल्या तारा देशभक्तां ५९

टिळक सुटले रात्रीचे साडेअकरा
घरोघरी साखरा वांटीयेल्या ६०

बाळ गंगाधर दत्ताचा अवतार
देशाचा कारभार घेई माथां ६१

कां ग सखी गर्दी काल जाहली रस्त्यांत
मिरवणूक होती येत टिळकांची ६२

पहिली माझी ओवी जगाच्या पालका
रक्षी टिळक बालका रात्रंदिवस ६३

पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
तेणें मुळशी पेटा बुडवीला ६४

पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
मुळशीवर वरंवटा फीरवीला ६५

पैसेवाला मोठा मुंबईचा आटाट
त्याच्या नाहीं पोटा दयामाया ६६

मुळशीत मोठा मांडीती सत्याग्रह
बुडत्या धरणीला पांडुरंग वराह ६७

मुळशीच्या सत्याग्रहीं उडे आधणांचे पाणी
परी सत्याग्रही भगिनी मानिती तें फुलावाणी ६८

जिकडे तिकडे जाहलें गांधी गांधी
अंगावर साधी खादी घालतात ६९

जिकडे तिकडे जाहले गांधी गांधी
तुरुंगी राजबंदी लाखों जाती ७०

गांधी हा गारुडी वाजवीतो पुंगी
इंग्रजाला गुंगी तेणे येई ७१

गांधी जादूगार भ्याडा करी धीट
दास्याचा आणी वीट सर्व लोकां ७२

जिकडे तिकडे जाहलें गांधी गांधी
राहणी होई साधी शिकलेल्यांची ७३

कुठें ग चालल्या	हजारों या ग नारी	
समुद्राचे तीरी	सत्याग्रहा	७४
चुलीपाशी आला	गांधींचा सत्याग्रह	
इंग्रजाला शह	घरींदारी	७५
कुठें या चालल्या	हजारो आयाबाया	
बंद मीठ लुटावया	इंग्रजांचे	७६
कुठे या चालल्या	बायका गाणी गात	
सत्याग्रह चळवळीत	उडी घ्याया	७७
बाया झाल्या धीट	त्यांची गेली भीती	
हातांत झेंडा घेती	स्वराज्याचा	७८
दूरच्या तुरुंगांत	भगतसिंगा फांशी देती	
गांधी चळवळ करिती	स्वराज्याची	७९
पालगड गांवांत	काँग्रेसची भरली सभा	
तेथें राहे हिरा उभा	पंढरीनाथ	८०
पालगडच्या गणपतीला	बदामाचा शिरा	
पालगड गांवचा हिरा	पंढरीनाथ	८१
माझ्या अंगणांत	हिरवा भाजीपाला	
खादीचा टोपीवाला	भाईराया	८२
गांधींची चळवळ	मुलाबाळां बायकांची	
भीती जाईल सर्वांची	मनातील	८३
उठली मुलें बाळें	त्यांना भीति कशी नाहीं	
वंदे मातरं दिशा दाही	घुमतसे	८४
एक देणारे स्वातंत्र्य	प्रिय देशा हिंदुस्थाना	
देई उदंड आऊक्ष	देवा महात्मा गांधींना	८५

□ □

८: व्रते, सण वगैरे

रसपरिचय

लग्न झाल्यावर मंगळागौर पूजायची. पहिली पाच वर्षे ही पूजा असते, श्रावणातला मंगळवार; त्या दिवशी ही पूजा करायची. पाऊस पडत असतो. पावसात नाना प्रकारची फुले फुलतात. मंगळागौरीसाठी भरपूर फुले जमविण्याची कोण खटपट, पहाटेपासून मुली उठतात. त्या आपल्या लहान भावांनाही बरोबर घेतात. पाटी-पाटी फुले गोळा होतात. आणि ती नाना झाडांची पत्री हवी. मोठी गंमत असते.

पहांटेच्या उठूं फुले आणूं पाटीभर
आज आहे मंगळागौर उषाताईंची

मंगळागौरीच्या दिवशी रात्रभर जागरण करायचे, खेळ खेळायचे, फुगड्या झिम्मे खेळायचे. लहानमोठ्या साऱ्या बायका मिसळतात, तो महोत्सव असतो. एक मैत्रीण विचारते:

कां ग सखी तुझे डोळे असे लाल
मंगळागौरीचें ग काल जागरण

फुगड्यांची मनोहर वर्णने आहेत. मैत्रिणी सासरहून माहेरी वा माहेराहून सासरी येतात. त्या भेटतात. आपण फुगडी खेळू, प्रेमाने गरगर फिरू, म्हणजे जन्मभर ओळख राहील असे त्या म्हणतात. लहानपणी ज्यांच्याबरोबर आपण हसलो-खेळलो त्यांची आठवण आयुष्यात चिरंजीव होते :

फुगडी खेळूं ये तूं ग मी ग सखी
राहील ओळखी जन्मवेरी

फुगड्यांनी बाप्पाजींचे घर दणाणते. जोराने दणदण फुगडी चालते. पाठीमागचा खोपा सुटतो व वेणी मोकळी होते:

दणदण फुगडी दणाणतो सोपा

खेळतां सुटे खोपा मैत्रिणीचा

किती यथार्थ व सुंदर आहे हे वर्णन नाही? आणि तरुण नवोढांमध्ये पोक्त सुवासिनीही मिसळतात. त्या पोक्त सुवासिनींनाही जुन्या प्रेमळ प्रसंगांची आठवण येते. त्यांनीही पूर्वी लाजत ओखाणे घेतले असतील. आज पुन्हा त्या ओखाण्यांतून पतीचे नाव घेतात:

मोठ्या मोठ्या नारी ओखाणे प्रेमे घेती
पतीच्या नांवी प्रीती बायकांना

चातुर्मास्यांत नाना व्रते, नाना नेम. कोणी गोपद्मे काढतात, कोणी लक्ष वाती लावतात, कोणी फुलांची, दूर्वांची लाखोली वाहतात :

वेंचायला लाग सखी दुरवा ग मातें
लक्ष मी वाहतें गणेराया

आणी एकीचे शाकाहारव्रत असते. ती जाते आपल्या मैत्रिणीकडे. मैत्रीण प्रेमाने नाना प्रकारचें फराळाचे देऊ लागते. परंतु ही म्हणते :

शाकाहारव्रत असे माझें बाई
नको देऊं भलते कांही फराळाला

आणि चातुर्मास्यातील ते निरनिराळे दिवस : ज्या दिवशी आजीबाई कहाण्या सांगते. हातात तांदूळ घेऊन सारे लहानथोर त्या कहाण्या ऐकतात :

ऐकावी कहाणी हाती घ्या तांदूळ
होईल मंगल ऐकणारांचे

नागपंचमीचा तो मंगल सण. त्या दिवशी पाटावर चंदनाचा नागोबा काढायचा. गारुडी नागोबा आणतील त्याची पूजा करायची :

नागपंचमीला नागा चंदनाचें गंध
तुटतील भवबंध पुजणारांचे

नागाची पूजा का करायची?

नागपंचमीला नागाला घाला दूध
होईच बुद्धि शुद्ध नागकृपें
नागपंचमीला नको चिरूं भाजीपाला
दया शिकवू हाताला आज सये

गारुड्याची पुंगी वाजते. नागोबाला बाळ पाहू इच्छितो. परंतु एकटा जायला भितो. ती आईच्या पाठीस लागतो. आई कोठे वाजते पुंगी त्याची चौकशी करते :

गारुड्याची पुंगी सखी कुठें ग वाजते
तेथें घेऊन मी जाते तान्हेबाळा

आणि नागपंचमीला झाडावर झोके घ्यायचे. एक स्त्री म्हणते, "इतक्या उंच उंच जाऊ की आकाशाला धक्के देऊ" :

चला सखियांनो घेऊं झाडावर झोके
आकाशा देऊं धक्के आपुल्या पाया

कोकणातील एक भगिनी देशावरची ही झोक्याची मौज पाहाते व म्हणते :

नागपंचमीला कोंकणीं नाही मजा
झोके घेती कडूनिंबा देशावर

आणि वर्षप्रतिपदेला गुढी उभारायची. शालिवाहन राजाच्या विजयाची ती खूण, ती गुढी कशासाठी उभारायची? ऐका :

गुढी पाडव्याला उंच गुढी उभवती
कुळाची कीर्ती जावी दाही दिशा

ती गुढी जणू कुळाचा मोठेपणा जाहीर करते. या कुळातील, या घरातील माणसे मनाने उंच आहेत असे जणू ती गुढी सांगते. गुढीचे वर्णन ऐका :

पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
वर खण जरीकांठी उषाताईचा
पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
चांदीची वर लोटी गोपूबाळाची

ही एक गोड ओवी देतो :

गुढी पाडव्याला घरोघर गुढी
पडूं दे माझी कुडी देवासाठी

आणि नवरात्रीचे ते नऊ दिवस. अंबा घटी बसते. नऊ दिवस नऊ माळा बांधावयाच्या. दहाव्या दिवशी विजयी अंबादेवी सीमोल्लंघनास निघते :

नऊ दिवस नवरात्र अंबामायेचा सोहळा
नऊ दिवस नऊ माळा वाहीयेल्या
नऊ दिवस नवरात्र दहावे दिवशी दसरा
अंबा निघाली उशीरां शिलंगणा

आणि आपट्याचे सोने लुटायला भाऊ जातो. घरी येतो व बहीण त्याला ओवाळते:

दसऱ्याचे दिशीं *आपट्याची लुटालुटी*
सारंगी घोडा पिटी *गोपूबाळ*

अंबाबाईला बायकांचे नवस असायचे :

नवस मी केला *मनांतल्या मनांत*
मला पावली जनांत *जोगेश्वरी*

ज्या गोष्टींसाठी नवस केला, ती गोष्ट मिळाली. आता मला नवस फेडू दे :

नवस मी केला *नवसाजोगी झाल्यें*
नवस फेडूं आले *जोगेश्वरीचा*

लहान मुलगी सासरी गेलेली. तिचा सांभाळ अंबाबाईने करावा म्हणून माता नवस करते :

नवस मी केला *अंबाबाईला कमळ*
परदेशीं तू सांभाळ *उषाताईला*
नवस मी केला *अंबाबाईला ताम्हन*
परदेशी गेली लहान *उषाताई*

अंबाबाईच्या पाया पडून स्त्री म्हणते :

आई अंबाबाई *पडते पायां लेक*
चुडे अभंग राख *जन्मवेरी*

शिमग्याच्या सणात बहिणीचे भाऊ डफ हाती घेतात. ते क्षणभर गमतीसाठी खेळी बनतात. बहीण कौतुकाने म्हणते :

शिमग्याच्या सणा *भाऊ माझे खेळी*
डफावर जाळी *मोतियांची*

अशी ही वर्णने आहेत. मिळाल्या ओव्या त्या देत आहे :

व्रते, सण वगैरे : ओव्या

पहाटे उठूं *फुलें आणूं पाटीभर*
आज आहे मंगळागौर *उषाताईची* १
पहाटेच्या प्रहररात्री *उठोनी फुलें आणूं*
मंगळागौर सजवुनी *ठेवायला* २
प्राजक्तीच्या कळ्या *करूं त्यांची अब्दागीर*

आज आहे मंगळागौर   उषाताईची   ३
का ग सखी तुझें   डोळे असे लाल
मंगळागौरीचें ग काल   जागरण   ४
वसोळ्या किती होत्या   सखी तुझ्या घरी
होत्या मैत्रीणी ग चारी   चुडेयांच्या   ५
जागवूं मंगळागौर   खेळ खेळू नानापरी
नवी नवरी माहेरी   उषाताई   ६
फुगडी खेळूं ये   तूं ग मी ग सखी
राहील ओळखी   जन्मवेरी   ७
फुगडी खेळूं ये   फिरूं ये गरगर
दणाणेल घर   बाप्पाजींचे   ८
झिम्मा खेळू ये ग   आपण मैत्रिणी जोडीच्या
आपण मैत्रिणी गोडीच्या   बरोबरीच्या   ९
दणदण फुगडी   दणाणती सोपा
खेळतां सुटे खोपा   मैत्रिणीचा   १०
गरगरा नको फिरवू   मला येते ग भोवंडी
पुरे कर ग फुगडी   नको ओढूं   ११
दणदण फुगडी   दणाणे माजघर
जागवीती मंगळागौर   उषाताईची   १२
दंडाची दंडफुगडी   तूं ग मी ग घालूं
माहेरी नाचूं-खेळू   पोटभर   १३
मोठ्या मोठ्या नारी   फुगड्या खेळतात
प्रेमानें मिसळतात   मुलींमध्ये   १४
मोठ्या मोठ्या नारी   ओखाणे प्रेमे घेती
पतीच्या नांवी प्रीती   बायकांना   १५
मोठ्या मोठ्या नारी   गाणी म्हणती गमतीची
गाजते नवरीची   मंगळागौर   १६
श्रावणी सोमवार   शिवालयी जाऊं
शिवामूठ वाहूं   पाहूं शंकराला   १७
श्रावणी सोमवार   आज शेवटील

शंकराला बेल भावे वाहूं १८
गोपझांचा नेम चातुर्मासी माझा
प्रसन्न कंथराजा माझ्यावरी १९
शाकाहार व्रत असे माझे बाई
नको देऊं भलतें कांही फराळाला २०
करायला लागा शेजी मला बोटवाती
लक्षाला पडती कांही कमी २१
वेंचायला लाग सखी दूरवा ग माते
लक्ष मी वहातें गणेराया २२
वेंचायला लाग नीलवर्णाचीं ग फुले
लक्ष मी बोलल्यें विठ्ठलाला २३
गुढी पाडव्याला उंच गुढी उभवावी
कुळाची कीर्ती जावी दाही दिशा २४
गुढी पाडव्याला गुढी उंच उभी करी
खण घाली जरतारी गोपूबाळ २५
गुढी पाडव्याला कडुलिंब खाती
आधी कडूं मग प्राप्ति अमृताची २६
गुढी पाडव्याला घरोघरी गुढी
पडूं दे माझी कुडी देवासाठी २७
पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
चांदीची वर लोटी गोपूबाळाची २८
पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
कुळाची कीर्ती मोठी बाप्पाजींच्या २९
पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
वर खण जरीकाठी उषाताईचा ३०
नऊ दिवस नऊ नवरात्र अंबायेचा सोहळा
नऊ दिवस नऊ माळा वाहियेल्या ३१
नऊ दिवस नवरात्र अंबामाय बसे घटी
मोतीयांनी भरा ओटी जोगेश्वरीची ३२
आलें नवरात्र चला पाहूं अंबाबाई

रीघ मंदिरांत नाही — भारी गर्दी — ३३

आले नवरात्र — माळेला फुलें आणूं
आरत्या रोज म्हणूं — अंबाबाईच्या — ३४

नवरात्रामध्यें — अंबाबाईचा गोंधळ
भरूं मोत्यांची ओंजळ — तिचे पायी — ३५

आज मंगळवार — देवीचा वार आला
चला शेजी दर्शनाला — राऊळांत — ३६

आज शुक्रवार — देवीचा प्रिय वार
लावूं नका हो उशीर — दर्शनाला — ३७

नऊ दिवस नवरात्र — दहावे दिवशी दसरा
अंबा निघाली उशीरा — शिलंगणा — ३८

दसऱ्याचे दिवशीं — सोने घेऊनीयां आले
दारीं भाई ओवाळीलें — उषाताईनें — ३९

दसऱ्याचे दिवशीं — माझ्या ताटामध्यें सोने
ओवाळीतें मी प्रेमाने — भाईराया — ४०

दसऱ्याचे दिवशीं — आपट्याची लुटालुटी
सारंगी घोडा पिटी — गोपूबाळ — ४१

नवस मी केला — मनांतल्या मनांत
मला पावली जनांत — जोगेश्वरी — ४२

नवस मी केला — नवसाजोगी झाल्यें
नवस फेडूं आले — जोगेश्वरीचा — ४३

नवस मी केला — अंबाबाईला कमळ
परदेशी तूं सांभाळ — उषाताईला — ४४

नवस मी केला — अंबाबाईला ताम्हन
परदेशी गेली लहान — उषाताई — ४५

नवस मी केला — अंबाबाईला कुयिरी
गेली परदेशा दूरी — उषाताई — ४६

आई अंबाबाई — भरत्यें तुझी ओटी
सांभाळ सौभाग्याची पेटी — उषाताईंची — ४७

आई अंबाबाई खण नारळ ग तुला
राख माझ्या कुंकवाला जन्मवेरी ४८
आई अंबाबाई फुलें तुला सुवासाची
काळजी कुंकवाची माझ्या घेई ४९
आई अंबाबाई पडते पायां लेक
चुडे अभंग राख जन्मवेरी ५०
आई अंबाबाई तुला सात नमस्कार
कृपा करी कंथावर उषाताईच्या ५१
शेरा सोनीयाची अंबाबाई पागोट्यांत
राख माये परदेशांत भाईरायाला ५२
शेरा सोनीयाची अंबाबाई घडवीली
देव्हाऱ्या चढवीली बाप्पाजींनी ५३
ऐकावी कहाणी हातीं घ्या तांदूळ
होईल मंगल ऐकणारांचे ५४
नागपंचमीला नागाला घाला दूध
होईल बुद्धि शुद्ध नागकृपें ५५
नागपंचमीला पाटावर काढा नाग
आजीबाई कहाणी सांग लहानथोरा ५६
नागपंचमीला लाल ग चंदनी
नाग देतसे काढोनी भाईराया ५७
नागपंचमीला नागाला लाह्या फुलें
सुखानें दोन्ही कुळें नांदतील ५८
नागपंचमीला नागा चंदनाचे गंध
तुटतील भवबंध पूजणारांचे ५९
नागपंचमीला नको चिरूं भाजीपाला
दया शिकवूं हाताला आज सये ६०
नागांची पंचमी गाणी गाऊन जागवूं
दोन्ही कुळांना वागवू आनंदांत ६१
गारुड्याची पुंगी कुठे ग वाजते
शेजीकडे पूजा होते नागोबाची ६२

गारुड्याची पुंगी सखि कुठें ग वाजते
तेथें घेऊन मी जाते तान्हेबाळ ६३

नागपंचमीला बांधीती झाडां झोके
खेळती कवतुकें नारी-नर ६४

चला सखियांनो घेऊं झाडावर झोके
आकाशा देऊ धक्के आपुल्या पायी ६५

नागपंचमीची कोंकणी नाही मजा
झोके घेती कडूलिंबा देशावर ६६

कार्तिक महिना काकड्याची वेळ
तुळशीची माळ विठोबाला ६७

शिमग्याच्या सणा भाऊ माझे खेळी
डफावर जाळी मोतियांची ६८

□ □

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

९ : ऋतुवर्णन, सृष्टिवर्णन

रसपरिचय

स्त्रियांनी उन्हाळा, पावसाळा व थंडी यांचेही वर्णन केले आहे. सूर्य, समुद्र, वसंत यांची ही वर्णने आहेत. पाऊस म्हणजे पृथ्वीचे सौभाग्य. पाऊस नाही तर काही नाही. आकाशाकडे सर्वांचे डोळे लागतात. बिरबल म्हणत असे २७ नक्षत्रांतील पावसाची नक्षत्रे वगळली तर शून्य उरते. पाऊस आला नाही वेळेवर तर हायहाय उठते:

पाऊस पडेना सुकली सारीं तोंडें
राग कां गोविंदें केला आहे
पाऊस पडेना सुकली सारीं तळी
सुकल्या वृक्षवेली रानीवनी

परंतु देवाला दया येते, आकाशात मेघ जमतात:

पडेल पाऊस बघा झाले मेघ गोळा
आला हो कळवळा देवबाप्पा

मेघांचा घिमीघिमी आवाज ऐकू येतो. पावसाळी हवा होते. मोर पिसारे उभारतात:

मेघांची आकाशीं गदी झालेली पाहून
मोर नाचे आनंदून वनामध्यें

आपल्या माहेरी पाउस पडला असेल की नाही ते बहिणी मनात आणतात. भावाचे शेतभात पिकू दे. भाऊ मग दिवाळीला नेईल :

पड रे पाऊसा पिकूं दे दाणापाणी
भाईरायाला बहिणी आठवीती

पावसाळा चांगलाच सुरू होतो. हिरवे हिरवे दाट गवत उगवते. पृथ्वी जणू जाड जोट पांघुरली आहे असे वाटते. जोट शब्द खानदेशात फार आहे :

पाऊस पडतो पडतो काळाकुट्ट
धरणीमाता हिरवा जोट पांघुरली
पाऊस पडतो थांबेना पागोळी
धरणीमाय हिरवी चोळी घालीतसे

पाऊस पडत असतो. शेतकऱ्यास विसावा नाही. कोकणात तर सारे पावसातच काम. शेतावर गेलेल्या लोकांसाठी बायका भाकऱ्या घेऊन जातात:

पाऊस पडतो ओल्या झाल्यात कामिनी
भाकरीच्या पाट्या शेता जातात घेऊनी

पाऊस पडू लागला म्हणजे मुलांना आनंद होतो. त्यांना पाण्यात नाचावे, डुंबावे असे वाटते. परंतु आई म्हणते :

येईल पडसें पाण्यांत नको जाऊं
घरांत खेळ पाहूं गोपूबाळा

मग घरातल्या पडवीत बसूनच मुले खेळतात. पागोळ्या पडत असतात. त्यांच्याखाली मुले हात धरतात :

पाऊस पडतो पागोळ्या पाणी गळे
माणीक दारीं खेळे उषाताई

कोकणात कधी कधी सारखी आठवडा आठवडा संततधार लागते. सूर्यदर्शन होत नाही :

पाऊस पडतो पडतो सारखा
सूर्य झालासे पारखा चार दिवस

कधी कधी पर्जन्य येतो, त्या वेळेस विजांचा चमचमाट होतो. कडाड कडाड आवाज होतो. धरणीमायेचा पती पर्जन्य वाजतगाजत येतो :

झाडें झडाडती विजा कडाडती
धरणी माये तुझा पति येत आहे

लहान मुले असा कडकडाट व गडगडाट होऊ लागला म्हणजे भितात. आई त्यांना कुशीत घेऊन निजवते :

मेघ गरजतो पाऊस वर्षतो
कुशींत निजतो तान्हे बाळ

पावसाळ्याचे असे मनोहर वर्णन आहे, तसेच थंडीचेही आहे. फार थंडी पडलेली असली म्हणजे फुलांच्या कळ्या नीट फुलत नाहीत. त्या आखडून

जातात:

थंडी पडे भारी फुलती ना कळ्या
आखडून गेल्या झाडावर

थंडी इतकी पडली कीं पाणी अगदी गारगार झाले. आकाशातील तारेही थंडीने थरथरू लागले :

थंडी पडे भारी तारे थरारती
करी तूं गुरंगुटी तान्हे बाळा

थंडी पडलेली असली म्हणजे ताटात किंवा शेगडीत निखारे घेऊन म्हातारी माणसे घरात शेकत बसतात :

थंडी आज भारी ताटी निखारे भरून
देऊं शेकाया नेऊन बाप्पाजींना

परंतु स्त्रियांनी उन्हाळ्याचे वर्णन केले आहे ते आता ऐका. ऊन इतके पडले आहे की दगडसुद्धा फुटून त्यांच्या लाह्या होतील :

दुपारचें ऊन दगडाच्या झाल्या लाह्या
तोंड कोमेजे देसाया भाईराया

भाईराया श्रीमंत. त्याला देसाईचे वतन आहे. त्याला ऊन सहन होत नाही. लहान मुले उन्हाच्या झळा लागून कोमेजतात :

दुपारचें ऊन झळा झळाळा लागती
बाळें माझी कोमेजती सुकुमार

अशा दुपारच्या उन्हातून एखादे वेळेस आईला कोणाकडे जायचे असते, तिच्या पायांत जोडा वगैरे नसतो. कडेवर मूल असते. भरभर तर चालवत नाही:

दुपारचें ऊन पाय ग भाजती
त्यांत बाळ कडेवरती माऊलीच्या

दुपारच्या वेळेला आई मुलांना जरा झोपविते. पाखरेही झाडांच्या गर्द छायेत शांत बसतात :

दुपारचें ऊन पांखरें शांत शांत
आईच्या मांडीवरी तान्हे बाळ ग निवांत

कधी कधी उन्हाळा इतका प्रखर होतो, की बाहेर तोंड काढवत नाही. जणू निखाऱ्यांची वृष्टी होत आहे असे वाटते.

दुपारचें ऊन बाहेर बघवेना

बाहेर निघवेना घडीभर
दुपारचें ऊन जणू इंगळांची वृष्टि
हिरवी सारी सृष्टि जळून गेली

परंतु या उन्हाळ्यातच झाडांना नवीन पालवी फुटते. वसंत ऋतू येतो. मोठे आश्चर्य आहे!

कडक उन्हाळा रानांत नाही पाणी
देव आश्चर्य करीतो झाडां पल्लव फोडूनी
आंबे मोहरले आनंद कोकिळेला
वसंताच्या स्वागताला करीतसे

अशी ही वर्णने आहेत. सकाळच्या सूर्यनारायणाचे वर्णनही मनोहर आहे. रथावर बसून सूर्य येतो. सर्वत्र प्रकाश पसरतो :

छत्र धरी शिरी त्याचा लखलखाट पडे
सूर्यनाथ चढे रथावरी

आणि एक भगिनी प्रेमाने म्हणते, सूर्यनारायण आधी माझ्या दारात उगवले व मग पृथ्वीवर त्यांचा उजेड पडला :

उगवले सूर्यदेव आधी उगवे माझ्या दारी
मग पृथ्वीवर उजेड पडे

उजाडत सूर्य लाल लाल असतो. जणू शेंदराचा गोळा :

उगवला भानु शेंदराचा थप्पा
आयुष्य मागे बाप्पा गोपूबाळ

सोनेरी किरणांचा मुकुट घालून सूर्य येतो. तो येताच साऱ्या चराचरात चैतन्य संचरते :

सूर्य उगवला किरीट किरणांचा
पांखरा फुटे वाचा झाडांवरी

बहीण सूर्यनारायणाला म्हणते, "देवा, फार तापू नकोस. भाऊ बाहेर गेला आहे. तो सुकुमार आहे."

सूर्यनारायणा तापू नको फार
बाहेर सुकुमार भाईराया

सूर्य मावळतो. विद्यार्थी पुस्तके बांधतात. गुरूला प्रणाम करून जातात :

कविता संपूर्ण झाल्या पदांची पोथी सोडी

गुरूला हात जोडी भाईराया

"पोथी सोडी" म्हणजे पोथी सोडून जातो, पोथी गुंडाळतो. पदांची म्हणजे वेदांची. वेदातील ऋचांमधील प्रत्येक शब्द संधी सोडून निराळा म्हणणे, या गोष्टीला "पदापर्यंत म्हणणे" असे म्हणतात. अमक्या भटजीने पदापर्यंत म्हटले आहे असा प्रयोग करतात.

समुद्र म्हणजे अमर्याद काव्य! बायकांनी त्याचे वर्णन केले आहे. समुद्राचे पाणी सारखे नाचते. त्याला क्षणाची विश्रांती नाही.

समुद्राच्या पाण्या स्वस्थता अणू नाहीं
नाचतें हालते सदा खालीं वर होई

समुद्र कधी आटत नाही. कारण तो सर्व प्रवाहांना जवळ घेतो, जो सर्वांना जवळ घेईल तो अमर होईल :

कोठलेहि असो पाणी समुद्र घे पोटी
उन्हाळा पावसाळा त्याला नाही कधी तुटी

समुद्र सारखा ओरडत असतो! त्याचे काय हरवले आहे? काय आहे त्याची वेदना? त्याचा एकुलता एक गोरागोमटा मुलगा चंद्र दूर जाऊन बसला म्हणून समुद्र ओरडतो:

समुद्रा रे बापा किती टाहो तूं फोडशी
पुत्र तुझा गोरा गोरा जाऊन बसला आकाशीं

अशा या समुद्राच्या लाटा सारख्या उसळत असतात. शुभ्र फेस वर येत असतो. हा फेस नाही. समुद्र आपल्या मुलग्याला, त्या चंद्राला, जणू फूले अर्पण करतो :

समुद्राच्या लाटा फेस उधळीती
गोड त्या चंद्राला जणूं फुलें अर्पिताती

ही एक काव्यमय उत्प्रेक्षा पाहा :

समुद्रा ग मध्यें लाटांचें उभें शेत
फेसाचें पीक येत अपरंपार

समुद्राचे वर्णन, त्याप्रमाणेच पावसाळ्यात दुथडी भरून जाणाऱ्या नद्यांचे वर्णन. कृष्णेचे हे वर्णन वाचा :

भरली कृष्णाबाई जशा दुधाच्या उकळ्या
जटा ठेविल्या मोकळ्या दत्तात्रेयांनी

कृष्णेच्या त्या फेसाळ लाटा म्हणजे दुधाला फुटलेल्या जणू उकळ्या! किंवा दत्तात्रेयाच्या या मोकळ्या सोडलेल्या जटा! औदुम्बर किंवा नरसोबाची वाडी येथील का हे वर्णन आहे? बहुधा नरसोबाच्या वाडीचे असावे. कारण तेथे खडक आहेत व फेसाळ लाटा कृष्णापंचगंगेच्या संगमात उसळत असतात.

ऋतुवर्णन, सृष्टिवर्णन : ओव्या

पाऊस पडेना पडेना एक थेंब
फुटेना एक कोंब धरणीला १
पाऊस पडेना सुकले नद्या नाले
गुरावासरांचे झाले भारी हाल २
पाऊस पडेना सुकलीं सारीं तळीं
सुकल्या वृक्षवेली रानींवनी ३
पाऊस पडेना देव कोपलासे भारी
देवांवाचून कोण तारी त्रिभुवनी ४
पाऊस पडेना सुकली सारी तोंडे
राग कां गोविंदे केला आहे ५
पाऊस पडेना पिकेल कशी शेती
होईल सारी माती संसाराची ६
पाऊस पडेना प्राण येती कंठी
कधी तो जगजेठी करिल कृपा ७
पडेल पाऊस बघा झाले मेघ गोळा
आला हो कळवळा देवबाप्पा ८
पावसाची चिन्हें दिसती आभाळी
मेघांची गर्दी काळी जाहलीसे ९
मेघांची आकाशी गर्दी झालेली पाहून
मोर नाचे आनंदून वनामध्यें १०
मोर नाचतांना मोर अश्रू ते गाळिती
लांडोरी चाखीती आनंदोनी ११
पड रे पाऊसा पिकूं दे दाणापाणी

भाईरायाला बहिणी आठवीती १२
पाऊस पडतो पडतो काळाकुट्ट
धरणीमाता हिरवी जोट पांघुरली १३
पाऊस पडतो थांबेना पागोळी
धरणीमाय हिरवी चोळी घालीतसे १४
पडतो पाऊस ओल्या झाल्यात कामिनी
भाकरीच्या पाट्या शेता जातात घेऊनी १५
पाऊस पडतो ओल्या झाल्यात जमिनी
या ग पेरणीच्यासाठी शेता जाती सुवासिनी १६
पाऊस पडतो पागोळ्या पाणी गळे
माणीक दारी खेळे उषाताई १७
पाऊस पडतो पडतो मुसळधार
गंगेला आला पूर दोन्ही थडी १८
पाऊस पडतो गरजे पाणी पडे
आकाश जणूं रडे रात्रंदीस १९
पाऊस पडतो पडतो सारखा
सूर्य झालासे पारखा चार दिवस २०
पाऊस पडतो विजांचा चमचमाट
धरणीमाता हिरवा थाट मांडीतसे २१
मेघ गडगडे कडाडते वीज
कुशीमध्यें नीज तान्हे बाळा २२
झाडें झडाडती वीज कडाडती
धरणीमाये तुझा पति येत आहे २३
मेघ गरजतो पाऊस वर्षतो
कुशींत निजतो तान्हे बाळ २४
पाऊस थांबेना राऊळी कशी जाऊं
त्रिदळ कसें वाहू शंकराला २५
पाऊस थांबेना देऊळी कशी जाऊं
बाळाला कशी नेऊं कडेवरी २६
पाऊस थांबेना पांखरें गारठली

आईच्या पदराखाली तान्हे बाळ २७
पाणी पाणी झालें साऱ्या अंगणांत
नको जाऊं तू पाण्यात तान्हे बाळ २८
येईल पडसें पाण्यात नको जाऊं
घरांत खेळ पाहूं गोपूबाळा २९
येईल पडसे पाण्यांत नको नाचूं
मायेला नको जाचूं तान्हे बाळा ३०
पावसाच्या मारें जणूं डोंगर वांकले
हिरव्या रुमालें झाकलें त्यांनी तोंड ३१
पाऊस पडतो पडतो थुईथुई
भिजल्या जाईजुई विठ्ठलाच्या ३२
पाऊस पडतो पडतो कोंडाकोंडा
भिजला राज्यगोंडा विठ्ठलाचा ३३
पाऊस पडतो पडतो भिरिभिरी
भिजली अब्दागिरी विठ्ठलाची ३४
पाऊस पडतो भरले नद्या नाले
भाई माझे अडकले पैलतीरा ३५
पाऊस पडतो नद्यांना आलें पाणी
देवा सुखरूप आणी भाईराया ३६
थंडी पडे भारी पाठींत निघती कळा
कुशींत तान्हे बाळा गाई करी ३७
थंडी पडे भारी पाणी झाले जसें कालें
निजली तान्हीं बाळें कुशीमध्यें ३८
थंडे पडे भारी फुलती ना कळ्या
आंखडून गेल्या झाडावर ३९
थंडी आज भारी ताटी निखारे भरून
देऊं शेकाया नेऊन बाप्पाजींना ४०
थंडी पडे भारी मळे करपले
ओठ ते ग फुटंले तान्हे बाळाचे ४१
थंडी पडे भारी फुटले तुझे ओठ

कोकमतेलाचें तूं बोट   लाव बाळा   ४२
थंडी पडे भारी   तुला बंडी मी घालीन
राही बाळा तूं निजून   अंथरुणांत   ४३
थंडी पडे भारी   तारे थरारती
करी तूं गुरंगुटी   तान्हे बाळा   ४४
दुपारचें ऊन   दगडांच्या झाल्या लाह्या
तोंड कोमेजे देसाया   भाईराया   ४५
दुपारचें ऊन   लागते रे तुला
माझ्या गुलाबाच्या फुला   गोपूबाळा   ४६
दुपारचें ऊन   झळा झळाळा लागती
बाळे माझी कोमेजती   सुकुमार   ४७
दुपारचें ऊन   पाय ग भाजती
त्यांत बाळ कडेवरती   माउलीच्या   ४८
दुपारचें ऊन   नको जाऊं तूं बाहेर
तूं रे राजा सुकुमार   फुलावाणी   ४९
दुपारचे ऊन   बाळ खेळायाला गेले
कोकंबासारखें   तोंड लाल लाल झालें   ५०
दुपारचें ऊन   कोण ग साहील
समुद्र आटेल   अशा ऊने   ५१
दुपारचे ऊन   पांखरें शांत शांत
आईच्या मांडीवरी   तान्हें बाळ निवांत   ५२
दुपारचें ऊन   बाहेर बघवेना
बाहेर निघवेना   घडीभर   ५३
दुपारचें ऊन   इंगळांची वृष्टि
हिरवी सारी सृष्टि   जळून गेली   ५४
कडक उन्हाळा   रानांत नाहीं पाणी
देव आश्चर्य करितो   झाडा पल्लव फोडूनी   ५५
कडक उन्हाळा   पाण्याचा नही पत्ता
देव आश्चर्य करितो   झाडां फुटे नवा पत्ता   ५६
छत्र धरी शिरी   त्याचा लखलखाट पडे

सूर्यनाथ चढे रथावरी ५७
उगवले सूर्यदेव आधी उगवे माझ्या दारीं
मग पृथ्वीवरी उजेड पडे ५८
सूर्य वर आला अंधार गेला दूर
दरींत करी घर भांबावोनी ५९
सूर्य उगवला किरीट किरणांचा
पांखरां फुटें वाचा झाडांवरी ६०
सविता संप्रूण झाल्या मग करावें पारणें
वाचीलें रामायण बाप्पाजींनी ६१
सविता संप्रूण झाल्या दिव्याला भरण
वाचीलें रामायण मामंजीनी ६२
सविता संप्रूण झाल्या पदांची पोथी सोडी
गुरूला हात जोडी भाईराया ६३
उगवला भानू शेंदराचा थप्पा
आयुष्य मागे बाप्पा गोपूबाळ ६४
सोनेरी किरण डोंगराच्या माथां
नमन सूर्यनाथा उजाडत ६५
सूर्य नारायणा तापूं नको फार
बाहेर सुकुमार भाईराया ६६
सूर्य नारायणा तापूं नको फार
गांवा गेले छाया कर भाईराया ६७
सूर्य नारायणा गगनीं तापशी
लोकांचे पहाशी पापपुण्य ६८
उगवला भानू भानु नव्हे हा भास्कर
त्याला माझा नमस्कार दोन्ही हाती ६९
आंबे मोहरले आनंद कोकिळेला
वसंताच्या स्वागताला करितसे ७०
समुद्राच्या पाण्या स्वच्छता अणू नाहीं
नाचतें हालतें सदा खालीं वर होई ७१
कोठलेंहि असो पाणी समुद्र घे पोटी

उन्हाळा पावसाळा त्याला नाहीं कधी तुटी ७२
समुद्रा रे बापा किती टाहो तूं फोडशीं
पुत्र तुझा गोरागोरा जाऊन बसला आकाशी ७३
समुद्राच्या लाटा फेंस उधळती
गोड त्या चंद्राला फुलें अर्पिताती ७४
समुद्रा ग मध्यें लाटांचे उभे शेत
फेसाचें पीक येत अपरंपार ७५
भरली कृष्णाबाई जशा दुधाच्या उकळ्या
जटा ठेविल्या मोकळ्या दत्तात्रेयांनी ७६

□ □

१० : पहिली माझी ओवी

रसपरिचय

फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रो. वासुदेवराव पटवर्धन मराठी शिकवीत होते. त्यांनी मुलांना विचारले, "तुम्हाला मराठीतील अभिजात छंद माहीत आहे? मराठीतील अभिजात वृत्त कोणते?" मुलांना उत्तर देता आले नाही. मग प्रो. पटवर्धन एकदम म्हणाले, "ओवी. हा मराठीतील अभिजात छंद आहे. मराठीतील महाकाव्ये याच वृत्तात आहेत. स्त्रियांनी याच वृत्तात स्वत:ची सुखदु:खे सांगितली. तुम्ही कोणी एखादी ओवी म्हणून दाखवता?" मुले हसली. कोणी ओवी म्हणेना, तेव्हा पुन्हा प्रो. पटवर्धनांनी:

पहिली माझी ओवी पहिला माझा नेम
तुळशीखालीं राम पोथी वाची

ही ओवी म्हटली व म्हणाले, "ओवी वृत्त फार गोड,"

"पहिली माझी ओवी, पहिला माझा नेम" ही ओवी कोणाला माहीत नाही! मी प्रस्तुत प्रकरणाला "पहिली माझी ओवी" हेच नाव दिले आहे.

पहिली माझी ओवी, दुसरी माझी ओवी असे करीत करीत एकविसावी माझी ओवी. येथपर्यंत मजल येते. या पद्धतीच्या किती तरी ओव्या आहेत. मोठा सुंदर प्रकार आहे हा. यात बुद्धिमत्ताही लागते. पहिल्या चरणात पहिली, दुसरी, तिसरी, असे शब्द आरंभी असतात, तर दुसऱ्या चरणाच्या आरंभी त्या त्या संख्येइतके काही तरी सांगितलेले असते. उदाहरणार्थ:

पांचवी माझी ओंवी पांच पांडवांना
पाठीच्या भावंडांना राज्य येवो

या ओवीच्या पहिल्या चरणाच्या आरंभी "पांचवी" असा शब्द आहे तर दुसऱ्या ओवीच्या आरंभी पाच पांडव असे आहे. स्पष्ट कल्पना येण्यासाठी आणखी एक ओवीं देतो:

सातवी माझी ओवी सात सप्तऋषि
कौसल्येच्या कुशीं रामचंद्र

कधी कधी दुसऱ्या चरणाच्या आरंभी संख्यादर्शक वस्तू नसून निराळीच गंमत केलेली असते:

विसांवी माझी ओवी विसांवा माहेराला
आईच्या आसऱ्याला सुखशांती

या ओवीत पहिल्या चरणात विसावी हा शब्द असल्यामुळे काही तरी वीस दुसऱ्या चरणात हवेत. परंतु विसाव्या ओवीतील 'विसावी' हा शब्द 'विसावा' या समानोच्चारक शब्दाशी जोडला आहे. अशा ओव्यांतून संख्यादर्शक वस्तू नसते. परंतु अशा ओव्या फार थोड्या आहेत.

कधी कधी या प्रकारात ओवीच्या पहिल्या चरणातील संख्यादर्शक शब्दाशी यमक आणणारा शब्द दुसऱ्या चरणाच्या आरंभी घालतात:

पहिली माझीं ओवी वहिला काळा दोरा
लिहिणाराचा हात गोरा राजबिंडा

या ओवीत 'पहिली' या शब्दाशी 'वहिला' या शब्दाचे यमकमय सादृश्य आहे.

या ओव्यांतील काही काही ओव्या फारच सुंदर आहेत. संसारात सुख पाहिजे असेल तर शेजाऱ्यापाजाऱ्यांशी प्रेमाने वागले पाहिले; दुजाभाव कमी करीत गेले पाहिजे असे एका ओवीत सांगितले आहे:

दुसरी माझी ओंवी दुजा नको भाव
तरीच पावे देव संसारात

कधी कधी तिसऱ्या व चौथ्या चरणात अर्थान्तरन्यास असे एखादे वचन असते:

नववी माझी ओंवी आहेत नवग्रह
संसारी आग्रह धरूं नये
पांचवी माझी ओंवी आपुली पांच बोटें
त्यांनी कधी कर्म खोटे करूं नये

अशी सुंदर सुभाषिते शेवटच्या चरणातून असतात.

ही एक गोड ओवी पहा:

सोळावी माझी ओंवी सोळा चंद्रकला

पतीच्या ग कला   सांभाळावें

एक बाई सांगते:

एकुणिसावी माझी ओंवी   एकोणीस वर्षे
नेलीं मी ग हर्षे   संसारात

एका स्त्रीचे हे वर्णन ऐका:

पहिली माझी ओंवी   पहिली कामाला
स्मरते रामाला   अंतरंगी

हातात काम व मुखात रामनाम अशी ही थोर सती आहे.

कधी कधी तात्त्विक विचार या ओव्यांतून असतात. योगशास्त्रातील गोष्टीही मांडलेल्या असतात. पुराणे वगैरे ऐकायला जाणाऱ्या बायकांना सारी माहिती असते:

सतरावी माझी ओंवी   सतरावीचे दूध
योगी पिती शुद्ध   समाधींत
दहावी माझी ओवी   दश इंद्रियांचा
अकराव्या मनाचा   खेळ सारा

काही ओव्यांतून सामाजिक व ऐतिहासिक गोष्टीही सांगण्यात आल्या आहेत:

पहिली माझी ओंवी   सदा एकींचे पालन
घरी बेकी होतां जाण   राज्य गेलें
अठरावी माझी ओवी   अठरापगड जाती
गांवांत नांदती   आनंदानें

गावगाडा सुरळीत चालला आहे असे ही भगिनी सांगते. तसेंच आपल्यातील दुहीने राज्य गेले असे ती बजावीत आहे.

तुकाराम महाराज्यांसारख्यांनीही पहिली माझी ओवी, दुसरी माझी ओवी या प्रकारच्या ओव्या केल्या आहेत. त्यांनाही स्त्रियांच्या वाङ्मयातील हा प्रकार आवडला असावा. या प्रकरणात तुकाराम महाराजांच्या या पद्धतीच्या दहा ओव्या दिल्या आहेत. सोवळ्या बायकांना या ओव्या येतात; स्नानाच्या वेळेस वगैरे त्या म्हणतात. शेवटच्या ओवीत तुकाराम महाराज म्हणतात:

दहावी माझी ओवी   दाही अवतारां
घाली संवसारा   तुका म्हणे

''तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हांसी'' त्याचीच येथे आठवण होते.

लोकसेवेसाठी पुन्हा पुन्हा संसारात यावयास तुकाराम तयार आहेत. भगवान बुद्धही म्हणत असत की, 'जगात जोपर्यंत कोणी दु:खी आहे, तोपर्यंत मी पुन्हा पुन्हा जन्म घेईन; कंटाळणार नाही.''

या ओव्या झोपाळ्यावर बहुधा भराभरा रचलेल्या असाव्यात. एकीने 'पहिली माझी ओवी' असे म्हटले की दुसरीचे लगेच 'दुसरी माझी ओवी' असे म्हणायचे. भराभर त्या त्या संख्या दर्शविणाऱ्या वस्तू आठवल्या पाहिजेत. नऊ म्हणताच नवग्रह, दहा म्हणताच दाही दिशा, एकवीस म्हणतांच गणपतीच्या एकवीस दूर्वा किंवा एकवीस मोदक हे पटपट आठवले पाहिजे. हा ओवीप्रकार गोड आहे खरा.

पहिली माझी ओवी

पहिली माझी ओंवी पहिला माझा नेम
तुळशीखाली राम पोथी वाची १

पहिली माझी ओंवी पहिल्यापासून
आली रथांत बसून अंबाबाई २

पहिली माझी ओंवी वहिला काळा दोरा
लिहिणाराचा हात गोरा राजबिंडा ३

दुसरी माझी ओंवी दूध नाही कोठें
ध्यानी मनीं भेटे पांडुरंग ४

तिसरी माझी ओंवी तीन त्रिकुटाच्या परी
ब्रह्माविष्णुशिवावरी बिल्वपत्र ५

चवथी माझी ओंवी चवथीच्या चंद्रा
मखमली गेंदा रंग बहू ६

पांचवी माझी ओंवी पांच पांडवांना
पाठीच्या भावंडांना राज्य येवो ७

सहावी माझी ओंवी सहावीची छाया पडे
तुझ्या गर्भा तेज चढे उषाताई ८

सातवी माझी ओंवी सात सप्तऋषि
कौसल्येच्या कुशीं रामचंद्र ९

आठवी माझी ओंवी आठ आटेपाटे

देवाजीचे ओटे   रंगवीले   १०
नववी माझी ओंवी   नऊ खंडी गहूं
फेरीला किती घेऊं   देवाजीच्या   ११
दहावी माझी ओवी   दशांगुळे मी गाईन
लक्षुमी होईन   संसारात   १२
अकरावी माझी ओंवी   अकरा हे ग गडू
जेवला बुंदीलाडू   गोपूबाळ   १३
बारावी माझी ओंवी   बारा आदितवार
सूर्याला नमस्कार   घालूं केलें   १४
तेरावी माझी ओंवी   तेरा तेरियाची
पालखी हिरियाची   देवाजींची   १५
चौदावी माझी ओंवी   चौदा चौकड्यांची
पालखी हलकड्यांची   देवाजींची   १६
पंधरावी माझी ओंवी   पंधरा की ग काड्या
रंगवील्या साड्या   सीताबाईच्या   १७
सोळावी माझी ओंवी   सोळा कोशिंबिरी
आज आहे माझ्या घरीं   भाऊबीज   १८
सतरावी माझी ओंवी   सतरा धंदे करूं नये
ऐकावें माझें सये   हितासाठी   १९
अठरावी माझी ओंवी   अठरा धान्यांचे कडबोळें
शेजीशीं बऱ्या बोलें   वाग बाई   २०
एकुणिसावी माझी ओंवी   एकूण एक करा
संसारीं नित्य स्मरा   गणेराया   २१
विसावी माझी ओंवी   विसावा माहेराला
आईच्या आसऱ्याला   सुखशांती   २२
एकविसावी माझी ओंवी   एकवीस दूर्वा आणा
वाहा देवा गजानना   लंबोदरा   २३
पहिली माझी ओंवी   जगाच्या पालका
रक्षीता बालका   देवराया   २४
दुसरी माझी ओवी   दुजा नको भाव

तरीच पावे देव संसारांत २५

तिसरी माझी ओवी भीकबाळे तीन मोती
संसारी रमापति आठवावा २६

चौथी माझी ओंवी चांडाळचौकडी
त्यांची कधी गडी करूं नये २७

पांचवी माझी ओंवी आपुलीं पांच बोटें
त्यांनी कधी कर्म खोटें करूं नये २८

सहावी माझी ओंवी सहा महाशास्त्रें
निर्मिली विचित्रें ऋषिमुनींनीं २९

सातवी माझी ओंवी सात आठवड्याचे वार
आहे हा संसार संकटाचा ३०

आठवी माझी ओंवी आठवा देवकीचा
सखा द्रौपदीचा कृष्णनाथ ३१

नववी माझी ओंवी आहेत नवग्रह
संसारी आग्रह धरूं नये ३२

दहावी माझी ओंवी आहेत दहा दिशा
चंद्रामुळें निशा शोभतसे ३३

अकरावी माझी ओंवी अकरावा अवतार
मानूं ज्ञानेश्वर आळंदीचे ३४

अकरावी माझी ओंवी अक्राळ असूर
नखरा न कर उषाताई ३६

बारावी माझी ओंवी संसारी बारा वाटा
पुण्याचा करी साठा क्षणोक्षणी ३६

तेरावी माझी ओंवी तीन तेरा होती
जरी न जपती जगीं लोक ३७

चौदावी माझी ओंवी चौदा चौकड्यांचा
नाश झाला रावणाचा गर्व होतां ३८

पंधरावी माझी ओंवी पंधरा दिवसांचा पक्ष
संसारात दक्ष राही सदा ३९

सोळावी माझी ओंवी सोळा चंद्रकला

पतीच्या ग कला सांभाळावें ४०
सतरावी माझी ओंवी सतरावीचें दूध
योगी पीती शुद्ध समाधींत ४१
अठरावी माझी ओंवी अठरा पुराणें
लिहिली व्यासानें लोकांसाठी ४२
अठरावी माझी ओंवी अठरापगड जाती
गावांत नांदीती आनंदाने ४३
एकुणिसावी माझी ओंवी एकोणीस वर्षे
नेली मी ग ह्वर्षे संसारांत ४४
विसावी माझी ओंवी विसाण पाण्याचें
निशाण रामाचें उभें केले ४५
विसावी माझी ओंवी वीस मणी खंडी
नास्तिक पाखंडी होऊं नयें ४६
एकविसावी माझी ओंवी एकवीस मोदक
तेणे सिद्धिविनायक सुप्रसन्न ४७
पहिली माझी ओंवी पहिला माझा नेम
गायिलें निधान पांडुरंग ४८
दुसरी माझी ओंवी दुजें नाहीं कोठें
पाहीन मी विटे पांडुरंग ४९
तिसरी माझी ओंवी त्रिगुण शरीरा
गाईन सोयरा पांडुरंग ५०
चवथी माझी ओंवी चतुर्भुज मूर्ती
गाईला श्रीपति पांडुरंग ५१
पांचवी माझी ओंवी पांची पराक्रम
गाईन आत्माराम पांडुरंग ५२
सहावी माझी ओंवी सहा मास लोटले
साक्षात भेटले पांडुरंग ५३
सातवी माझी ओंवी सप्त द्वीपांठायी
लक्ष्य तुझ्या पायीं पांडुरंग ५४
आठवी माझी ओंवी अठ्ठावीस युगें

विटेवरी उभे पांडुरंग ५५
नववी माझी ओंवी नवविधा भक्ति
गाईन श्रीपती पांडुरंग ५६
दहावी माझी ओंवी दाही अवतारां
घाली संवसारा तुका म्हणे ५७
चौथी माझी ओंवी चौसंगे दाटली
प्रसंगे भेटली मायबाई ५८
बारावी माझी ओंवी बारा वाटा ग संसारी
आठवा कंसारी भय नाही ५९
तिसरी माझी ओंवी तीन पावली वामन
व्यापितो त्रिभुवन देवांसाठी ६०
सहावी माझी ओंवी सहा हे ग ऋतु
वसंत परंतु त्यांचा राजा ६१
सहावी माझी ओंवी सहा तोंडे षडानना
नमूं देवा गजानना त्याच्या भावा ६२
एकटी दुसरी तिसरीला चिंधी
चवथीला बिंदी उषाताईला ६३
एकटी दुसरी तिसरीला माळ
चवथीला चंद्रहार घालूं केला ६४
पहिली माझी ओंवी पहिले वहिले
भक्ती वंदीले मायबाप ६५
पहिली माझी ओंवी पहिली कामाला
स्मरतें रामाला अंतरंगी ६६
पहिली माझी ओंवी पहिला ग पुत्र
व्हावा संसारांत म्हणतात ६७
दहावी माझी ओंवी दश इंद्रियांचा
अकराव्या मनाचा खेळ सारा ६८
बारावी माझी ओंवी बारा अक्षरांचा मंत्र
ध्रुव बाळाने पवित्र जप केला ६९
सरसकट माझी ओंवी सरसकट सहा देवां

आरती महादेवा कापुराची ७०

पहिली माझी ओंवी सदा एकीचें पालन
घरीं बेकी होतां जाण राज्य गेलें ७१

दुसरी माझी ओंवी दुहीला मिळता वाव
परक्यांनी डाव साधीयेला ७२

तिसरी माझी ओंवी लाभ तिसऱ्याचा
दोघांच्या भांडणाचा शेवट हा ७३

चवथी माझी ओवी चारांचें ऐकावें
हट्टाला सोडावें संसारात ७४

ओंवीला आरंभ केला पेटीला कप्पे कप्पे
लिहिणार माझे सख्खे भाईराय ७५

ओंवीला आरंभ केला पेटीला काळा दोरा
लिहिणाराचा हात गोरा भाईरायाचा ७६

□ □

११ : सुभाषिते

रसपरिचय

स्त्रियांच्या ज्या ओव्या मी संग्रहित केल्या त्यांतून काही सुभाषितरूप ओव्या अलग करून त्या या प्रकरणात देत आहे. इतर प्रकरणांतूनही मधूनमधून सुभाषितरूप संबद्ध ओव्या किंवा सुभाषितरूप चरण नाहीत असे नाही; परंतु काही पृथक् निवडून हे प्रकरण केले आहे.

या सुभाषितांत काही काही फारच बहारीची सुभाषिते आहेत. त्यांतून मी कोणती निवडून देऊ हे समजत नाही. परंतु काहींची चव देतो. मनुष्य पुष्कळ वेळा चांगली वस्तू जवळ असूनही तिचा त्याग करितो, प्रकाश जवळ असून अंधारात खितपत पडतो. चांगला रस्ता समोर असूनही मुद्दाम चिखलातून जाऊ बघतो :

रामाच्या नांवाचा पापी कंटाळा करीती
निवळ टाकून पाणी गढूळ भरीती

निर्मळ पाणी जवळ असूनही गढूळ पाणीच काही पसंत करतात. असे अनुभव जीवनात येतात.

स्त्रियांचे संसारासंबंधी काय मत? संसार सोडून देणे जरूर आहे का? मुमुक्षूने का संसार सोडावा? संसारात राहून मुक्त होईल तो खरा. मनुष्याची परीक्षा संसारातच राहून घ्यायला हवी :

शिकती तराया पाण्यात पडून
संसारी वावरून मुक्त व्हावें

तुम्हाला एक सुंदर सुभाषित देऊ? हे घ्या :

वाण्याच्या दुकानी भाव नाहीं कापराला
मूर्खाशीं बोलतां शीण येई चतुराला

वाण्याच्या दुकानात वस्तू पडलेल्या असतात. कोणी गिऱ्हाईक येईल तर ती द्यायची. त्याला त्या वस्तूचे मोठेसे प्रेम नसते. त्याला जर आपण म्हणू तुमच्या दुकानात केशर आहे, कस्तुरी आहे, कापूर आहे, तर तो म्हणेल, आहेत डबे

भरलेले. त्या वस्तूमुळे त्याचे हृदय थोडेच उचंबळून येते? त्याप्रमाणे मूर्खाला कितीही चांगल्या गोष्टी सांगितल्या तरी त्याचे हृदय फुलत नाही. सुंदर ओवी.

जगात सारे नाशिवंत आहे. शरीर जाणारे आहे. या जाणाऱ्या शरीराला फार कुरवाळू नका. आत्म्याकडे पहा. मानवधर्माच्या सेवेत देह झिजवा. मेलो तर आपल्याबरोबार कोण येईल? जगात मागेही काय राहील? ज्या चांगल्या गोष्टी आपण केल्या त्याच आपणाला आधार :

कुणी नाही रे कुणाचा पुत्र नव्हे ग पोटीचा
येईल कामाचा धर्म पांचा ग बोटींचा
कुणी नाहीं रे कुणाचा आत्मा नव्हे रे कुडीचा
आहे संसार घडीचा नाशिवंत

या ओव्यांतील प्रास-अनुप्रास आणि प्रसन्न रचना किती गोड आहेत!

धर्माचे सार काय? ज्या आईबापांनी वाढविले त्यांची सेवा, कृतज्ञता म्हणजेच धर्म :

वृद्ध मायबाप सेवावे पूजावे
हेच समजावें धर्मसार

क्षुद्र लोक क्षुद्रांवर ओरडतात. परंतु मोठी माणसे मोठ्यांशी मुकाबला करतात. ही गोष्ट पुढील ओवीत किती सुंदर रीतीने मांडिली आहे पाहा :

कुतरा भुंकतो मांजर देखून
गर्जतो पंचानन हत्तीसाठीं

तीर्थयात्रा वगैरे काय कामाच्या? परमेश्वर जवळ हवा. स्वत:चे जीवनच तीर्थ केले पाहिजे. परमेश्वर शेवटी हृदयात हवा :

राम राम म्हणुनी राम माझ्या हृदयात
जसें मोती करंड्यांत वागवीतें

किती सुंदर ओवी! रामाचा जप करून शेवटी जीवन राममय झाले पाहिजे. ध्येयाच्या चिंतनाने सारे जीवनच ध्येयमय झाले पाहिजे.

जगात जर मोठ्यांपुढे टुरटुर कराल तर फजिती होईल. आकाशातील नक्षत्रांनी चंद्र नसता चमकावे. परंतु चंद-प्रकाशांत ती लोपून जातील. पौर्णिमेला त्यांनी ऐट दाखवू नये. अवसेला त्यांचे राज्य :

चांदण्यांनो तुम्ही अवसें राज्य करा
थोर नसतां गलबला करावा की

पुराणातील वांगी पुराणात असे आपण नेहमी म्हणतो, परंतु तीच गोष्ट या खाली दिलेल्या ओव्यांत किती ठसकेदार रीतीने सांगितली आहे. पहा :

पुराणींच्या गोष्टी सखी पुराणी राहती
जन हे वागती यथातथा
पुराणीच्या गोष्टी देवळांत गोड
संसाराची ओढ कोणा सुटे

जगात अच्युत कोणी नाही. सर्वांना मरण आहे.

फुलें सुकतात तारे गळतात
असे कोण ग अच्युत संसारांत

स्त्रिया रोज सकाळी चूल सारवतात. आठवड्यातून एखादे वेळेस सारवून भागणार नाही. त्याप्रमाणे मनुष्यानें साधनेला स्वीकारणे जरूर आहे. कधी रामनाम घेऊन काम भागणार नाही. कधी लहर आली म्हणजे खादी घेऊन जमणार नाही. ध्येयाचा निदिध्यास हवा तरच जीवनावर संस्कार होतो :

चूल सारवीती जशी नित्य ग नेमानें
तसें मन हे भक्तीने सारवावें

बाबर बादशहा म्हणत असे की, जगाच्या खानावळीत जो जो आला त्याला शेवटी मरणाचा पेला घ्यावा लागतो. शेवटी सर्वांना मरण. माउलीच्या पोटी आलेला प्रत्येक प्राणी शेवटी धरित्रीमायेच्या पोटी जायचा आहे. रेल्वेचे तिकिट संपले म्हणजे उतरावे लागते, त्याप्रमाणे आयुष्य सरताच जगाला रामराम करावा लागतो.

तिकिट संपता सोडिली आगीनगाडी
सोडावे लागे जग आयुष्याची सरता घडी

आगगाडी, मोटार यांच्या उपमा बायका देऊ लागल्या आहेत. मोटार सारखी पो पो करीत जाते, जणू अहंकाराने धावते. पावसात सर्वांच्या अंगावर खुशाल चिखलपाणी उडविते. मोटारीतील प्रतिष्ठिताला गोरगरिबांची किंमत नाही; ही गोष्ट स्त्रिया ओव्यांतून सांगत आहेत :

पों पों ग पों पों मोटार पुढचें पाहीना
तसा कोणा जुमानीना अहंकार

स्त्रियांची भव्य कल्पना, उच्च प्रतिभा तुम्हाला पाहावयाची आहे? मुक्तेश्वरांची, किंवा इंग्रज कवी मिल्टन यांची भरारी तुम्हाला स्त्री-वाङ्मयांत पाहावयाची आहे?

ही पहा :

समुद्राच्या कांठी विष्णू वाळू मळी
घडवी बाहुली ब्रह्मदेव

या ओवीत प्रास-अनुप्रास आहे; आणि विशाल कल्पना. रोज प्राणिमात्र जन्माला येत आहेत, एखादा कुंभार एखाद्या नदीकाठी मडकी बनवितो. त्याला थोडीशी माती व थोडे पाणी पुरते. परंतु भगवान विष्णू समुद्राची न संपणारी वाळू मळतात. समुद्राचे पाणी वापरतात आणि मग त्या मळलेल्या वाळूची ब्रह्मदेव ही बाहुली बनवितो. बाहुली शब्द किती समर्पक आहे?

ज्याने जीवनात वासना स्वैर सोडल्या, ज्याच्या जीवनात संयमाला स्थान नाही, ज्याने जीवनात विषयभोगाचे मळे पिकविणे सुरू केले, त्याच्या हातून पापाशिवाय काय होणार? पापाचे कोठारच त्याच्या घरी जमा होते :

ज्याच्या दारी आहे कंदर्पाचें रोप
त्याच्या हाती सारे पाप जमा होतें

एखाद्या गर्विष्ठ बाईला एक नम्र व अनुभवी बाई म्हणते :

कोणाचें आहे कोण माझा आहे भगवान
शेवटा जाऊं दे मूर्खा तुझा अभिमान

माझा तर भगवान आहे. त्याचाच मला आधार. तू स्वतःच्या घमेंडीत असशील तर असा तुझा अभिमान होवो यशस्वी! बघ यश मिळते का! गर्वाचे घर तर खाली असते; परंतु तुझा गर्व जाणार असेल यशाच्या शिखराला तर जावो बापडा! गीतेत म्हटले आहे की धर्माचे आचरण अल्पस्वल्पही हातून झाले तरी ते कामी येते. अंधारात एखादा किरणही तारतो, समुद्रात एखादा ओंडकाही जगवितो :

इवलीशी पणती प्रकाशा देतसे
इवलेंसें पुण्य जिवा आधार होतसे

आणि या जगांत निरुपयोगी अशी वस्तू नाही. उपयोग करून घेणारा मात्र हवा. बायका आपला नेहमीचा अनुभव सांगतात:

सुंठ घासायला खापरी येते कामी
जगांत रिकामी वस्तू नाही

कोकणांत तापात खूप घाम वगैरे एकदम येऊ लागला तर सुंठीचे कुडे कौलावर घासतात. ती जी मऊ पूड होते, ती अंगाला फासतात.

बायका भांडी शक्यतो स्वच्छ ठेवतात. परंतु पुष्कळशी भांडी जरी बाहेरून स्वच्छ दिसली तरी आत काळी असतात. ह्या अनुभवामुळे स्त्रिया म्हणतात :

वरूनी आरशाचें आंत परी भांडे काळें
सर्वच जीवांचें आंत बाहेर निराळें

जो अंतर्बाह्य एकरूप आहे. असा क्वचितच एखादा महात्मा दुनियेत असतो.

संसारात कोणी सुखी होईल का? सर्वांचे मनोरथ पुरतात का? या जगात समाधान शेवटी मनात निर्मावे लागते. अभ्यासाने समाधान प्राप्त होते :

संसारी मानावें लागतें समाधान
सगळे मनींचे होईना कधी पूर्ण

आणि या दोन ओव्या पहा :

पिकतात केस गळते बत्तीशी
वासना राक्षसी जैशीतैशी
पांढुरके केस परि वासना हिरव्या
कळेना कोणाला त्या कैशा जिरवाव्या

मनुष्य म्हातारा होतो, नाक लोंबू लागते, दृष्टी कमी होते, केस पिकतात; परंतु वासना नेहमी तरुणच असते. वासना नेहमी हिरवीगारच असते. आयुष्याचा क्षय होत आला तरी माणसाला माकडे बनविणाऱ्या स्वैर वासना अक्षयच असतात!

तारुण्य अंगात मुसमुसत असते तेव्हा मनुष्य ऐटीने चालतो. त्याला सारे जग कःपदार्थ वाटते. परंतु पुढे हे यौवन गेले म्हणजे तोंडाभोवती माश्या घोंघावू लागतात. तारुण्यात तरुणींच्या भोवती युवजनांची फुलपाखरे नाचत असतात. परंतु ते सौंदर्य गेले की कोण राहतो जवळ?

नवतीची नार नार चाले दणादणा
नवती गेली निघून माश्या करीती भणाभणा

किती सुंदर आहे ओवी! शब्द कसे समर्पक आहेत!

आणि गर्जना करणाऱ्या समुद्राला एक स्त्री काय म्हणते ऐका :

समुद्रा रे बापा किती करीशी बढाई
नाही पाण्याला गोडी तिळमात्र

इंग्रजी कवी कोलेरिज् याने समुद्राचे वर्णन करताना म्हटले आहे :

Water, water everywhere
Not a drop to drink

सर्वत्र पाणीच पाणी, परंतु तोंडात एक थेंब घालण्याची सोय नाही. काय करायचे ते अपार पाणी? एखाद्या माणसाजवळ खूप संपत्ती असते. परंतु त्यांतील दिडकीही कोणाच्या कामी येत नसते! तो ऐट मिरवितो, मी श्रीमंत म्हणून तोरा मिरवतो. परंतु त्याच्या त्या मोठेपणाचा जगाला काय उपयोग?

आणि शेवटी एक ओवी देऊन हा रसपरिचय संपवितो :

गोड बाळपण गेले बागडोनी
पांखरांच्यावाणी सदोदित

नगर वाचनालय, सातारा.

सुभाषिते : ओव्या

डोंगर चढून भेटावें देवाला
यत्नानें यशाला मिळवावें १
नको ग कधींही संसारी बोलू खोटे
त्यानें गेले मोठमोठे अधोगती २
नको ग कधींही संगती दुर्जनांची
भेट ती नरकांची मृत्युलोकी ३
रामाच्या नांवाचा पापी कंटाळा करीती
निवळ टाकून पाणी गढूळ भरीती ४
माझें माझें म्हणून प्राणी संसारीं भुलतो
निवळ सोडून पाणी गढूळ भरीतो ५
साखर मुंगीला मध तो माशीला
तैसें सज्जनचित्ताला रामनाम ६
शिकती तराया पाण्यांत पडून
संसारी वावरून मुक्त व्हावे ७
वाण्याच्या दुकानी भाव नाही कापराला
मूर्खाशीं बोलतां शीण येई चतुराला ८
चंदना पडती विळखे सर्पाचे
तैसे दुर्जनांचे सज्जनांना ९
बळीचीये दारीं तिष्ठतो वामन
भक्ताचे आधीन भगवंत १०

भक्ताला जवळ दुष्टा सदा लांब
प्रल्हादासाठीं खांब स्वीकारीला ११

कुणी नाहीं रे कुणाचा आत्मा नव्हे रे कुडीचा
आहे संसार घडीचा नाशीवंत १२

कुणी नाहीं रे कुणाचा पुत्र नव्हे ग पोटींचा
येईल कामाला धर्म पांचा ग बोटींचा १३

कुणी नाहीं रे कुणाचा कशाला हसा रडा
आहे संसार बुडबुडा नाशीवंत १४

कुणी नाही रे कुणाचा कशाला खोटें बळ
संसार मृगजळ नाशीवंत १५

वृद्ध मायबाप सेवावे पूजावे
हेंच समजावें धर्मसार १६

वृद्ध मायबाप जशीं पिकलेली फळें
तयांची चरणकमळें नित्य वंदू १७

रामराम म्हणुनी जपती माझे ओठ
जिव्हेबाई घ्यावा घोट अमृताचा १८

रामराम म्हणुनी जपती माझ्या दाढा
घेई अमृताचा काढा जिव्हेबाई १९

कुतरा भुंकतो मांजर देखून
गर्जती पंचानन हत्तीसाठी २०

कुतरा भुंकतो भुंकतो भीतभीत
रानांत हुंकारत पंचानन २१

हंस धीर गति कावळे कोकलती
मूर्खांना उपेक्षिती बुद्धिमंत २२

नको तीर्थयात्रा नको चारी धामें
मुखी घ्यावी नामें विठ्ठलाचीं २३

नको तीर्थयात्रा नको सप्त पुऱ्या
मुखीं ओव्या गाव्या विठ्ठलाच्या २४

नको तीर्थयात्रा नको अन्य नेमव्रत
माझे पवित्र दैवत मायबाप २५

रामराम म्हणुनी राम माझ्या ह्वदयांत
जसे मोती करंड्यांत वागवीतें २६

चंद्राच्या प्रकाशीं लोपून जाती तारा
थोरांपुढें तोरा मिरवूं नये २७

चांदण्यांनो तुम्ही अंवसे राज्य करा
थोर नसतां गल्बला करावा कीं २८

कुत्रा भुंकतो घराच्या सभोंती
घरं रानीं गर्जती सिंहव्याघ्र २९

आज काय जालें खळें पडलें चंद्राला
कोणी पापी का संताला छळिताहे ३०

पुराणींच्या गोष्टी गोड ऐकायाला
तसें वागायला अवघड ३१

पुराणींच्या गोष्टी देवळांत गोड
संसाराची ओढ कोणा सुटे ३२

पुराणींच्या गोष्टी सखी पुराणीं राहती
जन हे वागती यथातथा ३३

आकाशामधून केवढा तारा तुटे
पतनावांचून कोणी ना जगीं सुटे ३४

फुलें कोमेजती तारे वरचे तुटती
सर्वांना आहे च्युती संसारात ३५

फुलें सुकतात तारे गळतात
असे कोण ग अच्युत संसारात ३६

चूल सारवीती जशी नित्य ग नेमानें
तसें मन हे भक्तीने सारवावें ३७

सारे बुडबुडे कांही संसारी टिकेना
हें ग मरण कुणाही कधी काळी चुकेना ३८

जो जो प्राणी आला माउलींच्या पोटीं
धरित्रीच्या पोटीं तो तो जाई ३९

तिकिट संपता सोडती आगिनगाडी
सोडावे लागे जग आयुष्याची सरतां घडी ४०

अमृत विषाचें विष अमृताचें
ईश्वराच्या इच्छे होत असे ४१
पों पों ग पों पों जशी करते मोटार
तसा जगीं अहंकार प्राणीमात्रां ४२
पों पों ग पों पों मोटार पुढचें पाहीना
तसा कोणा जुमानीना अहंकार ४३
समुद्राच्या कांठी विष्णु मळीतसे माती
ब्रह्मा घडवीतो मूर्ति नानापरीच्या ४४
समुद्राच्या कांठी विष्णु वाळू मळी
घडवी बाहुली ब्रह्मदेव ४५
वेळी सारवावें वेळीच शिवावें
हा ग देह आहे तोच सार्थक करावें ४६
वेळीच जपावें वेळच्या वेळी काम
हा ग देह आहे तोच स्मरूं मनी राम ४७
ज्यांच्या दारी आहे कंदर्पाचें रोप
त्याच्या हातीं सारें पाप जमा होतें ४८
कोणाचें कोण आहे कोण माझा आहे भगवान
शेवटा जाऊं दे मूर्खा तुझा अभिमान ४९
कोणाचें आहे कोण माझा आहे भगवान
त्याच्या ग आधारे जाऊं संसार तरून ५०
संकटांत कामा येई जो मैत्र खरा
अभंग राहे हिरा घाव पडतां ५१
इवलीशी पणती प्रकाशा देतसे
अवलेंसे पुण्य जिवा आधार होतसे ५२
सुंठ घासायाला खापरी येते कामी
जगांत निकामी वस्तू नाही ५३
वरूनी आरशाचें आंत परी भांडे काळें
सर्वच जिवांचे आंत बाहेर निराळें ५४
संकटांत कामा येईल तो खरा
त्याची कास धरा जन्मवेरी ५५

संसारी मानावें लागतें समाधान
सगळें मनीचें होईना कधी कोण ५६
संसारी मानावे लागतें सखी सुख
नाही तर सदा दुःख चोही बाजू ५७
पिकतात केस गळते बत्तीशी
वासना राक्षसी जैशीतशी ५८
पांढुरले केस परी वासना हिरव्या
कळेना कोणाला त्या कैशा जिरवाव्या ५९
फुलांत सुगंध कमळी मकरंद
हृदयीं गोविंद असो तेवी ६०
नवतीची नार नार चाले दणादणा
नवती गेली निघून माश्या करीती भणाभणा ६१
समुद्रा रे बापा किती करीशी बढाई
नाहीं पाण्याला गोडाई तिळमात्र ६२
गोड बाळपण गेलें बागडोनी
पांखराच्यावाणी सदोदित ६३
मरणाच्या वेळें रामनाम घ्यावें
त्याने मुक्त व्हावें चारी लोकीं ६४
राम राम म्हणा राम साखरेचा खडा
त्यानें माझ्या दंतदाढा गोड केल्या ६५
राम राम म्हणा राम साखरेंचा खडा
रामाचें नांव घेतां दिवस आनंदांत जावा ६६

□ □

१२ : संकीर्ण

रसपरिचय

हे शेवटचे प्रकरण. या प्रकरणात उरल्यासुरल्या ओव्या एकत्र दिल्या आहेत. एकाच विषयासंबंधीच्या ओव्या या प्रकरणात नाहीत. या प्रकरणात खिचडी आहे आणि खिचडी फार छान लागते नाही? भाताला भाजीबिजीची जरुरी; परंतु खिचडीस निराळे तोंडी लावणे लागतच नाही.

या संकीर्ण प्रकरणात तुम्हाला मजामजा मिळेल. बोरीबंदरावर आगगाडी सुरू झाली. मुड्डम तेथे दिसली; साहेबांच्या बायका म्हणजे आमच्या बायकांना मोठे कुतूहल. बोरीबंदरावर सारे पदार्थ मड्डमीणबाईला या ओव्यांतून खायला दिले आहेत. इंग्रजांनी गाडी आणली. ही बिनबैलाची गाडी ढकलू लागला. एका महाराष्ट्र शाहिराने :

साहेबाचा पोरगा मोठा अकली रे
बिन बैलाने गाडी कशी ढकली

हे गाणे केलेले अनेकांना माहीत असेल. मागील सत्याग्रह-संग्रामात हे गाणे महाराष्ट्रभर पसरले होते; परंतु स्त्रियांनीही आपल्या ओव्यांत तोच भाव प्रकट केला आहे पाहा :

आगीनगाडी बिगिनगाडी गाडीला डबे डबे
बैलाविण चाले निघे रूळावरी

आणि ही गमतीची ओवी वाचा :

बोरीबंदरावर मड्डम खाते बिस्कुट
आगगाडीचें फिरलें मुस्कुट रूळावरी

दळणाच्या पुष्कळ ओव्या या प्रकरणात दिल्या आहेत. दळण व कांडण पूर्वी घरोघरी चाले. दळण तर चालेच चाले. दळणाचे श्रम ओव्या म्हणताना बायका विसरत. श्रमातून हे वाङ्मय निर्माण झाले. मुंबईला एखादा मोठा दगड उचताना कामगार गाणे म्हणतात. या दळणाच्या ओव्या हृद्य आहेत. अनेक भावना त्यातून आहेत. दळण संपत यावे. सुपाच्या कोपऱ्यात आता चिमुटभर दाणे राहिले आहेत; श्रमणाऱ्या त्या बायांना आनंद होतो. देव आठवतो :

सरले दळण राहीलें सुपाकोनी
विठ्ठल रखुमाई गायीली रत्ने दोन्ही

महाराष्ट्राची विठोबा-रखुमाई ही आवडती दैवते.

नेहमी शुभ बोलावे. दळण सरले असे कधी म्हणू नये. दळण तर रोज उठून हवे, सासरी-माहेरी किती तरी मंडळी. भरलेली घरे. एक स्त्री सांगते :

सरलें दळण सरलें म्हणूं नये
सासर-माहेर नांदतें माझें सये

दळता दळता हात दुखू लागतात. कष्ट होतात. परंतु पोक्त बाई तरुण मुलीला म्हणते :

सरलें दळण दळून दमलीस
सीतेलाही होई संवसारी वनवास

सीतेलाही कष्ट भोगावे लागले; मग आपली काय कथा?

दळताना शेजारचीही बाई एखादे वेळेस प्रेमाने हात लावायला येते. दळण पटकन् होते. जाते जड जात नाही; दळण संपत आले म्हणजे ती बाई कृतज्ञतेने म्हणते :

सरलें दळण घालूं शेवटचा घास
असाच हात लावी शेजी तुझी मला आस

किती गोड व सहृदय ओवी! शब्दरचनाही कर्णमधुर अशी आहे.

बायका नेहमी दळतात. परंतु ज्या जात्यावर दळायचे त्या जात्याचे कौतुक त्यांनी केले आहे का? ते जाते पाहून त्यांची प्रतिभा स्फुरली का? होय; स्फुरली बरे. जाते, जात्याचा खुंटा व जात्यावर ओव्या म्हणणाऱ्या सावळ्या सुंदरीचा गोड गळा सारे एका ओवीत आणले आहे पाहा :

जाते कुरुंदाचें खुंटा आवळीचा
गळा माझ्या सावळीचा आहे गोड

कुरुंदी दगडाची ती तांबडट जाती जरा हलकी येतात. सुंदर बांगड्या असलेला हात जाते ओढत आहे!

जाते कुरुंदाचें खुंटा पाषाणाचा
वर हात कांकणाचा उषाताईचा

पाषाणाचा खुंटा कसा असेल ते देव जाणे! एखादा दगडी खुंटाच बसलेला असे की काय?

जात्याच्या तोंडाला दिलेली सुंदर उपमा वाचा :

जातियाचें तोंड जशी खोबऱ्याची वाटी
याचा कारागिरी नांदतो बालेवाटी
भुकेला ब्राह्मण पोटाला हात लावी
दुरून घर दावी भाईरायाचें

गावात परप्रांतीय भिक्षुक ब्राह्मण येतात. त्यांना देशवारकरी म्हणतात. एखादी सासुरवाशीण ओसरीत येते. भुकेलेला ब्राह्मण पोटाला हात लावतो. परंतु येथे जेवायला रहा असे सांगायला ती सासुरवाशीण धजत नाही. तिच्या मनांत कितीही असले तरी सासूसासऱ्यांच्या हवे ना? ती आपल्या भावाचे घर ब्राह्मणाला दाखवते. आपला भाऊ उदार आहे, तो नाही म्हणणार नाही असा तिचा आत्मविश्वास असतो. भावाविषयी किती हे प्रेम :

देवा मी दुबळी नेसेन धाबळी
येईन राऊळीं तिन्हीं सांजा

एक म्हातारी आजीबाई म्हणते :

गांव बिघडला सारे झाले गुंड
कोपेल वक्रतुंड गजानन

एक स्त्री आपुल्या गावची स्थिती वर्णिते :

गावातील मोठमोठे लोकही जर मोहाला बळी पडू लागले तर आशा तरी कोणती?

गांव बिघडला गांवाची गेली शोभा
मोठमोठे लोक लोभा गुंततातीं

आणखी एक ओवी सांगू ? प्रत्येक गावांत मारुतीचे देऊळ असतेच. मारुती ब्रह्मचारी-जितेंद्रिय. गावात मारुती असणे याचा अर्थ गावाने संयमी व्हावे, राम सेवक व्हावे परंतु :

गांव बिघडला झाले सारे व्यभिचारी
कोपेल ब्रह्मचारी मारुतिराय

असे ही भगिनी सांगत आहे.

"पहाटेच्या प्रहर-रात्री" हा पहिला चरण असलेल्या बऱ्याच ओव्या या प्रकरणात दिलेल्या आहेत. ही ओवी ऐका :

पहांटेंच्या प्रहररात्रीं कोण राणी ओंव्या गाते

पुत्राला नीजविते   उषाताई

पहाटे काकडआरत्या सुरू होतात, देवळात झांजा वाजतात. काशाच्या धातूचे कर्णे वाजतात :

पहाटेच्या प्रहरी   कर्णा वाजतो मंजुळ
दह्या-दुधाची आंघोळ   विठ्ठलाची

तिन्ही सांजा झाल्या म्हणजे भिक्षा घालू नये. विशेषत: भिकारणी जोगिणींना घालू नये. त्यांची मुलाबाळांवर दृष्ट पडायची एखादी.

तिन्ही सांजा झाल्या   उंबऱ्याला रक्षा
जोगिणीला भिक्षा   घालूं नये

हल्लीच्या मुलींवर ओव्यांतून टीका झाली आहे.

हल्लींच्या मुलींना   काम नको डोळ्यांपुढे
लक्ष लिहिण्याकडे   उषाताईचें

वाकडे भांग हवेत, कुंकू आहे नाही असे बारीक; खोपा घालण्याऐवजी केसांची चकरे करायची, या सर्वांवर टीका आहे :

हल्लीच्या बायका   चकरें घालीती
वर फुल ते खोविती   शेवंतीचें

घरात आता घड्याळे आली आहेत. मुंबई टाइम, मद्रास टाइम हा फरकही समजू लागला :

मुंबई मद्रास   मागे पुढें तास
किती वाजले तपास   गोपूबाळा

बायकांना कुंकवाचे वेड. सौभाग्याचे ते चिन्ह. ते कुंकू सर्वांना पाठवायची हौस; बहिणीला पाठवीन, मामींना पाठवीन, वन्संबाईना पाठवीन. ह्या सौभाग्यचिन्हाला सर्वत्र धाडू दे, सदिच्छा प्रकट करू दे

कुंकू मी वांटीन   भरीन कचोळा
धाडीन आजोळा   मामीबाईला

गावातील सर्वांना बोलावून त्यांना कुंकू वाटायचे. मग बाहेरगांवच्या नातलगांना, मैत्रिणींना नको का धाडायला?

ही एक विनोदप्रचुर ओवी ऐका :

वऱ्हाड्यांत वऱ्हाडी   गोपूबाळाची हुषारी
लग्नी अच्छेर सुपारी   पुरविली

गोपूबाळ मोठा हुशार. अच्छेर सुपारी त्याने पुरविली.

बैठकीच्या तबकात अत्तरदाणी, गुलाबदाणी व लवंगा, वेलदोडे, जायपत्री, सुपारी, कात वगैरे ज्यात असते तो चौफुला-सर्वांचे वर्णन पहा कसे खुमारीने केले आहे :

अत्तरदाणी गुलाबदाणी   या दोघी ग सवती
दोघींना एक पति   चौफुला तो

चौफुला शब्द पुल्लिंगी आहे. अत्तरदाणी, गुलाबदाणी स्त्रीलिंगी, त्या जणू चौफुल्याच्या बायका!

एका तरुणाला कोणी तरी म्हणते :

अत्तरदाणी गुलाबदाणी   पाचूपेट्या पिंगारदाणी
आहे हौशी तुझी राणी   गोपूबाळा

तुझी राणी मोठी हौशी आहे. सारे तिला हवे. अंगावर पाचूपेट्या हव्यात, अत्तरदाणी-गुलाबदाणी जवळ हवी. विडा खाऊन पीक टाकायला पिकपाणी हवी. रंगेल आहे तुझी राणी. पिंगारदाणी म्हणजे पीकदाणी.

कधी कधी रूपकात्मक अशा अध्यात्मपर ओव्या आढळतात :

काय सांगू सखे   आंबा पिकलासे टिक्षी
येतील गरुडपक्षी   घेऊन जाती

हा कोठला आंबा? गरुड कोण? आंबा पिकला म्हणजे आयुष्य सरत आले, म्हातारपण आले, केस पिकले, जीवनही जणू पिकले. गोड झाले. काम-क्रोधाचा आंबटपणा जाऊन विचाराचा मधुर रस जीवनात भरला. आता विष्णूचे दूत येतील व हे फळ घेऊन जातील.

रस्त्यात कुंकवाची पुडी वगैरे सापडली तर पतीला भरपूर आयुष्य लाभेल असे स्त्रिया मानतात.

कुंकवाचा पुडा   अक्काबाईला सापडला
आयुष्याचा लाभ झाला   तिच्या कंथा

ओव्या झोपाळ्यावर बसून म्हणायच्या. त्या झोपाळ्याचे वर्णन नाही का केले स्त्रियांनी? हो, केले आहे तर! झोपाळ्याला त्यांनी दादा म्हटले आहे. लहान मुले आईला झोपाळ्यावर घेऊन बस असे सांगतात. माता म्हणते :

झोंपाळ्या रे दादा   आम्हांला तुझा लळा
चैन पडेना बाळाला   तुझ्याविण

झोपाळा तुटला म्हणजे मुलाबाळांची निराशा. मग ती बापाच्या पाठीस लागतात. बाप पुन्हा बांधून देतो.

झोपाळा तुटला आम्ही बसुं कशावरी
दुसरा बांधा दारी बाप्पाराया

आणि एखाद्या विलासिनीच्या घरच्या झोपाळ्याचे वर्णन ऐकायचे आहे ?

झोपाळा चंदनाचा त्याला पाचूचें दिलें पाणी
गंजीफा खेळे राणी गोपूबाळाची

चंदनाच्या झोपाळ्याला पाचूचा रंग दिला आहे. हिरवा रंग दिला आहे. त्यावर बसून आवडती बायको पतीबरोबर गंजीफा खेळत आहे!

असे. हे संकीर्ण प्रकरण नाना रसांचे आहे. ते गोड करून घ्या ही विनंती.

संकीर्ण : ओव्या

मेहुण मला हवें आवडीचीं दोघे
पुढें कंथ तूं मागें रखुमाई १
मेहुण मला हवें राधा-दामोदर
भवानी-शंकर चौघे यावीं २
लांब लांब केस विठोबा तेलंग्याचे
चारी खूर पलंगाचे झांकीयेले ३
आम्ही सहा जणी सहा गांवीच्या खारका
मध्यें नांदते द्वारका तुळसादेवी ४
आम्ही चौघी जणी चार बाजूंचे कळस
मध्यें शोभते तुळस मायबाई ५
अंगाईचे घरी मंगाई राखण
संवगाईचें दुकान रस्त्यावरी ६
बोरीबंदरावर मड्डम खाते पेरू
आगीनगाडी केली सुरू इंग्रजांनी ७
बोरीबंदरावर मड्डम खाते केळ
आगीनगाडीची झाली वेळ रूळावरी ८
बोरीबंदरावर मड्डम खाते संत्र

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आगिनगाडीचें मोडलें यंत्र रूळावरी ९
बोरीबंदरावर मड्डम खाते काकडी
आगीनगाडी झाली वांकडी रूळावरी १०
बोरीबंदरावर मड्डम खाते बिस्कुट
आगीनगाडीचें फिरले मुस्कुट रूळावरी ११
बोरीबंदरावर मड्डम पीते चहा
आगीनगाडी आली पहा रूळावरी १२
आगीनगाडी बिगिनगाडी गाडीला डबे डबे
बैलावीण चाल नीघे रूळावरी १३
तारूं लागलें बंदरा भाईरायांना ग सांगा
वेलदोडे लवंगा स्वस्त झाल्या १४
सरलें दळण उरला एक दाणा
गोकुळी कृष्णराणा यशोदेचा १५
सरलें दळण राहीलें सुपाकोनी
विठ्ठल-रखुमाई गाईलीं रत्ने दोन्ही १६
सरलें दळण सरलें म्हणूं नये
सासर माहेर नांदतें माझें सये १७
सरलें दळण सरत्या पुरत्या गंगा
येथून नमस्कार काशीच्या ज्योतिर्लिंगा १८
सरलें दळण मी आणीक घेणार
बैल कोटीचे येणार विठ्ठलाचे १९
सरलें दळण पुन्हां घेतलें पायली
लक्ष तुळस वाहिली विठ्ठलाला २०
सरलें दळण दळून दमलीस
सीतेलाही होई संसारीं वनवास २१
सरलें दळण घालूं शेवटचा घास
असाच हात लावी शेजी तुझी मला आस २२
सरलें दळण राहिला राइरा
विठ्ठल सोयरा पंढरीचा २३
दळण मी दळी पीठ आलें मोदकाचें

जेवण वैदिकांचे पांडुरंग २४
दळण दळत्यें उरला चाराचुरा
मोत्याचा लावूं तुरा विठ्ठलाला २५
दळण दळत्यें दळत्यें रवा-पिठी
पाहुणे जगजेठी पांडुरंग २६
भुकेला ब्राह्मण सांगतें ऐक खूण
माडीवरी वृंदावन तुळशीचें २७
भुकेला ब्राह्मण पोटाला हात लावी
दुरून घर दावी भाईरायाचें २८
भुकेला ब्राह्मण कोरण मागतो डाळीचें
घर लेंकूरवाळीचें उषाताईचें २९
काशीस मी गेल्यें काशीकर झाल्यें
कागद धाडीयेले गांवोगांव ३०
देवा मी दुबळी नेसेन धाबळी
येईन राऊळी तिन्हीसांजा ३१
देवा मी दुबळी वारियानें जातें
आधार तुझा घेतें पांडुरंगा ३२
झोळाईला पातळ सोमजाईला झुण्णा
या दोघी सास्वासुना वावरती ३३
वाटेवरला आंबा मोहरानें डुले
कौलानें बोले जोगेश्वरी ३४
नणंदा वन्संबाई आपुला मान घ्यावा
मला आशीर्वाद द्यावा चुडेयांना ३५
चैत्र मासीच्या रांगोळ्या प्रकारांच्या
नणंदा झणकाऱ्याच्या उषाताईंच्या ३६
माझ्या धावण्याला तुम्ही धांवा जगजेठी
द्रौपदीबाई मोठी मी तो बहीण धाकुटी ३७
माझ्या धावण्याला तुम्ही धांवा चक्रपाणी
तुमच्यावरून माझा देह ओवाळणी ३८
दुरून दिसते तातोबाची माडी लाल

सीताबाई बाळंतीण शालीचे दिले पाल ३९
वाजंत्री वाजती नदीच्या तीरावरी
देवा महादेवावरी अभिषेक ४०
काळी कपिला गाय दुधाला अधिक
त्याचा तुला अभिषेक महादेवा ४१
गांव बिघडला झाले सारे व्यभिचारी
कोपेल ब्रह्मचारी मारुतिराय ४३
गांव बिघडला सत्याची नाहीं चाड
कोपेल गोविंद श्रीगीतेचा ४४
गांव बिघडला सत्याला नाहीं मान
कोपेल भगवान शेषशायी ४५
गांव बिघडला जसे कावळे भांडती
कोपेल लक्ष्मीपति नारायण ४६
गांव बिघडला गांवाची गेली शोभा
मोठमोठे लोक लोभा गुंतताती ४७
गांव बिघडला मानीना कोणी कोणा
जो तो म्हणे मी शहाणा सभेमाजी ४८
माझ्या घरीं ग पाहुणा पाहुणा नव्हे बाई
नणंदा वन्संबाई पति तुमचे ४९
पहाटेच्या प्रहररात्रीं कोण राणी ओव्या गाते
पुत्राला निजवीते उषाताई ५०
पहांटेच्या प्रहररात्रीं कोंबडा आरवला
गोसावी फेरी आला दत्तात्रेय ५१
पहांटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो काशाचा
महालक्ष्मी मातेचा रथ फिरे ५२
पहांटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो मंजुळ
दह्यादुधाची आंघोळ विठ्ठलाची ५३
पहांटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो झाईझाई
रामरायाच्या स्नानाला जागे व्हावे गंगाबाई ५४
पहांटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो कांचेचा

महालक्ष्मी मातेचा   रथ फिरे   ५५
तिन्हीसांजा झाल्या   उंबऱ्याला रक्षा
जोगिणीला भिक्षा   घालूं नये   ५६
तिन्हीसांजा झाल्या   उंबऱ्याला माळ
जोगिणीला डाळ   घालूं नये   ५७
तिन्ही सांजा झाल्या   उंबऱ्याला कणा
जोगिणीला दाणा   घालू नये   ५८
लांबून दिसली   मला वाटे माझी आई
भेटायास आली   चुलत काकूबाई   ५९
आपण गुज बोलूं   डाळिंबीखालती
मी लेक तू चुलती   मायेपरी   ६०
आपण गुज बोलूं   कशाला हवी शेजी
गुजाजोगी आहे माझी   काकूबाई   ६१
जातें कुरुंदाचें   खुंटा आवळीचा
गळा माझ्या सांवळीचा   आहे गोड   ६२
जाते कुरुंदाचें   खुंटा पाषाणाचा
वर हात कांकणाचा   उषाताईचा   ६३
जातियाचें तोंड   जशी खोबऱ्याची वाटी
याचा कारागीर   नांदतो बालेघाटीं   ६४
वेदशाळेमध्यें   पाहीले कावळे
धैर्य ते मावळे   बाप्पाजींचे   ६५
गणपतीला नैवेद्य   बदामांचा शिरा
पालगडगांवचा हिरा   पंढरीबाळ   ६६
गौरी बाळंतीण   उन्हाळयांत झाली
कांचेची माडी केली   शंकरांनी   ६७
बाळपट्टी खण   पट्टीला चवल
शिंपी करतो नवल   चोळीयेचें   ६८
हल्लींच्या मुलींना   काम नको डोळ्यांपुढे
लक्ष सदा लिहिण्याकडे   उषाताईचें   ६९
मला हौस मोठी   वांकड्या भांगाची

भाळी टिकली कुंकवाची	तिळाएवढी	७०
देव देवळांत	कृष्ण कमळांत	
भानु आभाळांत	चंद्रसूर्य	७१
दिवस गेला कामाखालीं	रात्र झाली आनंदाची	
पोथी वाचली गोविंदाची	दादारायांनी	७२
संकष्टी चतुर्थी	माझा आहे नेम	
भाचा गंगेन ब्राह्मण	गोपूबाळ	७३
हल्लींच्या बायका	चकरें घालिती	
वर फूल तें खोविती	शेवंतीचे	७४
शंकराला बेल	विष्णूला तुळस	
दवडा आळस	सर्वजण	७५
सूर्योदयापूर्वी	करी प्रातःस्नान	
जाईल सारा शीण	गोपूबाळा	७६
सूर्योदयापूर्वी	करी प्रातःस्नान	
कर रामनाम	मंत्र जप	७७
समईत घाली	उषाताई तेलवात	
करी सांजवात	देवापाशीं	७८
चांदीचे ताटांत	नैवेद्य आणीला	
डोळे भरून पाहिला	वनमाळी	७९
तांब्याच्या टोपांत	उडदाचें वरण	
एकादशीचे मरण	मज यावे	८०
आठा दिशीं सोमवार	शिवण झालें बंद	
कशिद्याचा तुला छंद	उषाताई	८१
पहांटेच्या प्रहररात्रीं	धुमधुंम डेरा वाजे	
कृष्णाला ने ग राधे	गोकुळांत	८२
घड्याळ पाहतां	वाजलेले तीन	
वहिनी उठून	चहा करी	८३
वन्संबाईना ती वेणी	जाऊबाईना तो खण	
हलव्याला दिली गोण	जांवयाला	८४
भाऊ माझा एक	भावजया किती	

सोळा सहस्त्र गोपी भुलवील्या ८५
मामाराया घर बांधी सुतारांना दिल्या मिरच्या
घरांत आल्या टेबल खुर्च्या मामारायांच्या ८६
माझ्या ओटीवर कागदांचा केर झाला
लिहिणार कोठें गेला गोपूबाळ ८७
माझ्या दारावरनं दुर्वांच्या पाट्या जाती
आजोबांची भक्ति मोठी गणपतीची ८८
माझ्या दारावरनं बेलाच्या पाट्या जाती
शिवाची भक्ति मोठी बाप्पाजींना ८९
कुंकू मी करीन भरीन खिशांत
धाडीन देशांत ताईबाईला ९०
कुंकू मी वांटीन भरीन करंडा
धाडीन नणंदा वन्संबाईना ९१
कुंकू मी वांटीन भरीन कचोळा
धाडीन आजोळा मामीबाईला ९२
कुंकू मी वांटीन भरीन बोगणी
धाडीन बहिणी अक्काबाईला ९३
जाईच्या फुलांचा वास येतसे सुंदर
रामरायाचें मंदिर वाटेवरी ९४
आधीं नमन करू चिंचेच्या पानावरी
विष्णूच्या कानांवरी गोष्टी गेल्या ९५
वऱ्हाड्यांत वऱ्हाडी गोपुबाळ हा नटवा
मिरवी खांकेस बटवा सुपारीचा ९६
वऱ्हाड्यांत वऱ्हाडी गोपूबाळाची हुषारी
लग्नीं अच्छेर सुपारी पुरविली ९७
अत्तरदाणी गुलाबदाणी या दोघी ग सवती
दोघींचा एक पति चौफुला तो ९८
अत्तरदाणी गुलाबदाणी कांचेचा हिरवा पेला
पाण्यांत बंगला केला इंग्रजांनी ९९
अत्तरदाणी गुलाबदाणी पाचूपेट्या पिंगारदाणी

आहे हौशी तुझी राणी   गोपूबाळा   १००
समुद्राचे काठीं   दर्भाचें आसन
तेथें तुमचें संध्यास्नान   काकाराया   १०१
काय सांगू सखे   आंबा पिकलासे टिकशी
येतील गरुडपक्षी   घेऊन जाती   १०२
काय सांगू सखे   आंबा पिकला डहाळी
नेतील गरुडमाळी   वेळ होता   १०३
समुद्राच्या काठीं   कुवारल्यांची दाटी
परकर-चोळ्या वांटी   अक्काबाई   १०४
कुंकवाचा पुडा   अक्काबाईला सांपडला
आयुष्याचा लाभ झाला   तिच्या कंथा   १०५
देवांचा देव्हारा   फुलांनी सजवीला
मंत्रांनी पूजीला   बाप्पारायांनी   १०६
हरिश्चंद्र राजा   तारामती राणी
डोंबाघरीं पाणी   भरताती   १०७
व्याह्यांच्या पंगतीला   केलां साखरभात
मुदळ्याजोगा हात   वैनीबाईचा   १०८
वैनीबाई सुगरिणी   तुझा हिंग करपला
कचेरीस वास गेला   भाईरायाच्या   १०९
नाकीची ग नथ   पडली घंगाळांत
मैना गुंतली संसारांत   वैनीबाई   ११०
दुपार संपली   झाली संध्याकाळ
हातीं घेती जपमाळ   जपावया   १११
माझ्या घरीं ग पाहुणे   दत्तात्रेयस्वामी आले
पादुका विसरले   पंचवटी   ११२
माझ्या घरीं ग पाहुणे   दत्तात्रेय दिगंबर
चंदनें देवघर   सारवीलें   ११३
पंचवटीमध्यें   पिवळें झाड केतकीचें
रामापरीस सीतेचें   गोरेपण   ११४
ब्राह्मणाच्या मुली   तुला कामाचा कंटाळा

 / साने गुरुजी

कुंकवाची चिरी तुझ्यापारोशाकपाळा११५

माझे अंगणांत भात भात मोजिला खंडी खंडी
लुगडें घेती रेवदंडी काकाराया ११६

नागोबा माझे बाप नागिन माझी आई
लांडें पुच्छ माझे भाई सुखी राही ११७

नागिन ग बाई तुझा नागोबा कोठें गेला
गारुड्यानें नेला खेळावया ११८

देहाचा देव्हारा त्याला आत्म्याचें कुलूप
हिंदुस्तानांत मुलूख भाईरायाचा ११९

मुंबई मद्रास मागे पुढें तास
किती वाजले तपास गोपूबाळा १२०

झोंपाळ्यावर बसू म्हणू ओंव्या परी
गंमत खरोखरी होई किती १२१

झोपाळ्या रे दादा तुला सदैव लांबवूं
गोड गोड ओंव्या गाऊं तुझ्यावर १२२

झोंपाळ्या रे दादा मुलांना आवडसी
मागेंपुढें नाचतोसी आनंदाने १२३

झोंपाळ्या रे दादा आम्हांला तुझा लळा
चैन पडेना बाळाला तुझ्यावीण १२४

झोंपाळा बांधीला ओसरी माजघरी
खेळती त्याच्यावरी मुलेंबाळे १२५

झोंपाळ्यावर बसूं झोंपाळ्याचा नाडा
चिरेबंदी वाडा मामंजींचा १२६

झोंपाळा तुटला आम्ही बसूं कशावरती
दुसरा बांधा दारी बाप्पाराया १२७

झोंपाळा चंदनाचा त्याला पाचूचें दिलें पाणी
गंजीफा खेळे राणी गोपूबाळाची १२८

झोंपाळ्या रे दादा हेलपडे खाशी
आम्हांला आज्ञापीशी उठावया १२९

□ □

पूज्य साने गुरुजी
यांची आम्ही प्रकाशीत केलेली पुस्तके

सती

क्रांती

तीन मुले

स्त्रीजीवन

राष्ट्रीय हिंदुधर्म

राष्ट्रीय समाजधर्म

त्यागातील वैभव

मुलांसाठी फुले

सोनसाखळी

सुंदरकथा

शबरी

सर्व वयोगटांतील वाचकांवर संस्कार करणारी ही
पुस्तके आपल्या संग्रही असायलाच हवीत.

आपली मागणी आजच पाठवा.

इंद्रायणी साहित्य
२७३, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४५८५९८

साने गुरुजींचा मुला-मुलींशी आणि तरुणांशी सहज-संवाद होत त्यांनी मुलां-मुलींना 'गोड गोष्टी' आणि अमोल गोष्टी सांगितल्या. असंख्य तरुणांना स्वातंत्र्यासाठी लढण्याची त्यांनी प्रेरणा दिली. साने गुरुजींनी सुंदर पत्रांतून मुलामुलींना 'शेतात डुलणारी पिके, झुळझुळ वाहणाऱ्या नद्या, उंच उंच डोंगर, अथांग सागर पहावा आणि धरतीची लेकरे व्हावे', असे सांगितले. रानफुले आणि पक्षी यांचे सौंदर्य आणि पावित्र्य हे सांगून आपल्याकडील सणावारांतून आपला समाज एक कुटुंब होऊन आनंदाने कसा जगत होता याचे चित्र गुरुजींनी मुलांमुलींसमोर उभे केले. साने गुरुजींच्या गोष्टी ऐकताना, वाचताना मुलंमुली रंगून जात आणि त्यांना साने गुरुजी सांगत की, 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे.'

साने गुरुजी फार प्रेमळ होते आणि त्याच बरोबर कोणी अन्याय केला की ते संतापून उठत. भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते, या विरुद्ध साने गुरुजींच्या मनात संतापाचा आगडोंब उठे आणि आपल्या भाषाणांतून ते तरुणांना सांगत 'येथून तेथून सारा पेटू दे देश, उठू दे देश.' स्वतंत्र भारत एक कुटुंब म्हणून प्रेमाने नांदेल, आजपर्यंत ज्यांना आपण अस्पृश्य म्हणून दूर ठेवले त्यांना जवळ घेईल, सर्व धर्माचे लोक बंधुभावाने एकत्र राहतील, असे स्वप्न साने गुरुजींनी तरुण पिढीपुढे ठेवले.

साने गुरुजींचे साहित्य हे आपले वैभव आहे, कधी न संपणारा हा आनंदाचा ठेवा आहे. मुलांनी हा आनंद लुटावा म्हणून 'इंद्रायणी साहित्य' ने साने गुरुजींनी लिहिलेली 'तीन मुले', 'क्रांती', 'सती' आणि 'स्त्रीजीवन' या सारखी अनेक पुस्तके साने गुरुजींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रकाशित केली आहेत.

- प्रा. ग . प्र . प्रधान